**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी)**

**अशासकीय कामकाज - ठराव**

**तालिका सभापती** : आता अशासकीय ठराव घेण्यात येतील. आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेत अनुक्रमांक 1 वर दाखविलेला सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचा अशासकीय ठराव थोड्या वेळानंतर घेण्यात येईल. त्या आधी अनुक्रमांक 2 वरील सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे यांचा अशासकीय ठराव घेण्यात येईल.

**पृ. शी.** : राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण

**मु. शी.** : राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण या विषयावरील डॉ. सुधीर तांबे, वि. प. स. यांचा ठराव

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे यांनी आपला ठराव मांडावा.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे यांनी हा अशासकीय ठराव मांडू नये असा माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे हे सत्ताधारी बाकावरील सदस्य आहेत. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये 10 लाख लोकांना रोजगार व स्वयंरोजगार देण्याची घोषणा केलेली आहे. जर सन्माननीय सदस्यांचा सरकारच्या धोरणावर विश्वास नसेल तर त्यांनी हा ठराव मांडावा, अन्यथा हा ठराव त्यांनी मागे घ्यावा किंवा सरकारी पक्षातर्फे राजीनामा द्यावा. माननीय राज्यपालांच्या धोरणाच्या विरोधात, सरकारच्या धोरणाच्या विरोधात सत्ताधारी पक्षाच्या सदस्याकडून अशा प्रकारचा ठराव येत असेल तर सदस्यांना ते धोरण मान्य नाही असा त्याचा अर्थ होतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, या ठरावामध्ये कोठेही सरकारच्या विरोधात अविश्वास दाखविण्यासारखी परिस्थिती नाही. माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात जे सांगितले आहे त्यापासून निश्चितपणे कोणीही दूर गेलेले नाही. परंतु रोजगार देत असताना तो कोणत्या पध्दतीने द्यावा, त्यामध्ये एखादी समिती असावी की काय अशा प्रकारची विनंती करणारा हा अशासकीय ठराव आहे. त्यामुळे अशा प्रकारचे रेकॉर्डवर येणे बरोबर नाही.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे यांनी आपला ठराव मांडावा.

डॉ. सुधीर तांबे ( नाशिक विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडतो.

"राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व त्यांच्यात रोजगाराअभावी निर्माण झालेले वैफल्याचे व असंतोषाचे वातावरण लक्षात घेता बेरोजगारांची समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्यासाठी सेवायोजन आणि रोजगार व स्वयंरोजगार कार्यालये अधिक कार्यक्षम करण्यासाठी तसेच, संबंधित प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

सभापती महोदय, आताच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्याबाबत मी सांगू इच्छितो की, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये शासनाने जे धोरण जाहीर केलेले आहे त्याचा पुरस्कार आपण करीतच आहोत परंतु बेरोजगारीचा प्रश्न हा इतका मोठा आणि भीषण आहे की, त्यावर आपल्याला सातत्याने उपाययोजना कराव्या लागतील. बेरोजगारीचा प्रश्न हा केवळ महाराष्ट्रापुरता किंवा भारत देशापुरताच नसून तो प्रश्न खऱ्या अर्थाने जागतिक प्रश्न झालेला आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/ श्री.बरवडनंतर 10:05

डॉ.सुधीर तांबे....

संपूर्ण जगात अमेरिकेसारखे प्रगत राष्ट्र असेल, युरोपसारखे प्रगत राष्ट्र असेल किंवा भारतासारखे विकसनशील राष्ट्र असले तरी सर्वत्रच बेरोजगाराच्या प्रश्नाने उग्र स्वरुप धोरण केलेले आहे. आपल्या देशाचे गरीबपणाचे, मागासलेपणाचे कारण बेरोजगारी हे आहे. आपण सर्वजण हे सातत्याने सांगतो की, आपला देश हा तरुणांचा देश आहे. आपल्या देशात तरुणांची संख्या जास्त आहे. डेमोक्रसीचा ग्राफ पाहिला किंवा लोकसंख्येचा ग्राफ पाहिला तर तरुणांची संख्या खूप मोठी असल्याचे दिसून येते. देशातील 50 टक्क्यापेक्षा अधिक लोकसंख्या 20 वयोगटातील आहे. सरासरी वय 29 वर्षे आहे. यामध्ये बेरोजगारांची संख्या खूप मोठी आहे. ही तरुण पिढी, युवा पिढी आहे. खऱ्या अर्थाने आपल्या देशाचे विकासाचे स्वप्न, समाजाच्या विकासाचे स्वप्न पूर्ण करण्याचे सामर्थ्य या युवा पिढीमध्ये आहे. बेरोजगाराची व्याख्या काय आहे ? ज्याला काम करण्याची इच्छा आहे, ज्याच्यामध्ये क्षमता आहे त्याला काम मिळत नाही त्याला बेरोजगार असे म्हणतात. भारतीय युवकांची बौध्दिक क्षमता, काम करण्याची क्षमता जगाच्या पातळीवर मान्य झालेली आहे. जगाच्या पातळीवर भारतीय युवक सॉफ्टवेअर इंजिनिअर म्हणून, वैद्यकीय क्षेत्रामध्ये काम करीत आहेत. आमच्या युवकांमध्ये क्षमता आहे. परंतु त्यांना संधी दिली नाही तर ते वैफल्यग्रस्त होतात, त्यातून ते आत्महत्या करतात. त्या आत्महत्यांची आपण येथे चर्चा करीत बसतो. सध्याची परिस्थिती पाहिली तर वैफल्यग्रस्त झालेले तरुण आत्महत्या करीत असल्याचे चित्र दिसते, हे प्रमाण अधिक आहे. त्याच्या हाताला काम मिळत नाही. ही संख्या अफाट आहे. आपण कोणत्याही गावामध्ये जावे, बेरोजगार तरुणांचे तांडेच्या तांडे आपल्याला दिसून येतील.

सभापती महोदय, मुंबई ते अहमदनगर पर्यंतच्या प्रवासामध्ये नाशिकपर्यंत मोठया प्रमाणावर साईबाबांचे हजारो तरुण भक्त रस्त्याने पायी चालत असल्याचे दिसून येतात. कोणत्याही राजकीय, सामाजिक कार्यकर्त्यांकडे हे तरुण कामाची मागणी करण्यासाठी येतात, अगदी अगतिक होऊन आलेले असतात. या तरुणांना आम्ही समाधानकारक उत्तर देऊ शकत नाही. त्यावेळी राजकीय कार्यकर्ता म्हणून काम करीत असताना आपल्या मनामध्ये निराशा येते. आपण या तरुणांना न्याय देऊ शकत नाही ही भावना निर्माण होते. काम नसल्यामुळे हे तरुण व्यसनाधीन होतात. काही तरुण गुन्हेगारीकडे वळतात. म्हणून या सर्व दृष्टीकोनातून या प्रश्नाबाबत विचार होण्याची गरज आहे. यासाठी तातडीने व प्रभावीपणे योजना आखण्याची गरज आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/

डॉ.सुधीर तांबे....

सभापती महोदय, बेरोजगारांच्या प्रश्नाचा विचार करीत असताना मी मंत्री महोदयांना सांख्यिकी माहिती देऊ इच्छितो. आज देशाची लोकसंख्या 120 कोटीपर्यंत गेलेली आहे. महाराष्ट्राची लोकसंख्या 11 कोटी इतकी आहे. सर्वसाधारणपणे बेरोजगारांचे सरासरी प्रमाण 9.7 टक्के आहे. राज्याचा विचार करता बेरोजगारांची संख्या 1 कोटीच्या आसपास आहे. या बेरोजगारांमध्ये ग्रामीण भागातील तरुणांचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे मोठ्या शहरांकडे तरुणांचे लोंढेच्या लोंढे येत आहेत. कारण मोठ्या शहरांमध्ये त्यांना संधी मिळण्याची शक्यता असते. शहरामध्ये आल्यावर त्यांच्या वाट्याला चांगले आयुष्य येते अशातील भाग नाही. त्यांना रस्त्यावर रहावे लागते. हे सर्व टाळावयाचे असेल तर ग्रामीण भागामध्ये रोजगार निर्माण करणे आवश्यक आहे. सध्या ज्याठिकाणी रोजगार उपलब्ध आहे त्याचे विश्लेषण केले तर 60 टक्के रोजगार शेती व शेतीला पूरक अशा व्यवसायामध्ये असल्याचे दिसते. उत्पादक युनिट्समध्ये 9 टक्के आहे, बांधकाम क्षेत्रात 7.5 टक्के आहे. स्वयंरोजगारामध्ये 44 टक्के आहे.

यानंतर श्री शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 10:10

डॉ. सुधीर तांबे...

केवळ 17 टक्के लोक हे नियमित वेतन मिळणा-या खाजगी, शासकीय किंवा निमशासकीय नोकरीमध्ये आहेत. 39 टक्के लोक हे कॅझ्युअल लेबर आहेत. अशा लोकांना काम कधी मिळते तर कधी मिळत नाही. त्यांना कधी पुरेसे वेतन मिळत तर कधी मिळत नाही. म्हणून या प्रश्नाची सोडवणूक करीत असताना या सर्व स्टॅटिस्टिकचा विचार आपणाला करावा लागेल. या बेरोजगारीचा विचार करीत असताना हेही सांगणे महत्वाचे आहे की, इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यामध्ये सुशिक्षितांचे प्रमाण अधिक आहे. मुले कॉलेजमध्ये जाऊन शिकतात, डिग्री घेतात, डिप्लोमा घेतात. आई-वडील अडचणीच्या परिस्थितीतूनही आपल्या मुलांना शिकवितात. अशा परिस्थितीमध्ये मुलांनी शिक्षण घेतल्यानंतर त्यांना नोकरी मिळू शकली नाही तर सहाजिकच त्यांच्यात वैफल्याची भावना निर्माण होते.

सभापती महोदय, या बेरोजगाराच्या प्रश्नावर या सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा झालेल्या आहेत. अनेक सन्माननीय सदस्यांनी या प्रश्नाबाबत आपापले विचार मांडलेले आहेत. मी या विषयी अधिक न बोलता बेरोजगाराची कारणे आणि त्यावर करावयाची उपाययोजना यावर प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न करणार आहे. या बेरोजगारीचे पहिले मूळ कारण कोणते असेल तर वाढणारी लोकसंख्या. आपल्या देशाची आणि राज्याची लोकसंख्या अतिशय वेगाने वाढत आहे. आज आपण रोजगाराभिमुख योजना करतो. मग त्या कृषी क्षेत्रातील विकास योजना असोत वा उद्योग क्षेत्रातील विकास योजना असोत. या विकास योजना वाढत्या लोकसंख्येच्या दराच्या मानाने तोकड्या पडत आहेत. म्हणून या प्रश्नाची कारणमीमांसा करीत असताना या वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे अत्यंत महत्वाचे आहे.

सभापती महोदय, बेरोजगारीचे दुसरे कारण म्हणजे आपली सदोष शिक्षण पध्दती हे आहे. आपल्या शिक्षण पध्दतीमध्ये मुलांना पुस्तकी शिक्षण जास्त दिले जाते. मुले डिग्री घेऊन शिक्षित होतात पण त्यांच्याकडे व्यावसायिक कौशल्याचा अभाव असतो. आपण जर इंजिनिअरींगची पदवी घेतलेल्या मुलांचा आढावा घेतला तर अवघी 10 टक्के मुले ही नोकरीसाठी पात्र ठरतात असे दिसून येईल. आज एका बाजूला शासकीय, निमशासकीय नोक-या कमी कमी होत चालल्या आहेत. खाजगी क्षेत्रामध्येच नोकरीच्या अधिक संधी आहेत. त्यामुळे खाजगी क्षेत्रामध्ये कोणत्या कौशल्याची

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 10:10

डॉ. सुधीर तांबे...

कोणत्या तंत्रज्ञानाची मागणी आहे याचा विचार करुन आपल्या शिक्षण पध्दतीमध्ये आणि सिलॅबसमध्ये आमूलाग्र बदल करण्याची आवश्यकता आहे. आज आपण प्रत्येक जिल्ह्यामध्ये आटीआय, पॉलिटेक्निक्स काढलेली आहेत. प्रत्येक तालुक्यामध्ये दोन-दोन तीन-तीन आयटीआय, पॉलिटेक्निक्स काढलेली आहेत. या आयटीआय आणि पॉलिटेक्निक्स मधून चांगले कुशल मनुष्यबळ निर्माण करण्याची गरज असून त्यासाठी ट्रेनिंगचा मोठा कार्यक्रम हाती घेण्याची नितांत गरज आहे. या शिक्षण पध्दतीमधून व्यावसायाभिमुख शिक्षण देण्याचा विचार आपण केला पाहिजे. जेव्हा मुलगा 8वीमध्ये जातो त्यावेळी त्याचा कल कोठे आहे हे लक्षात घेतले पाहिजे. 12वी पर्यन्त मुलांना व्यावसायिक कोर्सेस देण्याचा प्रयत्न झाला होता. आता त्या कोर्सेसचा नव्याने आणि आधुनिक पध्दतीने विचार करुन शिक्षण पध्दतीमध्ये बदल करणे अत्यंत महत्वाचे आहे असे मला वाटते्.

सभापती महोदय, बरोजगारीचे तिसरे कारण हे आहे की, आपल्या राज्याचा कृषी विकासाचा आणि औद्योगिक विकासाचा दर हा अत्यंत कमी आहे. आपला कृषी विकास दर अपेक्षेएवढा नाही. तो अधिक वाढविण्याची गरज आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये काजू प्रक्रियेवरील व्हॅट कमी करण्याचा निर्णय घेतलेला आहे. हा अतिशय चांगला निर्णय शासनाने घेतलेला आहे. आपल्या राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर काजू प्रक्रिया युनिट बंद पडलेले आहेत. हा निर्णय आधीच घेतला असता तर बरे झाले असते. या काजू प्रकिया उद्योगामध्ये प्रचंड रोजगार निर्माण करण्याची क्षमता आहे.

....नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KTG/ KGS/ प्रथम श्री.शिगम 10:15

डॉ.सुधीर तांबे...

आणि म्हणून कृषी विकासाचा वेग वाढविणे गरजेचे आहे. कृषी,कुक्कुटपालन यातून प्रचंड मोठया प्रमाणात रोजगार निर्माण होऊ शकतो. या क्षेत्रांचा विकास वेगाने होण्यासाठी शासनाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. औद्योगिक विकासाचा वेग सुध्दा वाढविणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, आज प्रत्येक क्षेत्रात भ्रष्टाचार मोठया प्रमाणात वाढत चाललेला आहे. आपण कोणतीही योजना आणा, कोणतेही नियोजन करा, परंतु भ्रष्टाचारामुळे कोणतीही योजना अथवा नियोजन यशस्वी होत नाही. शासनाच्या चांगल्या योजना तळागाळातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाहीत. भ्रष्टाचारामुळे चांगल्या योजनांची यशस्वीपणे अंमलबजावणी होत नाही. एखाद्या गळक्या माठामध्ये पाणी भरतो परंतु तो माठ गळका असला तर त्यातील पाणी झिरपून जाते अशी शासनाच्या योजनांमध्ये भ्रष्टाचाराची गळती सुरु आहे. राज्यात वाढत असेला भ्रष्टाचार थांबविण्यासाठी शासनाने ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, राज्यातील सेवायोजन कार्यालयांमध्ये सुशिक्षित बेरोजगार तरुण आपल्या नावाची नोंदणी करतात. राज्यातील किती सुशिक्षित बेरोजगार तरुणांनी सेवायोजन कार्यालयात नोदणी केलेली आहे, त्यापैकी किती सुशिक्षित बेरोजगारांना नोकऱ्या मिळाल्या ? एक-दोन टक्के तरुणांना नोक-या उपलब्ध होतात यापेक्षा जास्त तरुणांना सेवायोजन कार्यालयातून नोकऱ्या उपलब्ध होत नाहीत. सुशिक्षित बेरोजगार तरुण मुले सेवायोजन कार्यालयात जातात, ते आपल्या नावाची नोंदणी करतात, परंतु त्यांना सेवायोजन कार्यालयाकडून नोकऱ्या उपलब्ध होत नाहीत. राज्यातील सेवायोजन कार्यालये आधुनिक करण्याची गरज आहे. मी तर असे म्हणेन की, सेवायोजन कार्यालयाचे रुपांतर करिअर गायडन्स सेंटर्समध्ये केले पाहिजे. या गायडन्स सेंटर्सच्या माध्यमातून तरुणांना चांगल्या प्रकारचे मार्गदर्शन दिले गेले पाहिजे. राज्यातील सर्व सेवायोजन कार्यालयांचे आधुनिकीकरण करणे गरजेचे आहे. या कार्यालयांची संपूर्णपणे पुनर्रचना होणे गरजेचे आहे. ही कार्यालये ऑनलाईन झाली पाहिजेत. या कार्यालयांमध्ये पारदर्शकता आली पाहिजे. मी मघाशी उल्लेख केला त्याप्रमाणे ट्रेंड लेबर वर्क फोर्स निर्माण करणे गरजेचे आहे. एक गोष्ट अभिनंदनीय आहे की, शासनाने नॅशनल स्कील डेव्हलपमेंट इनिसिएटिव्ह नावाचा मोठा कार्यक्रम हाती घेतलेला आहे. राज्यातील विद्यार्थ्यांना शिक्षण पध्दतीतून स्कील देवू शकत नाही. कम्युनिकेशन स्कील देऊ शकत नाही. मुलगा पदवीधर होतो, त्यास साधे संगणकाचे ज्ञान पूर्णपणे

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे...

आपण देऊ शकत नाही. त्याला संवाद कौशल्याचे ज्ञान देवू शकत नाही. व्यवहारिक इंग्रजीचे ज्ञान तरुणांना नसते, अशा प्रकारचे ज्ञान देण्याचे काम स्कील डेव्हलपमेंट इनिसिएटिव्हच्या माध्यमातून दिले पाहिजे. या माध्यमातून चांगल्या पध्दतीचा स्कील पर्सोनेल निर्माण करण्याचा शासनाने प्रयत्न केला पाहिजे.

सभापती महोदय, आपण 1991 साली जागतिकीकरणाचा स्वीकार केला. त्या अनुषंगाने आपण काही शक्तीस्थाने आयडेंटीफाय केली होती. त्यामध्ये कृषी आहे, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी क्षेत्र आहे. आज आपण पाहतो आहोत की, सर्व्हीस इंडस्ट्रीज् वेगात चालली आहे. सर्व्हीस इंडस्ट्रीजमध्ये रोजगाराची खूप मोठी संधी आहे. कृषी, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, सर्व्हीस इंडस्ट्रीज या उद्योगांचा मी जाणीवपूर्वक उल्लेख केला. यामध्ये रोजगार निर्मिती बाबत प्रचंड क्षमता आहे. या इंडस्ट्रीज शासनाने विकसित केल्या पाहिजेत व रोजगार निर्मितीला प्रोत्साहन दिले पाहिजे असे माझे मत आहे.

सभापती महोदय, सहकारामध्ये रोजगार निर्मितीची प्रचंड क्षमता आहे. ग्रामीण भागातील परिवर्तन सहकारामुळे झालेले आहे. सहकारामुळे ग्रामीण भागात मोठया प्रमाणात रोजगार निर्मिती झालेली आहे. सहकारामुळे लोकांचे आर्थिक सक्षमीकरण झाले आहे. सहकारामुळे शैक्षणिकीकरण झालेले आहे. सभापती महोदय, मी फैजपूरच्या इंजिनिअरींग कॉलेज्मध्ये गेलो होतो. स्व.वसंतदादा पाटील यांनी 1983 साली तंत्र शिक्षणाच्या मोठा क्रांतीकारक निर्णय घेतला. स्व.वसंतदादा पाटील यांचे महाराष्ट्रावर खूप उपकार आहेत. त्यांनी 1983 साली तंत्र शिक्षणा विषयी धोरणात्मक निर्णय घेतला, त्यामुळे ग्रामीण भागातील प्रत्येक गावापर्यंत तंत्र शिक्षण जाऊन पोहोचले. आमच्या संगमनेर तालुक्यातील 300 ते 400 मुलांनी इंजिनिअरींगचे शिक्षण घेतल्यामुळे ते आज परदेशात वेगवेगळया क्षेत्रात नोकरी करीत आहेत. मला फैजपूरला सांगण्यात आले की, फैजपूर येथील इंजिनिअरींग मधून शिक्षण घेतलेले 1 हजार विद्यार्थी आज परदेशात नोकऱ्या करीत आहेत. या परिवर्तनामध्ये शासनाचा निश्चितपणे सहभाग आहे. ब-याच ठिकाणी सहकारातील प्रामाणिकपणामुळे उत्कृष्ठ कामे झालेली आहे. सहकारामुळे राज्यातील शहरांमध्ये तसेच ग्रामीण भागात निश्चितपणे परिवर्तन झालेले आहे. आपण आता खुली अर्थव्यवस्था स्वीकारलेली आहे. या अर्थव्यवस्थेमुळे लोकांमध्ये

3...

डॉ.सुधीर तांबे...

पळण्याची शर्यत लागली आहे. सभापती महोदय, सहकाराचे पुन्हा पुनरुज्जीवन करण्याचा शासनाने प्रयत्न केला पाहिजे. चुकीच्या पध्दतीचा अवंलब करुन आर्थिक शिस्त मोडणे, भ्रष्टाचार होणे यामुळे सहकार क्षेत्र अडचणीत आलेले आहे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ KGS/ 10:20

डॉ.सुधीर तांबे........

सभापती महोदय, कर्नाटक राज्यात दर्पण नावाची योजना लागू केलेली आहे. त्या माध्यमातून प्रत्येक सहकारी संस्थांच्या व्यवहाराची माहिती वेबसाईटवर लोड केली जाते. ती माहिती कोणालाही उपलब्ध होऊ शकते. अशा प्रकारची पारदर्शकता आपल्या राज्यातही आणली पाहिजे. सहकारी क्षेत्रात दूध डेअरी, साखर कारखाने, सूत गिरण्या, बँकिंग आदी बाबतीत आपण खूप चांगली प्रगती केली आहे. परंतु आपण सहकाराची व्याप्ती अधिक वाढवू शकतो. प्रत्येक व्यवसायाला सहकारामध्ये आणले तर सहकाराच्या माध्यमातून मोठया प्रमाणात रोजगार निर्माण होऊ शकतो.

सभापती महोदय, आय.टी.च्या क्षेत्रामध्ये प्रचंड प्रमाणात रोजगार निर्मितीची क्षमता आहे. आज आपल्या देशामध्ये आऊटसोर्सिंगच्या माध्यमातून आय.टी.क्षेत्रात कामे केली जातात. 2-3 लाख कोटी रुपयांची कामे आपल्या देशामार्फत केली जात आहेत. ही कामे इन्फोसीस, विप्रो अशा मोठमोठ्या आय.टी.कंपन्यांकडून केली जात आहेत. या कंपन्यांना प्रचंड प्रमाणात नफा मिळत आहे. हे खरे असले तरी शासनामार्फत प्रत्येक तालुक्यात आय.टी.पार्क निर्माण केले आणि त्या भागातील तरुणांना कामे दिली तर खूप मोठया प्रमाणात रोजगार निर्माण होऊ शकतो. या कामासाठी इंजिनिअर पाहिजेत असा भाग नाही. 12वी किंवा पदवी प्राप्त केलेल्या सुशिक्षित बेरोजगारांकडून चांगल्या प्रकारे ही कामे होऊ शकतात. त्याठिकाणी रोजगाराची क्षमता निर्माण होऊ शकते.

सभापती महोदय, आपण महाराष्ट्र राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत असताना या सुवर्ण महोत्सवी वर्षात अनेक धोरणे राबविली. युवा धोरण, क्रीडा धोरण, सांस्कृतिक धोरण, महिला धोरण राबविण्याचा प्रयत्न केला असला तरी युवा धोरण राबवित असताना रोजगाराबाबत गंभीरपणे तातडीची व प्रभावी उपाययोजना करणे गरजेचे आहे. शासनाने नॉलेज कॉर्पोरेशनची स्थापना केली. त्या माध्यमातून अनेक गोष्टी साध्य करु शकलो. महाराष्ट्र शासनाने अनेक चांगल्या योजना राबविल्या आहेत. म्हणून मला शासनाला विनंती करावयाची आहे की, रोजगार महामंडळ किंवा एम्प्लॉयमेंट कॉर्पोरेशन स्थापन केले तर त्या माध्यमातून रोजगार निर्मिती करण्यास वाव मिळेल. शासकीय, निम शासकीय संस्थामार्फत स्वयंरोजगार योजनांबाबत प्रभावी काम करण्यासाठी शासनाने एम्प्लॉयमेंट कॉर्पोरेशनची स्थापना करावी अशा प्रकारची मी सूचना या निमित्ताने करीत आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे..........

सभापती महोदय, रोजगार हा एक राष्ट्रीय इश्यू आहे. या देशाचे अर्थकारणी, या देशातील राजकारणी, यशस्वी उद्योजक यांना एकत्र आणून या विषयावर धोरणात्मक निर्णय घेतला गेला तर ते खूप महत्वाचे ठरेल. मला याठिकाणी ठराव मांडण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले मनापासून आभार मानतो आणि माझे भाषण संपवितो.

ठराव प्रस्तुत झाला.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी मांडलेल्या अशासकीय ठरावावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये गुन्हेगारी, व्यसनग्रस्तता, नक्षलवाद हे प्रश्न निर्माण झाल्यामुळे आपण चिंतीत झालेलो आहोत. या प्रश्नामागे सुशिक्षित बेरोजगारी कारणीभूत आहे हे आपण लक्षात घेतले पाहिजे. ज्याप्रमाणे राईट टू एज्युकेशनचा कायदा करुन महाराष्ट्रामध्ये जन्माला येणाऱ्या प्रत्येक मुलाला शिक्षणाचा हक्क देण्यात आला आहे. त्याच धर्तीवर रोजगाराचा हक्क प्रदान करणारा कायदा करण्याची आवश्यकता आहे. माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी या प्रश्नाबाबत दोन्ही सभागृहाच्या सदस्यांची संयुक्त समिती स्थापन करण्याचा मुद्दा मांडला आहे. त्यादृष्टीने राईट टू एम्प्लॉयमेंट अशा प्रकारचा कायदा करण्याची गरज आहे असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, शासकीय पातळीवर निरनिराळ्या रोजगाराच्या संधी निर्माण होतात. खाजगी (एनजीओ) व सहकार क्षेत्रातही निरनिराळ्या रोजगाराच्या संधी निर्माण होत असतात. या सर्व संधी कायद्याच्या कार्यकक्षेत आणून "प्रत्येक हाताला काम" देण्याचा जो कायदा केला जाईल त्या कायद्याचा लाभ सर्व रोजगार किंवा स्वयंरोजगार करु इच्छिणाऱ्यांना देऊन खऱ्या अर्थाने पुरोगामीत्व सिध्द केले जावे एवढे बोलून मी या ठरावाला पाठिंबा देऊन माझे भाषण संपवितो.

--------

नंतर एफ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे यांनी ठराव क्र. 99 च्या माध्यमातून सभागृहात बेरोजगारांच्या प्रश्नाला वाचा फोडलेली आहे. आजपर्यंत या सभागृहात बऱ्याच वेळेला या विषयावर चर्चा केली. मग ती कधी सत्ताधारी पक्षाकडून उपस्थित केली असेल तर कधी विरोधी पक्षाकडून उपस्थित केली असेल. दरम्यानच्या काळात अनेक मंत्री बदलले पण या समस्येला अजून वाचा फुटलेली नाही.

महोदय, मध्यंतरी मी एक ठराव मांडला होता त्यावेळेस सभागृहात उत्तरादाखल सांगण्यात आले होते की, यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली असून त्या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर या प्रश्नाला वाचा फुटेल अथवा त्यावर तोडगा निघू शकेल. जिल्हा सेवायोजन कार्यालये बंद करण्याचा देखील घाट घातला होता पण त्याला प्रखर विरोध करण्यात आला. तत्कालीन मंत्री श्री. राजेंद्र दर्डा साहेबांनी सभागृहात आश्वासन दिले होते की, आपण या सेवायोजन कार्यालयांचे रुपांतर करियर गाईडन्स मध्ये करणार आहोत. पण मुळात बेरोजगारांची नोंदणीच झाली नाही तर त्याचा काय उपयोग होणार आहे, हा महत्वाचा प्रश्न विचारात घेतला पाहिजे. सेवायोजन कार्यालयाचा मूळ हेतू बाजूला ठेवला जातो ही दुर्दैवाची गोष्ट आहे. या सभागृहात आताच सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणातून सेवायोजन कार्यालयांचे रुपांतर करियर गाईडन्समध्ये करण्याचा उल्लेख केला पण बेरोजगारांची नोंदणी कुठे करावयाची हा प्रश्न अनुत्तरितच राहतो. कारण मागील काही वर्षात फक्त 17 हजार बेरोजगारांनाच हे शासन नोकऱ्या उपलब्ध करुन देऊ शकले, अशी माझी आकडेवारी आहे. यावर माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या माध्यमातून प्रकाश टाकावा अशी माझी विनंती आहे. तसेच ठरावामध्ये सभागृहाची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी अशी शिफारस ही विधानसभा करीत आहे, असे म्हटले आहे. पण या मुद्याचा त्यांच्या भाषणातून कोठेही उल्लेख झालेला नाही याचा खेद वाटतो. त्यांनी सांगितले की, यासाठी शासनाने एखादे कार्पोरेशन निर्माण करावे, महामंडळाची स्थापना करावी पण तरी देखील या ठरावाच्या मूळ गाभ्यालाच बगल देण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसून येते.

सभापती महोदय, शासन बेरोजगारी दूर करण्यासाठी बेरोजगारांचे मेळावे भरवित असते, त्यावर पैसा खर्च करते पण यातून नेमका किती लोकांना आपण रोजगार उपलब्ध करुन दिला हा संशोधनाचा विषय आहे. त्यासाठी वेगवेगळ्या कंपन्यांना आमंत्रित करतो आणि बेरोजगारांना

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .........

नोकऱ्या देण्याचा आग्रह धरतो. तसेच अशा कंपन्यांमध्ये 80 टक्के भूमी पुत्रांना नोकऱ्या देण्यासंबंधीचा शासनाचा जो जी.आर. आहे, त्याची किती परिणामकारक अंमलबजावणी होत आहे हे देखील पाहिले पाहिजे. तसेच किती कंपन्यांना आपण आग्रहाने सांगतो की, या राज्यातील 80 टक्के भूमी पुत्रांना नोकऱ्या दिल्याच पाहिजे ? याचाही अंतर्मुख होऊन विचार करणे गरजेचे आहे. अशा कंपन्यांनी नियमानुसार किंवा जी.आर. प्रमाणे 80 टक्के लोकांना रोजगार दिला नाही तर त्यांच्यावर आपण काय कारवाई करतो ? याचाही विचार केला पाहिजे. पण हाच मुद्दा आपण लावून धरला आणि त्याचे कायद्यात रुपांतर केले तर खरोखरच राज्यातील बेरोजगारीचा प्रश्न 100 टक्के नव्हे तर किमान 50 टक्के तरी सुटू शकेल अशी माझी खात्री आहे.

महोदय, शेवटचा मुद्दा असा आहे की, राज्यातील सेवायोजन कार्यालये बंद न करता चालूच ठेवावी कारण त्याशिवाय आपल्याला राज्यातील सुशिक्षीत बेरोजगारांची संख्या किती आहे हे समजणार नाही. राज्यातील बेरोजगारांचा आकडा समजला तर त्यातून नवीन दिशा मिळेल आणि ज्या 10 लाख लोकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात झालेला आहे त्याचे स्पष्टीकरण मंत्री महोदयांनी करावे अशी विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

---------

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, कामकाज पत्रिकेवर दिलेल्या सर्व अशासकीय ठरावावर आजच चर्चा व्हावी असे वाटत असेल तर सभासदांनी बोलताना वेळेचे भान ठेवावे. आता सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते व सन्माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी कृपया दोन-दोन मिनिटातच आपले विचार मांडावेत, जेणेकरुन मंत्री महोदयांना ताबडतोब उत्तराला सुरुवात करता येईल.

....3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. तांबे यांनी बेरोजगारीसंबंधीचा ठराव मांडला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी अशी भीती व्यक्त केली की राज्यातील सेवायोजन कार्यालये शासन बंद करायला निघाले की काय ? पण माझ्या माहितीनुसार हा केंद्र शासनाचा कायदा असल्यामुळे राज्य शासनाला तसे करता येणार नाही. यापूर्वी देखील सभागृहात मुद्दा उपस्थित झाला असता तत्कालीन राज्यमंत्री श्री. पाटील साहेब असताना मी त्यांच्याकडे सर्व कागदपत्रे सादर केली होती. सर्वोच्च न्यायालयाने यासंदर्भात असा निर्णय दिलेला आहे की, नोकरीसाठी निवड करताना प्रथम सेवायोजन कार्यालयांमधून नावे मागविणे बंधनकारक आहे व तसे जज्मेंट माझ्याकडे आहे. तसेच त्यावेळेस असेही आदेश दिले होते की, अशी भरती करताना नोटीस बोर्डावर जाहीर करावे पण निवड करताना प्राथम्यक्रमाने सेवायोजन कार्यालयात नावे नोंदविलेल्या यादीतील उमेदवारांचाच विचार करावा. त्यातून उमेदवार उपलब्ध झाले नाहीच तर जाहिरात प्रसिध्द करुन उमेदवार मागवून घ्यावे ही दुसरी बाब आहे. पण बिलंदर सरकारी अधिकारी मात्र सेवायोजन कार्यालयात नोंद झालेल्या उमेदवारांची नावे मागविणे प्रथम बंधनकारक असताना नेमका दुसऱ्या बाबीचाच प्राथम्याने विचार करतात आणि अशी पदे भरण्यासाठी जाहिरात प्रसिध्द करतात.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात मी जे काही विचार मांडत आहे ते जबाबदारीने मांडत आहे. यासंदर्भातील पुरावे माझ्याकडे ढिगा-याने पडलेले आहेत. जिल्हा परिषदेची भरती असो, महानगरपालिकेची भरती असो त्या भरत्या स्थानिक पातळीवरच केल्या जातात. खाजगी कंपन्या हा नंतरचा भाग आहे. सेवायोजन कार्यालयात भूमीपुत्रांनी नावे नोंदवलेली आहेत. त्या ठिकाणाहून परप्रांतीय मिळत नाहीत. यांच्या आवडीचे, प्रेमाचे परप्रांतीय मिळण्याकरिता सर्व भूमिपुत्रांना डावलले जाते. किमान स्थानिक स्वराज्य संस्था व सरकारशी निगडित ज्या ठिकाणी जागा असतील त्या ठिकाणी भूमिपुत्रांना नोक-या दिल्या पाहिजेत यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आहे. त्यामुळे यापुढे तरी भूमिपुत्रांना नोक-या प्राधान्याने दिल्या जातील व त्या ठिकाणी उमेदवार मिळाले नाहीत तर जाहिरात दिली जाईल असे जर केले तरच भमिपुत्रांना न्याय मिळू शकतो व अशामुळे सेवायोजन कार्यालयाची उमेदवारांची यादी कमी होऊ शकते. अन्यथा परप्रांतियांना नोकरी दिल्याचे पाप तुमच्या नशिबी येईल एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेले) सभापती महोदय,या ठिकाण सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे यांनी जो अशासकीय ठराव मांडलेला आहे त्याचे समर्थन करण्यासाठी व त्यावर विचार मांडण्यासाठी मी उभी आहे. आपल्याकडे जी काही बेरोजगारी निर्माण झालेली आहे त्यामध्ये केवळ महाराष्ट्र शासनाचा किंवा केंद्र शासनाचा दोष आहे असे नाही. आज जगामध्ये भांडवलदारी व मुक्त अर्थव्यवस्था आहे. या अर्थव्यवस्थेमध्ये एकीकडे मोठे उद्योग मोठया प्रमाणात वाढत आहेत व लघु उद्योग कोलमडून पडत आहेत व त्याच व्यवस्थेचा आपण एक भाग आहे हे आपण विसरता कामा नये. यातून आपण अंग बाजूला काढून घेऊ शकत नाही कारण आपण मुक्त अर्थव्यवस्था स्वीकारलेली आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील हातमाग धंदा, विडी कामगार धंदा पूर्णपणे कोलमडून पडलेला आहे. आमच्या बीडमध्ये जसे अनेक कारखाने बंद पडले आहेत तसे अनेक कारखाने महाराष्ट्रात बंद पडले आहेत. मजूराच्या हाताला काम शिल्लक राहिलेले नाही. त्यामुळे लघु उद्योग कसे जगवता येतील यादृष्टीने आपल्याला देशपातळीवर व राज्य पातळीवर प्रयत्न करावे लागतील.

सभापती महोदय, ग्रामीण भागातून शहराकडे लोंढे येत आहेत त्यामुळे सुध्दा बेकारी निर्माण झालेली आहे. ग्रामीण भागातून शहराकडे जे मायग्रेशन होते त्याचे मुख्य कारण म्हणजे कुटुंबाकडे असलेल्या जमिनी कमी कमी होत जाणे. कुटुंबाची संख्या वाढल्यामुळे जमिनीचे क्षेत्र कमी झालेले आहे त्यामुळे ग्रामीण भागातून शहराकडे त्यांचे स्थलांतरण मोठया प्रमाणात होत आहे. तसेच वैज्ञानिक पध्दतीने शेती होत नसल्यामुळे कुटुंबाचे पोट भरणे शक्य राहिले नसल्यामुळे ग्रामीण भागातील जनता शहराकडे धावावयास लागली आहे. शहरात मोठया प्रमाणात लोकसंख्या असल्यामुळे शहरातही आपण त्यांना उद्योग देऊ शकत नाही अशी परिस्थिती आहे. यासाठी आपल्याला शेतीकडे चांगल्या पध्दतीने बघण्याची आवश्यकता आहे. महात्मा गांधी यांनी म्हणाल्या प्रमाणे "चलो ग्राम" या पध्दतीने आपण केले व शेती उद्योग चांगल्या प्रकारे विकसीत केली तरी सुध्दा आपण ब-याच प्रमाणात बेरोजगारी कमी करु शकू. विरोधी पक्ष जेव्हा सत्तेत होता तेव्हा ते म्हणाले होते की, आम्ही 40 लाख लोकांना नोक-या देऊ परंतु ते सुध्दा 40 लाख लोकांना

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे ....

नोक-या देऊ शकले नाहीत. आम्ही सत्तेत आलो आणि आम्ही कितीही म्हटले तरी आम्ही सर्व बेरोजगारी संपवू शकत नाही. रोजगार हमी योजनेसारखा कायदा असतांना सुध्दा बेरोजगारी संपवू शकलो नाही. त्यामुळे यासाठी आपल्याला धोरण ठरवावे लागणार आहे. या ठरावाच्या अनुषंगाने एक समिती गठीत करणे गरजेचे आहे असे माझे मत आहे.

---

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेंमत टकले (विधानसभेने निवडलेले) सभापती महोदय, सुशिक्षित बेरोजगारांच्या संदर्भातील ठराव सन्माननीय सदस्य डॉ. तांबे यांनी मांडलेला आहे. राज्याच्या दृष्टीने अतिशय आवश्यक असलेली ही बाब आहे. काल मी उल्लेख केल्या प्रमाणे मनुष्यबळाचे नियोजन आपल्या राज्यासाठी काय करावयाचे आहे, त्यासाठी आवश्यकता किती आहे हे बघणे आवश्यक आहे. औद्योगिक किंवा इतर विभागाच्या संदर्भात जी धोरणे आहेत त्या धोरणामध्ये पब्लीक प्रायव्हेट पार्टनरशिप हा एक मोठा संकेत निर्माण झालेला आहे. त्यामुळे सरकारकडून ज्या नोक-या उपलब्ध व्हावयास पाहिजे त्या दिवसेंदिवस कमी होत जाणार आहेत, कदाचित खाजगी क्षेत्रात नोक-यांचे प्रमाण वाढेल. खाजगी क्षेत्रातील आधुनिकीकरणामुळे त्या ठिकाणी सुध्दा नोक-या कमी कमी होत जातील आणि बेरोजगारांची संख्या कमी होण्याऐवजी वाढण्याकडे कल जाण्याची शक्यता मोठया प्रमाणात निर्माण होईल.

सभापती महोदय, श्री. पु.ल.देशपांडे यांनी तीन पैशाचा तमाशा या नावाचे नाटक लिहिले आहे. त्या नाटकामध्ये असा उल्लेख होता की, आता लोक शिक्षित होऊन भीक मागतात त्याऐवजी भीक मागायचे शिक्षण देणारे एक विद्यापीठ काढण्यात यावे अशा पध्दतीचा उपहास त्यामध्ये व्यक्त केला होता. त्यामुळे या विषयाकडे फार गांभीर्याने बघण्याची गरज आहे. एकूण धोरणाचा विचार करतांना जो ठराव आलेला आहे त्याचा निश्चितपणे विचार व्हावा म्हणून मी या ठरावाला अनुमोदन देतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

----

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी या ठिकाणी एका अत्यंत महत्वाच्या विषयावर जो अशासकीय ठराव मांडला आहे त्या ठरावावर माझे विचार व्यक्त करण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय, राज्यातील शेतक-यांचा प्रश्न जेवढा गंभीर स्वरुपाचा आहे तेवढाच बेरोजगारांचा प्रश्नसुध्दा गंभीर व महत्वाचा आहे.हा प्रश्न केवळ तरुण बेरोजगारापुरताच मर्यादित आहे असे म्हणता येणार नाही. राज्यातील सामाजिक परिस्थिती व सामाजिक आरोग्य बेरोजगारांच्या समस्येवर अवलंबून आहे. सुशिक्षित बेरोजगारांची संख्या वाढली की त्यातून राज्यामध्ये अनेक गोष्टी घडत असतात. बेरोजगारांच्या बाबतीत राज्य सरकारचे धोरण अयशस्वी झाले आहे त्याचबरोबर अजून राज्य सरकारने युवा धोरण जाहीर केलेले नाही.तेव्हा गेल्या 10-15 वर्षापासून आतापर्यंत ही समस्या सोडविण्यासाठी काय प्रयत्न करण्यात आले होते, त्याचे रिझल्टस काय दिसून आले त्याचप्रमाणे येथून पुढच्या काळात कोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहे हे सांगण्यासाठी शासनाने श्वेतपत्रिक प्रसिध्द करावी असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे .

सभापती महोदय, स्वयं रोजगार आणि सेवायोजन कार्यालयाना शासनाने अधिक प्रोत्साहन दिले पाहिजे. ठाणे येथील सेवायोजन कार्यालयाने रोजगार देण्याच्या बाबतीत चांगले काम केले व अनेक तरुणांना नोक-या दिल्या अशी बातमी परवा वर्तमानपत्रात आली होती त्यांनी चांगले काम केले म्हणून त्याचे अनेक लोकांनी कौतुक केले.तेव्हा ठाणे येथील कार्यालयाने नक्की कशा प्रकारे चांगले काम केले आहे हे तेथे जाऊन पाहण्याची आवश्यकता आहे. ते जर चांगले काम करु शकतात तर बाकीच्या ठिकाणची कार्यालये का करु शकत नाही याचा सुध्दा विचार केला पाहिजे आणि पुढील 15-20 वर्षाचा विचार करुन सुशिक्षत बेरोजगारांची समस्या कमी करण्यासाठी निश्चित कोणत्या प्रकारची ठोस उपाययोजना करण्यात येणार आहे याचा अहवाल तयार केला गेला पाहिजे.

सभापती महोदय, जगात सर्वात जास्त तरुणांची संख्या असलेला आपला देश असून सुशिक्षत बेरोजगारांचा प्रश्न सोडविण्यासाठी तसेच राज्याला पुढे नेण्यासाठी या गंभीर विषयाच्या संदर्भात शासनाने ठोस असा कार्यक्रम आखण्याची गरज आहे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीपराव सोनवणे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी या ठिकाणी जो अशासकीय ठराव मांडला आहे त्यावर माझे विचार मांडण्याकरिता मी येथे उभा आहे.

सभापती महोदय, स्वयं रोजगार व सेवा योजन कार्यालय अधिक कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी अत्यंत महत्वाचा ठराव या ठिकाणी मांडल्याबद्दल सर्व प्रथम मी त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय,सध्याच्या स्वयंरोजगार व रोजगार सेवा अधिक परिणामकारक होण्याच्या दृष्टीने प्रयत्न होण्याची आवश्यकता आहे.सक्षमीकरण होत असतांना त्या ठिकाणी रोजगाराच्या संदर्भात प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. त्याचवबरोबर सुशिक्षित बेरोजगारांना मार्गदर्शन देण्याची देखील आवश्यकता आहे.याबाबतीत मला असे सागावयाचे आहे की, हे मार्गदर्शन देण्याकरता जे काही अनुदान लागणार आहे ते अनुदान सुध्दा शासनाने तातडीने दिले पाहिजे तसेच सर्व्हिस सेंटर दिले पाहिजे. त्याचबरोबर स्कील डेव्हलपमेन्ट प्रोग्राम हाती घेण्यात आला पाहिजे.राजस्थानमधून कारागीर आपल्या राज्यात काम करण्यासाठी येतात आणि त्यांना आपल्याकडे काम करण्यासाठी आपण बोलावतो त्याचबरोबर नेपाळ मधील काही लोक येतात व ते भरत काम चांगल्याप्रकारे करीत असतात तसेच इंटेरिअर डेकोरेशनचे काम करण्यासाठी उत्तर प्रदेशातील काही मजूर आपल्याकडे येऊन काम करतात. त्याचप्रमाणे आपल्या राज्यातील सुशिक्षित बरोजगारांना प्रशिक्षण देण्याची सोय केली तर त्यांना रोजगार मिळू शकेल.तसेच आपल्या राज्यात लहान लहान उद्योग, ग्रामीण उद्योग सुरु केले तर सुशिक्षित बेरोजगारांच्या समस्या परिणामकारक सोडविण्यासाठी त्याचा निश्चितपणे उपयोग होईल एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग पदवीधर) सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी अत्यंत महत्वाच्या विषयावरील ठराव या ठिकाणी मांडला असून त्यावर बोलण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय, राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढत चाललेले प्रमाण या विषयावर सभागृहामध्ये सातत्याने चर्चा झालेली आहे.सुशिक्षित बेरोजगारांचा प्रश्न हा राज्याच्या दृष्टीने अत्यंत गंभीर स्वरुपाचा आहे आणि त्याचा उल्लेख सातत्याने माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये केला जातो.

सभापती महोदय, सुशिक्षित बेरोजगारांचा प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांची एक संयुक्त समिती नेमावी अशी सन्माननीय सदस्य डॉ तांबे यांनी या अशासकीय ठरावाच्या माध्यमातून सूचना केली आहे त्या सूचनेचे मी स्वागत करतो.सुशिक्षित बेरोजगारांची एवढी मोठी समस्या आपल्या समोर असताना सुशिक्षित बेरोजगारांची समस्या कमी कशी करता येईल यासाठी महाराष्ट्र शासन काही प्रयत्न करीत आहे. काही पदांसाठी सेवानिवृत्तीचे वय वाढविण्याचा निर्णय नुकताच घेतला आहे या निर्णयामुळे बेरोजगारांची संख्या वाढणार आहे की कमी होणार आहे याचासुध्दा आपल्याला विचार करावा लागणर आहे. तेव्हा या संबंधी शासनाने गांभीर्याने विचार करावा असे मला या निमित्ताने शासनाला सांगावयाचे आहे.काही पदांसाठी सेवा निवृत्तीचे वय वाढविण्याचा निर्णय घेतल्यामुळे नवीन पिढीतील तरुणांना नोक-या मिळणार नाहीत त्यामुळे हा निर्णय घेतल्याने बेरोजगारी कमी होणार आहे की वाढणार आहे हा सर्वात महत्वाचा प्रश्न असल्यामुळे त्याचा गांभीयाने विचार करावा आणि काही पदांसाठी सेवा निवृत्तीचे वय वाढविण्यात आले आहे ते कमी करावे. सेवा निवृत्तीचे वय कमी केल्यामुळे नवीन पिढीतील तरुणांना काम मिळू शकेल असे माझे मत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ दीपक सावंत यांनी असे सांगितले आहे की, ज्या ठिकाणी नवीन उद्योग सुरु होतील त्या ठिकाणच्या स्थानिक व्यक्तींना प्राधान्याने त्या उद्योगात नोक-या दिल्या जाव्यात. यासाठी कायदा करण्याची गरज आहे. तेव्हा हा कायदा तातडीने केला पाहिजे अशा प्रकारच्या दोन सूचना या निमित्ताने करुन मी माझे भाषण संपवितो.

-------

नंतर श्री.सरफरे

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. सय्यद जमा (महाराष्ट्र विधानसभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे ने बेरोजगारों के बारे मे जो अशासकीय ठराव पेश किया है, मैं इसका समर्थन करता हूँ. मैं अपने कुछ सुझाव देना चाहता हूँ. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते ने कहा कि रोजगार कार्यालय केन्द्रीय सरकार के कानून के अनुसार बनाए गए हैं, इसलिए ये बंद नहीं हो सकते. यह बात सही है. केन्द्रीय कानून के अनुसार किसी भी राज्य सरकार के लिए, किसी भी सरकारी विभाग के लिए, किसी भी शासकीय ऑर्गनाइजेशन के लिए यह जरुरी है कि उनके यहां जो वेकेन्सी क्रिएट होती है, उसकी सूचना रोजगार कार्यालय को दी जाए. इस कानून का पालन अगर कोई विभाग नहीं करता है तो शासन को इस बारे में ध्यान देना चाहिए.

सभापति महोदय, रोजगार कार्यालय में जो लोग अपना नाम लिखाते हैं, उसमें से जिन लोगों को रोजगार मिल जाता है, उनके नाम रोजगार कार्यालय की सूची में से डीलिट नहीं किए जाते हैं. इस सूची को अप-टू-डेट नहीं किया जाता है. रोजगार प्राप्त किए लोगों के नाम भी 10-20 साल तक रोजगार कार्यालय की सूची में बने रहते हैं. इसलिए अगर हमें सही जानकारी प्राप्त करनी है तो इसका असेसमेंट होना चाहिए. हमें मालूम होना चाहिए कि बेरोजगारों में शिक्षित व्यक्ति कितने हैं और अशिक्षित व्यक्ति कितने हैं. जहां तक औद्योगिक क्षेत्र का सवाल है तो 80 प्रतिशत लोग ठेकेदारी पद्धति से काम करते हैं. उनका रोजगार स्थायी नहीं है. राज्य सरकार ने तो वर्ष 2003-04 से नौकरी भर्ती पर प्रतिबंध लगा दिया है. मेरा कहना है कि एक समिति बनाकर इन सारे प्रश्नों पर चर्चा होनी चाहिए.

सभापति महोदय, जहां तक असंगठित मजदूरों का प्रश्न है तो हर शहर के किसी चौराहे पर 100-200 मजदूर काम के इन्तजार में बैठे रहते हैं. इन गरीब मजदूरों का नाम कहीं भी रजिस्टर्ड नहीं होता है और श्रम कानून का भी इनको संरक्षण नहीं है. रोजगार कार्यालय की कार्यप्रणाली में असंगठित मजदूर भी रेगूलेटेड होने चाहिए, ऐसा इस प्रस्ताव के माध्यम से मेरा सुझ ाव है.

............

भाषण पूर्ण, नंतर I 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर (रोजगार व स्वयंरोजगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे यांनी राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण लक्षात घेता परिणामकारक उपाय योजना करण्यासाठी दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांची एक संयुक्त समिती स्थापन करावी या विषयासंदर्भात अशासकीय ठराव मांडला आहे. या ठरावावरील चर्चेच्या निमित्ताने माननीय सदस्यांनी मांडलेल्या सर्व सूचनांचे मी स्वागत करीत आहे.

सभापती महोदय, सुरुवातीला मी रोजगार आणि स्वयंरोजगार विभागाच्या माध्यमातून कोणकोणते उपाय केले जात आहेत त्या संदर्भात थोडक्यात माहिती देत आहे. या विभागामार्फत रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम राबविला जात आहे. त्या अंतर्गत सहकारी संस्थांना विना अनुदान शासनाची कामे देण्याबाबत पत्रक काढण्यात आले आहे. सहकारी संस्थांना इलेक्ट्रिशियनसारखी विविध प्रकारची सेवा देणारी लहान मोठी कामे देण्यास सुरुवात केली आहे. त्याचप्रमाणे आदिवासी उमेदवारांना रोजगार आणि स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण व मार्गदर्शन देणारे वर्ग सुरु केले आहेत. त्या माध्यमातून आदिवासी उमेदवारांना व्यावसायिक मार्गदर्शन मिळाले पाहिजे म्हणून राज्याच्या सर्व जिल्ह्यामध्ये वेगवेगळया प्रकारचे मेळावे आयोजित केले जात आहेत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर . . ..

सभापती महोदय, याबाबतीत सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी प्रश्न उपस्थित केला होता की, 2010 ते 2011 मध्ये आपण किती बेरोजगारांना नोकऱ्या दिल्या आहेत ? रोजगार-स्वयंरोजगार केंद्राच्या मार्फत जानेवारी 2010 ते डिसेंबर 2010 पर्यंत 3,53,904 उमेदवारांना नोकऱ्या प्राप्त झालेल्या आहेत. बेरोजगारांच्या मेळाव्यात किती बेरोजगारांना नोकऱ्या मिळाल्या असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला होता. याबाबत सांगावयाचे तर राज्यामध्ये एकंदर 161 रोजगार मेळावे आयोजित करण्यात आले होते. त्या माध्यमातून 16,151 बेरोजगारांना नोकरी देण्यात आली आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितलेली माहिती बरोबर आहे. तसेच त्यांनी केलेली सूचनाही बरोबर आहे की, अजूनही रोजगार मेळावे आयोजित करुन, त्या माध्यमातून नोकरी मिळण्याची आवश्यकता आहे. राज्यामध्ये ज्या जिल्ह्यांमध्ये मेळावे आयोजित करण्यात आले होते, त्यापैकी काही जिल्ह्यांमधील मेळाव्याच्या वेळेस मी स्वत: तेथे उपस्थित होतो. त्यावेळी मी संबंधितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, केवळ नावापुरते मेळावे न घेता प्रत्यक्षात त्याठिकाणी मोठया प्रमाणात उद्योजक देखील आले पाहिजेत. आज सर्वसामान्य लोकांना नोकरीची आवश्यकता आहे, त्यामुळे तेथे त्यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असला पाहिजे. बेरोजगारांना विभागाच्या माध्यमातून, कारखानदारांच्या माध्यमातून ज्या-ज्या सेवा देता येतील त्या बाबत कारखानदारांनी, उद्योगधंद्यातील लोकांनी सविस्तर माहिती देण्याचा प्रयत्न केला तर आपल्याला निश्चितपणे त्याठिकाणी उद्योग देता येईल. त्याचप्रमाणे आपण किती लोकांना रोजगार दिला आणि त्या नंतर तो त्याठिकाणी किती दिवस कामावर राहिला याची नोंद रोजगार व स्वयं रोजगार विभागाकडे नसल्यामुळे इफेक्टीव्हली अमुक इतक्या लोकांना कायम स्वरुपी नोकरी दिलेली आहे हे निश्चितपणे सांगता येत नाही. यासाठी ठोस पावले उचलावी लागणार आहेत. तसेच यासंबंधीचा कायदा कडक करणे आवश्यक आहे. जेणेकरुन रोजगार व स्वयंरोजगार विभागाकडून ज्या सूचना गेल्या असतील किंवा मेळाव्याच्या माध्यमातून ज्या-ज्या ठिकाणी उमेदवारांना नोकरीसाठी प्राधान्य दिले असेल त्यांना नोकरी मध्ये कायम स्वरुपी कसे सामावून घेता येईल यादृष्टीकोनातून बंधन घालण्यासाठी आणि तशा प्रकारचे निर्देश देण्यासाठी कायदा करावा लागेल. याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केलेली आहे, ती बरोबर आहे.

सभापती महोदय,सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी सांगितले की,महाराष्ट्र राज्यामध्ये



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर . . ..

1 कोटी बेरोजगार आहेत आणि ही वस्तुस्थिती आहे.सन्माननीय सदस्यांनी एवढ्या बेरोजगार लोकांना नोकरी देण्याबाबत सूचना केलेल्या आहेत.शहरी भागाप्रमाणे ग्रामीण भागातील बेरोजगारांचा प्रश्न देखील मोठया प्रमाणात आहे. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी ग्रामीण भागात असलेल्या बेरोजगारांबाबत उल्लेख केला. आपण नेहमी पहातो की, आज ग्रामीण भागातील युवक शहरी भागामध्ये येत आहे आणि आपल्याला येथेच तातडीने नोकरी मिळावी अशी त्याची धारणा असते. ही बाब लक्षात घेता ग्रामीण भागामध्ये लहान-मोठे उद्योग, लघु उद्योग कसे सुरु करता येतील या दृष्टीकोनातून राज्य शासनाला येणाऱ्या काळामध्ये धोरण आखावे लागणार आहे आणि याबाबत निश्चितपणे विचार करता येईल.

सभापती महोदय, शिक्षण पध्दतीमध्ये देखील आमूलाग्र बदल झाला पाहिजे अशी देखील सूचना करण्यात आली आहे. आज उमेदवारांना बी.ए., बी.एस्सी. डिग्री घेतल्यावर किंवा पोस्ट ग्रॅज्युएशन केल्यावरही पाहिजे तशी नोकरी मिळत नाही. आज बेरोजगारांची संख्या मोठया प्रमाणात असली तरी त्यामध्ये ग्रॅज्युएशन केलेल्यांची संख्या देखील जास्त आहे. बी.एस्सी., बी.कॉम. केल्यानंतरही नोकरी मिळत नाही. त्यामुळे संबंधितांना तांत्रिकदृष्ट्या शिक्षण कसे देता येईल यादृष्टीने विचार करुन, सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांनी सांगितल्याप्रमाणे शिक्षण पध्दतीमध्ये देखील आमूलाग्र बदल करणे गरजेचे आहे. जेणेकरुन या विद्यार्थ्यांना टेक्नीकल शिक्षण देता येईल. आज मोठमोठया कारखान्यांसाठी तांत्रिक शिक्षण घेतलेले उमेदवार उपलब्ध होत नाही. त्यामुळे सुध्दा बेरोजगारांची संख्या वाढलेली आहे हे आपण पहातो. त्याठिकाणी रोजगार उपलब्ध आहे. आपल्याकडे कारखानदार येतात, त्यावेळी उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविल्यानंतर त्यांना तांत्रिकदृष्टया सक्षम असे उमेदवार मिळत नाहीत. तेथे बी.ए.,बी.कॉम.,बी.एस्सी.झालेले विद्यार्थी येतात आणि अशा उमेदवारांची आवश्यकता कमी प्रमाणात असते. म्हणून आय.टी.आय. किंवा अन्य माध्यमातून तांत्रिक शिक्षण उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर....

सन्मानीय मंत्री श्री. दर्डा साहेब यांनी कॅबिनेट बैठकीमध्ये एक विषय प्रपोज केलेला आहे. माध्यमिक शाळा व उच्च माध्यमिक विद्यालयांच्या माध्यमातून वेगवेगळया प्रकारचे लहान-मोठे उद्योगांचे सोर्सेस मग ते कुंभार काम असेल, लोहार काम असेल, सुतार काम असेल अशा पध्दतीचे लहान-मोठया उद्योगांचे कोर्सेस कसे सुरु करता येतील या बाबीचा समावेश शैक्षणिक पध्दतीमध्ये करावा लागेल. आय.टी. क्षेत्रातील भूमिकेबद्दल सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी उल्लेख केला आहे, ती गोष्ट खरी आहे. आपल्या देशातील आणि राज्यातील तरुण आय.टी क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणात पुढे गेलेला आहे. त्यांनी या क्षेत्रात रोजगार मिळविण्याचा प्रयत्न केलेला आहे आणि अनेक देशामध्ये चांगले् स्थान मिळविलेले आहे. म्हणून आय.टी. क्षेत्राची वाढ मोठया प्रमाणात करण्यासाठी राज्य सरकारला काय करता येईल या संदर्भात निश्चितपणे प्रयत्न करावा लागेल. यासंदर्भात राजकारणी व यशस्वी उद्योजक यांचे मत घ्यावे अशी सूचना केली गेली ती सूचना अतिशय महत्वाची आहे. या समितीमध्ये चांगल्या उद्योजकांचा आणि तज्ज्ञांचा ज्ञानाचा उपयोग करुन घेतला आणि त्यांच्याकडून सूचना घेण्याचा प्रयत्न केला तर निश्चितपणे चांगल्या पध्दतीचे काम या क्षेत्रात आपल्याला करता येईल.

सभापती महोदय, प्रत्येकाला रोजगार मिळण्याचा हक्क आहे, याबाबतीत कायदा करावा अशा प्रकारची सूचना या ठिकाणी केलेली आहे. ती चांगली गोष्ट आहे. राईट टू एज्युकेशन ज्या पध्दतीने सुरु केलेले आहे त्याचपध्दतीने रोजगाराचा हक्क कसा मिळवून देता येईल या दृष्टिकोनातून या सूचनेचा निश्चितपणे विचार करावा लागेल. सर्वच क्षेत्राला या विभागांतर्गत आणावे लागेल मग ते कारखाने असतील, सहकार क्षेत्र असेल,..

श्री. दिवाकर रावते (बसून) : या संदर्भात कायदा करण्यात आलेला आहे.

श्री. गुलाबराव देवकर : रोजगार हमी योजनेमध्ये अकुशल कामगार येतात. त्यांच्या संदर्भात कायदा केलेला असून शासन त्यांना 365 दिवसांच्या कामाची हमी देते.

श्री. दिवाकर रावते : अंशकालीन कर्मचाऱ्यांचा प्रश्न गेले कित्येक दिवस रेंगाळत पडलेला आहे. हे अंशकालीन कर्मचारी आता म्हातारे होत आलेले असून त्यांची मुले मोठी झालेली आहेत. या ठिकाणी शासनाने फक्त घोषणा न करता या अंशकालीन कर्मचाऱ्यांची जी 150 ते 200 मुले आहेत त्यांना दोन टक्क्यातून नोकरीत घेण्यात यावे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर : हा वेगळा विषय आहे. सभापती महोदय, डॉ. दीपक सावंत यांनी 17000 लोकांना रोजगार मिळाला आहे त्यासंदर्भातील माहिती देण्यात यावी असे म्हटले होते. त्याबाबतीतील माहिती मी दिलेली आहे. संयुक्त समिती स्थापन करण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला होता, यासंदर्भात ठरावामध्ये मुख्य विषय घेतलेला आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी असे सांगितले होते की, मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली जी समिती नेमण्यात आली होती, त्या समितीचे काय झाले?

श्री. गुलाबराव देवकर : त्याबाबतीत दुरुस्ती करण्यात आलेली आहे. दोन प्रकारच्या समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. दिनांक 4 ऑगस्ट, 2010 रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे....

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, याठिकाणी माजी मंत्री श्री. राणा जगजितसिंह, श्री. राजेंद्र दर्डा उपस्थित आहेत आणि आता आपण या विभागाचे माननीय मंत्री आहात. हा प्रश्न आपण तिघांनी मिळून सोडविला पाहिजे. या समितीचे काय झाले ते सांगितले पाहिजे.

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, सचिवांच्या संयुक्त समितीच्या बाबतीतील विषय मला माहीत नव्हता. परंतु दोन प्रकारच्या समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. रोजगार व स्वंय रोजगार विभागाने दिनांक 4 ऑगस्ट, 2010 रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांच्या समस्या परिणामकारक पध्दतीने सोडविण्याकरिता उपाययोजना सुचविण्यासाठी माननीय मंत्री उद्योग रोजगार व स्वंय रोजगार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्री समिती स्थापन करण्यात आलेली आहे. मंत्री समितीची ही एक समिती आहे. दुसरी समिती, मागच्या अधिवेशनामध्ये सभागृहात एका प्रश्नाच्या संदर्भात आमदार महोदयांची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी असे म्हटले होते.सर्व सन्माननीय सदस्यांच्या सूचनेचा आदर करुन मी ताबडतोबीने त्या संदर्भात माननीय राज्य मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापना केलेली आहे. या समितीमध्ये सन्माननीय सदस्य श्री. संजय वामन सावकारे, श्री. दिलीपराव शंकरराव सोनवणे, श्री.प्रकाश उत्तमराव डहाके, श्री. विनायक तुकाराम मेटे, प्रा. सुरेश नवले हे सदस्य आहेत. तसेच श्री. विजय कुमार गौतम हे अधिकारी आहेत.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : या समितीमध्ये विरोधी पक्षातील सदस्य कोण आहेत. विरोधी पक्षातील कोणीही सदस्य या समितीमध्ये नाहीत मग शासनच समिती नेमणार आणि शासनच निर्णय घेणार असे कुठे असते काय?

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

सभापती महोदय, त्या समितीवर विरोधी पक्षाचा कोणताही सदस्य घेतलेला नाही. अशी समिती असते काय ?

श्री. गुलाबराव देवकर : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, हा जो विषय होता तो उशिरापर्यंत चालला होता.

डॉ. दीपक सावंत : आम्ही उशिरापर्यंत सभागृहात बसतो.

श्री. गुलाबराव देवकर : सदस्य उपस्थित नसतात असे मला म्हणावयाचे नाही.

डॉ. दीपक सावंत : उशिरा समिती नेमली तेव्हा आम्ही उपस्थित नव्हतो काय ?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, या समितीवरील आणखी काही सन्माननीय सदस्यांची नावे वाचावयाची राहिलेली आहेत. या समितीमध्ये सन्माननीय सदस्य श्री. सुधीर मुनगंटीवर, सन्माननीय सदस्य श्री. सुरेश गणपती हळवणकर या दोन सदस्यांचा समावेश केलेला आहे आणि बाकीचे इतर सदस्य आहेत.

डॉ. दीपक सावंत : त्या समितीमध्ये विधान परिषद सभागृहाचे सदस्य आहेत का ?

श्री. दिवाकर रावते : ही समिती अस्तित्वात आहे का ?

श्री. गुलाबराव देवकर : ही समिती अस्तित्वात आहे.

श्री. दिवाकर रावते : यासंदर्भात समिती नेमावी अशी सन्माननीय सदस्यांची मागणी आहे. त्यामुळे त्या समितीचा विस्तार करा. त्या समितीमध्ये विधान परिषद सभागृहातील सत्ताधारी पक्षाच्या तसेच विरोधी पक्षाच्या सदस्यांना घेऊन ती समिती कार्यान्वित करा.

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, या समितीची एक सभा सुध्दा झालेली आहे.

श्री. संजय केळकर : या समितीचा विस्तार करणार काय ?

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. ज्यावेळी एखादी समिती स्थापन केली जाते त्यावेळी अशी समिती नेमलेली आहे याचे परिपत्रक या सभागृहात देखील वाचून दाखविले जाते. या समितीमध्ये या सभागृहातील सदस्य प्रा. सुरेश नवले यांचे नाव घेतले त्याबद्दल आनंद आहे. परंतु या सभागृहात त्याबाबतचे परिपत्रक आलेले नाही. जर ही समिती नेमलेली असेल तर वरच्या सभागृहामध्ये त्याबाबतचे परिपत्रक वाचून दाखविलेले नाही. त्यामुळे ही समिती कशी असेल, त्यांची सॅंक्टीटी काय असेल, याचे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी द्यावे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP/ KTG/ KGS/

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मागच्या अधिवेशनामध्ये काही सन्माननीय सदस्यांनी या विषयावर चर्चा उपस्थित केली असता सन्माननीय मंत्री महोदयांनी समिती नेमण्यात येईल असे सांगितले होते. त्या नंतर अधिवेशन संपले. अधिवेशन संपल्यानंतर मंत्री महोदयांनी त्याबाबत तात्काळ दखल घेऊन या समितीची स्थापना केली. समिती नेमण्यात येईल असे जे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले होते त्याची त्यांनी ताबडतोब अंमलबजावणी केली आणि समिती स्थापन केली. ही समिती स्थापन करीत असताना त्या समितीवर कोणाला घ्यावयाचे, कोणाला घ्यावयाचे नाही, हा पूर्ण अधिकार माननीय मंत्री महोदयांचा आहे. आम्हालाच घेतले पाहिजे असा आग्रह असता कामा नये. आम्हाला घ्या असे सरळ सांगावे.

श्री. दिवाकर रावते : त्याबाबत मान्यता घ्यावयाची असते.

श्री. विनायक मेटे : समितीवर कोणाला घ्यावयाचे, सत्ताधारी पक्षाचे सदस्य घ्यावयाचे की, विरोधी पक्षाचे सदस्य घ्यावयाचे याबाबत पूर्ण अधिकार सत्ताधारी पक्षाला आणि माननीय मंत्री महोदयांना आहे. तो तुमचा अधिकार नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्य जे आरोप करीत आहेत ते बरोबर नाहीत. त्यांचे आक्षेप चुकीचे आहेत.

श्री. दिवाकर रावते : सभागृहाच्या मान्यतेशिवाय समिती नेमण्याचा अधिकार आहे काय ? हे मी पहिल्यांदाच ऐकत आहे.

( दोन्ही बाजूचे अनेक सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात )

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : सन्माननीय सदस्यांनी आपसामध्ये बोलू नये. हा राज्याचा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे.

श्री. दिवाकर रावते : सदनाची समिती सदनाच्या मान्यतेने व्हावयास पाहिजे. ते कोणाच्या मर्जीने होत नाही.

श्री. विनायक मेटे : तुम्ही विनंती करा.

श्री. दिवाकर रावते : विनंती करायला आम्ही भिकारी आहोत काय ? आम्ही आमदार आहोत. आमचा या सदनामध्ये काही अधिकार आहे. मंत्री महोदय असे म्हणाले असते तर एक वेळ ठीक आहे पण सन्माननीय सदस्य असे कसे बोलू शकतात. सन्माननीय सदस्यांना आपले शब्द मागे घेण्यास सांगावे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते........

सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे हे आमच्यासारखेच या सदनाचे सदस्य आहेत. त्यामुळे सरकारच्या वतीने ते कसे काय बोलू शकतात ?

डॉ.दीपक सावंत : सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी चुकीचे वक्तव्य केलेले आहे.

( दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलत असतात.)

**तालिका सभापती ( श्री.मोहन जोशी )** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, या ठरावावर अतिशय चांगल्या प्रकारे चर्चा झालेली आहे. त्या चर्चेला सन्माननीय राज्यमंत्री उत्तर देत आहेत. समितीच्या संदर्भात सभागृहातील सदस्यांच्या भावना निश्चितपणे विचारात घेतल्या जातील. या समितीचा निश्चितपणे विस्तार केला जाईल. त्यामुळे मला असे वाटते की, सन्माननीय राज्यमंत्र्यांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, सन्माननीय मंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे या समितीचा विस्तार करण्यात येईल. परंतु या समितीबाबत शासनाने जी.आर. काढलेला आहे. हिवाळी अधिवेशनामध्ये या समितीबाबतची माहिती सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात आली होती, या समितीला मान्यता दिलेली आहे. तरी सुध्दा सन्माननीय सदस्यांचा आदर ठेवून या समितीचा विस्तार करण्यात येईल असे सांगतो. सन्माननीय सदस्यांनी आपला ठराव मागे घ्यावा अशी मी त्यांना विनंती करतो.

डॉ.सुधीर तांबे : मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणातून अनेक प्रकारच्या उपाययोजना जाहीर केलेल्या आहेत. त्याचप्रमाणे दोन्ही सभागृहातील संयुक्त समितीबाबतही त्यांनी सांगितले आहे. या समितीचा विस्तार करण्याचे त्यांनी मान्य केलेले आहे, त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. मी माझ्या भाषणात केलेल्या सूचनांची त्यांनी गंभीरपणे नोंद घेतल्याचे सांगितले आहे. मंत्री महोदयांनी आता उत्तरात जे आश्वासन दिलेले आहे त्याची प्रभावीपणे व तातडीने कार्यवाही करावी अशी मी त्यांना विनंती करतो आणि हा ठराव मागे घेण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला.

----

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी हरकतीचा मुद्दा मांडत आहे. या ठरावाच्या निमित्ताने एक गंभीर बाब सभागृहासमोर उघडकीस आलेली आहे. मागील अधिवेशनामध्ये या विषयाच्या ठरावावर चर्चा झाली होती असे सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी सांगितले आहे. त्यावेळी सुध्दा या प्रश्नासंबंधी चिंता व्यक्त करण्यात आली होती. त्यावेळी सन्माननीय सदस्यांनी याबाबत एक समिती स्थापन करण्याची मागणी केल्यावर अधिवेशन संपले होते. येथेपर्यंत हा घटनाक्रम बरोबर आहे. मंत्री महोदयांनी यासंबंधी समिती स्थापन झाल्याचे व त्यातील सदस्यांची नावे वाचून दाखविली आहे. ही संयुक्त समिती केव्हा स्थापन झाली ते आम्हाला माहीत नाही. कोणत्याही समितीचे गठन झाल्यावर तिला सभागृहाची मान्यता घेतली पाहिजे अशी तरतूद आहे. या समितीला सभागृहाची मान्यता न घेता ती अस्तित्वात आली आहे. या समितीमध्ये कोणाला घेतले, कोणत्या पक्षाच्या सदस्यांना घेतले हा वेगळा भाग आहे. या समितीला मंत्री महोदयांनी सभागृहाची मान्यता घेतली नसल्यामुळे सभागृहाचा अवमान झालेला आहे. मंत्री महोदयांनी मघाशी समितीबाबतची सर्व माहिती रेकॉर्डवर आणलेली आहे. त्यामुळे मंत्री महोदयांच्या विरुध्द हक्कभंगाची सूचना दाखल करण्याचे मी सूतोवाच करीत आहे.

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, या समितीचे गठन झाल्यावर त्याबाबतची माहिती सर्व सन्माननीय सदस्यांना कळविली होती.

**तालिका सभापती** : मला वाटते की, हा विषय येथे संपलेला आहे.

श्री सय्यद जमा : अध्यक्ष महोदय, मेरा पाइंट ऑफ आर्डर है और वह यह कि इस सदन में कई बार चर्चा होने के बाद सरकार की ओर से कार्रवाई होती है. यहां पर उन्होंने कहा कि चीफ सेक्रेटरी की अध्यक्षता में एक कमेटी बनी है. मैं कहना चाहूंगा कि वह कमेटी बनने की कोई जानकारी हमको नहीं है. हमारा कहना है कि हाऊस में चर्चा करने के बाद यदि कोई कमेटी बनती है तो उसकी लिखित जानकारी, नोटिफिकेशन निकालकर हमको मिलनी चाहिए.

इसके अलावा कमेटी बनाने के संबंध में एक रुल के मुतातबिक यह अधिकार सभापति महोदय का है कि वह उस कमेटी में किसको लेना चाहते हैं और किसको नहीं लेना चाहते हैं. किस पार्टी या किस ग्रुप के माननीय सदस्य को उस कमेटी में रखना है यह अधिकार सभापति

...3

श्री सय्यद  जमा....

महोदय का है. हमारा कहना है कि यदि इस कमेटी का विस्तार होना है तो फिर उस बारे में डिसकसन होना चाहिए और जिस पार्टी या जिस ग्रुप के माननीय सदस्यों को उस कमेटी में लेना है, उस पार्टी के नेता या उस पार्टी के प्रतोद से सलाह-मशविरा करके उनकी सहमति से माननीय सदस्यों को उसा कमेटी में लिया जाना चाहिए.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यात मराठी माध्यमाच्या बंद पडत चाललेल्या शाळा

**मु.शी.**: राज्यात मराठी माध्यमाच्या बंद पडत चाललेल्या शाळा
या विषयावरील श्री. दिवाकर रावते, वि.प.स. यांचा ठराव

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील ठराव मांडतो.

"राज्यातील मराठी शाळांच्या बाबतीत शासनाच्या उदासीन भूमिकेमुळे, मराठी माध्यमांच्या बंद पडत चाललेल्या शाळा, परिणामी, मराठी शाळांचे व भाषेचे अस्तित्व व भवितव्य धोक्यात आले आहे. मराठी शाळांच्या बाबतीत स्वीकारलेल्या उदासीनतेच्या व दिरंगाईच्या धोरणामुळे राज्याची राजभाषा मराठी असूनही ती निराधार झाली आहे. मराठी भाषेचे संवर्धन व्हावे व मराठी माध्यमांच्या शाळा बंद पडू नयेत यासाठी ठोस भूमिका शासनाने स्वीकारावी, त्याचप्रमाणे मराठी शाळांच्या ८००० प्रस्तावांना विनाविलंब मान्यता देण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

सभापती महोदय, मी पहिल्यांदा शासनाच्या या धोरणाला मन:पूर्वक आदरांजली वाहतो. मराठी शाळांच्या बाबतीतील श्रध्दांजली माननीय शालेय शिक्षण मंत्री श्री. राजेंद्र दर्डा यांच्या नशिबी का यावी हे मला माहीत नाही. सांगली जिल्ह्यात जत तालुका आहे. आपण किती कार्यप्रवण आहात, प्रामाणिक आहात ? या जत तालुक्यामध्ये एकही मराठी शाळा नाही. सर्व कन्नड भाषिक शाळा आहेत. याबाबतीत जेव्हा प्रशासनाला विचारणा केली त्यावेळी असे सांगितले गेले की, जेव्हा सीमा प्रश्न सुटेल त्यावेळी जत तालुका तिकडे जाणार असल्यामुळे आम्ही येथे मराठी शाळा काढत नाही. तिकडे बेळगावचे कानडीकरण करुन कर्नाटक सरकारने मराठी भाषिकांवर अत्याचार करण्याचा सपाटा लावलेला असून तेथील मराठी भाषिकांना चेपले जात आहे. इकडे मात्र त्यांना कुरवाळले जातेय. सभापती महोदय, जत तालुका महाराष्ट्रात आहे, तो आपला तालुका आहे. तेथे एकही मराठी शाळा नाही. मग चुलीत घालयचे काय तुमच्या बृहत आराखडा करणा-या अधिका-यांच्या भूमिकेला ? बृहत आराखडा बृहत आराखडा अशी बोंबाबोंब ते करतात...

..२..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी माननीय मंत्र्यांच्या संदर्भात "बोंबाबोंब" असा शब्द वापरलेला आहे. तो कार्यवृत्तातून काढून टाकावा.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी अधिका-यांच्या संदर्भात बोललो, " मग चुलीत घालायचे काय तुमच्या बृहत आराखडा करणा-या अधिका-यांच्या भूमिकेला ?" असे वक्तव्य मी केले. मला असे वाटले होते की मी वस्तुस्थिती सांगितल्या नंतर रणरागिणी उठतील आणि शालेय शिक्षण मंत्र्यांना विचारतील की, "दर्डाजी हे काय लावले आहे ?"

सभापती महोदय, या सभागृहामध्ये हा विषय का आला ? आमच्या शासनाने अत्यंत कौतुकाने मराठीच्या सुरु असणा-या शाळांच्या बाबतीत कारवाई करण्याचे आदेश दिले. पूर्वीच्या शालेय शिक्षण मंत्र्यांनी या सभागृहामध्ये अधिकृतपणे असे सांगितले की, मराठी शाळेला मान्यता दिली तर अनुदान द्यावे लागेल. मराठी शाळांना अनुदान द्यावे लागते म्हणून मराठी शाळा सुरु करण्याची परवानगी न देण्याचा निर्धार सरकारने केलेला आहे. मराठी माणूस, मराठी भाषा यांची घोर प्रतारणा करण्याची प्रवृत्ती या सदनामध्ये प्रक्षेपित केली आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये मराठी भाषेच्या पाठीत खंजीर खुपसण्याचे काम जाहीररित्या या सदनाच्या माध्यमातून केले जात आहे

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

आणि मग आम्हाला शाळेला अनुदान द्यावे लागेल असे या ठिकाणी तुम्ही सांगता. ही गोष्ट बरोबर आहे की नाही यासंबंधी या सभागृहातील शिक्षक मंडळींनी मला माहिती द्यावी. मी शिक्षक मंडळींना सांगितले, शिक्षण संचालकांना सांगितले नाही. यासंदर्भात लोकांमध्ये चीड झाली आणि त्यांनी होळी केली. या देशातील प्रत्येक राज्यामधील प्रत्येक नागरिकास मातृभाषेमध्ये शिक्षण मिळावे असा घटनादत्त अधिकार देण्यात आलेला आहे. यासंदर्भातील घटनेतील मसुदा मी वाचून दाखविणार आहे. त्यात असे म्हटले आहे की, राज्यातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या सर्व सुखसोयी उपलब्ध करुन देणे ही राज्य सरकारवर टाकलेली जबाबदारी आहे. सभापती महोदय,काही महिन्यापूर्वी केंद्र सरकारमध्ये मा.श्री.कपिल सिब्बल यांनी राईट टू एज्यूकेशन असा अधिकार या देशात जन्मलेल्या प्रत्येक मुलास दिला. त्यांनी घटनेच्या पुढे जाऊन एक पाऊल टाकले. त्यांचे कौतुक आणि अभिनंदन केले पाहिजे.

सभापती महोदय, सुवर्ण महोत्सवी वर्षासंबंधीची समिती स्थापन करण्यात आली आहे. त्या समितीची बैठक आयोजित करण्यात आली, त्या बैठकीस आम्हाला निमंत्रित करण्यात आले. सुवर्ण महोत्सवी वर्ष कसे साजरे करावयाचे, मंडप कुठे टाकावयाचा, मंडपावर किती कोटी रुपये खर्च करावयाचे ? यासंबंधीची चर्चा झाली. मंडपासाठी दोन कोटी, तीन कोटी रुपये खर्च झाला तरी चालेल परंतु तो मंडप विधान भवनाच्या प्रांगणातच घालावयाचा. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी देखील सांगितले की, मंडप विधान भवनाच्या प्रांगणातच घालावयाचा. मी त्यावेळी सांगितले की, या कार्यक्रमासाठी षन्मुखानंद हॉल घ्यावा. या हॉलमध्ये तीन ते साडेतीन हजार लोक बसू शकतात. त्यासंदर्भात मला सांगण्यात आले की, तो कार्यक्रम विधान भवनाच्या प्रांगणातच झाला पाहिजे. तरच या कार्यक्रमाला महत्व येईल. मग त्या कार्यक्रमासाठी तीन कोटी रुपयांचा मंडप घातला गेला तरी चालेल. माझी त्यास हरकत नाही. हौसेला मोल नसते. परंतु स्वत:च्याच भाषेचा जाहीर खून करणारे राज्यकर्ते जगाच्या पाठीवर महाराष्ट्राशिवाय अन्य ठिकाणी सापडणार नाहीत अशी त्यांची अवस्था एका निर्णयामुळे झालेली आहे. कर्नाटक राज्यामध्ये कन्नड भाषेची सक्ती करण्यात येत आहे. कर्नाटकातील मराठी भाषिक लोक हे अत्यंत दुर्भाग्याचे आणि दुर्देवी जीवन जगत आहेत. कर्नाटकात मराठी शाळा बंद करीत आहेत. अशी परिस्थिती असताना हे राज्य शासन मराठी शाळा बेदिक्कत बंद करीत आहे. परंतु इंग्रजी शाळेसाठी मात्र कोणत्याही प्रकारचा बृहत आराखडा

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

लागत नाही. इंग्रजी शाळा कोठेही उघडा, कशाही प्रकारे उघडा, इंग्रजी शाळा विना अनुदान तत्वावर उघडल्या जातात त्यावर बंधन नाही. कालांतराने शिक्षकांच्या अंदोलनातून या मराठी शाळा अनुदानीत होतील या भीतीने मराठी शाळा उघडण्यावर बंदी आणली आहे.

सभापती महोदय, मला एका गोष्टीचे वाईट वाटते की, धान्यापासून दारु बनविण्याकरिता कारखान्यांना अनुदान देण्यात येते. तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या सुपुत्रास धान्यापासून दारु बनविण्याच्या कारखान्यास शासनाने 350 कोटी रुपयांचे अनुदान दिले. भाग्यशाली राजपुत्र जन्माला आलेले आहेत. त्या भाग्यशाली सुपुत्रास दारु बनविण्याकरिता 350 कोटी रुपयांचे अनुदान दिले. शिक्षणासाठी अनुदान द्यावे लागेल या भीतीने वागणारे हे सरकार दारु बनविण्यासाठी अनुदान उपलब्ध करुन देते. सभापती महोदय, वृत्तपत्रात एक बातमी आली. मंत्र्यांच्या बंगल्यांमध्ये डागडुजी करण्यासंबंधी कोणत्याही प्रकारच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झालेल्या नाहीत. परंतु पूर्वीच्या मंत्र्यांनी या बंगल्यांची डागडुजी करण्याकरिता करोडो रुपये खर्च केले होते. नवीन मंत्रिमंडळ स्थापन झाल्यानंतर मंत्र्यांनी आपापल्या बंगल्यांची पुन्हा डागडुजी केली व त्या कामावर करोडो रुपये खर्च केले. प्रत्येक मंत्र्यांनी बंगल्यांची डागडुजी करण्यासाठी किती पैसे खर्च केले याची आकडेवारी वृत्तपत्रात छापून आली आहे. मागच्या मंत्र्यांनी बंगल्यावरील खुर्चीत बसून काय काय केले असेल म्हणून ती खुर्ची बदलून टाकावयाची. हा बदल करण्यामागे मंत्र्यांच्या काही भावना असू शकतात. आपण देखील खुर्ची बदलण्यामागची भावना आपण ओळखून घेतली पाहिजे.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ MMP/ 11:15

श्री.दिवाकर रावते.......

ती मऊ नसते का? ती मऊ असते. आमची त्याबद्दल तक्रार नाही. परंतु शिक्षणाला पैसा द्यायचा म्हटल्यानंतर अर्थ खात्याला का अडचण भासते? हा प्रश्न ज्यावेळी पुढे येतो त्यावेळी खूप दु:ख होते. काल पुण्यामध्ये पुन्हा निदर्शने झाली. 21 मार्च, 2011 पासून पुण्यामध्ये धरणे आंदोलन सुरु होणार आहे. या विषयावर मागील हिवाळी अधिवेशनात 9 डिसेंबर, 2010 रोजी मी विशेष उल्लेखाची सूचना मांडली होती. मला अद्याप शासनाकडून उत्तर पाठविण्यात आलेले नाही. हा प्रस्ताव शासनाकडे धूळ खात पडून आहे. अशा वेळेला इंग्रजी शाळांबाबत कोणतेही बंधन नाही. कोणीही उठावे आणि इंग्रजी शाळा काढावी. मी माननीय शिक्षणमंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. एवढ्यासाठी अभिनंदन करतो की, एखाद्या मंत्र्याला समोर जे दिसते ते बोलण्याची हिंमत त्यांनी दाखविली. इंग्रजी शाळा काढता. इंग्रजी शिकवावयास शिक्षक नाहीत, तर कशाला इंग्रजी शाळा काढता? हे माननीय मंत्री श्री.दर्डा साहेबांचे वक्तव्य आहे. एक मंत्री महोदय जे समोर दिसते ते बोलून दाखवितात. इंग्रजी शाळांचे पेव एवढे फुटले आहे की, जो उठतो तो इंग्रजी शाळा काढतो. घरामध्ये मराठी अस्मिता जपणारी माणसे इंग्रजी शाळा काढतात. इंग्रजी शिकवावयास शिक्षकच नाहीत.

सभापती महोदय, कै.रामकृष्ण मोरे हे या राज्याचे शिक्षणमंत्री होते. त्यांनी पहिलीपासून इंग्रजी विषय शिकविण्याची कल्पना मांडली. त्यानंतर प्रा.वसंत पुरके हे शिक्षणमंत्री झाले. त्यांनी या निर्णयाची री ओढली. आम्ही त्यांचे अभिनंदन केले. मराठी शाळांमध्ये पहिलीपासून इंग्रजी शिकविण्याच्या निर्णयाचे आम्ही स्वागत केले. नंतर असे लक्षात आले की, इंग्रजी विषय शिकविण्यास शिक्षकच नाहीत. जे शिक्षक आहेत त्यांना ट्रेनिंग द्यायचे आणि त्यांनी एक-एक क्लास घ्यायचा. त्याबाबत शासनाने नियोजन केले. ते कितपत यशस्वी झाले? ही योजना अद्याप कार्यरत आहे की नाही याची मला माहिती नाही. आम्ही प्रत्यक्ष पाहिले तेव्हा असे दिसून आले की, पाचवी-सहावीच्या वर्गातील मुलांना इंग्रजी भाषेतून स्वत:चे नाव लिहिता येत नाही, पुस्तकातील धडा वाचता येत नाही. कविता हा विषयच नाही. हे आम्ही प्रत्यक्ष अनुभवतो आहोत.

सभापती महोदय, "मान्यतेच्या प्रतिक्षेत असलेल्या शाळा" याबाबत मी अधिकृतरित्या आपल्या माध्यमातून शाळांची यादी सादर करु शकतो. या शाळांमध्ये पूर्ण विद्यार्थी संख्या आहे. या शाळांना शासनाने पहिले ते चौथी व चौथी ते सातवीपर्यंत मान्यता दिली आहे. परंतु नैसर्गिक

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

वाढीप्रमाणे होणारा विषय आणि त्यापुढील मान्यता मात्र शासनाने रोखून ठेवली. त्या शाळांमधील विद्यार्थ्यांनी सातवीनंतर जायचे कुठे? माझ्याकडे 100 ते 150 प्रकरणांची माहिती आहे. विदर्भातील शाळांची यादी आहे. 100 शाळांमध्ये विद्यार्थी संख्या पूर्ण असताना शासनाने सांगितले की, तुम्हाला पुढील मान्यता देणार नाही म्हणजे नाही. हा कसला हट्ट आहे? दुर्दैव असे की, यातील एकही शाळा नेत्याची, आमदारांची किंवा खासदारांची नाही. शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांनी सुरु केलेल्या या शाळा आहेत. 1500 शाळांच्या मान्यतेचे प्रकरण उच्च व सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेले होते. तत्कालीन शिक्षणमंत्र्यांच्या स्वत:च्या 170 शाळा त्यामध्ये अंतर्भूत होत्या. सत्तेचा वापर कसा करावा याचे हे उत्तम उदाहरण आहे. मी अधिकृत बोलत आहे. त्या 1500 शाळांच्या प्रकरणाची कोर्टाने जो काही निकाल लावायचा तो लावला. मी याठिकाणी नाव घेऊ शकत नाही. प्रत्येक शाळेच्या मान्यतेसाठी किती रक्कम घेतली? किती कोटी रुपये जमा केले? मी नाव घेऊ शकत नाही. तुम्हाला ते माहित आहे. मी यादी तुमच्यापुढे ठेवतो, तुम्हीच व्हेरिफाय करा. परंतु हा हट्ट कशासाठी? मंत्री महोदयांनी माझ्याकडे जी माहिती दिली गेली ती वाचण्याची त्यांनी तसदी घेऊ नये. राज्यात एकूण किती प्राथमिक शाळा आहेत, विद्यार्थी संख्या किती आहे, शिक्षक किती आहेत याची अधिकृत माहिती उपलब्ध आहे. ती माहिती वाचून दाखविण्यापेक्षा गळती कशी होते हे मी सांगणार आहे.

नंतर क्यू.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ............

हा घटनात्मक व तांत्रिक असा विषय आहे. माननीय श्री. राधाकृष्ण विखे-पाटील हे या राज्याचे शिक्षण मंत्री असताना हा विषय ऐरणीवर आलेला आहे. सन 2002 मध्ये न्यायालयाने शासनाला विचारले तेव्हा शासनाच्या वतीने एक प्रतिज्ञा पत्र न्यायालयात सादर करण्यात आले व त्यात "आम्ही बृहत आराखडा तयार करु आणि त्याप्रमाणे शाळांना मान्यता देऊ" असा उल्लेख केला होता. आम्ही अजूनही माननीय श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांनाच शिक्षण मंत्री समजत आहोत. त्यानंतर सन 2005 मध्ये शासनाकडे मराठी शाळा सुरु करण्यासाठी आलेल्या प्रस्तावांना मान्यता दिली गेली. सन 2005 नंतर मात्र या राज्यात मराठी शाळांना मान्यता दिल्या गेल्या नाहीत. मग सन 2008 मध्ये शासनाने पुन्हा असे प्रस्ताव मागविले आणि ते प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर दि. 29 एप्रिल, 2008 रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत कायम विना अनुदानित तत्वावर शाळांना मान्यता देण्याबाबत चर्चा झाली होती. मंत्रिमंडळाच्या बैठकीत एखाद्या गोष्टीवर निर्णय घेत असताना त्यामागील भूमिका तांत्रिक आहे, अव्यवहार्य आहे की व्यवहार्य आहे याचा विचार करुन अशा प्रस्तावांवर निर्णय घ्यावा असे अभिप्रेत असते. हे मी अधिकृत रित्या माननीय शिक्षण मंत्र्यांना आव्हान देऊन सांगतो की, दि. 29 एप्रिल, 2008 रोजी कायम विना अनुदानित तत्वावर मान्यता देण्यासाठी जे अर्ज मागविले त्यांची मान्यता नंतर 16 जून, 2008 रोजीच्या बैठकीत लगेच रद्द करुन टाकली. हा काय प्रकार आहे हेच मला समजत नाही. ती मान्यता रद्द करण्यामागचे कारण काय तर मंत्रिमंडळाला वाटले म्हणून ही मान्यता रद्द करण्यात येत आहे असे सांगण्यात आले.

महोदय, मराठी शाळांना मान्यता देण्यापूर्वी वास्तविक अशा शाळा सुरु कराव्या लागतात, तीन महिने शाळा चालविल्यानंतर संबंधित जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी येऊन त्याची तपासणी करतात आणि त्यांनी मान्यतेचा दाखला दिल्यानंतर शासनाकडे शाळा सुरु करण्यासाठी मान्यता मिळावी म्हणून अर्ज केला जातो. त्याप्रमाणे राज्यात काही शाळा सुरु झाल्या, मुले सुध्दा यायला लागली, शिक्षण घेऊ लागली पण लगेच मंत्रिमंडळाने त्या शाळांची मान्यता रद्द करुन टाकली. अशा परिस्थितीत त्या शाळेत दाखल झालेल्या मुलांच्या भवितव्याचा विचार शासनाने काय केला, हा महत्वाचा प्रश्न आहे. स्व. तात्यासाहेब शिरवाडकर आता हयात नाहीत हे एका दृष्टीने बरे झाले. ते हयात असते तर त्यांनी काय केले असते हे माहीत नाही. आमचे नाशिककर सन्माननीय सदस्य

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .........

हे स्व. तात्यासाहेबांचे शिष्य आहेत. मी त्यांना विचारु इच्छितो की आपल्याला या निर्णयाबाबत काय वाटते ? स्व. तात्यासाहेब एकदा असे म्हणाले होते की, "मराठी मंत्रालयाच्या दारात कशी उभी आहे" ? आज मात्र या मराठीचे दुर्दैव असे की, मराठी शाळा चालू करण्याची मान्यता दिल्यानंतर लगेच ती मान्यता रद्द करण्यात येते, तसे आदेश पारित केले जातात. एवढेच नव्हे तर आदेशाचे पालन न करता त्या शाळा पुढे चालूच ठेवल्या तर त्यांना एक लाख रुपये दंड ठोठावण्याचेही त्या आदेशात म्हटले आहे. तसेच त्यापुढेही शाळा सुरुच राहिल्या तर दर महिन्याला दहा हजार रुपये दंड केला जाईल असे त्यात म्हटले आहे.

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. रामनाथ मोते)**

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

वरुन परत शाळा चालकांना सांगण्यात आले की, तुमच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील. सभापती महोदय, आपण पीठासीन अधिका-याचा पदावर बसलेला असल्यामुळे तसेच आपण शिक्षकी पेशाचे असल्यामुळे मला आनंद झालेला आहे परंतु आपण या विषयाच्या संदर्भात आपल्या संवेदनांना चालना द्यावी असे मला वाटते. शाळा रद्द करण्याचे आदेश देऊन सुध्दा शाळा चालवली तर एक लाख रुपये दंड, असे असतांनाही शाळा चालवली तर दर महिन्याला वरुन 10 हजार रुपये दंड व एवढे करुनही शाळा चालवली तर फौजदारी गुन्हा हे जे काही या शासनाने चालवले आहे ते मराठी माणासाला चीड आणणारे आहे.

सभापती महोदय, या शासनाला गुन्हेगारांना शोधायला वेळ लागतो, गुन्हे दाखल करण्यास वेळ लागतो. पुण्याचा घोडे व्यापारी श्री. हसन अली याच्यावर आपल्याला गुन्हे दाखल करता आलेले नाहीत, काही आरोपी तर पोलिसांच्या गाडीत राहूनच जामीन शोधत असतात. शाळा चालकांना 420 व 406 कलामान्वये आदेश धाडलेले आहेत. या महाराष्ट्रात मराठी ही राज भाषा असतांना मराठी भाषिक शाळा चालवण्याकरिता संस्था चालकांना जाच आणि यातना भोगाव्या लागतात त्यामुळे या सरकार पेक्षा कर्नाटक सरकार बरे असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. कर्नाटकचा कवी असे म्हणाला की, "महाराष्ट्र हा सुध्दा अगोदर पूर्णपणे कर्नाटकात होता". हे जे काही बोलले आहे ते चीड आणणारे आहे. आम्हाला खरे म्हणजे याबद्दल घृणा वाटते. हे शासन मराठी शाळेची गळचेपी करीत आहे. तसेच ते सुध्दा म्हणतात की, आम्ही तर तुमच्या मराठी शाळा मारुन काढल्या आहेत त्यामुळेच ते असे म्हणाले आहेत. मराठी शाळा काढल्या जातात म्हणून संस्था चालकांविरुध्द 420 कलम लावले जाते व 406 कलमाखाली गुन्हे दाखल केले जात आहे. हे सरकार मराठी शाळा बंद करण्यासाठी संस्था चालकांवर बंदूक रोखत आहे. तत्कालीन शिक्षणमंत्री आदरणीय श्री. राधाकृष्ण विखे-पाटील आता शिक्षण मंत्री नसल्यामुळे मी त्यांना जबाबदार धरणार नाही. याचा अर्थ असा नाही की, 14 व्या लोकसभेने चोरी किंवा लूट केली असेल तर त्यासाठी 15 व्या लोकसभेचा काही संबंध नाही, असे आहे काय ? परंतु त्यांनी असे सांगितले होते की, "यासंदर्भातील बृहत आराखडा डिसेंबर,2010 पर्यंत जाहीर करण्यात येईल." परंतु अजूनही बृहत आराखडा अद्यापपर्यंत तयार झालेला नाही.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** ( श्री. रामनाथ मोते ) : या ठरावासाठी 40 मिनिटाचा अवधी देण्यात आला असून त्यानंतर माननीय मंत्र्यांचे उत्तर होणार आहे. त्यामुळे आपण आपले विचार थोडक्यात पूर्ण करावेत. या चर्चेसाठी मर्यादित वेळ देण्यात आलेला आहे.

श्री.दिवाकर रावते : हा महत्वाचा विषय असल्यामुळे इतर विषय बाजूला राहिले तरी चालतील. महाराष्ट्रातील हा ज्वलंत प्रश्न आहे. या विषयाच्या संदर्भात नंदूरबार, वर्धा,परभणी, पुणे या ठिकाणी आंदोलन झाले होते. या ठरावावर सरकारला उत्तर देतांना नाकीनऊ येईलच. या विषयाच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करण्यात आली व यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे की, "कोणालाही कोठेही शाळा काढण्याचा हक्क मुळातच भारतीय घटनेने कलम 19(क) अनुसार नागरिकांना दिलेला आहे. त्यामुळे सरकारने मान्यता देण्याचा विषय मुळातच घटनाबाह्य आहे. शिवाय राज्याचा आणि स्थानिक स्वराज्य संस्थाचा असा प्रयत्न असला पाहिजे की, आपल्या मातृभाषेतून प्राथमिक शिक्षण घेण्यासाठी कलम 350(अ) अनुसार सहाय्य करावे. ज्या शाळा अनुदान मागतील त्या शाळांना अनुदान देणे हे सरकारची जबाबदारी आहे."

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

त्यामुळे ज्यावेळी त्यांनी शासनाकडे अनुदान मागितले त्यावेळी त्यांना अनुदान देणे ही सरकारची जबाबदारी आहे. त्याचबरोबर राईट टू एज्युकेशनमुळे ही जबाबदारी तर शासनावर आलेलीच आहे. अशा प्रकारे घटनादत्त परिस्थितीमध्ये आपण कोणत्या अधिकारामध्ये हे सर्व नाकारत आहात ? हा प्रश्न निर्माण झालेला आहे.

सभापती महोदय, या बाबतीत दंडाच्या आणि कारवाईच्या संदर्भात जे परिपत्रक काढण्यात आले होते ते मी या ठिकाणी वाचून दाखवले आहे. औरगाबाद खंडपीठाने या बाबतीत स्पष्ट शब्दात निर्णय दिलेला आहे. दिनांक 8 एप्रिल 2010 रोजी उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने तो निर्णय दिलेला आहे. आपल्या इच्छेने शैक्षणिक संस्था चालविणे हा नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे असे घटनेमध्ये जे म्हटलेले आहे ते सुध्दा मी मघाशी वाचून दाखवले आहे. राईट टू एज्युकेशन हा कायदा केन्द्र सरकारने केलेला आहे परंतु त्यातील परिच्छेद आमच्या अधिका-यांनी बाजूला काढला आहे.मी अधिका-याच्या बाबतीत असे का बोलतो ? तर राईट टू एज्युकेशन या कायद्यात बृहत आराखडा वगैरे सर्व काही दिलेले आहे. त्याचवेळेला त्यांनी जे काही सांगितले आहे ते सर्वात जास्त महत्वाचे आहे. 19 जून 2010 रोजी केन्द्र सरकारने परिपत्रक काढलेले आहे. " 19 व्या कलमात असे म्हटलेले आहे की,ज्या शाळा हा कायदा अस्तित्वात येण्या पूर्वी किंवा किंवा येतांना अस्तित्वात होत्या किंवा आहेत त्यांना शासनाने नियमावली द्यावयाची आणि निकष पूर्ण करण्यासाठी तीन वर्षाची मुदत द्यावयाची आहे."अशा प्रकारे तीन वर्षानंतर शाळेची तपासणी करुन मान्यता घ्यावयाची असते. केन्द्र सरकारच्या राईट टू एज्युकेशन या कायद्याच्या कलमामध्ये तीन वर्षामध्ये आपली योग्यता सिध्द करण्याची तरतूद असेल तर आपण अशा प्रकारे मराठी शाळांची गळचेपी चालवलेली आहे आणि विनाअनुदानित शाळा चालविण्याच्या बाबतीत आपण त्यांच्याकडून लिहून घेता. माझ्याकडे या ंसबंधीची यादी असून ती यादी मी आपल्याकडे देतो त्या यादीतील एकाही शाळेला अनुदान नको आहे. इंग्रजी माध्यमाच्या विना अनुदानित शाळा आपण देत आहात त्याच प्रमाणे मराठी विना अनुदानित शाळा जे मागत आहेत तेव्हा या शाळा शासन का देत नाही ? मराठी शाळांसाठी तर शासनाने अनुदान दिलेच पाहिजे असे घटनेने म्हटलेले आहे. आपल्याकडे दारु तयार करण्यासाठी पैसे आहेत, बाकीच्या नको त्या गोष्टी करण्यासाठी पैसे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

आहेत मग शिक्षणाला पैसे नाहीत अशा प्रकारे मराठी भाषेची गळचेपी करण्याची जी केविलवाणी अवस्था राज्यामध्ये झालेली आहे ती अत्यंत वेदना देणारी आहे, ही अवस्था अत्यत दुर्देवी आहे.राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांना शोभा देणारी नाही.

सभापती महोदय, शिक्षकांचे प्रतिनिधी असलेली ही विधान परिषद आहे. या ठिकाणी अधिकृतरीत्या प्रतिनिधित्व शिक्षकांना आहे. तसेच पदवीधर मतदारसंघाचे प्रतिनिधी येथे आहेत त्यामुळे विधान परिषदेला स्वत:चा एक वेगळा अधिकार आहे.म्हणून आठ हजार मराठी शाळांना तातडीने मान्यता द्यावी अशा प्रकाराची शिफारस करणारा प्रस्ताव मी येथे मांडलेला आहे.बृहत आराखडा अजून तयार झालेला नाही. मला माननीय मंत्री महोदयांना एक विनंती करावयाची आहे की, बृहत आराखडा अजून तयार झालेला नाही तो का झालेला नाही त्याची कारणे आपण सांगावीत. डिसेंबर महिन्यात बृहत आराखडा करु असे आपण जाहीरपणे सांगितले होते .2002 ते 2010 पर्यत आठ वर्षे बृहत आराखडा तयार केलेला नाही, तेव्हा हा बृहत आराखडा न करणा-या अधिका-यावर कारवाई करणार आहात किंवा नाही, असा माझा प्रश्न आहे.त्यांनी जाणीवपूर्वक का दिरंगाई केली हे कळले पाहिजे. एक एक अधिकारी कसे काय आहेत याबाबतीत मला काही बोलावयास नको. या विधान परिषदेच्या माध्यमातून मला असे सांगावयाचे आहे की ,घटनेतील कलमामध्ये अंतर्भूत असल्याप्रमाणे मराठी शाळांना मान्यता देण्याच्या बाबतीत ही विधान परिषद निर्णय धेईल. परंतु याबाबतीत आम्ही निर्णय घेण्यापेक्षा माननीय मंत्र्यांनी जर निर्णय जाहीर केला तर आम्हाला जास्त आनंद होईल त्यामुळे मंत्र्यांचे सुध्दा कौतुक होईल एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

ठराव प्रस्तुत झाला

--

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवानराव साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी राज्यातील मराठी माध्यमांच्या शाळांच्या बाबतीत शासनाचे असलेले उदासीन धोरण त्यामुळे या शाळा बंद पडत चालल्या असल्यामुळे नवीन मराठी शाळांना मान्यता देण्याबाबत त्यांनी मागणी केली आहे. त्या संदर्भात मांडलेल्या अशासकीय ठरावाला पाठिंबा देण्याकरिता मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी नाण्याची एक बाजू पुढे आणीत असतांना हे शासन नवीन मराठी माध्यमाच्या शाळांना मान्यता देण्याच्या बाबतीत किती उदासीनता दाखवित आहे हे सभागृहाच्या लक्षात आणून दिले आहे. त्याचप्रमाणे आज ज्या विद्यमान मराठी माध्यमाच्या शाळा सुरु आहेत त्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या, जिल्हा परिषदेच्या, नगरपालिकेच्या शाळा आहेत तसेच खाजगी शिक्षण संस्थांच्या मराठी माध्यमाच्या प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळा आहेत. या सर्व शाळांना गेल्या सात ते आठ वर्षापासून वेतनेतर अनुदान दिले गेले नाही. त्या शाळांना इमारतीचे भाडे दिले जात नाही. वेतनाची रक्कम वेळेवर उपलब्ध करुन दिली जात नाही. आतापर्यंत ज्या शाळा विना अनुदानित तत्वावर सुरु होत्या त्या अनुदानाच्या टप्प्यावर आल्या नंतर त्यांना अनुदान देण्यासाठी सुध्दा अक्षम्य दुर्लक्ष केले जात आहे. या उलट इंग्रजी माध्यमांच्या शाळांना अगदी बेलगामपणे मागेल तेव्हा मागेल तशी परवानगी दिली जात आहे. त्यामुळे मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडत आहेत. एका बाजूला या राज्यामध्ये 6 ते 14 वयोगटातील मुलांना मोफत शिक्षणाचा हक्क प्रदान केला जात आहे. असे असतांना हे महाराष्ट्र सरकार शाहू, फुले आणि आंबेडकर यांचे नाव घेऊन इतक्या बेमालूमपणे मराठी माध्यमाच्या शाळांची मान्यता नाकारीत आहे, अशा प्रकारे मराठी माध्यमाच्या शाळा बंद पाडण्याचे षडयंत्र सुरु आहे. महाराष्ट्रात दरवर्षी मराठी माध्यमांच्या प्राथमिक स्तरावरील सुमारे 150 शाळा बंद पडत आहेत आणि माध्यमिक स्तरावरील सुमारे 100 शाळा बंद पडत आहेत हे मी अत्यंत जबाबदारीने विधान करीत आहे. ही दुरवस्था आणि ही उदासीनता अशीच चालू ठेवली तर एकेदिवशी महाराष्ट्रातील असलेल्या सर्व मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडतील. त्यामुळे या शाळा आपण वाचवाव्यात याकडे मी या शासनाचे लक्ष वेधून माझे भाषण संपवितो.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MMP/ D/

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मांडलेल्या अशासकीय ठरावाला पाठिंबा देत असतांना मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडणे ही गोष्ट बरोबर होणार नाही असे मी याठिकाणी नमूद करतो.

सर्वात महत्वाचा भाग असा की, ज्यावेळी आपण शिक्षणाचा आणि भाषेचा संबंध एकत्र आणतो त्यावेळी कोणतेही शिक्षण हे जेव्हा मातृभाषेमधून सुरु होते तेव्हा ते अधिक परिणामकारक होते हा सर्वसाधारणपणे स्वीकारला गेलेला नियम आहे. या राज्याची मराठी ही अधिकृतपणे राजभाषा असतांना आपण मराठी भाषेच्या संवर्धनाकरिता प्रयत्न करीत आहोत त्यावेळी मराठी भाषेच्या शाळा असणे ही अतिशय मूलभूत गोष्ट आहे, ही पहिली पायरी आहे. या पहिल्या पायरीवरच मराठीच्या शिक्षणाला अडथळा निर्माण झाला तर पुढील काळात मराठीचे भवितव्य कठीण आहे. आज मराठी भाषा ही व्यावहारीक भाषा म्हणून विकसित व्हावयास पाहिजे, ज्ञान भाषा म्हणून विकसित व्हावयास पाहिजे या सर्व गोष्टींमध्ये अडचण निर्माण होण्याची शक्यता आहे. अशाप्रकारे मराठी शाळा बंद पडणे ही चांगली गोष्ट नाही. उलट जास्तीत जास्त ठिकाणी मातृभाषेमधून, मराठी भाषेमधून शिक्षण मिळण्याची सोय शासनाने केली पाहिजे अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी एका अतिशय महत्वाच्या विषयावरील अशासकीय ठराव सभागृहापुढे मांडला आहे. हे शासन जणू काही मराठी भाषा आणि मराठी शाळा संपवायला निघाले आहे की काय अशाप्रकारचे वातावरण या राज्यात निर्माण झाले आहे. इतकेच नव्हेतर महाराष्ट्राच्या दुर्गम भागामध्ये असलेल्या मराठी शाळा बंद केल्या जाणार आहेत की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. आज लोकांनी या शाळा उभ्या करतांना सोने-नाणे गहाण टाकून शाळा उभ्या केल्या आहेत. या शाळांना आठ-आठ वर्षे वेतनेतर अनुदान मिळत नाही म्हणून या सर्व शाळा बंद करण्याच्या मनस्थितीत हे शासन आहे. वेतनेतर अनुदान मिळत नसल्यामुळे या शाळेच्या इमारती दुरुस्त करता येत नाही, संस्था चालक त्याकरिता डोनेशन घेऊ शकत नाहीत, किंवा फी वाढ करु शकत नाहीत. या अनुषंगाने मराठीला उद्ध्वस्त करण्याचा शासनाचा डाव आहे.

सभापती महोदय, या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये मला दोन मागण्या करावयाच्या आहेत. याठिकाणी आपण बृहत आराखडा तयार करण्याच्या प्रस्तावाला ताबडतोब मान्यता दिली पाहिजे. दुसरे असे की, मराठी भाषा जगवायची असेल, मराठी शाळा टिकवायच्या असतील, मुलांना मराठी भाषेमध्ये शिक्षण द्यावयाचे असेल तर महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने आपण या शाळांना विशेष अनुदान दिले नाही तर या शाळा जगू शकणार नाहीत. त्याकरिता आपण तरतूद करावी अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

----

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

APR/ D/ MMP/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 11:40

**तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते)** : सन्माननीय सदस्य श्री.वसंतराव खोटरे यांनी आपले भाषण सुरु करावे. पण कृपया वेळेअभावी त्यांनी केवळ मुद्दे मांडावेत

श्री.वसंतराव खोटरे (अमरावती विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो अशासकीय ठराव आणलेला आहे, त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये मराठी माणसांचे राज्य आहे आणि येथील राजभाषा "मराठी" आहे. अशा वेळी या राज्यामध्ये मराठी शाळेच्या प्रस्तावांना मान्यता मिळत नाही ही दुर्दैवाची बाब आहे. आमचा इतर कोणत्याही भाषेला विरोध नाही. ज्याप्रमाणे बाकीच्या भाषांच्या शाळा काढल्या जातात, त्याचप्रमाणे मराठी भाषेच्या शाळा देखील काढल्या पाहिजेत आणि सर्व मुलांना मराठी भाषेतून शिक्षण मिळाले पाहिजे हा महत्वाचा मुद्दा आहे. तसेच आपण ज्या शाळेला मान्यता देणार आहात, त्यांना सुरुवाती पासूनच अनुदान देण्याच्या बाबतीत व्यवस्था करावी. माझी माहिती आहे की, आज महाराष्ट्रातील अनेक शाळा बंद झालेल्या आहेत.आदिवासी क्षेत्रातील एकंदर 40 शाळा बंद करण्यात आल्या आहेत. व्ही.जे.एन.टी.च्या आश्रमशाळांमधील कर्मचाऱ्यांना 9-9 महिने पगार मिळत नाही. म्हणून ज्या मराठी भाषेच्या शाळा आहेत, त्यांना अनुदान द्यावे. तेथे शिक्षकांची भरती करण्यात यावी आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी लागू करण्यात आलेला आकृतीबंध ताबडतोब उठविण्यात यावा अशी आमची मागणी आहे.

-----

. . . .यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सभापती महोदय, यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांचे भाषण होईल आणि त्यानंतर माननीय मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण सुरु होईल.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, असे चालणार नाही. तुम्हाला असे करता येणार नाही.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या प्रस्तावावरील चर्चा आपल्याला वेळेमध्ये संपवावयाची आहे. मी सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना भाषण करण्यासाठी संधी दिलेली आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मलाही भाषण करण्याची संधी मिळाली पाहिजे.

**तालिका सभापती** : आता तेवढा वेळ शिल्लक नाही.

श्री.कपिल पाटील (खाली बसून) : सभापती महोदय, आपण अन्याय करीत आहात.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी भाषण सुरु करावे.

. . . .यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो ठराव मांडलेला आहे . . ..

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी भाषण सुरु करावे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, याठिकाणी राज्य शासनाच्या अनास्थेमुळे मराठी शाळांच्या 8000 प्रस्तावांना मान्यता देण्याबाबतचा मुद्दा अशासकीय ठरावाच्या माध्यमातून उपस्थित करण्यात आला आहे. मला वाटते की, सदनातील प्रत्येक सन्माननीय सदस्यांची देखील हीच भूमिका असावी आणि जर अशाच प्रकारची सर्वांची भूमिका असेल तर सभागृहाने एकमुखाने सदरहू प्रस्ताव मंजूर करावा असे मी सभागृहाला आवाहन करतो. कारण याबाबतीत आपल्या सर्वांच्या भावना एकच आहेत. जाता-जाता एकच गोष्ट सांगू इच्छितो की, राज्य शासनाने कितीही अनुदान दिले तरी आता मराठी माणसाची मानसिकता बदलली आहे. प्रत्येक मराठी माणसाने आपल्या मुलांना आणि आजूबाजूच्या माणसांना समजावून सांगितले पाहिजे की, मराठी भाषा जगवावयाची असेल तर मराठी शाळेत जावे. एवढेच मला सांगावयाचे आहे. जय हिंद जय महाराष्ट्र.

----

. . . .यु-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार (विधानसभा सदस्यांव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो अशासकीय ठराव मांडलेला आहे, त्या प्रस्तावातील भावनांशी मी पूर्णपणे सहमत आहे, फक्त भावनांशी.

सभापती महोदय, एक गोष्ट खरी आहे की, मराठी भाषिक राज्याच्या स्थापनेला 50 वर्षे पूर्ण झाल्यानंतर सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करण्यात आले आणि आता विधिमंडळाच्या स्थापनेला 75 वर्षे पूर्ण होत आहेत आणि अशावेळी सदनामध्ये या प्रस्तावावर चर्चा होत आहे. सर्व सन्माननीय सदस्यांची वेदना एकच आहे. खरे म्हणजे मातृभाषेमध्ये शिक्षण घेतल्यामुळे बुद्धयांक वाढतो, स्मरणशक्ती वाढते, प्रगल्भता वाढते.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्लास पवार....

हा जागतिक शास्त्रज्ञांचा सिध्दांत असताना सुध्दा यामध्ये दोन गोष्टी आहेत. पालकांची मानसिकता व शासनाची इच्छाशक्ती या दोन गोष्टींचा एकत्र संगम झाल्याशिवाय हे होणार नाही. मराठी भाषेच्या शाळा बंद होत आहेत किंवा मराठी भाषेच्या शाळांचे जे प्रस्ताव प्रलंबित पडलेले आहेत, याबाबतीत अनुदानाचा प्रश्न आहे, खरे म्हणजे हा हक्काचा प्रश्न आहे. या सर्व दृष्टीने शासनाने सहानुभूतीपूर्वक विचार करणे, ही काळाची गरज आहे. 8 हजार शाळांचे प्रस्ताव प्रलंबित राहणे किंवा शाळा बंद पडणे याबाबतीत खरे म्हणजे शासनाच्या काही उणिवा असतील, दोष असतील तर त्याबाबतीत मर्मावर बोट ठेवले पाहिजे. पण आपण आत्मचिंतनही केले पाहिजे. पुणे महानगरपालिकेतील शाळा, मुंबई सारख्या महानगरातील मराठी शाळा, खरे म्हणजे याठिकाणी शिवसेनेची सत्ता इतकी वर्षे आहे. मी याबाबतीत दोष देऊ इच्छित नाही. पण दर वर्षी मराठी माध्यमाच्या महानगरपालिकेच्या शाळा शिवसेनेची महानगरपालिकेमध्ये सत्ता असताना सुध्दा बंद पडत आहेत. वर्ग कमी होत आहेत ही अत्यंत खेदाची बाब आहे. यासंदर्भात आत्म संशोधन, आत्मचिंता, आत्म टीका करण्याची अवस्था निर्माण झालेली आहे. शासनाने प्रोत्साहन देणे, शासनाची इच्छाशक्ती असणे, या दोन्ही गोष्टी आहेत.

सभापती महोदय, मी या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करु इच्छितो. माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी शपथ घेतल्यानंतर जेव्हा पहिली पत्रकार परिषद घेतली तेव्हा त्यांना मराठी शिवाय इंग्रजी आणि हिंदी भाषेमध्ये प्रश्न विचारण्यात आले, त्यावेळी त्यांनी मी मराठीतच बोलणार आहे असे सांगितले. याबद्दल त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. मराठीची सुरुवात त्यांनी पहिल्या दिवसापासून केलेली आहे. एवढेच नाही तर त्यांनी मराठी भाषा विभाग वेगळा केला आणि तो स्वत:कडे ठेवला, याचे कारणच असे आहे की, मराठी भाषेला प्रोत्साहन मिळावे, मराठी भाषा टिकावी, शक्तीशाली व्हावी, तिचे संवर्धन व्हावे ही त्यांची मानसिकता आणि इच्छाशक्ती प्रामाणिक आहे, हे मी या ठिकाणी अत्यंत विनम्रपणे निदर्शनास आणून देऊ इच्छितो. राज्याच्या सांस्कृतिक धोरणाचा मसुदा शासनाला सादर करण्यात आला. या मसुद्यामध्ये अनेक मागण्या करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये मराठी भाषा भवन मुंबईत झाले पाहिजे अशी एक मागणी होती. मराठी भाषा भवनाची इमारत बांधली जाईल अशा प्रकारचा पहिला निर्णय या सरकारने आणि

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्लास पवार....

माननीय मुख्यमंत्र्यांनी घेतलेला आहे. मराठी भाषे बद्दलची उदासीनता राज्य सरकारची नाही, हे अतिशय प्रामाणिकपणे मला या ठिकाणी सांगावयाचे आहे. या निमित्ताने मी शासनाला विनंती करतो की, आर्थिक परिस्थिती बघून या 8000 शाळांच्या प्रस्तावांच्या बाबतीत विनाविलंब निर्णय घेण्यात यावा तसेच शाळा बंद पडत असतील तर ते थांबविण्यात यावे. सभापती महोदय, मी या ठिकाणी आत्मसंशोधन आणि आत्मटीका एवढयाचसाठी म्हणतो की मी नेहमी यासंदर्भात अनेक उदाहरणे दिलेली आहेत. श्री. जयंत नारळीकर यांचे वडील बनारस हिंदू विद्यापीठामध्ये असल्यामुळे ते हिंदी माध्यमाच्या शाळेत शिकलेले आहेत. परंतु श्री. वसंतराव गोवारीकर, श्री. रघुनाथराव माशेलकर, श्री. विजय भाटकर असे अनेक नामवंत शास्त्रज्ञ हे आपापल्या गावामध्ये खेडयातील मराठी माध्यमाच्या शाळेमध्ये शिकलेले आहेत. आपले माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण हे क-हाड नगरपालिकेच्या शाळेत इयत्ता पहिली ते इयत्ता सातवी पर्यंत शिकलेले आहेत. त्यानंतर ते अमेरिकेतील बर्कले विद्यापीठात शिकलेले आहेत परंतु त्यांचे पहिले शिक्षण कऱ्हाड नगरपालिकेच्या शाळेत झालेले आहे. मला या ठिकाणी असे सांगावयाचे आहे की, अनेक जागतिक कीर्तिचे शास्त्रज्ञ श्री. रघुनाथराव माशेलकर, श्री. वसंतराव गोवारीकर हे खेडयातील मराठी माध्यमाच्या शाळेमध्ये शिकलेले आहेत. श्री. भाटकर हे मुर्तीजापूर येथील दुर्गम अशा एका खेडयातील शेतकऱ्याचा मुलगा आहेत. पण जागतिक महासंगणक बनविण्याचे काम त्यांनी करुन दाखविलेले आहे. म्हणून याबाबतीत पालकांचेही काही कर्तव्य आहे. तसेच या बाबतीत शासनाला निश्चितपणे दोष दिला पाहिजे. शासनाच्या उणिवा भरुन काढल्या पाहिजेत. शिक्षण मंत्री महोदय श्री. राजेंद्र दर्डा या ठिकाणी बसलेले आहेत त्यांना त्यांच्या पिताजींचा स्वातंत्र्य सैनिकाचा वारसा लाभलेला आहे. लोकमत सारखे मराठी दैनिक आज भारतात भाषिक वर्तमानपत्रामध्ये क्रमांक एक वर आहे. मराठीचे समर्थन करण्यासाठी त्यांनी मनापासून काम कलेले आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रावते यांनी या ठिकाणी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याचा शासनाने गांभीर्याने विचार करावा. या 8000 शाळांच्या प्रस्तावाच्या बाबतीत तसेच मुंबई, पुणे, नागपूर ज्या ज्या ठिकाणी मराठी शाळा बंद पडत आहेत, त्यांचे वर्ग कमी होत आहेत

..3..



SMT/ MMP/ D/ 11:45

श्री. उल्लास पवार....

याबाबतीत काळजी घेण्याची आवश्यकता आहे. मुंबई महानगरपालिकेच्या अनेक शाळा रिकाम्या पडलेल्या आहेत त्या अनेक संस्थाना चालविण्यासाठी दिलेल्या आहेत. वेगवेगळया संस्थांची कार्यालये या शाळांमध्ये थाटलेली आहेत. तीच अवस्था पुण्यामध्ये आहे, औरंगाबादमध्ये आहे, नागपूरमध्ये आहे. असे होत असेल तर केवळ शासनाकडे बोट दाखवून चालणार नाही. शासनाने या संदर्भातील अपेक्षा पूर्ण केल्या पाहिजेत, या शाळा बंद होणार नाहीत याची काळजी घेतली पाहिजे पण त्याच बरोबर आपण लोकप्रतिनिधी, पालक यांची मानसिकता आणि इच्छाशक्ती पाहणार की नाही? पालक इंग्रजी बोलतात, सर्व काही इंग्रजीतून चालले आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार .......

मी असे उदाहरण सभागृहात दिले होते असे मला वाटते. स्व. वसंतदादा पाटील यांच्या बरोबर मी पुण्याला गणेशोत्सवामध्ये गेलो होतो. त्या ठिकाणचे उदाहरण मी दिले होते. "Why this Tukaram going up and down?" असे सदाशिवपेठेतील मुलाने आपल्या आई-वडिलांना विचारले होते. सदेह वैकुंठगमन म्हणजे काय, हे त्याला कळलेच नाही. दहा पंधरा मिनिटे गेली. सदाशिवपेठेतील ते कुटुंब होते. ते माझे मित्र होते. ते मराठीचा अभिमान असणारे होते. तो मुलगा म्हणाला की, "Why this Tukaram going up and down?" असे म्हटल्यानंतर आम्ही तिथून निघून गेलो. ही मानसिकता आहे. म्हणून इच्छाशक्ती आणि मानसिकता याचा संगम झाल्याशिवाय या शाळांचे संवर्धन होणार नाही असे मला अत्यंत विनम्रपणे वाटते. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ D/

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी दोन वेळा माझे नाव घेतले म्हणून तेवढ्यापुरते मी एका मिनिटात सांगतो. त्यांनी सांगितले की, माननीय मुख्यमंत्र्यांची भाषा भवन उभारण्याची इच्छाशक्ती आहे. श्री. कृपाशंकर सिंह यांनी बांद्रा येथे हिंदी भवन कधीच उभारले आहे, हे आपल्याला माहीत आहे की, नाही हे मला माहीत नाही. मराठी भाषा भवन झालेले नाही. मुंबई महानगरपालिकेमध्ये मराठी माणसांचा टक्का आता 26 टक्क्यावर आलेला आहे आणि 74 टक्के परप्रांतीय भरले आहेत आणि त्यांना या भाषेशी काही देणे-घेणे नाही. मग मराठी शाळा ओस पडणार नाहीत काय ?

--

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ( मुंबई विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मराठी शाळा बंद पडण्याची तीन कारणे आहेत. पहिले कारण असे की, शाळा उदंड झालेल्या आहेत. 'लेकुरे उदंड जाहली' असे संत रामदासांनी म्हटले होते. महाराष्ट्रात 40 हजार खेडी आहेत. 70-80 हजार शाळा दिलेल्या आहे. किती शाळा द्यावयाच्या याला काही मर्यादा असल्या पाहिजेत. किमान कुटुंब नियोजन करा. दुसरे जे कारण आहे त्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी केला. तो प्रश्न पालकांच्या मानसिकतेचा आहे. जी भाषा जगवते त्या भाषेकडे पालकांचा आणि कोणत्याही सामान्य माणसांचा ओढा असतो. त्यामुळे स्वाभाविकपणे गरिबातील गरीब माणसाला असे वाटते की, इंग्रजी शिकलो तर माझी दारिद्र्यातून, दैन्यातून मुक्तता होईल, माझी पुढची पिढी तरी नीट शिकेल. म्हणून तो इंग्रजीकडे वळतो. लोकमान्य टिळकांनी साहित्य सम्मेलनाचे उद्घाटन करताना जो इशारा दिला होता त्याची मी आठवण करुन देतो. लोकमान्य टिळक असे म्हणाले होते की, भाषा जगविणारी पाहिजे आणि मराठी भाषा जर जगवावयाची असेल, वाढवावयाची असेल तर ती व्यापाराची भाषा बनली पाहिजे, बाजाराची भाषा बनली पाहिजे.

सभापती महोदय, श्री. वा.गो.आपटे यांनी शब्दरत्नावली म्हणून जो मराठी शब्दांचा ग्रंथ किंवा शब्दकोश प्रसिध्द केला त्यावेळी त्यांनी 90 वर्षापूर्वी सांगितले होते त्याप्रमाणे त्यावेळेला इंग्रजीमध्ये 5 लाख शब्द होते आणि मराठीत 1 लाख एवढी संख्या सुध्दा भरत नव्हती, ही वस्तुस्थिती आहे. आजही तीच स्थिती आहे. आज इंग्रजीचा शब्द संग्रह 10 लाखावर गेलेला आहे पण मराठीचा शब्दसंग्रह दीड लाखाच्या वर गेलेला नाही. म्हणून माझे जे तीन मुद्दे आहेत त्याबाबत आपल्याला वेगळा विचार करावा लागेल. माझी माननीय शिक्षण मंत्र्यांना अशी विनंती आहे की, मराठी शाळा आपण सेमी इंग्रजी करावी. तेथील इंग्रजी चांगले करा. पूर्वी माझे वडील मराठी शाळेत शिकून सुध्दा त्यांचे इंग्रजी चांगले होते. कारण इयत्ता पाचवीनंतर इंग्रजी पहिलीमध्ये जात असत. आता इयत्ता दहावीपर्यंत इंग्रजीचा काय बट्ट्याबोळ झालेला आहे ते आपण पाहतो. त्यामुळे मराठी शाळा आपण सेमी इंग्रजी करा आणि इंग्रजी शाळा सेमी मराठी करा. सर्व बोर्डाच्या शाळांना आपण पहिलीपासून मराठी लागू करा. या दोन मागण्या मी या ठिकाणी करतो. मराठी शाळा सेमी इंग्रजी करा आणि इंग्रजी शाळा सेमी मराठी करा. तिसरा मुद्दा मराठी भाषेच्या

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ D/

श्री. कपिल पाटील .....

संवर्धनाचा आहे. मराठी भाषा भवन उभारणे सोपे आहे. मेल्यानंतर स्मारक उभारणे सोपे असते. पण भाषा जिवंत राहावयाची असेल, प्रवाही राहावयाची असेल तर ती व्यापाराची, वाणिज्याची, विज्ञानाची आणि तंत्रज्ञानाची भाषा बनली पाहिजे आणि याकरिता भाषा लवचिक बनण्यासाठी एक वेगळा खटाटोप करावा लागेल. आपली मराठी भाषा विकास संस्था मृतावस्थेत आहे. त्यामुळे तिला सुध्दा ऊर्जितावस्थेत आणण्याची आवश्यकता आहे. याबद्दल नवे शिक्षण मंत्री निश्चितपणे विचार करतील अशी मी आशा व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

---

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ D/

श्री. हुसेन दलवाई ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, या सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जो अशासकीय ठराव मांडलेला आहे त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे. आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार जे बोलले त्याच्याशी मी सहमत आहे. सन्माननीय सदस्यांच्या ठरावातील भावना या अतिशय महत्वाच्या आहेत. मी या सभागृहात आल्यानंतर सातत्याने मराठीच्या विषयावर चर्चा होते. प्रत्यक्ष अंमलबजावणी मात्र काहीही होत नाही. सन्माननीय सदस्यांनी काही उदाहरणे दिली ती अतिशय चांगली आहेत. परंतु शासनानेही चार पावले पुढे गेले पाहिजे. इंग्रजीमुळे मराठी शाळा बंद होत आहेत इतकेच नव्हे तर सरकारचे जे एकंदरीत धोरण आहे त्यामध्ये वर पासून खालपर्यंत सांगितले जाते की, सर्वांना शिक्षण मिळाले पाहिजे.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ D/ KTG/ MMP/ श्री.बरवडनंतर 11:55

श्री.हुसेन दलवाई....

पण प्रत्यक्षात बहुजन समाजाच्या घरातील लोकांना कधीही शिक्षण मिळालेले नाही. अशा घरातील मुलांना शिक्षणाचे दरवाजे बंद करण्याचे धोरण विना अनुदानित शाळांच्या माध्यमातून आखले गेले आहे की, काय याबद्दल मला शंका नाही तर खात्री पटली आहे. ही गंभीर बाब आहे. सध्या सर्व मुले इंग्रजी शाळेत जात नाहीत. ज्यांच्या घरातील माणसांना कधीच मराठीचे शिक्षण मिळालेले नाही. त्या घरातील मुले शिक्षण घेऊ इच्छितात, पण शाळाच उपलब्ध नाहीत. जेथे जावे ती शाळा विना अनुदानित असते. शाळांमधील शिक्षकांकडून 5-5 लाख रुपये घेतले जातात. अशा शाळांमधील फी एवढी जास्त असते की, त्यामुळे मुले शाळेत जाऊ शकत नाहीत. अशी मुले फक्त गुरे चारण्याचे काम करतात.

सभापती महोदय, आम्ही कोकणामध्ये माझ्या गावातच एक शाळा चालवितो. दलवाई लोकांनी त्यावेळी एक चूक केली. आता तेथे इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु केल्यामुळे कुणबी, गवळी समाजातील मुले, खोतांची मुले त्या शाळेत शिकत आहेत. ज्या शाळेतील मुले संध्याकाळी नांगर धरतात, गुरांना चारण्यासाठी नेतात, शेताचे काम करतात, त्या शाळेचा निकाल 100 टक्के लागतो. त्याचे श्रेय मी त्या शाळेतील शिक्षकांना देईन. आम्ही त्यासाठी काही करीत नाही. त्या शाळेतील मुलांचे पालक मला सातत्याने भेटतात. ते एकाच मागणी करतात की, तुम्ही येथे ज्युनिअर कॉलेज काढावे. माझी पत्नी प्राध्यापक आहे. शिक्षणाविषयी ती अतिशय संवेदनशील आहे. लोकांच्या मागणीप्रमाणे जर कनिष्ठ महाविद्यालय सुरु करावयाचे असेल तर ते विना अनुदानित सुरु करावे लागेल. त्या कॉलेजमध्ये येणाऱ्या मुलांकडून बरीच फी घ्यावी लागेल. ही मुले कोठून फी देणार ? मंत्री महोदयांच्या वडिलांकडे ज्या ज्या खात्याचा कार्यभार होता त्या खात्याचा कारभार त्यांनी चांगल्या प्रकारे सांभाळला होता. मी त्यांच्या हाताखाली काम केलेले आहे. माननीय शिक्षण मंत्री सुध्दा चांगले काम करीत आहेत. त्यामुळे आपण ठोसपणे निर्णय घ्यावा. विना अनुदानित हे जे ढोंग आहे, हे ढोंग लुटालूट करणारे आहे, ते ताबडतोब बंद करण्यात यावे. ज्या शाळांची आवश्यकता आहे त्या शाळा चालू ठेवाव्या. तुकडयांना मान्यता

2...

श्री.हुसेन दलवाई....

देताना त्या विना अनुदानित चालविण्यास सांगितले जाते. माझ्या शाळेला एक तुकडी वाढवून दिली आहे, ती किती वर्षापासून विना अनुदानित चालवावयाची, हा काय भिकारपणा आहे ? एका बाजूला शिक्षणावर बोलत असताना महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, फातिमा शेख, भाऊराव पाटील यांची नावे घेतले जाते. दुसऱ्या बाजूला शिक्षणाचे दरवाजे बंद करण्याचे काम केले जाते हे दुटप्पी धोरण आहे. बहुजन समाजाला शिक्षण मिळू नये यासाठी हा बनाव केला आहे की काय अशी मला शंका वाटते. आम्हाला इंग्रजी भाषेची मुळीच भीती वाटत नाही. इंग्रजी माध्यमाच्या शाळा ज्यांना चालवायच्या आहेत त्यांनी त्या चालवाव्यात. पण ज्यांना शिक्षण घ्यायचे आहे त्यांच्यासाठी मराठी माध्यमाच्या शाळा उपलब्ध असवयास पाहिजेत. त्या उपलब्ध न होणे चुकीचे आहे.

सभापती महोदय, आमच्या समाजातील बरेच लोक उर्दू शाळा काढतात. ज्यांची मातृभाषा उर्दू असेल त्यांनी जरुर त्या माध्यमाच्या शाळा काढाव्यात. कोकणात आम्ही घरात मराठी किंवा कोकणी भाषेत बोलतो. तेथे उर्दू शाळा काढल्या जातात. पण मराठी शाळेमध्ये उर्दू शिकविले जात नाही. मी यासंबंधी 10 वर्षे मागणी करीत आहे. त्याबाबत मंत्री महोदयांनी अधिक लक्ष द्यावे. मराठी शाळेत ज्यांना उर्दू हा विषय शिकावयाचा आहे त्यांच्यासाठी हा विषय वैकल्पिक ठेवावा. त्याबाबतची सोय झाली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी केलेल्या सूचनेला माझा पूर्ण पाठिंबा आहे. तत्कालीन शिक्षण मंत्री कै.रामकृष्ण मोरे यांनी शिक्षणाच्या बाबतीत चांगले धोरण स्वीकारले होते. त्यांनी इयत्ता पहिलीपासून इंग्रजी विषय सुरु केला आहे. काही प्रमाणात ते धोरण चांगल्या प्रकारे सुरु आहे. सेमी इंग्रजी शाळा सुरु करण्याची मागणी केली आहे ती शासनाने मान्य करावी. त्या सर्व शाळा अनुदानित असाव्यात, तुकडया अनुदानित असाव्यात. तुकडीसाठी अमूक इतके विद्यार्थी पाहिजेत अशी अट ठेवण्यात येऊ नये. एका तुकडीमध्ये 70 विद्यार्थी असतील, ही संख्या 80 होईपर्यंत दुसऱ्या तुकडीला मान्यता दिली जात नाही. त्यामुळे दुसरी तुकडी सुरु करता येत नाही. म्हणून शासनाने तुकड्यांच्या संख्येबाबत निर्णय घ्यावा अशी विनंती करतो, एवढे बोलून मी येथेच थांबतो.

---------

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी महत्वाच्या विषयाचा अशासकीय ठराव सभागृहात मांडलेला आहे. मराठी शाळांबद्दलच्या भावना ते सभागृहात वारंवार मांडत असतात. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. मराठी शाळांना परवानगी द्यावी असे त्यांचे म्हणणे आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MMP/ KTG/ D/ पूर्वी श्री. खंदारे 12:00

श्री. विक्रम काळे....

या विषयी राज्य शासनाच्या वतीने याला विरोध होतोय अशी भावना महाराष्ट्रामध्ये पसरविण्याचे जे काम होत आहे ते चुकीचे होत आहे. कारण या राज्यामध्ये अस्तित्वात असलेल्या मराठी शाळा आणि तुकड्या किती आहेत याचा अभ्यास केला पाहिजे. राज्यात असलेल्या तुकड्यांचा उल्लेख या सदनामध्ये करण्यात आला. काही शाळा बंद पडत आहेत, तुकड्या बंद पडत आहेत असाही उल्लेख करण्यात आला. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले की, सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यामध्ये एकही मराठी शाळा नाही. ही अत्यंत खेदाची बाब आहे. तेव्हा आजच्या आज जत तालुक्यामध्ये मराठी शाळा देण्याचा निर्णय मंत्री महोदयांनी घ्यावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

आता नवीन शिक्षण कायदा केलेला आहे. त्या कायद्यानुसार दीड कि.मी.च्या आत प्राथमिक शाळा आणि 5 कि.मी.च्या आत माध्यमिक शाळा असली पाहिजे. या कायद्यानुसार शाळा देताना सर्व मराठी शाळा द्याव्यात, एकही इंग्रजी शाळा देऊ नये. तसेच शाळा देताना ज्या संस्थेची शाळा चालविण्याची क्षमता आहे, ज्या संस्थेकडे इमारत आहे, किमान 2 एकर जागा आहे, भौतिक सुविधा देण्याची क्षमता आहे, बँक बॅलन्स आहे अशाच संस्थाना शाळा चालविण्याची परवानगी देण्याचा नियम केला तर ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना निश्चितपणे दर्जेदार शिक्षण मिळण्यास मदत होईल आणि शिक्षणाचे व्यापारीकरण बंद होईल. याठिकाणी तत्कालीन शिक्षणमंत्री श्री. राधाकृष्ण विखे-पाटील उपस्थित आहेत. त्यांचे मी जरुर अभिनंदन करतो. त्यांच्यामुळे प्राथमिक आणि माध्यमिक शाळांच्या पुढील "कायम" शब्द निघाला. त्यांच्या निर्णयामुळे महाराष्ट्रातील लाखो शिक्षकांच्या मनात त्यांनी घर केलेले आहे. तेव्हा माननीय मंत्री श्री. दर्डा साहेब हे देखील आता मागे राहाणार नाहीत. त्यांनी उच्च माध्यमिक शाळांच्या बाबतीत असलेला "कायम" शब्द काढला तर ते देखील शिक्षकांच्या मनामध्ये घर केल्या शिवाय राहाणार नाहीत, एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

----

श्री. राजेंद्र दर्डा (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी अशासकीय ठरावाच्या माध्यमातून एका ज्वलंत अशा विषयाला हात घातलेला आहे. या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री. भगवान साळुंखे, हेमंत टकले, वसंतराव खोटरे, विक्रम काळे,डॉ.दीपक सावंत अशा दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी भाग घेतलेला आहे.

सभापती महोदय, अनेक अशासकीय ठराव येतात, परंतु आजच्या या अशासकीय ठरावावर चर्चा करीत असताना चर्चेची उंची खूप वाढलेली दिसून आली हे मला येथे मुद्दाम नमूद केले पाहिजे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी अनेक गोष्टी सांगितल्या. त्यांनी असे सांगितले की, मराठी शाळांना अनुदान द्यावे लागते म्हणून मराठी शाळांना परवानगी दिली जात नाही. इंग्रजी शाळांचा त्यांनी उल्लेख केला. मान्यताप्राप्त नसलेल्या शाळा बंद करण्याचे आदेश दिले जातात असे सांगून बृहत आराखड्याचा उल्लेख त्यांनी केला. मी सुरुवातीला जी काही वस्तुस्थिती आहे ती सदनासमोर ठेवतो. आज महाराष्ट्रामध्ये 75 हजार प्राथमिक आणि 20 हजार माध्यमिक शाळा सुरु आहेत. 75 हजार प्राथमिक शाळांपैकी 66 हजार मराठी माध्यमाच्या आहेत. तसेच 20 हजार माध्यमिक शाळांपैकी 16 हजार मराठी माध्यमाच्या शाळा आहेत. त्यामुळे मराठी माध्यमाच्या शाळांना शासन परवानगी देत नाही किंवा मराठी शाळांच्या बाबतीत शासनाचे दुजाभावाचे धोरण आहे असे म्हणणे योग्य होणार नाही.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा....

सभापती महोदय, 2001 ते 2007 या कालावधीचा आढावा घेतला तर सन्माननीय सदस्यांचा लक्षात येईल की, शासनाने 1678 प्राथमिक मराठी माध्यमांच्या शाळांना व 2196 मराठी माध्यमिक शाळांना परवानगी दिलेली आहे. ज्यावेळी या शाळांना परवानगी दिली त्यावेळी त्या शाळा कायम विना अनुदानित होत्या. त्यानंतर 16 जून, 2009 रोजीच्या निर्णयांच्या अनुषंगाने आपण मा.ना.श्री.विखे-पाटील यांचा उल्लेख केला. 16 जून, 2009 रोजी शासनाने निर्णय घेतला की, प्राथमिक व माध्यमिक शाळांना इंग्रजी शाळा व्यतिरिक्त "कायम" शब्द वगळावा. या सगळया मराठी शाळांना 2012-2013 पासून अनुदान लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला. "कायम" हा शब्द काढला. एकच गोष्ट सांगू इच्छितो की, महाराष्ट्र शासनाची भूमिका या मराठी शाळांना अनुदान मिळाले पाहिजे हीच होती. परंतु त्याच काळात म्हणजे 2008 साली एक जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. जनतेकडून शाळासंबंधीचे प्रस्ताव मागविण्यात आले होते. या मुद्दयाचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी केला. त्यावेळेला जवळपास प्राथमिक मराठी माध्यमाचे 5625 आणि 6029 असे माध्यमिक मराठी माध्यमांचे प्रस्ताव प्राप्त झाले होते ही गोष्ट खरी आहे. जाहिरातीमध्ये त्यावेळी आपण कायम विना अनुदानित शब्द वापरला होता. 16 जून, 2009 मध्ये "कायम" हा शब्द वगळून टाकल्यामुळे ती जाहिरात रद्द करणे स्वाभाविक होते. मधल्या काळात मा.उच्च न्यायालयामध्ये काही संस्था गेल्या होत्या, त्यावेळी मा.उच्च न्यायालयाने वेळोवेळी अनेक निर्णय दिले. त्यात एक महत्वाचा निर्णय दिला होता की, शाळा परवानगी देताना अनैसर्गिक स्पर्धा होणार नाही याची राज्य शासनाने दक्षता घेतली पाहिजे. त्यामुळे शासनाने निर्णय घेतला की, यावेळेला बृहत आराखडा हा चांगल्या प्रकारे केला पाहिजे. बृहत आराखडा तयार करीत असताना चूक होता कामा नये. त्यामध्ये कोणाचे लागेबांधे येऊ नयेत. त्यावेळी एक महत्वाचा निर्णय घेण्यात आला की,...

श्री. दिवाकर रावते : सन 2000 मध्ये न्यायालयाने जो काही निर्णय दिला आहे तो आपण या ठिकाणी सांगावा.

श्री. राजेंद्र दर्डा : सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांची माहिती मी या ठिकाणी देणार आहे. माझे उत्तराचे भाषण झाल्यानंतर सर्व सन्माननीय सदस्यांच्या उप प्रश्नांना

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा...

उत्तरे देण्याची माझी तयारी आहे. माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, प्रथम माझे उत्तराचे भाषण ऐकून घ्यावे.

डॉ. दीपक सावंत : अनैसर्गिक स्पर्धा अशा प्रकारचा माननीय मंत्री महोदयांनी शब्द वापरला आहे. अनैसर्गिक स्पर्धेचा नेमका अर्थ काय आहे?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, एका ठिकाणी एक शाळा चालू असताना तेथे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. परंतु त्या शाळेच्या जवळच दुसरी शाळा सुरु झाली तर विद्यार्थी दुस-या शाळेत प्रवेश घेतात. तेथील पूर्वीच्या शाळेचे शिक्षक अतिरिक्त ठरतात असा अनैसर्गिक स्पर्धेचा अर्थ होतो. सभापती महोदय, बृहत आराखडा तयार करण्याचा निर्णय घेतल्यानंतर शासनाने नागपूरच्या जीआयएस टेक्नॉलॉजीचा वापर करण्याचे ठरविले. सॅटेलाईटच्या माध्यमातून मॅपींग करण्याचे शासनाने ठरविले. त्यासाठी मॅन्युअल काम सुध्दा करावे लागले. मला सांगण्यास आनंद होतो की, परवाच आमच्या बृहत आराखडयाचे काम संपलेले आहे. या बृहत आराखडयामध्ये शासनाने एका गोष्टीची काळजी घेतलेली आहे, ती म्हणजे राईट टू एज्युकेशन. युपीए सरकारने अत्यंत महत्वाचा निर्णय घेतलेला आहे. 6 ते 14 वयोगटातील विद्यार्थी आहेत, त्या विद्यार्थ्यांना शाळाबाहय ठेवता कामा नये. त्यांना नियमित शाळेत आणले पाहिजे. बृहत आराखडा तयार करताना प्राथमिक शाळा एका कि.मी.मध्ये असावी. ज्यास आपण उच्च माध्यमिक शाळा म्हणतो ती तीन कि.मी.च्या आत असावी...

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा........

आणि उच्च माध्यमिक शाळा 5 कि.मी.मध्ये असावी असे सांगितले आहे. त्या पध्दतीने शिक्षणाच्या कायद्याने 3 वर्षाचा वेळ आपल्याला दिलेला आहे. याठिकाणी वारंवार असे सांगण्यात येते की, मराठी माध्यमाच्या शाळांना परवानगी दिली जात नाही. सभापती महोदय, मी शिक्षणमंत्री झाल्यानंतर विभागाकडून माहिती घेतली तेव्हा असे दिसून आले की, राज्यात 9 विद्यार्थ्यांपेक्षा कमी विद्यार्थी संख्या असलेल्या एकूण 1529 शाळा आहेत. 10 ते 19 विद्यार्थी संख्या असलेल्या एकूण 7287 शाळा आहेत आणि जवळपास 32 हजार शाळा अशा आहेत, ज्या शाळांमध्ये 50 पेक्षा कमी विद्यार्थी संख्या आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, महाराष्ट्र शासनाचे धोरण हे मराठी शाळांच्या विरोधात असते तर अशा प्रमाणात शाळा मंजूर झाल्या असत्या का? शासनाची भूमिका हीच आहे की, एक विद्यार्थी असो किंवा पाच विद्यार्थी असोत, त्यांची मराठी शिकण्याची इच्छा असेल तर मराठी शाळा मंजूर केली पाहिजे. याच भावनेने शासनाने या शाळा सुरु केलेल्या आहेत.

सभापती महोदय, वेतनेतर अनुदानाचा मुद्दा माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी मांडला आहे. 2004 नंतर शाळांना वेतनेतर अनुदान मिळालेले नाही. वास्तविक हे अनुदान मिळाले नाही तर ते रद्द झाले आहे. 2004 सालापासून हे अनुदान रद्द झाले आहे. त्याबद्दल माझी भावना वेगळी आहे. मी माननीय सदस्यांच्या भावनेशी सहमत आहे. माझी स्वत:ची अशी भावना आहे की, ज्या शाळांमध्ये आपण सहावा वेतन आयोग लागू केला त्याठिकाणी खडूसाठी कोणाकडून पैसे घ्यावे लागणे हे योग्य नाही. त्यामुळे निश्चितपणे वेतनेतर अनुदानाचा प्रश्न सुटला पाहिजे या भावनेशी मी निश्चितपणे सहमत आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते आणि विक्रम काळे यांनी जत तालुक्यातील शाळांबाबत उल्लेख केला आहे. आज जत तालुक्यामध्ये 290 मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळा आहेत. जत तालुक्यात असे अनेक भाग आहेत, ज्याठिकाणी मराठी शाळांची आवश्यकता आहे. जत तालुक्यामध्ये एखाद्या भागात विद्यार्थी कमी असले तरी तेथील विद्यार्थ्यांना मराठी शिकता यावे म्हणून जत तालुक्यातील शाळांबाबत एक प्रस्ताव तयार करुन कॅबिनेट नोट पाठविली आहे. मला खात्री आहे की, पुढील महिनाभरात हा प्रश्न मार्गी लागेल आणि जत तालुका किंवा तेथील सीमावर्ती भागामध्ये मराठी विद्यार्थ्यांना शिकण्याची व्यवस्था निश्चितपणे होईल. या

..2..

श्री.राजेंद्र दर्डा........

ठरावाच्या अनुषंगाने अनेक सूचना करण्यात आल्या आहेत. मराठी भाषेचा आम्हा सगळ्यांना अभिमान असलाच पाहिजे. मराठी पाऊल पुढे पडलेच पाहिजे. मला या गोष्टीचा अभिमान आहे की, एका खेडेगावात आणि त्यानंतर जिल्हा परिषदेच्या मराठी माध्यमाच्या शाळेतून माझे शिक्षण झाले आणि त्यानंतर मला परदेशी शिक्षण घेण्याची संधी मिळाली.

सभापती महोदय, मला याठिकाणी एवढेच सांगावयाचे आहे की, आत्मपरीक्षणाची गरज आहे. मी माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, श्री.कपिल पाटील व इतर माननीय सदस्यांचे अभिनंदन करु इच्छितो.

(**सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी**)

नंतर 2बी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा .........

आम्ही या विधान परिषद सभागृहात फक्त सेवा व शर्ती बद्दलच बोलतो असे नाही तर शिक्षणाच्या दर्जाबद्दलही बोलतो व तशीच आजही दर्जेदार चर्चा झालेली आहे. आम्ही शाळांच्या बाबतीत ज्या सेवा शर्ती पूर्ण करतो आणि शिक्षकांना व्यवस्थित पगार दिल्यानंतर शाळा अस्तित्वात असताना सुध्दा विद्यार्थी खाजगी शाळांकडे का वळतात याबद्दल आत्मपरीक्षणाची वेळ आली आहे याचाही विचार कधी ना कधी आपणा सर्वांनाच करावा लागणार आहे. मला असे वाटते की, यासंदर्भात सर्व सन्माननीय सदस्यांचे एकमत आहे व त्यानुसार यासंबंधीची चर्चा सभागृहात कधी तरी करणे आवश्यक आहे.

एका बाजूला शासनाची इच्छाशक्ती आणि पालकांची मानसिकता या दोहोंचा संगम करुन मराठी भाषा वाढलीच पाहिजे, तिचे संवर्धन झाले पाहिजे असा जेव्हा विचार करतो त्याच पध्दतीने विद्यार्थी सुध्दा मराठी शाळांकडे वळले पाहिजेत याचाही विचार करावा लागणार आहे. अनेक ठिकाणी गेल्यानंतर लक्षात येते की, जिल्हा परिषदेच्या शाळा मराठी माध्यमाच्या आहेत पण त्यातील विद्यार्थी खाजगी शाळांकडे गेल्यानंतर त्या शाळा मात्र बंद पडतात. मुंबई महानगरपालिकेत देखील काही शाळांच्या तुकड्या बंद पडतात. दुसऱ्या बाजूला खाजगी संस्थांच्या माध्यमातून चालविल्या जाणाऱ्या मराठी शाळा चांगल्या प्रकारे चालतात. त्याचे उदाहरण म्हणून मी एकदा दादर येथील राजा शिवाजी विद्यालयामध्ये गेलो असता एक उत्तम प्रकारची शाळा असल्याचे मला दिसून आले. तसेच एकाच कॅम्पसमध्ये 18 हजार विद्यार्थी पाहण्याचा मला त्या दिवशी योग आला. त्याच वेळेला मला असेही वाटले की, सभागृहातील अनेक शिक्षण प्रेमी सन्माननीय सदस्यांना एकत्र आणून यावर चर्चा करणे आवश्यक आहे की राज्यातील जिल्हा परिषदांच्या ज्या शाळा बंद पडत आहेत त्या ठिकाणी अशा चांगल्या व नामांकित संस्थांमार्फत शाळा चालविता येतील की कसे ? सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी एक चांगला मुद्दा उपस्थित केला. त्यांनी सांगितले की, सन 2008 च्या दरम्यान शासनाने काही शाळांची मान्यता रद्द केली. शासनानेच शाळा सुरु करण्याची मान्यता दिली आणि नंतर त्याच शाळांवर शासनाने कारवाई केली. यासंदर्भात मी असा खुलासा करु इच्छितो की, अशा मान्यताप्राप्त नसलेल्या शाळा बंद करण्याचे आदेश शासनाने दिलेले आहेत. कारण नुकताच केंद्र शासनाने "राईट टू एज्युकेशन" कायदा पास

.....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा .........

केला असून त्याप्रमाणे अशा मान्यता नसलेल्या शाळांमध्ये विद्यार्थी असले तरी त्या बंद कराव्यात, असा शासनाचा आदेश आहे. याचे कारण असे की, परवाच मुंबईत मेरी किंवा मेरीयान अशीच कोणती तरी शाळा होती त्या शाळेत दहावीची परीक्षा चालू होती तेव्हा त्या शाळेच्या मान्यतेचा प्रश्न निर्माण झाला, अशी एक घटना घडली. अशा वेळेस मान्यताप्राप्त शाळा नसेल तर विद्यार्थ्यांचे जास्त नुकसान होऊ शकते. शासनाला याची कल्पना आहे, म्हणून ही खबरदारी घेण्यात आली आहे. तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी ज्या संस्थांचा उल्लेख केला त्या संस्था मी पाहिलेल्या आहेत. त्या संस्था अतिशय चांगल्या स्थितीत आहेत. अशा 10-15 शाळा तरी आहेत की, ज्यां बंद करण्याचे आदेश पूर्वी दिलेले आहेत. अशा सेवाभावी तत्वाने चालविणाऱ्या संस्था अत्यंत चांगल्या प्रकारे शिक्षणाचे काम करीत आहेत, त्यांना अनुदानाचीही अपेक्षा नाही. यासंदर्भात मी अतिशय पॉझिटीव्हली सांगू इच्छितो की, शासनाचा बृहत आराखडा तयार असून अशा संस्थांचा पुन्हा शासन विचार करील, याबद्दल सन्माननीय सदस्यांनी मनात कोणतीही शंका बाळगू नये आणि पुन्हा .........अडथळा.........

श्री. कपिल पाटील : महोदय, माननीय शिक्षण मंत्री शाळांच्या बाबतीत अतिशय सहानुभूतीने विचार करीत आहेत. पण "राईट टू एज्युकेशन" नुसार फक्त तीन वर्षांची मुदत आहे. माननीय मंत्री महोदयांनी सुध्दा मान्य केले की या चांगल्या संस्था आहेत. तरी देखील त्या बंद करण्याच्या नोटिसा पाठविलेल्या आहेत. अशा नोटिसा शासन थांबविणार काय ? कारण नवीन कायद्याप्रमाणे शाळांना अनुदान मिळण्यासाठी फक्त तीन वर्षांची मुदत आहे. एकदा तीन वर्षे झाल्यानंतर कुठलाही टप्पा न घालता संपूर्ण अनुदान देण्याची तरतूद आहे. त्याच पध्दतीने ज्या शाळा सध्या चालू असतील त्यांना दंड करण्यासाठीची नोटीस देताना सुध्दा ताबडतोब न देता मुदत द्यावी.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे : सभापती महोदय, बृहत आराखडयाच्या संदर्भातील उल्लेख या ठिकाणी माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांनी केलेला आहे. बृहत आराखडा सर्वांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्याची नितांत आवश्यकता आहे. मतलबी लोकांनी जर मूळ शाळेच्या जवळच दुस-या शाळेचा प्रस्ताव दिला असेल तर त्याचा परिणाम प्रस्तावित जुन्या शाळेवर होतो त्यामुळे यासंदर्भातील धोरण निश्चित करणे, यादी प्रसिध्द करणे, बृहत आराखडा प्रसिध्द करणे, आक्षेप मागवणे ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच त्याला अंतिम रुप दिले गेले पाहिजे. तसेच नवीन शाळांना मान्यता देण्याची प्रक्रिया सुध्दा 1 मे च्या आत पूर्ण झाली पाहिजे. असे जर झाले नाही तर शाळांमध्ये अनागोंदी कारभार सुरु होतो. त्यामुळे मान्यता देण्याची प्रक्रिया ही नवीन शैक्षणिक वर्षाच्या पूर्वी पूर्ण करण्यात यावी अशी विनंती आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी स्पष्ट केले आहे की, या पुढे बृहत आराखडयानुसार राईट टू एज्यूकेशन (आरटीई) असा अधिकार प्रत्येक मुलाला मिळण्याबाबत आपली भूमिका स्पष्ट केलेली असल्यामुळे कोणाच्याही मनात शंका राहिलेली नाही. तसेच मंत्री महोदयांनी "ज्या चांगल्या शैक्षणिक संस्था आहेत त्यांना परवानगी दिली जाईल" अशा प्रकारचा उल्लेख केलेला आहे. त्याबद्दल आम्ही मंत्री महोदयांचे स्वागत करतो. परंतु शैक्षणिक संस्था कोणत्या चांगल्या याबाबत शासन काही निकष ठरवणार आहे काय ? उदा. शाळेची आर्थिक परिस्थिती, शाळेकडे असलेली जमीन, इमारत अशा प्रकारचे निकष ठरवले जाणार आहेत काय ?

श्री. हुसेन दलवाई : ज्या मराठी शाळेत मुस्लीम विद्यार्थी शिक्षण घेत आहेत अशा शाळांमध्ये उर्दू विषय शिकवला जाईल काय, तसेच नवीन अनुदानित तुकड्या आहेत त्यांना मान्यता दिली जाईल काय ?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. भगवान साळुंखे यांनी बृहत आराखड्याच्या संदर्भातील मुद्दा उपस्थित केलेला आहे. बृहत आराखडा तयार झाल्यानंतर तो प्रसिध्द केला पाहिजे, आक्षेप मागवले पाहिजे व त्यानतरच अंतिम रुप दिले पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे. मी सदनाला सांगू इच्छितो की, नवीन शाळा देत असताना जाहिरातीच्या माध्यमातूनच त्या दिल्या जातील व यामध्ये पूर्ण पारदर्शकता असेल अशी मी सभागृहाच्या माध्यमातून ग्वाही देतो. सुदैवाने माझी एकही शाळा नसल्यामुळे यामध्ये काही प्रश्न येत नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी आरटीई कायद्यातील मुख्य तरतुदीचा उल्लेख केला आहे की, परवानगी शिवाय शाळा सुरु ठेवता येणार नाहीत. परंतु आपण यासंदर्भात जो उल्लेख केलेला आहे त्यासंदर्भात विधी विभागाचा सल्ला घेऊन योग्य तो न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल अशी ग्वाही देतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी माझ्या वडिलांचा चांगल्या पध्दतीने उल्लेख केल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. मी एवढेच सांगू इच्छितो की, अनेक ठिकाणी उर्दू शाळा सुरू आहेत. माझ्याही मतदार संघात मोठया प्रमाणात उर्दू शाळा सुरु आहेत. सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी चांगली सूचना केलेली आहे. मराठी माध्यमातून शिक्षण घेत असलेल्या व ज्या मुस्लीम विद्यार्थ्यांना उर्दूचा विषय हवा असेल अशा मराठी शाळांमध्ये उर्दू विषय शिकवण्यात यावा अशी जी सूचना केलेली आहे त्याची दखल घेण्यात आलेली आहे.

श्री. दिवाकर रावते : मराठी शाळेत उर्दू विषय सुरु करावा, असे त्यांचे म्हणणे आहे.

श्री. राजेंद्र दर्डा : सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांचा उद्देश फार चांगला आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा..

सभापती महोदय,मराठी भाषेच्या आणि मराठी शाळांच्या बाबतीत हे शासन संवेदनशील आहे असे मला म्हणावयाचे आहे.ज्या शाळांमध्ये मराठी शिकवले जाते त्या ठिकाणी इंग्रजीसुध्दा चांगले शिकवले गेले पाहिजे . सेमी इंग्रजीच्या संदर्भातील उल्लेख देखील आपण केलेला आहे. त्याबाबतीत शासन अधिक लक्ष देईल. त्याचबरोबर इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी भाषा शिकवलीच पाहिजे अशी सुध्दा शासनाची भावना आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी मांडलेल्या अशासकीय ठरावावर चांगली चर्चा झाल्याबद्दल मी सभागृहातील सन्माननीय सदस्यांचे आभार मानतो व सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांनी हा ठराव मागे घ्यावा अशी मी विनंती करतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांचे मी अभिनंदन करतो. एक मुलगा जरी असला तरी शिकवीन असे त्यांनी सांगितले असल्यामुळे आठ हजार मराठी शाळांना त्यांनी मान्यता द्यावी असे विधान परिषदेचे ठाम मत आहे. त्यामुळे या बाबतीत माननीय मंत्र्यांनीच सांगितलले असल्यामुळे हा ठराव मागे घेण्याचा प्रश्नच येत नाही.

श्री.राजेंद्र दर्डा : सन्माननीय सदस्यांनी ठराव मागे घ्यावा.

श्री.दिवाकर रावते : एक मुलगा जरी असला तरी शिकवीन असे तुम्हीच सांगितले असल्यामुळे ठराव मागे घेण्याचा प्रश्न येत नाही. तेव्हा या मराठी शाळांना मान्यता द्यावी. मराठी शाळांसाठी शासनाने अर्ज मागितले होते त्यामुळे ते अर्ज रद्द करण्याचा प्रश्न येत नाही. त्याचबरोबर अनुदान देण्यात येणार आहे असाही खुलासा आपण केला होता .

श्री.राजेंद्र दर्डा : मी पुन्हा एकदा सांगतो की, कोणीही अर्ज केला म्हणून त्याला मराठी माध्यमाची शाळा द्यावी असे म्हणणे देखील योग्य नाही. त्या ठिकाणी दुसरी मराठी शाळा आहे किंवा नाही याचाही विचार केला पाहिजे.सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांची भावना मला समजलेली आहे. तेव्हा या बाबतीत राजकारण करु नये अशी माझी त्यांना हात जोडून विनंती आहे.

श्री.दिवाकर रावते : इंग्रजी शाळांना मान्यता लागत नाही.त्यांना बृहत आराखडा लागत नाही, त्यांना किलोमीटर्सची अट लागत नाही. जो कोणी येईल तो इंग्रजी माध्यमाची शाळा काढत असतो. मराठी शाळा निघाली नाही तर ही मुले आपोआपच इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये प्रवेश

2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

घेतील.त्यांना दुसरा पर्याय राहणार नाही अशा प्रकारचे वातावरण या शाळा काढणा-या लॉबीने निर्माण केले आहे म्हणून हा ठराव मागे घेण्याचा प्रश्न येत नाही.मराठी शाळांची गळचेपी कोणत्याही परिस्थितीमध्ये ही विधान परिषद सहन करु शकत नाही.

श्री.कपिल पाटील :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचा मी आदर करतो. सभागृहाचा गैरसमज होऊ नये म्हणून मी सांगू इच्छितो की, शिक्षण मंत्र्यांनी स्पष्टपणे असे सांगितले आहे की,बृहत आराखडा तयार झाल्यानंतर या शाळांना परवानगी देण्यात येईल त्याचबरोबर ज्या चांगल्या शाळा आहेत त्याबाबतीत सुध्दा त्यांनी सांगितले होते.शाळा मोठया प्रमाणावर सुरु झालेल्या असल्यामुळे मुलांची पळवा पळवी सुरु आहे.

श्री.दिवाकर रावते : 2002 ते 2010 या आठ वर्षाच्या कालावधीमध्ये मराठी भाषेच्या शाळासाठी बृहत आराखडा तयार करण्यात आला नाही. सन्माननीय सदस्यांनी शासनाची बाजू घेता कामा नये.

श्री.कपिल पाटील : मुंबई महानगरपालिकेच्या शाळा आज बंद पडत चालल्या आहे. त्याची कारणे सुध्दा शोधावी लागतील. त्या शाळांमध्ये शिक्षकही नाहीत. व्हर्च्युअल क्लास रुम तयार करण्यात आली परंतु त्या वर्गात शिक्षक नाहीत.

. ( एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात )

श्री.उल्हास पवार : सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते यांना मी सर्वाच्या वतीने विनंती करतो की, त्यांनी ठराव मागे घ्यावा. राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत असतांना एकमताने आपल्या सर्वाच्या भावना बाहेर गेल्या पाहिजेत. सन्माननीय सदस्यांच्या भावनेशी आम्ही सर्वजण 100 टक्के सहमत आहोत त्याचप्रमाणे माननीय मत्र्यांनी या ठरावाला समर्पक उत्तर दिले आहे. राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात अशा प्रकारचे वेगळे वातावरण या ठिकाणी दिसणे बरोबर नाही.

श्री.दिवाकर रावते : मराठी मुले इंग्रजी कशी शिकत नाहीत, ती कशी नादान आहेत. जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना कसे शिकवले जाते, अशी दुर्देवी अवस्था या ठिकाणी मांडली आहे तेव्हा मराठी शाळेसाठी ही अवस्था स्वीकारावची काय ? मराठी शाळेतील मुस्लीम मुलांना उर्दू शिकवा असे मंत्री महोदय म्हणतात..

श्री.राजेंद्र दर्डा : सन्माननीय सदस्य अर्थाचा अनर्थ करतात. नंतर श्री.सरफरे

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब आपल्या भावनेशी हे सभागृह सहमत आहे. आपण आपला ठराव मागे घ्यावा म्हणून सर्व माननीय सदस्यांनी विनंती केली आहे. आपण हा ठराव मागे घेऊन सभागृहामध्ये चांगली प्रथा पाडावी.

श्री. दिवाकर रावते : मराठी शाळांच्या बाबतीत दहा वर्षे झाली तरी बृहत आराखडा होत नाही याचे उत्तर तुमच्याकडे आहे काय ?

**तालिका सभापती** : सभागृहाची वेळ 5 मिनिटांकरिता वाढविण्यात येत आहे.

श्री. दिवाकर रावते : बृहत आराखडा तयार करण्यास अधिकारी तयार नाहीत त्या अधिकाऱ्यांचे आपण कौतुक करता काय? त्यांच्यावर कारवाई करण्यास आपण तयार नाही.

**तालिका सभापती** : मंत्री महोदयांनी पुन्हा एकदा माननीय सदस्यांना विनंती करावी.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, मी सुरुवातीला सांगितले आहे की, या विषयावर अतिशय चांगल्या प्रकारे चर्चा झाली आहे, दर्जेदार चर्चा झाली आहे हे माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी सुध्दा मान्य केले आहे. म्हणून मी पुन्हा एकदा त्यांना विनंती करतो की,...

श्री. दिवाकर रावते : मंत्री महोदय, आपण आणखी अपमानास्पद बोललात ते आम्ही ऐकून घ्यायचे काय? कोणताही अर्ज आलेला नसतांना आणि बृहत आराखडा नसतांनाही आपण इंग्रजी शाळांना मान्यता दिली.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, मी पुन्हा एकदा सांगतो की, आपण इंग्रजीचा उल्लेख केला आहे. शासनाकडे 4 हजार इंग्रजी शाळांना मान्यता देण्याबाबत प्रस्ताव आले असतांना त्यापैकी एकाही प्रस्तावाला आतापर्यंत मान्यता देण्यात आलेली नाही हे आपण लक्षात घ्यावे. इंग्रजी माध्यमातून शिक्षण घ्यावयाचे असेल तर त्यासाठी चांगले शिक्षक असले पाहिजेत ही माझी भावना आहे. त्यामुळे मी जे बोलले नाही ते कृपया माझी तोंडी टाकू नका अशी मी विनंती करतो. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब आपण या सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य आहात म्हणून पुन्हा एकदा आग्रहाची विनंती करतो. हा विषय आपणा सर्वांच्या जिव्हाळयाचा विषय आहे म्हणून आपण हा ठराव मागे घ्यावा अशी विनंती करतो.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री. रावते साहेब आपण ठराव मागे घ्यावा अशी मंत्री महोदयांनी आपणास विनंती केली आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, हा ठराव मताला टाकावा अशी आमची मागणी आहे.

**तालिका सभापती** : ठराव मताला टाकण्याचा हा विषय नाही...

(सत्ताधारी पक्षाकडील अनेक माननीय सदस्य बोलू लागतात.)

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या सदनातील सर्व माननीय सदस्यांच्या भावना सारख्या असतील तर हा ठराव पारीत करण्यास कोणती अडचण आहे?

(गोंधळ)

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मला शब्दांचे खेळ नको आहेत. बृहत आराखडा नसतांना आपण इंग्रजी माध्यमाच्या 100 शाळांना मान्यता दिली. त्यानंतरचे प्रस्ताव त्यांच्याकडे पडून असतील. आज कुणीही यावे आणि इंग्रजी माध्यमाची शाळा काढावी हे सत्य आपण नाकारु शकत नाही. ज्यांच्याकडे पुरेशी विद्यार्थी संख्या आहे त्या शाळांना आपण नोटिस बजावली आहे. ते संस्थाचालक म्हणतात की, आमच्यावर कारवाई करु अशाप्रकारची नोटिस बजावली आहे. याठिकाणी काही मराठी शाळेत फक्त नऊ, दहा विद्यार्थी आहेत अशाप्रकारे त्या किती दुर्भाग्यशील आहेत हे दाखविण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. ज्या शाळांमध्ये 400 ते 500 विद्यार्थी आहेत त्यांच्यावर कारवाई करण्याची नोटिस देण्यात आली आहे. पुण्याच्या रस्त्यावर लहान-लहान मुले उतरुन आम्हाला शिकायचे आहे अशी मागणी करीत होते ती ढोंगबाजी होती काय? त्यांच्यावर आपण कारवाई करणार आणि पुन्हा आपण कारवाई केली म्हणता....

**तालिका सभापती** : माननीय सदस्यांनी आपला ठराव मागे घ्यावा अशी मंत्री महोदयांनी विनंती केली आहे.

श्री. दिवाकर रावते : तुम्ही छातीवर हात ठेवून सांगता की, गेल्या 60 वर्षात सर्व कन्नड भाषिक शाळा आपण काढल्या, त्यांना मराठी शिका असे आपण सांगितले नाही. तुम्ही कन्नड भाषिक शाळांचे कौतुक केले...

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, माझ्या संपूर्ण भाषणामध्ये कन्नड शब्द आलेला नाही आणि मी तो शब्द उच्चारलेला नाही.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा . . . .

मी उलट असे म्हणालो की, सीमावर्ती भागामध्ये मराठी शाळा अधिकाधिक निघाल्या पाहिजेत या बाबत माझी कॅबिनेटमध्ये नोट मुव्ह केली आहे. मला असे वाटते की, एवढया चांगल्या भाषेमध्ये बोलल्यानंतर आणि सदरहू ठरावाच्या संबंधातील चर्चा एवढया चांगल्या दर्जावर गेल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांनी असे करु नये.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी कशाचे उत्तर दिले ?

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : सभागृहाची वेळ पाच मिनिट वाढविण्यात येत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी असे सांगितले की, जत मध्ये संपूर्णपणे कानडी शाळा आहेत, एकही मराठी शाळा नाही. त्यावर माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिले की, सध्या तेथे प्राथमिक शाळा आहे आणि नंतर माध्यमिक काढू. पण गेल्या 60 वर्षामध्ये तेथील शिक्षकांना मराठी शिकवता आले नाही काय, ही कोणती मानसिकता आहे ?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, त्याठिकाणी 290 मराठी शाळा आहेत असे मी सांगितले आहे. तसेच मराठी शाळांच्या बाबतीत उल्लेख देखील केलेला आहे. पण मी एवढेच सांगत होतो की, ज्या ठिकाणी मराठी शाळा उपलब्ध नाही, तेथेही मी मराठी शाळा सुरु करण्याचा प्रस्ताव पाठविलेला आहे. पण तेथे 290 मराठी शाळा असल्याचे सुरुवातीलाच सांगितले आहे.

**तालिका सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब यांना सांगू इच्छितो की, आपल्या भावनेशी सर्व सभागृह सहमत आहे आणि आपण ज्येष्ठ सन्माननीय सदस्य आहात.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, त्याठिकाणी जमलेल्या सर्व लहान मुलांनी ...... अहो, आम्हाला लाज वाटते आणि ते या महाराष्ट्रामध्ये परत असे सांगतात की, हे तुमचे राज्य आहे.तुमची सत्ता आहे आणि मराठी शाळा बंद पडत आहेत.पुणे येथे सगळी मुले रस्त्यावर उतरली होती आणि त्यांनी असे सांगितले की, आम्हाला शिकावयाचे आहे.हे जर ढोंग असेल तर....हे ढोंग आहे काय ? परत याठिकाणी माननीय मंत्री महोदय सांगत आहेत की, होय, आम्ही त्यांना नोटीस दिल्या.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब यांनी ज्या शाळांचा उल्लेख केला, त्याबद्दल सुध्दा मी सांगितलेले आहे.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी सूचना



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केल्यावर त्यांनी ती मान्य केली आहे.

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी जी सूचना केली आहे, ती सुध्दा मी मान्य केली आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, आदरणीय सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांच्या भावनांशी हे सभागृह सहमत आहे.मराठीच्या प्रश्नाबाबत त्यांच्या प्रमाणेच आम्ही सर्वजण तेवढेच आग्रही आहोत.या ठरावातील जी शेवटची ओळ आहे की,"मराठी शाळांच्या 8000 प्रस्तावांना विनाविलंब मान्यता देण्यात यावी."पण ही बाब तपासल्याशिवाय,बृहत आराखड्या शिवाय, डॉ.सावंत हे मराठी शाळा चालवितात, त्यांचे वडील हे अत्यंत जुनेजाणते आदर्श शिक्षक आहेत. आमच्या सगळयांचा अनुभव असा आहे की,मुलांची पळवापळवी सुरु आहे.पण जर या धोरणाप्रमाणे केले तर त्यामुळे 8000 मराठी शाळा बंद पडणार आहेत. मग अशा वेळी मराठी शाळांवर कुऱ्हाड आणावयाची काय ? म्हणजे भावनेच्या भरात आम्ही आमचेच पाय कापून घ्यावयाचे हेही बरोबर नाही. मात्र या विषयाच्या संबंधातील भावना योग्य आहे परंतु भावनेच्या भरात आम्ही आमचे पाय कापून घेऊ नयेत. म्हणून माझी आदरणीय श्री.दिवाकर रावते साहेबांना विनंती आहे की, या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये मराठी भाषा कशी टिकवावयाची या संबंधात आपण एकत्रित सर्व संमतीचा असा वेगळा ठराव सदनासमोर आणून तो मंजूर करुया. यासाठी माननीय सभापतींच्या दालनामध्ये आपण सर्वांनी एकत्र बसून एक संयुक्त ठराव तयार करु. परंतु एक-दोन टेक्नीकल मुद्यांसाठी जर आपण असे केलेत तर प्रत्यक्षात मराठी शाळांचा घात होणार आहे. म्हणून मी सन्माननीय सदस्यांना तळमळीने विनंती करतो. तसेच शिक्षकांचा प्रतिनिधी म्हणूनही विनंती करतो. याठिकाणी जो अशासकीय ठराव देण्यात आलेला आहे,त्यातील शेवटच्या ओळींबाबत माझा आक्षेप आहे, अगोदरच्या आठ ओळींबाबत नाही.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मराठी शिक्षण मंत्र्यांमुळे मराठी शाळांचा घात कसा होईल हे मला कळत नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

सभापती महोदय, एकंदर 8000 अर्ज आले आहेत ते उगाचच आले काय ? या सदनामध्ये असे सांगितले गेले की, कोणीही अर्ज करावा आणि शाळा देण्यात यावी. हे उगाचच अर्ज आलेले नाहीत



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तर आपण जाहिरात दिली होती, म्हणून ते अर्ज आले. त्यामुळे कोणीही उठून शाळेची मागणी केली असे झालेले नाही. मग त्या शाळांना मान्यता द्यावयाची की नाही, त्यांची स्क्रुटीनी करावयाची की नाही ? पण ते रद्द करुन टाकले. त्यामुळे आता असे सांगण्यात यावे की, जे अर्ज आलेले
आहेत ते स्वीकारुन, त्याची छाननी करुन मग निकषामध्ये जे बसतील त्यांना द्यावयाचे हे ठीक आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, बृहत आराखडा तयार झाल्यानंतर ज्या संस्थांनी अर्ज केले होते, त्यांना परत अर्ज करण्याची संधी मिळेल आणि त्यावेळेला त्यांना निश्चितपणे न्याय मिळेल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, पहिल्यांदा त्यांनी अर्ज करणाऱ्यांचा जो अवमान केला....

श्री.राजेंद्र दर्डा : म्हणजे . . ..

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी एक मिनिट बोलतो. आपण सर्वजण साक्षीदार आहात. तुम्ही आता बोललात की, कोणीही उठावे आणि अर्ज करावे, त्यांना शाळा देणार नाही. पण प्रत्यक्षात तुम्ही जाहिरात दिली म्हणून लोकांनी अर्ज केले होते. ज्या शाळा सुरु आहेत त्यांच्या बाबतीत मी आपल्याकडे यादी पाठविली आहे.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

म्हणून मी एवढेच म्हणतो की, बृहत आराखडा आलेला आहे, त्यासंदर्भात सूचना मागविण्यात येणार आहेत, त्यासाठी सहा महिन्याचा कालावधी लागेल. सभापती महोदय, या प्रस्तावावरील चर्चेत ज्या सन्माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केलेल्या आहेत त्या सर्व सदस्यांच्या भावनांचा मी या ठिकाणी आदर करतो. यापुढे मराठी शाळांची गळचेपी होणार नाही आणि इंग्रजी शाळांच्या लॉबीमुळे मराठी शाळा निघणार नाहीत याचे जे काही षडयंत्र आहे त्याला शह देऊन मराठी शाळा प्रस्थापित होतील आणि मराठी शाळेत उर्दू घुसणार नाही. (गोंधळ ) अल्पसंख्यांकाना शाळा काढण्याचा अधिकार घटनेने दिलेला आहे आणि धार्मिक शिक्षण असलेल्या त्यांच्या संस्थाना शासनाने तपासणी न करता मान्यता दिलेली आहे. अल्पसंख्याकांना खूप संरक्षण आहे. ठीक आहे. मी सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावनांचा आदर करतो आणि माझा ठराव मागे घेण्यासाठी सभागृहाची अनुमती मागतो.

**तालिका सभापती** : सभागृहाच्या अनुमतीने ठराव मागे घेण्यात आला आहे. आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेले उर्वरित दोन अशासकीय ठराव नंतर घेण्यात येतील.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, उर्वरित दोन ठराव नंतर कधी घेण्यात येतील?

**तालिका सभापती** : उर्वरित दोन ठराव कधी घ्यावयाचे हे नंतर ठरविण्यात येईल. सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. दुपारी 12.45 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

( सभागृहाची विशेष बैठक दुपारी 12 वाजून 41 मिटिनांनी दुपारी 12 वाजून 45 मिनिटांपर्यंत तहकूब झाली )

----

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**गर्भलिंग निदान चाचणी आणि स्त्रीभ्रूण हत्या विरोधी कायद्याअंतर्गत राज्यात नवीन समितीची स्थापना करणेबाबत**

**(१) * १३५१७ श्री.केशवराव मानकर , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.विनोद तावडे , श्री.संजय केळकर , श्री.चंद्रकांत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गर्भलिंग निदान चाचणी आणि स्त्रीभ्रूण हत्या विरोधी कायद्याच्या अंमलबजावणीकरीता राज्याच्या आरोग्य मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली माहे मार्च, २००७ मध्ये राज्य पर्यवेक्षकीय समिती तीन वर्षासाठी नेमली गेली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीने आतापर्यंत राज्यातील किती गर्भलिंग निदान केंद्र आणि स्त्रीभ्रूण हत्याविरोधी केंद्रांवर बंदी आणून कायद्याची अंमलबजावणी केली आहे, असल्यास, त्याचा थोडक्यात तपशील काय आहे,

(३) असल्यास, राज्य पर्यवेक्षकीय समितीची मुदत संपून आज दहा महिने उलटल्यानंतरही नवी समिती न नेमल्याची बाब निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंबंधी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, नसल्यास, सदर समितीची नेमणूक किती कालावधीत करण्यात येईल ?

**प्रा. फौजिया खान, श्री.सुरेश शेट्टी याच्याकरिता :** (१) हे खरे आहे.

(२) आतापर्यंत राज्यातील १३९ सोनोग्राफी केंद्राविरूद्ध न्यायालयात खटले दाखल करण्यात आले असून ४५ खटल्यांचा निकाल लागला असून त्यापैकी १७ सोनोग्राफी धारकांना शिक्षा झालेली आहे.

(३) हे खरे आहे.

(४) शासन निर्णय क्र.प्रचिनी २००६/४२३/प्र.क्र.१५०/कु.क.२ दि.५.३.२०११ अन्वये राज्य पर्यवेक्षकीय समिती पुनर्गठीत करण्यात आली असून दि.११.३.२०११ रोजी समितीची बैठक आयोजित करण्यात आलेली आहे.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, आरोग्य विभागाशी संबंधित गर्भलिंग निदान आणि स्त्रीभ्रूण हत्येच्या संदर्भात हा अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. या प्रश्नाकडे आरोग्य विभागाचे अक्षम्य दुर्लक्ष झालेले आहे. 2007 मध्ये समिती नियुक्त केली. ही समिती तीन वर्षासाठी नेमली

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 13517 .... श्री. केशवराव मानकर...

होती. 2010 मध्ये त्या समितीची मुदत संपली. मी जर 27 जानेवारीला तारांकित प्रश्न दिला नसता तर कदाचित या प्रश्नाला न्याय मिळाला नसता. या ठिकाणी पहिल्या उपप्रश्नाला "हे खरे आहे" असे उत्तर दिलेले आहे. गर्भलिंग निदान चाचणी आणि स्त्रीभ्रूण हत्या विरोधी कायद्याच्या कलम 16(3)(अ) प्रमाणे प्रत्येक राज्याला समिती नेमणे बंधनकारक आहे तसेच दर चार महिन्यांनी त्या समितीची बैठक घेणे आवश्यक आहे. मागील वर्षात या संबंधात किती बैठका घेतल्या गेल्या, बैठका घेतल्या नसल्यास त्याची कारणे काय आहेत ? आता जी समिती नेमलेली आहे त्याबद्दल मी मंत्री महोदयांचे आभार मानतो. या अत्यंत महत्वाच्या प्रश्नाकडे शासन दुर्लक्ष करणार नाही याची जबाबदारी मंत्री महोदयांनी घेऊन ज्या अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केलेले आहे त्यांच्यावर कारवाई करणार का ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, या विषयावर शासनाने दुर्लक्ष केले आहे असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे पण तशी परिस्थिती नाही. 11.3.2011 रोजी माननीय मंत्री महोदयांकडे बैठक झालेली आहे. या प्रश्नाकडे शासनाने दुर्लक्ष केलेले नाही. मंत्री स्तरावर माननीय मुख्यमंत्र्यांनी सुध्दा बैठक घेतलेली आहे तसेच जिल्हाधिकाऱ्यांशी सुध्दा व्हिडिओ कॉन्फरन्सींगव्दारे बोलणे केलेले आहे. या बाबत वारंवार बैठका घेण्याची दक्षता घेण्याचे काम शासनाने केलेले आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13517....

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरात असे नमूद केले आहे की, "आतापर्यंत राज्यातील 139 सोनोग्राफी केंद्रांविरुध्द न्यायालयात खटले दाखल करण्यात आले असून 45 खटल्यांचा निकाल लागला असून त्यापैकी 17 सोनोग्राफी धारकांना शिक्षा झालेली आहे." राज्यातील एकूण सोनोग्राफी सेंटर्सची संख्या व त्यावरील मॉनेटरिंग पाहता ही संख्या तुटपुंजी आहे. राज्यातील मुलींचा जन्मदर ज्याप्रमाणात घटत आहे, स्त्री भ्रूण हत्या मोठया प्रमाणात होत आहेत हे शासनाला मान्य आहे काय, यावर मॉनेटरिंग करण्यासाठी जो कर्मचारीवर्ग आहे तो कमी आहे. म्हणून आवश्यक असलेली पदे तत्काळ भरण्यात येतील काय, सोनोग्राफी सेंटर्सचे मॉनेटरिंग करण्यासाठी वेगळे मंडळ निर्माण करण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारच्या मंडळाची निर्मिती करुन त्यासाठी पदे भरली जातील काय, उत्तरात नमूद केल्याप्रमाणे राज्य पर्यवेक्षकीय समितीची दिनांक 11.3.2011 रोजी बैठक घेण्यात आली होती, त्या बैठकीत कोणते निर्णय झाले ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सेक्स रेश्योमध्ये घट असल्याचे आपल्याला मान्यच करावे लागेल. ही वस्तुस्थिती आहे, ती कोणीही नाकारणार नाही. मॉनेटरिंगच्या कामासाठी कर्मचाऱ्यांच्या संख्येत वाढ करावी असे सांगितले आहे. यामध्ये तशा प्रकारची तरतूद नाही. या कामासाठी ॲक्टनुसार ॲप्रोप्रिएट ॲथॉरिटीज निर्माण करण्यात आलेल्या आहेत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, यावर मॉनेटरिंग करण्याची आवश्यकता आहे की नाही असा मी प्रश्न विचारला होता. त्याचे उत्तर मिळत नाही.

प्रा.फौजिया खान : मॉनेटरिंगची आवश्यकता आहे. परंतु त्यासाठी ॲप्रोप्रिएट ॲथॉरिटीज आहेत. मला एकंदर या विषयावर बोलावयाचे आहे. हा विषय एका विभागापुरता मर्यादित नाही किंवा देशापुरता नाही तर त्याची व्याप्ती संपूर्ण जगामध्ये पसरली आहे. परंतु मला या प्रश्नाच्या इतर पैलूंबाबत सुध्दा बोलावयाचे आहे. हा एक सोशल इव्हिल आहे. सोशल इव्हिलवर नियंत्रण ठेवण्यासाठी शासन कायद्याप्रमाणे काम करीत आहे. हा एक भाग झाला. दुसरा भाग सामाजिक प्रश्नाचा आहे. सामाजिक प्रश्नासंबंधी शासन काय करीत आहे, हा प्रश्न सुटण्यासाठी पुढाकार घेत

2....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

आहे त्याबाबत सुध्दा बोलण्याची मला संधी द्यावी.  शासनाने यासाठी कायदा केलेला आहे. त्याशिवाय राज्य स्तरावर, जिल्हा स्तरावर कमिट्या नेमलेल्या आहेत.  हा प्रश्न सुटावा म्हणून शासन आवश्यक ते सर्व करीत आहे.  सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे रजिस्टर्ड केसची संख्या पाहिली तर ती कमी दिसत आहे. त्यासाठी आपली मशिनरी मजबूत केली पाहिजे याबद्दल दुमत नाही. यासाठी फास्ट ट्रॅक कोर्ट निर्माण करता येतील.

समितीने एक महत्वाचा निर्णय घेतला आहे.  या विषयाचा अभ्यास करुन खुल्या बाजारामध्ये पिल्स आहेत त्याचा समावेश शेडयूल - एक्स मध्ये घालता येईल काय, त्यासाठी कायद्यात सुधारणा करता येईल काय याबाबत विचार करीत आहे.  शासनाने वेगवेगळया ॲथोरिटीज स्थापन केलेल्या आहेत.  राज्यात क्रिटीकल तालुके आहेत, त्या तालुक्यांवर विशेष लक्ष ठेवण्याचे सुध्दा काम करावे लागेल. मला सामाजिक दृष्टीकोनातून या प्रश्नाचा उल्लेख करावयाचा आहे.  या विषयाला मोठया प्रमाणात प्रसिध्दी दिली पाहिजे.  कमिटीमध्ये असाही निर्णय घेण्यात आला की, टार्गेट ओरियेण्टेड पब्लिसिटी केली पाहिजे. टार्गेट ओरियेण्टेड पब्लिसिटी म्हणजे ज्युडिशिअरीच्या लोकांचे  सेंसिटायझ ेशन करणे, अंगणवाडीच्या कायकर्त्या आहेत, आशा आहे किंवा एएनएम आहेत यांना हाताशी धरुन त्यांना सेंसिटायझेशन करण्याचे काम पब्लिसिटीच्या माध्यमातून करावयाचे आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

MSS/ D/ MMP/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 13:00

ता.प्र.क्र. 13517.....

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

डॉ. दीपक सावंत : राज्यमंत्री महोदया निबंध वाचून दाखवित आहेत...

प्रा. फौजिया खान : मी निबंध वाचत नाही तर वस्तुस्थिती सांगत आहे. आपण महिलांना 50 टक्के आरक्षण दिलेले आहे.

**The Chairman** : Hon'ble State Minister is explaining about social evil. याबाबतच्या त्यांच्या भावना त्यांनी सांगितल्या आहेत. त्यासंदर्भात सन्माननीय सदस्यांना काही प्रश्न विचारावयाचे असतील तर ते त्यांनी विचारावेत. मी सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांना प्रश्न विचारण्यास परवानगी देत आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, प्रश्न सरळ आहे. राज्य पर्यवेक्षकीय समिती ही तपासणी व पडताळणी समिती आहे. या समितीचा कार्यकाळ 2010मध्ये संपला. मग एक वर्ष हे शासन झोपा काढत होते काय ? सोशल इव्हिल संबंधी या ठिकाणी राज्यमंत्री महोदया भाषण करीत आहेत. या समितीचा कार्यकाळ ते वाढवू शकले नाहीत हे त्यांनी मान्य करावे. महिला राज्यमंत्री असल्यामुळे या प्रश्नाबाबत त्या फार संवेदनशील असल्या पाहिजेत. माझा प्रश्न असा आहे की, या समितीचा कार्यकाळ का वाढविण्यात आला नाही, याला कोण जबाबदार आहे ? माननीय राज्यमंत्री महोदया स्वत: मान्य करीत आहेत की, 5 मार्च 2011 ला समिती गठीत करण्यात आली आणि त्या समितीची पहिली बैठक 11 मार्च 2011 ला झाली. मग गेले वर्षभर शासन काय करीत होते ?

प्रा. फौजिया खान : सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, शासन याबाबतीत सेन्सेटिव्ह नाही. शासनाने काय काय केले हे मी सांगत होते. समितीची मिटींग 11 मार्चला घेण्यात आली असून त्या मिटींगमध्ये महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आलेले आहेत.

श्रीमती शोभा फडणवीस : ख-या अर्थाने हा विषय अतिशय सेन्सेटिव्ह आहे. महाराष्ट्रातील मुलींचा जन्मदर घसरत आहे. या संदर्भात समिती गठीत करण्यात आली होती. त्या समितीचा कार्यकाळ संपल्यानंतर ती पुनश्च गठीत करावयास पाहिजे होती. ही समिती 10-11 महिने गठीत होणार नसेल, समितीच्या बैठका होणार नसतील तर हा विषय गांभीर्याने शासन कसा काय हाताळणार, माझा प्रश्न असा आहे की, या समितीला आपण कोणते अधिकार दिलेले आहेत ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ MMP/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 13:00

ता.प्र.क्र. 13517.....

श्रीमती शोभा फडणवीस..

दुसरे असे की, सोनोग्राफी सेंटरमध्ये कोणत्याही प्रकारचे रेकॉर्ड ठेवले जात नाही, कोणत्याही केसेची नोंद केली जात नाही. अशा वेळी डमी माणूस पाठवून सोनोग्राफी सेंटरवर का कारवाई केली जात नाही, त्यासाठी समितीला अधिकार वाढवून देण्यात येणार आहेत काय, तज्ज्ञ समितीचा अहवाल ताबडतोब मांडण्याची गरज होती. तो अहवाल मांडला गेला नाही हे खरे आहे काय ?

प्रा. फौजिया खान : सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे हा अत्यंत संवेदनशील विषय आहे. केवळ कमिटीच नाही तर शासन इतरही अनेक माध्यमातून या विषयाच्या बाबतीत काम करीत आहे. महिलांचे सक्षमीकरण, सबलीकरण झाले तर त्यांच्यामध्ये सामाजिक जागृती निर्माण होईल. आज समाजामध्ये मुलीच्या जन्माचे स्वागत केले जात नाही. या विषयाला अड्रेस करणे आवश्यक आहे की मिटींग घेणे आवश्यक आहे असा प्रश्न मला समोरच्या सन्माननीय सदस्यांना विचारावा वाटतो....

**सभापती** : या प्रश्नावर किमान 15 मिनिटे चर्चा झालेली आहे. या प्रश्नाच्या संदर्भात माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांनी त्यांच्या दालनामध्ये बैठक घ्यावी. हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ MMP/ पूर्वी श्री. शिगम 13:05

ता.प्र.क्र.13517... मा.सभापती....

It is a social evil. मी मघाशी म्हटले ते खरे आहे. किंबहुना प्रत्येक तालुक्यात, प्रत्येक जिल्हयात, राज्यात मुलींचा जन्मदर कमी होऊ लागला आहे. आज जरी ही परिस्थिती भयावह नसली तरी दहा, वीस वर्षांनी ही बाब फार भयावह होणार आहे. म्हणून मी माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांना सांगू इच्छितो की, या विषयाच्या बाबतीत तुम्ही तुमच्या दालनामध्ये बैठक घ्यावी.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, यासंबंधीची समिती अद्यापपर्यंत का गठीत केली गेली नाही ?

( गोंधळ )

श्रीमती फौजिया खान : यासंबंधीची समिती गठीत होणे आवश्यक आहे...

**सभापती** : सभागृहात कृपया शांतता ठेवावी.

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, तारांकित प्रश्न क्रमांक 1 मधील जो विषय आहे. तशाच विषयाचा प्रश्न 4 आणि 13 वर नमूद केलेला आहे. हे तिघे प्रश्न एकत्र केले पाहिजे व त्यावर उपप्रश्न विचारले गेले पाहिजेत अशी माझी मागणी आहे. यासंदर्भात अत्यल्प आक्षेप घेतला गेलेला आहे ही वस्तुस्थिती आहे आणि ती शासनाने दुस-या तारांकित प्रश्नात मान्य देखील केलेले आहे. या विषयाच्या बाबतीत आरोग्य विभागाने अतिशय सिरियसली काम केले पाहिजे. कर्मकांडाच्या बाबतीत या ठिकाणी प्रश्न उपस्थित केलेला आहे, तो प्रश्न रास्त आहे. कर्मकांड मुलींना करता येत नाही, त्यात काही अडचणी असतात. वारसाचा प्रश्न निर्माण होतो. यासंदर्भात बरेच गैरसमज आहेत. ते गैरसमज दूर करण्यासंदर्भात शासनाने तसेच सर्व लोकप्रतिनिधी आणि जनता यांनी प्रचार आणि प्रसार केला पाहिजे तो होत नाही म्हणून याबाबतीत शासन काही उपाययोजना करणार आहे काय ?

श्रीमती फौजिया खान : याबाबतीत सरकार काय करीत आहे आणि काय करणार आहे यासंबंधीची मी माहिती या ठिकाणी देत आहे. या विषयाच्या बाबतीत आवश्यक ते सहकार्य शासनास मिळाले पाहिजे. सरकारच्या इनिशिएटिव्हज्च्या बाबतीत उल्लेख करणे गरजेचे आहे. त्यासंबंधीचा उल्लेख करण्यासाठी मला संधी उपलब्ध करुन द्यावी अशी माझी विनंती आहे.

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती फौजिया खान.... ता.प्र.क्र.13517...

लोकप्रतिनिधी म्हणून जोपर्यंत सरकारला सहकार्य मिळत नाही तोपर्यंत या सोशल इव्हीलला आपण कसे थांबविणार हा खरा महत्वाचा प्रश्न आहे. (गोंधळ )

डॉ.नीलम गोऱ्हे : यासबंधीची समिती का स्थापन केली नाही याची माहिती देण्यात यावी.

श्री. सुरेश शेट्टी : मी सन्माननीय सदस्या श्रीमती गोऱ्हे यांना सांगू इच्छितो की, आपण या समितीचे सदस्य होता. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी गर्भलिंग निदान चाचणी आणि स्त्रीभ्रूण हत्या विरोधी कायद्यांतर्गत राज्यात नवीन समितीची स्थापना करण्यास विलंब का झाला असा प्रश्न उपस्थित केला. त्याबाबतीत मी सांगू इच्छितो की, मागील समितीची मुदत 2010 मध्ये संपलेली आहे. नवीन समिती नेमण्यास विलंब झाला ही गोष्ट मी मान्य करतो. नवीन समिती स्थापन करताना सभागृहातील तीन सन्माननीय सदस्यांना सदस्य म्हणून घ्यावयाचे होते. यात महिला आमदारांचा समावेश केला गेलेला आहे. महिला आमदारांना पूर्वी देखील त्या समितीमध्ये सदस्य म्हणून घेतले होते. या समितीमध्ये नॉन-ऑफिशियल सदस्यांची नेमणूक करावयाची असते. या समितीमध्ये प्रचंड अनुभवी सदस्यांची नेमणूक करावयाची आहे. नवीन समितीत नॉन-ऑफिशियल सदस्यांची नेमणूक करताना मी स्वत: लक्ष घालणार आहे. या समितीमध्ये नॉन-ऑफिशियल सदस्य नेमताना त्यांचे बॅकग्राऊंड तपासून घेतले जाणार आहे. नवीन समिती नेमताना महिला व बालविकास मंत्र्यांना विश्वासात घेतले आहे. या विभागाशी दुसरे संबंधित मंत्री आहेत, त्यांच्याकडून नॉन-आफिशियल सदस्यांची नावे मागवून त्यांचे बॅकग्राऊंड तपासल्या नंतर या समितीमध्ये समावेश करण्यात येणार आहे. या नवीन समितीमध्ये सन्माननीय सदस्या श्रीमती पंकजा मुंडे, श्रीमती प्रणिती शिंदे व श्रीमती उषाताई दराडे यांचा समावेश केलेला आहे. परंतु या समितीमध्ये नॉन ऑफिशियल सदस्य नेमावयाचे आहेत, त्यांचे बॅकग्राऊंड चेक करुन घेण्याचा प्रयत्न करीत आहोत. या पूर्वी या समितीचे नॉन-ऑफिशियल जे सदस्य होते ते सोनोग्रॉफी सेंटर्समध्ये जाऊन धाड टाकण्याचे काम करीत होते. नवीन समिती नेमण्याच्या बाबतीत विलंब झालेला आहे हे मी मान्य करतो.

डॉ.दीपक सावंत : कोणते सदस्य धाड टाकण्याचे काम करीत होते त्यांची नावे सांगा ?

श्री. सुरेश शेट्टी : या ठिकाणी माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितले हा विषय अतिशय सेंसेटिव्ह आहे. आता फक्त सोनोग्रॉफी सेंटरमध्ये सेक्स डिटर्मिनेशनचे काम होत नाही...

यानंतर श्री. भोगले...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.13517.... श्री.सुरेश शेट्टी........

मेडिकल सायन्स इतके प्रोग्रेस झाले आहे की, बायोप्सी करुन दुस-या केंद्रामध्ये एका महिन्यात माहिती कळते. सोनोग्राफी सेंटरमध्ये जायची गरज भासत नाही. माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना याची कल्पना आहे. केवळ ब्लड सॅम्पल घेतात आणि दोन महिन्यात गर्भलिंग चाचणीचा निष्कर्ष सांगू शकतात.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, ही माहिती देण्यासाठी मंत्रीमहोदयांनी सभागृहाची 25 मिनिटे का वाया घालविली? कमीत कमी 10 प्रश्न उत्तरित झाले पाहिजेत असा आपला आग्रह असतो.

श्री.सुरेश शेट्टी : या विषयाबाबत शासन गंभीर आहे. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, वैद्यकीय शिक्षण खात्याच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली असून दोन्ही विषय त्या समितीसमोर ठेवले आहेत. ॲबॉर्शनवरील औषधे काऊंटरवर मिळतात आणि टीव्हीवर देखील आपण जाहिरात पाहतो. ॲबॉर्शनवरील औषधांची सर्रास जाहिरात केली जाते. ही औषधे शेड्यूल एक्समध्ये समाविष्ट करुन विदाऊट प्रिस्क्रिप्शन देता येणार नाहीत असा नियम करीत आहोत. बायोप्सी आणि हेल्थ सेंटर्स आहेत ती सोनोग्राफी सोडून सेक्स डिटर्मिनेशनचे काम करतात, त्यांना कसे मॉनिटर करु शकतो यासाठीच ही समिती नेमली आहे. सभागृहात मागणी केली जाते की, ॲबॉर्शन पिल्सवर बंदी आणावी, सोनोग्राफी सेक्स डिटर्मिनेशनवर बंदी आणावी. याबद्दल स्ट्राँग लॉबी आहे. काही महिला ॲक्टिव्हीस्टनी सुध्दा याला विरोध केला आहे. माझ्याकडे महिला ॲक्टिव्हीस्टचे मेसेज आणि ई-मेल्स आहेत त्यात त्यांनी असे म्हटले आहे की, "Abortion is our birth right you cannot stop it." वैद्यकीय शिक्षण विभाग हे करु शकत नाही असे त्यांचे म्हणणे आहे. These are all technical and sensitive issues. म्हणूनच स्टेक होल्डर, एनजीओ, ॲक्टिव्हीस्ट यांच्यासोबत चर्चा करुन निर्णय घ्यावा लागेल. केवळ सभागृहामध्ये घोषणा करण्यात आली आणि उद्या प्रकरण न्यायालयात गेले तर समाजात चुकीचा मॅसेज जाईल हे मी सभागृहाला सांगू इच्छितो.

---------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**शिवतेज आरोग्य सेवा संस्था (ता.खेड, जि.रत्नागिरी) यांच्या**
**बालक आश्रमाच्या प्रस्तावाबाबत**

**(२) * १३७४४ श्री.रामदास कदम :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवतेज आरोग्य सेवा संस्थेने (ता.खेड, जि.रत्नागिरी) बालक आश्रमाचा परिपूर्ण प्रस्ताव शासनाकडे सादर केल्याबाबतचे लोकप्रतिनिधींनी एक निवेदन मा.महिला व बालविकास मंत्री यांना दिनांक ८ जानेवारी, २०११ रोजी वा त्यासुमारास दिले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार या प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,
(३) अद्यापपर्यंत कोणताच निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.वर्षा गायकवाड :** (१) होय.
(२) व (३) नवीन बालगृहांना मंजुरी देण्यापूर्वी त्याबाबतचा कृती आराखडा तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. त्याचप्रमाणे यापुढे नवीन बालगृह मंजूर करतांना जाहिरात देवून प्रस्ताव मागविण्याचे शासनाने ठरविले आहे. त्यामुळे नवीन बालगृहांचा कृती आराखडा अंतिम झाल्यावर ज्या जिल्ह्यात नवीन बालगृहांची आवश्यकता आहे, अशा ठिकाणी प्रस्ताव सादर करण्याबाबत वर्तमानपत्रात जाहिरात देवून प्रस्ताव मागविण्यात येतील तद्नंतरच जाहिरातीनुसार वरील संस्थेने जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, रत्नागिरी यांना प्रस्ताव सादर केल्यावर, तो जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, रत्नागिरी यांचेमार्फत तपासण्यात येईल व इतर प्राप्त प्रस्तावांसोबत प्रस्तुत संस्थेचा प्रस्ताव तपासून बालगृहास मान्यता देण्याबाबत उचित कार्यवाही करण्यात येईल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, राज्यात ११०० बालगृहे मंजूर करण्यात आली. या बालगृहांना मंजुरी देत असताना जी पध्दत अवलंबिण्यात आली तीच पध्दत अवलंबून शिवतेज आरोग्य सेवा संस्थेच्या प्रस्तावाला मंजुरी दिली जाईल काय? किती दिवसात ही मंजुरी देण्यात येईल?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी यापूर्वी मंजूर केलेल्या बालगृहांना जो निकष लावण्यात आला त्याच निकषाच्या आधारे शिवतेज आरोग्य सेवा संस्थेच्या प्रस्तावाला मान्यता दिली जाईल काय असा प्रश्न विचारला आहे. सभापती महोदय, विभागामार्फत बालगृहासंबंधी बृहत आराखडा तयार करीत आहोत. यापुढे तालुकानिहाय बालगृह मंजूर करण्याचा निर्णय घेतला आहे. खेड तालुक्यात सध्या एकही बालगृह नाही. जिल्हा परिषद आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या माध्यमातून तपासणी करण्यात आली आहे. आवश्यक ती प्रक्रिया पूर्ण करुन प्रस्तावाचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

..३..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.१३७४४.....

श्री.रामदास कदम : माझ्याकडे संपूर्ण राज्यातील बालगृहांची यादी उपलब्ध आहे. एका तालुक्यात एकच बालगृह असावे हा नियम आम्हाला मान्य आहे. नियमबाह्य पध्दतीने एका तालुक्यात पाच-पाच बालगृहे मंजूर झाली आहेत. नियम एकच बालगृह मंजूर करण्याचा असताना ज्या तालुक्यामध्ये पाच बालगृहे मंजूर केली आहेत ती तात्काळ रद्द केली जातील काय? या प्रक्रियेमध्ये जाहिरात देऊनच बालगृहे मंजूर केली पाहिजेत अशी पध्दत असताना कोणत्याही बालगृहांना मंजुरी देत असताना जाहिरात काढली गेली नाही. यामध्ये ५०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे. मी यासंबंधी मंत्रीमहोदयांना माहिती देण्यास तयार आहे. इमारत नाही, शाळा नाही अशा ठिकाणी अनुदान दिले गेले आहे. हे मी जबाबदारीने सांगत आहे. एखादी संस्था दोन-तीन वर्षे सतत शासनाकडे प्रस्ताव सादर करीत असताना पुन्हा पुन्हा तपासणी करुन प्रस्ताव खालच्या स्तरावर पाठविला जातो. मग पुन्हा प्रस्ताव मागविला जातो. ही कार्यवाही का केली जात आहे?

नंतर २एम.१...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ D/ MMP/ पूर्वी श्री. भोगले....... 13:15

ता. प्र. क्र. 13744........... श्री रामदास कदम .....

ज्या पध्दतीने सबंध राज्यात शासनाने वसतिगृहे दिली त्याच पध्दतीने या संस्थेलाही वसतिगृहाची मान्यता दिली जाणार आहे काय ?

श्रीमती वर्षा गायकवाड : महोदय, 10 जून, 2010 ला आयुक्तांना एक पत्र दिलेले आहे. त्या माध्यमातून तालुकानिहाय वसतिगृहे मंजूर करीत असताना प्राधान्याने विचार केला जाईल. कारण अगोदरच जे निकष ठरलेले होते त्यानुसार ज्या संस्थांनी अर्ज केलेले आहेत व सन 2008 पूर्वीची परवानगी दिलेली आहे त्यांना मान्यता दिली जाईल. त्यानंतरच्या अर्जांच्या बाबतीत बृहत आराखडा विचाराधीन असून तो तयार केल्यानंतर तालुकानिहाय वसतिगृहे मान्य करण्याचा शासनाचा विचार आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, शासनाने 668 संस्थांची तपासणी केली असता त्यातील 453 संस्थांचे अहवाल शासनाकडे प्राप्त झाले. त्यातील 41 संस्थांमध्ये स्वच्छता आढळून आली नाही, इमारती दिसून आल्या नाहीत तर काही ठिकाणी मालकाचाच पत्ता नाही, अशा संस्थांनाही शासनाने अनुदान दिलेले आहे. वास्तविक सर्व निकष पूर्ण करणाऱ्या संस्थांना अनुदान मागूनही शासन ते देत नाही. म्हणून कोकणातील ज्या ज्या तालुक्यांमध्ये बालगृहे नाहीत तेथे खास बाब म्हणून शासन मान्यता देण्याची घोषणा करणार काय ?

श्रीमती वर्षा गायकवाड : महोदय, मी अगोदरच सांगितले की नवीन बृहत आराखडा तयार झाल्यानंतर ......

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, ज्या 41 संस्थांमध्ये शासनाच्या निकषाप्रमाणे परिस्थिती आढळून आली नाही, स्वच्छता दिसून आली नाही त्या यावर्षाचे सुध्दा अनुदान दिलेले आहे. तरी देखील मंत्री महोदय बृहत आराखड्याची अट घालत आहेत.

श्रीमती वर्षा गायकवाड : सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती माझ्याकडे उपलब्ध नाही...

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, मी सांगितलेली माहिती ही शासनाच्याच अहवालातील आहे आणि मंत्री महोदय सांगत आहेत की माझ्याकडे माहिती नाही. मी शासनाकडून माहितीच्या अधिकाराखाली ही माहिती मागविलेली आहे.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांचा प्रश्न असा आहे की, ज्या संस्थांनी योग्य वेळेत अर्ज केलेले आहेत त्यांच्या बाबतीत शासन योग्य विचार करणार काय ?

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 13744........

श्रीमती वर्षा गायकवाड : ज्या संस्थांनी शासनाच्या निकषांची पूर्तता केली आहे त्यांच्या बाबतीत उचित कार्यवाही केली जाईल.

प्रा. सुरेश नवले : महोदय, तालुकानिहाय बालगृहे मंजूर करण्यासाठी बृहत आराखडा विचाराधीन असल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले. शासनाच्या विचाराधीन असलेला कालावधी हा महिन्यांचा आहे की वर्षांचा आहे ?

श्रीमती वर्षा गायकवाड : महोदय, हा कृती आराखडा साधारण पाच वर्षांचा असतो, या काळात निर्णय घ्यावयाचा असतो. सन्माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे तालुकानिहाय वसतिगृह दिले पाहिजे पण 6 ते 12 आणि 12 ते 18 अशी मुलांची कॅपेसिटी असलेली वसतिगृहे प्रत्येक तालुक्यासाठी चार दिले जावेत असा प्रस्ताव असतो.

श्री. भाई जगताप : या प्रश्नाची व्याप्ती फक्त एका तालुक्यापुरतीच नाही तर भष्टाचाराशी संबंधित देखील आहे. शासन यासाठी नवीन निकष सुरु करणार पण बाकीच्या गोष्टींच्या बाबतीत काय निर्णय घेणार आहे, तसेच यामध्ये चुकीच्या पध्दतीने मान्यता दिल्याचे पुरावे सांगण्यात आले अशा संस्थांवर कोणती कारवाई करणार आहात ?

श्रीमती वर्षा गायकवाड : महोदय, शासनाची कोणालाही पाठीशी घालण्याची भूमिका नाही. असा भ्रष्टाचार कोणत्या संस्थेने केला असेल तर त्या संस्थेवर कारवाई करण्यात येईल.

-------

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पालघर, वसई-विरार (जि.ठाणे) या ठिकाणी पाणीपुरवठा करणाऱ्या बंधाऱ्याची गळती थांबविण्यासाठी करावयाची उपाययोजना**

**(३) * १३२८३ श्री.प्रकाश बिनसाळे , श्रीमती उषाताई दराडे , श्री.विक्रम काळे , श्री.रमेश शेंडगे , श्री.हेमंत टकले , श्री.सुभाष भोईर :** सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील पालघरसह वसई विरारला पाणीपुरवठा करणाऱ्या बंधाऱ्याला माहे डिसेंबर, २०१० मध्ये वा त्या दरम्यान गळती लागल्याने २६ गावांच्या नळपाणी पुरवठा योजनेवर पाणी टंचाईचे संकट येण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर बंधाऱ्याची गळती थांबविणे बाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुनील तटकरे :** (१) नाही. तथापि बंधाऱ्याच्या बांधकामातून काही प्रमाणात गळती होत आहे. तथापि त्यामुळे पाणी टंचाई निर्माण झाली नाही.

(२) नाही.

(३) सदरचा बंधारा वसई-विरार महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय झाला असून त्याबाबतची कार्यवाही चालू आहे. त्यामुळे बंधाऱ्याच्या दुरुस्तीचा निर्णय झालेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात वसई-विरार महानगरपालिकेला ज्या बंधा-यातून पाणी पुरवठा करण्यात येतो त्या बंधा-यामधून पाण्याची गळती होत आहे हे मंत्री महोदयानी मान्य केलेले आहे. या बंधा-यातील गळतीमुळे या ठिकाणच्या जनतेला पाण्याचा तुटवडा झाला नसेलही परंतु धरणातून जी काही पाण्याची गळती होते त्याचा अर्थ हे धरण बांधण्यामध्ये काही तरी चुका झालेल्या आहेत असे दिसून येते. हे धरण बांधतांना त्यामध्ये जर चुका झाल्या असतील तर त्याची आतापर्यंत चौकशी का करण्यात आली नाही, यासंदर्भात चौकशी केली गेली असेल तर संबंधितांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आलेली आहे, हा बंधारा डिफेक्टीव्ह असताना तो बंधारा आपण वसई-विरार महानगरपालिकेकडे सोपवून त्यांच्या अडचणीमध्ये अजून भर का टाकत आहात ?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सदर बंधारा हा 1988 साली बांधून पूर्ण करण्यात आलेला होता. सूर्या प्रकल्पातून उपलब्ध होणारे पाणी या बंधा-यामध्ये आणले जाते. या बंधा-यातून सिंचनाचे लाभक्षेत्र निर्माण करण्यात आलेले आहे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.: १३२८३** .....

श्री. सुनील तटकरे...

या धरणाची उंची 4.86 मीटर असून लांबी 132 मीटर आहे. या परिसरात मोठया प्रमाणात पाऊस पडत असल्यामुळे ख-या अर्थाने या बंधा-यात नादुरुस्ती निर्माण झालेली आहे. वसई-विरार महानगरपालिकेला या बंधा-यातून गेल्या अनेक वर्षापासून पाणीपुरवठा होतो आहे. सन 2006 मध्ये विद्यमान उपमुख्यमंत्री व तत्कालीन जलसंपदा मंत्र्यांकडे यासंदर्भात बैठक झाली होती त्या बैठकीमध्ये हा बंधारा वसई-विरार महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्याचा निर्णय झाला होता. या धराणासाठी जो काही खर्च आलेला आहे तो न घेता हे धरण वसई-विरार महानगरपालिकेला हस्तांतरित करण्याचा निर्णय झालेला आहे. परंतु असे असताना अजूनही वसई-विरार महानगरपालिकेने या बंधा-याला आपल्या ताब्यात घेतलेले नाही. परंतु हा बंधारा वसई-विरार महानगरपालिकेला देण्यासंदर्भात काही विशिष्ट दिवसात कार्यवाही केली जाणार आहे. धरण नादुरुस्त आहे, या धरणातून पाण्याची गळती होत आहे ही वस्तुस्थिती आहे. परंतु या गळतीमुळे पिण्याच्या पाण्यावर काही एक परिणाम होत नाही कारण या बंधा-यात सूर्या प्रकल्पाचे पाणी सोडले जाते. या बंधा-याच्या गळतीमुळे काही परिणाम होत नाही परंतु तरी सुध्दा या धरणाची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. येत्या आठ दिवसात हा बंधारा वसई-विरार महानगरपालिकेला ताब्यात घेण्याच्या सूचना देण्यात येतील. या महानगरपालिकेने हा बंधारा ताब्यात घेतला नाही तर विभागाच्या माध्यमातून या बंधा-याची दुरुस्ती केली जाईल एवढे या प्रसंगी मी सांगू इच्छितो.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, प्रश्न क्रमांक 3 च्या उत्तरात असे म्हटले आहे की, "सदरचा बंधारा वसई-विरार महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्याचा निर्णय झाला असून त्याबाबतची कार्यवाही चालू आहे." माझ्याकडे अशी माहिती आहे की, या बंधा-याची दुरुस्ती शासनामार्फत करुन देण्याच्या संदर्भात वेळोवेळी वसई-विरार महानगरपालिकेने विनंती केलेली आहे परंतु या विनंतीकडे दुर्लक्ष केले जात आहे. वसई-विरार येथे मोठमोठया इमारती उभ्या राहत आहेत तसेच या ठिकाणी जी काही वस्ती आहे त्यांना दोन दोन, तीन तीन दिवसानंतर या धरणातून पिण्याचे पाणी मिळते त्यामुळे याबाबत मंत्री महोदय काही माहिती देतील काय ?

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.: १३२८३** .....

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे तो प्रश्न मूळ प्रश्नाशी निगडित नाही. वसई-विरार महानगरपालिकेला पाणी पुरवठा योग्य रीतीने व्हावा यासाठी पूर्वी सुध्दा बैठका झालेल्या आहेत, माझ्या कालावधी मध्ये सुध्दा बैठका झाल्या होत्या तसेच या प्रकल्पाला मी जेव्हा स्वत: भेट दिली होती त्यावेळेस त्या ठिकाणच्या विधानसभा सदस्यांना, आयुक्तांना, महापौरांना तसेच सर्व नेत्यांना बोलावण्यात आले होते. वसई विरार येथे पाणी पुरवठा नियमित होण्याची दक्षता आमच्या विभागाकडून नियमितपणे घेतली जाते.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या प्रकल्पात शेती सिंचनाचे क्षेत्र किती आहे ? हा बंधारा कधी बांधण्यात आला, त्यावर किती खर्च झाला तसेच हा बंधारा बांधण्याचा ठेका कोणास देण्यात आला होता, बंधारा बांधणा-या ठेकेदाराला आपण ब्लॅकलिस्टमध्ये टाकणार आहात काय?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, या बंधा-याला 1983 साली मान्यता मिळाली होती व त्यावेळेस त्याची किंमत 17.58 लक्ष रुपये होती. कोणत्या ठेकेदाराने या बंधा-याचे काम केलेले होते यासंदर्भातील माहिती आता माझ्याकडे उपलब्ध नसल्यामुळे मी सदर माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतो. सिंचनाचे लाभक्षेत्र अगोदर 117 हेक्टर होते परंतु 2005 मध्ये 120 हेक्टर व सन 2009-10 मध्ये 133.10 हेक्टर इतके क्षेत्र सिंचनाखाली आलेले आहे.

----

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यात मुलींचा जन्मदर वाढविण्याकरिता लेक वाचवा अभियान राबविणेबाबत**

**(४) * १२९०२ डॉ.सुधीर तांबे , प्रा.सुरेश नवले , श्री.एम.एम.शेख , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.सुभाष चव्हाण , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.हुसेन दलवाई , श्री.विजय सावंत , श्री.राजन तेली , श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मुलींचा जन्मदर कमी झाल्यामुळे कोल्हापुर पॅटर्नच्या धर्तीवर लेक वाचवा अभियान राज्यभर राबविण्यासाठी सेव्ह दि बेबी गर्ल हे संकेतस्थळ व सायलन्ट ऑब्झरव्रर चे तांत्रिक मुल्यमापन करण्यासाठी नेमण्यात आलेल्या तज्ञांच्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,
(२) असल्यास, सदरहू अहवालात काय आढळून आले व त्यानुसार लेक वाचवा अभियानाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान,श्री.सुरेश शेट्टी यांच्याकरिता:** (१) अहवाल शासनास प्राप्त झालेला नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

**सभापती** : पहिल्या प्रश्नाच्या निमित्ताने या विषयावर पुष्कळ चर्चा झालेली असल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी फक्त एकच प्रश्न विचारावा.

श्री.भाई जगताप : हा वेगळा प्रश्न आहे आणि विषय देखील वेगळा आहे.

**सभापती** : तसे असले तरी दोन्ही प्रश्नांचा गाभा एकच आहे.

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नावर बरीच चर्चा झाली होती हे जरी खरे असले तरी हा प्रश्न वेगळा आहे. मुलींचा जन्मदर कमी झाल्यामुळे कोल्हापूर पॅटर्नच्या धर्तीवर अभियान राबवावयाचे असून "सेव्ह दि बेबी गर्ल" हे संकेतस्थळ आणि सायलन्ट ऑब्झरव्हरचे तांत्रिक मूल्यमापन करण्यासाठी तज्ज्ञ समिती नेमण्यात आली होती. त्या समितीचा अहवाल शासनाकडे प्राप्त झालेला नाही असे उत्तर देण्यात आले आहे. हा अहवाल सादर करण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत. ? सभापती महोदय, हा प्रश्न गंभीर स्वरुपाचा असून आपण स्वत: या प्रश्नाची नोंद घेतलेली आहे.मला माननीय मंत्र्यांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, या समितीचा अहवाल लवकरात लवकर प्राप्त करुन त्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे काय ?

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12902...

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, या विषयाचा अभ्यास करुन अहवाल देण्याचे काम या समितीकडे सोपविण्यात आले असून अहवाल अजून शासनाला प्राप्त झालेला नाही. हा अहवाल तयार करण्याचे काम सातत्याने सुरु आहे.विभागाचे सचिव त्या कामाचा रिव्हयू घेत आहेत परंतु यामध्ये अनेक टेकनिकल बाबी येत असल्यामुळे फूल प्रुफ सिस्टीम आणण्याकरिता या समितीला अजून वेळ हवा आहे. अहवाल तयार करण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर तो अहवाल शासनाकडे प्राप्त होईल.

श्री.भाई जगताप :सभापती महोदय, आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील पहिला प्रश्न याच विषयाशी संबंधित असून त्यावर जरी सविस्तर चर्चा झालेली असली तरी व हा प्रश्न समितीशी संबंधित असला तरी "सेव्ह दि बेबी गर्ल "हा या विषयाचा गाभा आहे. गर्भ निदान करण्यासाठी सोनोग्राफी करण्याचीच गरज नाही. ब्लड टेस्ट करुनसुध्दा गर्भ निदान कळू शकते.हे सरकारला माहीत आहे.मंध्यतरी सोनोग्राफी सेन्टर्सवर कॉन्स्ट्रेशन करुन काही सोनोग्राफी सेंन्टर्सवर कारवाई देखील करण्यात आली होती. ब्लड टेस्ट करुन देखील गर्भ निदान कळते हे तंत्रज्ञान लक्षात घेऊन त्याबाबतीत कोणते प्रिकॉशनरी मेझर्स शासन घेणार आहे ? कोल्हापूर पॅटर्न या सगळया प्रक्रियेतूनच बाहेर आला असून तो चांगल्या प्रकारे तयार करण्यात आला आहे याबाबतीत दुमत होण्याचे कारण नाही.परंतु आजची परिस्थिती अशी आहे की, आज सुध्दा सर्वात जास्त भ्रुण हत्या कोल्हापूर जिल्हयात होत आहेत. ही भ्रुण हत्या थांबविण्यासाठी कोणती उपाययोजना करण्यात येणार आहे , पूर्वी 9 जिल्हे बाधित होते परंतु आता जवळजवळ 11 जिल्हे बाधित झालेले आहेत म्हणजेच हे प्रमाण वाढलेले आहे तेव्हा हे प्रमाण कमी करण्यासाठी शासन कोणते प्रयत्न करणार आहेत ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला प्रश्न अतिशय योग्य आहे. या संदर्भात शासनाने नवीन तंत्रज्ञान वापरुन अनेक प्रयत्न केलेले आहेत . त्यानुसार "आमची मुलगी डॉट कॉम" ही वेब साईट 1 मे 2010 पासून सुरु करण्यात येणार आहे.कोणाची काही तक्रार असेल तर ती तक्रार या वेबसाईटवर नोंद करण्याची त्यांना मुभा राहील त्याचबरोबर

3..



VTG/ D/ MMP/ प्रथम श्री.जुन्नरे 13.25

जोपर्यत मदर ॲन्ड चाईल्डचे ट्रॅकींग सिस्टीम आपण तयार करीत नाही तोपर्यत कोणत्या महिलेने कोणत्या ठिकाणी जाऊन गर्भपात केला आहे हे आपल्याला कळणार नाही.त्याकरता मदर ॲन्ड चाईल्ड ट्रॅकींग सिस्टीम (एमसीटीएस) 1 एप्रिल 2010 पासून सुरु करण्यात येणार आहे.शासकीय रुग्णालयामधून मदर ॲन्ड चाईल्डचे ट्रॅकींग केले जात आहे. एखाद्या गावातील कोणती महिला गर्भवती आहे ती महिला किती वेळा दवाखान्यात आली होती, त्याचबरोबर ती किती महिन्याची गर्भवती आहे, इत्यादीचे डिटेल्स ठेवले जात आहे त्याचबरोबर आता एम गर्व्हनन्सचा वापर करुन व्हाईस रिस्पॉन्स सिस्टिमच्या माध्यमातून मोबाईलव्दारे सुध्दा ट्रॅक करु शकतो. गर्भधारणा होऊन किती महिने झालेले आहेत आणि आता काय स्टेटस आहे हे पाहता येणार आहे .केवळ सोनोग्राफी करुन गर्भ निदान केले जाते असे नाही .त्यामुळे केवळ सोनोग्राफी या एकाच टेकनॉलॉजीला ॲड्रेस करुनही चालणार नाही. या बाबतीत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

------

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## राज्यात ग्रामपंचायतींमार्फत प्रत्येक गावात सौर अभ्यासिका सुरु करण्याबाबत

(५) * १३१८० श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.सुभाष चव्हाण , डॉ.सुधीर तांबे , श्री.हुसेन दलवाई , श्री.विजय सावंत , श्री.राजन तेली , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्रीमती दिप्ती चवधरी , श्री. एस. क्यू. ज़मा : सन्माननीय ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात भारनियमन आणि अवेळी जाणारी वीज यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान लक्षात घेऊन शासनाने प्रत्येक गावात सौर अभ्यासिका (सोलार हेमलाईट) सुरु करण्याचा माहे जानेवारी, २०११ मध्ये वा त्या दरम्यान निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने राज्यातील प्रत्येक गावात ग्रामपंचायतीमार्फत सौर अभ्यासिका सुरु करण्याच्या घेण्यात आलेल्या निर्णयाची त्वरित अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रचलित शासन निर्णयातील तरतूदीनुसार राज्यामध्ये वित्तीय वर्ष सन २००९-१० पासून ग्रामपंचायती अंतर्गत सौर अभ्यासिका सुरू करण्याची योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत सन २००९-१० मध्ये निधीच्या उपलब्धतेनुसार राज्यात एकूण २६६९ गावांमध्ये सौर अभ्यासिका कार्यक्रम राबविण्यात आला आहे. वित्तीय वर्ष २०१०-११ मध्ये निधीच्या उपलब्धतेनुसार एकूण ३७६४ गावांमध्ये सौर अभ्यासिकांचा कार्यक्रम राबविण्यात येत असून सदर काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, सौर अभ्यासिकांचा कार्यक्रम राबविण्याचे काम प्रगतिपथावर आहे असे उत्तरात म्हटले आहे. तेव्हा या कामासाठी निधी केव्हा मिळणार आहे, आणि हे काम केव्हा पूर्ण होणार आहे?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, सन २००९-१०, २०१०-११ आणि सन २०११-१२ या तीन वर्षामध्ये ज्या गावांमध्ये विजेचे भारनियमन असल्यामुळे लहान मुलांना अभ्यास करीत असतांना अडचण भासते अशा महाराष्ट्रातील ४१ हजार लहान मोठया गावांमध्ये सौर अभ्यासिका योजना सुरु करण्याचे योजिले होते. सन २००९-१० मध्ये ३७६४ गावांचे उद्दिष्ट पार पाडले. पहिल्या वर्षी २६६९ आणि या वर्षी ३७६४ अशा एकूण ३ वर्षामध्ये सर्व गावांना सौर अभ्यासिका देण्याचा मनोदय या विभागाचा आहे. परंतु अपुरा निधी असल्यामुळे ते उद्दिष्ट पूर्ण करु शकलो नाही. त्यामुळे गेल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ D/ MMP/

ता.प्र.क्र. १३१८०...

श्री. गणेश नाईक...

वर्षीपेक्षा या वर्षी जास्त गावांमध्ये सौर अभ्यासिका देण्याचे ठरविले आहे. याकरिता ११ कोटी ५४ लाख रुपयांची तरतूद केली आहे.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, ग्रामीण भागामध्ये ही योजना राबवीत असतांना आपण ठरविलेले उद्दिष्ट पुढील तीन वर्षामध्ये कसे पूर्ण करणार आहात? इतकेच नव्हेतर जागतिक पातळीवर आज ज्या घटना घडत आहेत त्या लक्षात घेता अपारंपारिक ऊर्जेचे महत्व वाढले आहे. केंद्र सरकारमार्फत अपारंपारिक ऊर्जेला प्रोत्साहन देण्याचे धोरण स्वीकारले जात आहे त्याचा आपण लाभ घेतला पाहिजे. त्यामुळे केवळ सौर अभ्यासिकेपुरती आपण मर्यादित गती न ठेवता गावातील संपूर्ण स्ट्रीटलाईटची व्यवस्था सुध्दा सौर ऊर्जेच्या माध्यमातून आपण करणार काय?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, या गतीने आपण सौर अभ्यासिका गावामध्ये देऊ लागलो तर ४१ हजार गावांमध्ये सौर अभ्यासिका देण्यास खूप मोठा कालखंड लागेल. याबाबत माननीय वित्तमंत्री श्री. अजितदादा पवार साहेबांकडे अधिक निधीची मागणी करण्यात आली असून त्यांनी सुध्दा या कामासाठी पुढील तीन वर्षाकरिता जास्त निधीची तरतूद करण्यात येईल असे सांगितल्यामुळे हे उद्दिष्ट पूर्ण् करण्याच्या दृष्टीने आम्ही निश्चितपणे पावले टाकणार आहोत.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सौर अभ्यासिकेचा उपयोग ग्रामीण भागामध्ये चांगल्या प्रकारे होऊ शकतो.परंतु आर्थिक तरतूद कमी असल्यामुळे या कार्यक्रमाला गती प्राप्त होत नाही. आपल्याला वित्त आयोगाचा निधी मिळणार आहे. त्यादृष्टीने मला असे सुचवावयाचे आहे की, प्रत्येक ग्रामपंचायतीच्या अखत्यारीत काही ऐतिहासिक स्थळे आहेत किंवा स्मारके आहेत ती दिवसें दिवस अंधारात पडलेली असतात. अशा स्मारकांच्या ठिकाणी सौर ऊर्जेमार्फत प्रकाशाची व्यवस्था करण्यासाठी पावले उचलणार काय वित्त आयोगाकडून जो निधी मिळणार आहे त्यामधून या सौर ऊर्जेसाठी विशेष तरतूद करण्याचा प्रस्ताव सादर करणार काय?

श्री. गणेश नाईक : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे ग्रामीण भागात ज्या ज्या ठिकाणी ऐतिहासिक स्थळे अंधारात आहेत त्यांची माहिती घेऊन त्याठिकाणी सौर ऊर्जेचा वापर करुन निश्चितपणे प्रकाश पुरविण्याची व्यवस्था केली जाईल.

-----

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्य शासनाने टेरी या संस्थेबाबत सामंजस्य करार करुन हवामान बदलामुळे होणाऱ्या परिणामावर करावयाची उपाययोजना**

**(6) *14077 श्री. एस. क्यू. ज़मा, श्री.विजय सावंत, श्री.हुसेन दलवाई** : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्य शासनाने टेरी या संस्थेबाबत सामंजस्य करार करुन त्या द्वारे राज्यात हवामान बदलामुळे होणाऱ्या परिणामाचा अहवाल व त्यावरील उपाययोजना या बाबतचा कृती आराखडा तयार करण्याचे काम माहे डिसेंबर, 2010 चे आधी पासून सुरु केले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदरील संस्थेने अहवाल व त्यावरील उपाययोजनाबाबत शासनास अवगत केले आहे काय,

(3) असल्यास, शासनाने कृती आराखडा लवकरात लवकर तयार करणेकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, याप्रकरणी होत असलेल्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सचिन अहिर, श्री.संजय देवतळे यांच्याकरिता** : (1) होय, याबाबत दिनांक 31 मार्च, 2010 रोजी "टेरी" या संस्थेबरोबर सामंजस्य करार करण्यात आला आहे.

(2) व (3) सामंजस्य करारानुसार अंतिम अहवाल 24 महिन्यांच्या कालावधीत सादर करावयाच्या असून याबाबतचा आढावा संबंधित विभागांबरोबर घेण्यात येतो.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.सय्यद ज़मा : सभापती महोदय, हवामान बदलाव का विषय बहुत ही गंभीर विषय है सभी माननीय सदस्य इस बारे में अपने सुझाव समय-समय पर देते रहते हैं. शासन ने 2008-09 में निर्णय लेकर एक हाई पावर कमेटी बनायी और उन्होंने कहा कि पर्यावरण के विषय में एक टेरी नाम की संस्था है, उसके साथ एग्रीमेंट किया जाये. दो साल के अंदर वे अपनी अंतिम रिपोर्ट देंगे. वह यह रिपोर्ट कार्बन इमीशन कम करने के बारे में और जंगल का जो डिपलिशन हो रहा है, उसके उपाय के बारे में देंगे. महाराष्ट्र शासन ने 16 नवम्बर 2009 को एक जी.आर. निकाला और टेरी संस्था से जो एम.ओ.यु. साइन किया है वह 31 मार्च 2010 को किया है.उन्होंने कहा है कि वे 24 महीने के अंदर एक्शन प्लान बनायेंगे. मंत्री महोदय से मैं जानना चाहता हूं कि भारत सरकार का जो नेशनल क्लाइमेट चेंज मिशन है. करीब 25 हजार करोड़ रुपए का उनका फंड है.मुझे पूछना है कि उसमें से हमने महाराष्ट्र राज्य के लिए कितना फंड प्राप्त किया है. दूसरा प्रश्न मेरा यह है कि यह एक ग्लोबल विषय है इसलिए एक्शन प्लान बनाने का जो कार्यक्रम है, उसमें जन प्रतिनिधियों के साथ कोई सभा लेकर या कोई वर्कशॉप लेकर या कोई सेमिनार लेकर आमदारों के साथ इन्टरएक्शन करने की क्या आपकी कोई योजना है? ताकि .....

महारात्र राज्य में इसको असरदार तरीके से और समयबद्ध तरीके से लागू किया किया जा सके.

श्री.सचिन अहिर : मुळामध्ये महाराष्ट्र हे एकमेव असे राज्य आहे की, ज्याठिकाणी पर्यावरण विषयाच्या बाबतीत श्री.के.पचौरी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केली. यासाठी केवळ समिती गठीत केली नाही तर आपण "टेरी" या संस्थेबरोबर सामंजस्य करार करुन 24 महिन्यामध्ये या राज्यामध्ये एकंदरीत 2030 साली, 2050 साली, 2070 साली काय होणार आहे याचे भाकित करण्याच्या दृष्टीकोनातून आणि आपण नेमके कोणत्या दिशेने जात आहोत हे समजण्यासाठी समिती गठीत केलेली आहे आणि त्याचे काम चांगल्या पध्दतीने सुरु आहे.सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे या कामासाठी आपल्याला केंद्र शासनाचा निधी उपलब्ध नाही.परंतु राज्य शासन म्हणून जो काही निधी उपलब्ध करावयाचा असेल तो करण्यात आलेला आहे.सन्माननीय सदस्यांनी दुसरीही सूचना केली, पण आपल्याला हे समजून घेतले पाहिजे की, ही बाब टेक्नीकली माहिती असलेल्या कमिटीकडे द्यावी लागेल.श्री.के.पचौरी यांच्या अध्यक्षते खालील "टेरी" ही जी संस्था आहे, त्यामध्ये जे सायंटीस्ट आहेत किंवा त्यातील जे तज्ज्ञ आहेत, त्यांचा समावेश केलेला आहे.त्यानुसार 24 महिन्यानंतर रिपोर्ट आल्यानंतर नेमके कोणकोणत्या क्षेत्रासाठी, आपण यामध्ये सहा क्षेत्रे म्हणजे आरोग्य, कृषी, पाणी इ.निवडलेली आहेत. यासंबंधातील रिपोर्ट आल्यानंतर सर्व लोकप्रतिनिधींना जागरुकता निर्माण करणे किंबहुना त्या दृष्टीकोनातून आणखी पुढे जाणे अशा प्रकारची कामे आपण प्रस्तावित केलेली आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे दरम्यानच्या काळामध्ये आपण अधिकाऱ्यांचे वर्कशॉपही घेतलेले आहे.त्याप्रमाणे लोकप्रतिनिधी यांचे देखील अशाच प्रकारचे वर्कशॉप घेतले जाईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, पर्यावरणाच्या अतिशय महत्वाच्या विषयावर देशातील सर्वोच्च संस्थेबरोबर सामंजस्य करार करुन जी पावले टाकावयाची आहेत, ती शासन निश्चितपणे टाकेल यात शंका नाही. परंतु आपण या सगळयाचा कालावधी लक्षात घेतला तर शासनाला 24 महिन्यानंतर यासंबंधातील अहवाल प्राप्त होणार आहे.त्यानंतर काय कार्यवाही करावयाची हे ठरविणार आहात. पण त्याअगोदर राज्यातील विभागांमध्ये विशेषत: पर्यावरण विभागामध्ये जो कुशल स्टाफ आहे आणि ज्यांनी या क्षेत्रामध्ये काम केलेले आहे,त्यांनी या मधल्या काळामध्ये निश्चितपणे काय करावयाचे आहे? कारण तुमच्यासाठी पर्यावरणामध्ये होणारे बदल हे दोन वर्षे थांबणार नाहीत. हे बदल सातत्याने होत आहेत आणि अतिशय वेगाने त्यातील सर्व बाजू समोर येत आहेत.



APR/ D/ MMP/ 13:35

ता.प्र.क्र.14077 . . . .

श्री.हेमंत टकले . . . .

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सदरहू अहवाल प्राप्त होण्यास दोन वर्षाचा कालावधी आहे.पण आतापासून पुढच्या कालावधी पर्यंत ज्या काही प्रिव्हेंन्टीव्ह मेजर्स् घेण्याची गरज आहे, त्याबाबत शासन विचार करणार आहे काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, शासन निश्चितपणे विचार करील. म्हणूनच आपण मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली सुकाणू समिती नेमलेली आहे.जेणेकरुन यामधील तज्ज्ञांबरोबर को-ऑर्डीनेशन करीत असताना आपल्या विभागातील, वेगवेगळया विभागातील अधिकाऱ्यांचे देखील सहकार्य मिळाले पाहिजे अशा प्रकारची आपली भूमिका आहे. यातील काही नावे पाहिली असेल तर त्यामध्ये डॉ.अरविंद मिश्रा हे सायंटीस्ट आहेत, डॉ.संजय तोमारे, डॉ.लक्ष्मी, श्रीमती नायर इ. वेगवेगळ्या तज्ज्ञांचा समावेश केलेला आहे.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.14077.....

श्री. सचिन अहिर...

सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे अजूनही काही तज्ज्ञांचा समावेश करावयचा असेल तर तो करण्याची राज्य शासनाची तयारी आहे.

डॉ दीपक सावंत : सभापती महोदय, ज्यावेळी ग्लोबल वार्मिंगवर या सभागृहात चर्चा झाली होती त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले होते की, याबद्दलचा डे-टु-डे आढावा घेण्याच्या बाबबतीत आम्ही प्रयत्नशील राहू. जपानची पार्श्वभूमी पहाता हवामान बदलचा प्रश्न अधिकच गहन झालेला आहे. येणाऱ्या पावसाळयात डे-टु-डे माहिती घेण्यासाठी अशा प्रकारची काही यंत्रणा उभारण्यात आली आहे काय, तसेच ॲक्शन प्लॅन लवकर इम्प्लीमेंट होण्याच्या दृष्टिकोनातून 24 महिन्याचा कालावधी कमी करता येईल काय?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, तूर्त पर्यावरण सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक कोऑर्डिनेशन समिती केलेली आहे. ज्याला आपण संनियत्रण असे म्हणतो, नेमके काय परिणाम होतात ते ही समिती मॉनिटर करील. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे जपानचा अनुभव येण्याच्या अगोदरच शासनाने एक प्रो-ॲक्टीव्हली समिती गठीत करुन यासंबंधीची कार्यवाही करण्याचे काम केलेले आहे. यु.के. च्या हवामान विभागाशी कोऑर्डिनेशन करण्याचे काम टेरी या संस्थेने केल्यानंतर नेमके कुठल्या लोकेशनमध्ये आणि कुठल्या मॉडेलप्रमाणे हे डिझाईन करावे लागेल आणि हा अहवाल तयार करावा लागेल यासंबंधीचा अहवाल देखील प्राप्त करण्याचे काम शासनाने केलेले आहे. म्हणून अहवालाची मुदत कमी करता येणार नाही. जो प्रोग्रॅम आहे तो नियमित रीतीने टाईमबाऊन्डली करण्याचे काम करण्यात येत आहे. म्हणून तूर्त 24 महिन्याच्या आत अहवाल मागविण्याची घाई करण्यात येणार नाही. 24 महिन्यापर्यंत हा अहवाल कसा प्राप्त होईल आणि त्यातून पुढे काय करावयाचे हे बघण्याचा प्रयत्न शासनाच्या वतीने केला जाईल.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ MMP/

**जळगाव जिल्ह्यातील दीपनगर विस्तारीत प्रकल्प कार्यान्वित होणेबाबत**

**(७) * १२६८३ श्री.दिलीपराव सोनवणे , श्री.वसंतराव खोटरे , श्री.मनीष जैन , श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्ह्यातील दीपनगरचा विस्तारीत प्रकल्प माहे २०११ मध्ये कार्यान्वित करण्याचे प्रस्तावित होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दीपनगर येथील वीज प्रकल्पात आवश्यक असणारी कामे पूर्ण न झाल्याने व तेथे अनेक अडचणी निर्माण होत असल्यामुळे सदर प्रकल्प कार्यान्वित होण्यास बराच कालावधी लागेल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुषंगाने सदर प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेंद्र मुळक, श्री.अजित पवार यांच्याकरिता :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे. (दीपनगर विस्तारीत प्रकल्पातील संच क्र.४ व ५ चे कार्यान्वय अनुक्रमे ऑगस्ट, २०१० व डिसेंबर, २०१० मध्ये प्रस्तावित होते. परंतु भेल कंपनीकडून सर्वत्र सामुग्रीचा पुरवठा वेळेवर आणि क्रमवारी नुसार न होणे, मुख्य संच उभारण्यासाठी अपुरे मनुष्यबळ तसेच दि.२८ जुलै, २०१० रोजी चिमणीतील लोखंडी धुरांडे कोसळणे ही विलंबाची मुख्य कारणे आहेत. सदर दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले असून सदर संच अनुक्रमे जून, २०११ व ऑगस्ट, २०११ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, उत्तरामध्ये दिलेल्या माहितीत विलंबाची कारणे दिलेली आहेत त्यापैकी विलंबाचे एक कारण असे दिलेले आहे की, "दिनांक 28 जुलै, 2010 रोजी चिमणीतील लोखंडी धुरांडे कोसळणे" याची चौकशी झालेली आहे काय, याबाबतची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे काय, तसेच यामुळे एकूण किती नुकसान झालेले आहे आणि या दुरुस्तीच्या कामामुळे किती खर्च वाढलेला आहे? यासंबंधीची माहिती देण्यात यावी.

...3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12683....

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, दिनांक 28 जुलै, 2010 रोजी जी घटना घडलेली आहे त्या बाबतच्या चौकशीसाठी त्रि-सदस्यीय चौकशी समिती नेमली होती. मुंबईच्या तज्ज्ञांच्या माध्यमातून अपघाताचा निष्कर्षही काढण्यात आला. त्यामुळे जे काही नुकसान झालेले आहे त्याबाबतीत टाटा आणि गॅमन या कंपन्याकडून कॉन्ट्रॅक्टमध्ये नमूद केलेल्या रकमेनुसार दहा टक्क्याच्या हिशोबाने कॉम्पेन्सेशन वसूल करण्यात आलेले आहे.

श्री. मनिष जैन : सभापती महोदय, प्रश्नामध्ये असे म्हटले आहे की, "भेल कंपनीकडून सर्वत्र सामुग्रीचा पुरवठा वेळेवर झालेला नाही" याचे काय कारण आहे?

जब कंपनी करार करती है तो उस करार में लिखा रहता है कि कितने समय में कंपनी सामान देने वाली है. क्या माननीय मंत्री महोदय बता सकेंगे कि आपको यह सामान टाइम पर नहीं मिला है. क्या आफिसर ने उस संबंध में सही ढंग से फॉलोअप नहीं किया. यदि कंपनी की गलती है तो क्या कंपनी उस संबंध में कुछ मुआवजा देने वाली है और यदि आपके आफिसर ने उसका फॉलोअप ठीक ढंग से नहीं किया तो क्या आप उसको जिम्मेदार ठहराने वाले हैं ?

श्री. राजेंद्र मुळक :सभापती महोदय, भेल कंपनीच्या माध्यमातून मुख्यत: बॉयलर, बॉटम रिंग रिडर, जनरेटर, स्टँडर, स्टेशन ट्रान्सफॉर्मर ही सर्व साधनसामुग्री करारानुसार वेळेवर भेटली नाही म्हणून विलंब लागला. याबाबतीत कॉन्ट्रॅक्टमध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यांच्यावर 10 टक्के विलंब शुल्क लावण्यात आलेला आहे आणि या विलंब शुल्काच्या वसुलीची कारवाई सुरु आहे.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, दीपनगर येथील संच फार जुने झालेले आहेत. 40-50 वर्षाच्या आधीपासून येथे विजेचे उत्पादन सुरु आहे. त्यामुळे येथील जुन्या संचाच्या विशेष दुरुस्तीसाठी लागणारा निधी उपलब्ध झाला तर त्या संपूर्ण भागात आज सुरु असलेला विजेचा लपंडाव थांबेल तेव्हा या संदर्भात शासन जादा निधी उपलब्ध करुन देईल काय?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, यासंबंधीची माहिती घेण्यात येईल आणि रिपेअर व मेन्टेनन्ससाठी जो निधी लागणार आहे त्यासंबंधीची प्रोव्हिजन केली जाईल.

---

यानंतर श्री. बरवड....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**जैतापूर (जि.रत्नागिरी) येथील वीज निर्मिती प्रकल्पामुळे बाधित झालेल्या प्रकल्पग्रस्त व शेतकऱ्यांच्या मागण्या पूर्ण करणेबाबत**

**(८) * १२८९१ श्री. सुभाष चव्हाण, श्री. राजन तेली, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप : तारांकित प्रश्न क्रमांक ९८८३ ला दिनांक १६ डिसेंबर, २०१० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यात जैतापूर हा सर्वात मोठा वीज प्रकल्प असून या वीजनिर्मिती प्रकल्पापासून सुमारे दहा हजार मेगावॅट वीज निर्मिती होणार असल्याने तसेच प्रकल्पग्रस्तांना व शेतकऱ्यांना योग्य व चांगला मोबदला देऊन स्थानिकांना नोकऱ्याही देण्यात येणार असल्याचा शासनाने माहे जानेवारी, २०११ मध्ये वा त्यादरम्यान निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निर्णयाची लवकरात लवकर अंमलबजावणी करुन प्रकल्पाचे काम सुरु होण्याबाबत शासनाने कोणती खास उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेंद्र मुळक, श्री.अजित पवार यांच्याकरिता :** (१) हे खरे आहे.

तथापि शासनाने जानेवारी, २०११ वा त्या दरम्यान निर्णय घेतला नसून दिनांक १६/१०/२०१० रोजी महाराष्ट्र शासन व एनपीसीआयएल (प्रकल्पसंस्था) यांच्या मध्ये पुनर्वसन पॅकेजबाबत करारनामा झालेला असून करार नाम्यानुसार प्रत्येक कुटुंबातील एक याप्रमाणे १७ कुटुंबातील प्रकल्पग्रस्तांना एनपीसीआयएलने नोकरीत सामावून घेतले आहे. प्रकल्पग्रस्त गावांना नागरी सुविधा व त्यांचा दर्जा उंचावण्यासाठी प्रत्येक गांव २ कोटी रु व पुढे सुविधांच्या देखभालीसाठी प्रतिवर्ष प्रतिगांव रु.२५ लाख देण्यात येणार असून प्रकल्पग्रस्तांना जमिनीचा वाढीव मोबदला व भरपाई देण्यासंदर्भातील प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. जैतापूर अणुऊर्जा प्रकल्पामुळे जी कुटुंबे भूमिहीन, अत्यल्प भूधारक, अल्पभूधारक पुनर्वसन अनुदान दिले जाणार आहे. तसेच बाधित गावातील आश्रित परित्यक्त्या व निराधार व्यक्तींना दरमहा किमान ५०० रु आजीव निवृत्ती वेतन मिळणार आहे.

(२) व ३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, प्रकल्पग्रस्त गावांना नागरी सुविधा व त्यांचा दर्जा उंचावण्यासाठी प्रत्येक गावाला 2 कोटी रुपये दिले जाणार आहेत. ही 2 कोटी रुपये रक्कम या जैतापूर प्रकल्पाच्या एकूण रकमेच्या किती टक्के आहे ? दुसरा प्रश्न असा की, सोलापूरला एनटीपीसीचा जो पॉवर प्रोजेक्ट आला त्या ठिकाणी जमिनीच्या मोबदल्यात चांगला निधी दिला गेला. त्या ठिकाणी 10 लाख रुपये, 5 लाख रुपये फिक्स डिपॉझीट म्हणून दिले गेले. त्या प्रमाणे आपला या संबंधीचा संपूर्ण मसुदा किती दिवसात तयार होणार आहे आणि त्या धर्तीवर या प्रकल्पग्रस्तांना रक्कम दिली जाणार आहे का ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2...

ता.प्र.क्र. 12891....

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, या संबंधात 16.10.2010 रोजी करारनामा करण्यात आला. त्या करारनाम्यानुसार प्रकल्पग्रस्तांना ज्या काही नागरी सुविधा द्यावयाच्या आहेत, त्यांचा जो दर्जा उंचवावयाचा आहे त्यासाठी 2 कोटी रुपये देण्यासंबंधी निर्णय झालेला आहे. सन्माननीय सदस्यांनी त्याची व्याप्ती किती राहील तसेच किती एरियामध्ये वाटप केले जाईल याबाबत प्रश्न विचारला.

श्री. सुभाष चव्हाण : दिली जाणारी रक्कम ही त्या प्रोजेक्टच्या एकूण किमतीच्या किती टक्के आहे ?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, त्यासंबंधी आता माझ्याकडे नेमकी माहिती नाही पण ती माहिती घेऊन आपल्याला नक्की सांगेन.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, एक गोष्ट मी सभागृहाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, हा प्रकल्प 1 लाख कोटी रुपये गुंतवणुकीचा आहे. एवढी मोठी गुंतवणूक होत असताना सन्माननीय सदस्यांनी विचारले त्याप्रमाणे 2 कोटी रुपये ही अतिशय तुटपुंजी रक्कम आहे. प्रकल्पाच्या एकूण किमतीच्या पॉइन्ट शून्य शून्य अशी काही तरी ती असेल. एक गोष्ट आम्हाला मान्य आहे की, ती रक्कम त्या हेतूने दिली जात नाही. खरे तर हा प्रकल्प केंद्र शासनाचा आहे. केंद्र सरकार हा प्रकल्प देत असताना मधल्या काळात जो निर्णय झाला आणि याच सभागृहामध्ये त्या बद्दलचा प्रश्न विचारलेला असताना अतिशय तुटपुंजी रक्कम आपण तेथील शेतकऱ्यांना दिलेली होती, ती रक्कम काही हजारामध्ये होती, मला वाटते ती रक्कम एकरी 60 हजार रुपये होती आणि म्हणून मी सभागृहाला सांगितले होते की, ही रक्कम काही लाखामध्ये कशी मिळेल अशा पध्दतीचा प्रयत्न केला जाईल. या राज्याचे नवीन मुख्यमंत्री म्हणून श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेब आल्यानंतर त्यांनी देखील स्वत: या प्रकल्पाच्या परिसरामध्ये भेट देऊन तेथील लोकांच्या मनामध्ये असणारे समज-गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केलेला आहे. मी या संदर्भात जी बैठक बोलविली होती त्या बैठकीमध्ये एक कमिटी केलेली होती आणि तेथील जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले होते की, काही झाले तरी तेथील प्रकल्पग्रस्तांना आपल्याला जास्तीची रक्कम द्यावी



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 12891.... श्री. अजित पवार ....

लागेल. सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी प्रश्न विचारताना सांगितले की, अशाच प्रकारचा एनटीपीसीचा प्रकल्प सोलापूरमध्ये आला, त्या ठिकाणी सन्माननीय श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी पुढाकार घेऊन एक चांगल्या प्रकारची रक्कम तेथील शेतकऱ्यांना देण्याकरिता लोकप्रतिनिधी या नात्याने प्रयत्न केलेला आहे. तशाच पध्दतीने याही प्रकल्पाच्या बाबतीत भरीव अशा प्रकारची रक्कम मिळावी याबाबतचा प्रस्ताव आता माननीय मुख्यमंत्र्यांसमोर त्या समितीने सादर केलेला आहे. अजून त्याबद्दल अंतिम निर्णय झालेला नाही. परंतु मी सभागृहाच्या लक्षात एक गोष्ट आणून देऊ इच्छितो की, एकरी काही लाख रुपये त्या भागातील शेतकऱ्यांना देण्याच्या संदर्भात राज्य सरकारची भूमिका आग्रही राहील.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, उप मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, प्रकल्पग्रस्तांना एवढी मोठी रक्कम देण्यात येईल. या भागामध्ये एकूण किती प्रकल्पग्रस्त आहेत आणि तेथील किती प्रकल्पग्रस्त लोकांची या प्रकल्पाला संमती मिळाली आहे, याबाबत माननीय मंत्री महोदय प्रकाश टाकू शकतील का ? माननीय मुख्यमंत्र्यांनी बैठक घेतली असेल पण माननीय मुख्यमंत्र्यांच्या बैठकीमध्ये नेमके काय झाले हे आपणा सर्वांना माहीत आहे. या प्रकल्पाला मान्यता देण्याच्या बाबतीत तेथील लोकांची मानसिकता तयार झालेली आहे काय ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, त्या ठिकाणी माडबन, मिठगाव, निवेली, करेल आणि वरेलवाडा अशी पाच-सहा गावे आहेत. माडबनला एकंदरीत 690 हेक्टर 40 आर एवढी जमीन आपल्याला घ्यावयाची आहे. त्यामध्ये 1851 एकूण खातेदार आहेत. जो अंतिम निवाडा केलेला आहे त्यामध्ये 12 कोटी 78 लाख 12 हजार 505 रुपयांची रक्कम आहे आणि वाटप झालेले खातेदार 109 असून वाटप झालेली रक्कम 1 कोटी 3 लाख 32 हजार 53 रुपये आहे. मिठगाववाडीला 2 खातेदारांना 58 हजार 325 रुपयांचे वाटप केले आहे. निवेलीला 17 खातेदार असून रक्कम 6 लाख 96 हजार 567 रुपये आहे. करेलला 2 खातेदार असून रक्कम 36 हजार 349 रुपये आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12891.... श्री.अजित पवार....

वरेलवाड्याला खातेदार 1 असून रक्कम 5,768 इतकी आहे. या सगळया गावातील संपादित क्षेत्र व वाटप झालेल्या खातेदारांची संख्या 131 आहे. खरे तर सगळया खातेदारांची संख्या 2,335 इतकी आहे. त्यापैकी 131 खातेदारांना वाटप झालेले आहे. वाटप झालेली रक्कम 1 कोटी 11 लाख 29 हजार 62 अशी आहे. ही रक्कम जुन्या दरानुसार दिलेली आहे. समितीच्या शिफारशीनुसार माननीय मुख्यमंत्र्यांकडे प्रस्ताव आलेला आहे. या खातेदारांनी यापूर्वी रक्कम घेतलेली असली तरी नव्याने जो दर निश्चित होईल त्यानुसार रक्कम दिली जाईल. त्यांनी अगोदर रक्कम घेतलेली आहे म्हणून त्यांना रक्कम दिली जाणार नाही अशातील भाग नाही. त्यांनाही ती रक्कम देणार आहे. शासनाने आज रोजी 17 प्रकल्पग्रस्तांच्या नियुक्तीचे आदेश दिलेले आहेत. त्यापैकी 16 प्रकल्पग्रस्त नोकरीवर रुजू झाले आहेत. उर्वरित 1 प्रकल्पग्रस्त जून, 2011 मध्ये आयटीआय उत्तीर्ण झाल्यावर नोकरीवर रुजू करुन घेतले जाईल. अशाप्रकारचे नियोजन केलेले आहे.

सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, या प्रकल्पाला स्थानिक लोकांचा अजूनही विरोध आहे. तो विरोध कमी करण्यामध्ये शासनाला यश मिळेल.जपानमध्ये नुकतीच घटना घडली आहे. त्यामुळे संपूर्ण देशामध्ये, राज्यामध्ये अणुऊर्जा प्रकल्पांबाबत वेगळी चर्चा सुरु झालेली आहे.या अणुऊर्जा प्रकल्पांना असलेले धोके, अडीअडचणींचा विचार करुन देशाच्या पंतप्रधानांनी यात लक्ष घातले आहे. अणुऊर्जा आयोगाच्या अध्यक्षांचे स्टेटमेंट सगळ्यांनी ऐकले असेल. सभापती महोदय, आपणही विधानमंडळाला 75 वर्षे पूर्ण झाल्यामुळे विधिमंडळामध्ये आगळावेगळा उपक्रम सुरु केलेला आहे. त्यानुसार चांगली व्याख्याने ठेवलेली आहेत.अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ.अनिल काकोडकर यांचे व्याख्यान झालेले आहे. त्यातून बऱ्याच गोष्टी समजून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. मी माझ्या उत्तराच्या माध्यमातून सभागृहाला विश्वास देऊ इच्छितो की, काही झाले तरी स्थानिकांचे नुकसान होणार नाही. त्यांच्या मनामध्ये जी भीती आहे ती दूर करण्यासाठी शासनाकडून खबरदारी घेतली गेली पाहिजे ती घेण्यात येईल.जपानमध्ये भूकंप झालेला आहे.तेथील अणुऊर्जा प्रकल्प भूकंपामुळे अडचणीत आला नसून तो त्सुनामी

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लाटेमुळे अडचणीत आला आहे. याबाबतचाही अभ्यास सगळयांनी केला पाहिजे. याबाबत अधिक माहिती घेण्याचा प्रयत्न करीत आहोत. हा प्रकल्प 25 मीटर उंचीवर आहे. त्यामुळे कितीही मोठी त्सुनामी लाट आली तर त्याच्यावर परिणाम होणार नाही. जगामध्ये आलेल्या त्सुनामीच्या लाटा 25-30 फुटाच्या उंचीच्या आहेत. हा प्रकल्प 75 फूट उंचीवर आहे. या सगळया बाबींची खबरदारी घेऊनच शासनाकडून पावले उचलली जातील.

श्री.हुसेन दलवाई : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी अतिशय चांगली भूमिका मांडली आहे, त्याचे आम्ही स्वागत करतो. त्या लोकांना जो मोबदला दिला जात आहे. ज्यांनी मोबदला घेतला त्यांची मंत्री महोदयांनी आकडेवारी सांगितली आहे. हे लोक मुंबईत किंवा अन्य ठिकाणी रहात आहेत. ते स्थानिक लोक नाहीत. त्यांच्यादृष्टीने ती जमीन गेलेलीच होती. जे मिळाले ते खिशात टाकावे अशी त्यांची भावना आहे. मी मुद्दाम हे शासनाच्या लक्षात आणून देतो. पण तेथे दिला जाणारा मोबदला अत्यल्प आहे. त्या कंपनीचे अधिकारी ज्या तऱ्हेने वागतात त्यामुळे तेथील वातावरण खराब झालेले आहे असे माझे मत आहे.

दुसरे असे की, सोलापूर येथील प्रकल्पासाठी मोबदला देण्यात आला, केवळ मोबदलाच नाही तर प्रकल्पग्रस्तांचे पुढील आयुष्य चांगले जावे, त्यासाठी त्यांच्या नावे काही रकमेची एफ.डी. देण्याचा निर्णय घेतला गेला. त्याप्रमाणे जैतापूर प्रकल्पाबाबत निर्णय घ्यावा. तिसरी सूचना अशी आहे की, ज्यांची जमीन आहे त्यांना मोबदला दिला जातो. परंतु या प्रकल्पामुळे मच्छिमारांचे सुध्दा खूप नुकसान होणार आहे. या प्रकल्पामुळे मच्छिमारांचे नुकसान होणार नाही असे शास्त्रज्ञ कितीही सांगत असले तरी ते न पटण्यासारखे आहे. मच्छिमारांचे फार मोठे नुकसान होणार आहे. मच्छिमारांना संरक्षण देण्यासाठी समुद्र ही त्यांची जमीन आहे असे समजून सरकारने त्यांच्याकडे सहानुभूतीने पाहून त्यांनाही या मोबदल्यात सामावून घ्यावे म्हणजे तेथील लोकांचा विरोध कमी होईल यासाठी सरकार विचार करीत आहे काय ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी, कोकणातील सर्व प्रमुख नेत्यांनी या प्रश्नामध्ये अतिशय बारकाईने लक्ष घातलेले आहे हे सन्माननीय सदस्यांनाही माहीत आहे. त्यामुळे मला एक गोष्ट लक्षात आणून द्यावयाची आहे जी सन्माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांनी मांडलेली आहे. शासनाची हीच भूमिका आहे. हा एनटीपीसीचा प्रकल्प आहे.

यानंतर श्री.शिगम...

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ KGS/ KTG/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 13:55

ता.प्र.क्र.12891..... श्री. अजित पवार....

कोकणातील जनतेचे किंवा तेथील शेतक-यांचे, स्थानिक मच्छिमाराचे, कोणाचेही कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही. अशा प्रकारचे नवीन प्रकल्प होत असताना खूप चर्चा होते. दाभोळ प्रकल्पाबाबत चर्चा होत असताना सभापती महोदय, आपणही मंत्रिमंडळामध्ये होता. एन्रॉन प्रकल्पासंबंधी खूप चर्चा झाली. हाही प्रकल्प तसाच आहे असे सांगण्यात आले. सभापती महोदय, राज्यकर्ते कोणीही असोत. ते राज्यकर्ते आपल्या राज्याचे, आपल्या परिसराचे, आपल्या शेतक-यांचे, स्थानिक लोकांचे नुकसान होईल अशा प्रकारचे प्रकल्प कधीही आणणार नाहीत. जपानमध्ये जी घटना घडली त्या संदर्भात देशपातळीवर माननीय पंतप्रधानापासून सर्वजण या प्रकल्पामध्ये लक्ष घालीत आहेत. माननीय मुख्यमंत्री देखील सातत्याने त्याकडे लक्ष देत आहेत. आता जो प्रस्ताव आलेला आहे त्यामध्ये आता सन्माननीय सदस्य श्री. हुसेन दलवाई यांनी जे काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्यांचा पहिल्यांदाच विचार करुन आम्ही रक्कम वाढवून देणार आहोत. मच्छिमारांचे नुकसान होणार नाही. त्यांना वा-यावर सोडले जाणार नाही. या सर्व बाबींचा राज्य सरकार शंभर टक्के विचार करील. त्या शिवाय या प्रकल्पाला पुढे जी काही राज्य सरकारची मदत लागते ती दिली जाणार नाही. पहिल्यांदा स्थानिकांचे समाधान केले जाईल. परंतु दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी हीही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, सगळया गोष्टी व्यवस्थित देत असताना उगाचच विरोधाला विरोध करायचा म्हणून कोणी राजकारण करण्याची भूमिका याबाबतीत घेऊ नये. प्रकल्पग्रस्तांबद्दल वेगवेगळया राजकीय पक्षांनी त्यांची भूमिका मांडलेली आहे. त्या भूमिकेला आम्ही कुणीही विरोध केलेला नाही. त्याचे आम्ही समर्थन करतो आणि तोच विचार राज्य सरकारचा देखील राहाणार आहे हे मी स्पष्टपणे सांगू इच्छितो.

**सभापती** : हा कोकणाशी आणि राज्याशी संबंधित असलेला अत्यंत महत्वाचा प्रश्न असल्यामुळे प्रश्नोत्तराचा तास संपलेला असताना सुध्दा या प्रश्नाला मी 3-4 मिनिटे वेळ वाढवून दिलेली आहे.

डॉ. नीलम गो-हे : सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी अगदी तपशीलवार उत्तर दिलेले आहे. हा कोकणाचा प्रश्न असला तरी जपानच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण राज्य आणि देशाशी संबंधित असा हा प्रश्न आहे.जपानमधील घटनेबाबत संपूर्ण माहिती घेण्यात येत आहे असे माननीय उप मुख्यमंत्र्यांनी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सांगितले. केन्द्रीय पर्यावरण मंत्री श्री. जयराम रमेश यांनी लोकसभेचे अधिवेशन चालू असताना असे जाहीर केलेले आहे की, "जैतापूरच्या संदर्भात आम्ही पुनर्विचार करु." मला हे सांगावयाचे आहे की, आज अनेक तज्ज्ञ वाहिन्यांवरुन हीच माहिती देत आहेत की, या अणुभट्टयांच्या होणा-या स्फोटांच्या परिणामांचा अभ्यास चाललेला आहे. तो अभ्यास अजून पूर्ण झालेला नाही. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी अनेक प्रकारच्या आपत्तीमध्ये स्वत: हस्तक्षेप करुन पुनर्वसनाच्या कामामध्ये पुढाकार घेतलेला आहे. जपानमधील अणुभट्टयांच्या स्फोटांच्या पार्श्वभूमीवर जैतापूर प्रकल्पाच्या संदर्भात पुनर्विचार होईपर्यन्त त्या प्रकल्पाला स्थगिती देण्यात येईल काय ?

श्री. अजित पवार : एक गोष्ट मला सभागृहाच्या लक्षात आणून द्यावयाची आहे की, या सर्व चर्चा सुरु झाल्यानंतर या देशाच्या पंतप्रधानांनी त्सुनामी किंवा भूकंपासारख्या आपत्ती आल्यास संपूर्ण देशातील अणुभट्टया किती सुरक्षित आहेत याची चाचपणी करण्यासाठी सर्व अणुभट्टयांच्या सुरक्षा यंत्रणा नव्याने तपासल्या जातील असे जाहीर केले. नंतर त्यांनी असेही सांगितले की, भारतातील सर्वच अणुभट्टयातील सुरक्षा अत्याधुनिक आहे. तसेच 2002 मध्ये गुजराथमधील विनाशकारी भूकंप आणि 2004 मध्ये दक्षिण तामिळनाडूमध्ये त्सुनामी संकट येऊनही तेथील अणुऊर्जा प्रकल्पांना कोणताही धोका पोहोचलेला नाही. अणुऊर्जा आयोगाचे अध्यक्ष डॉ. बॅनर्जी हे आहेत. त्यांनी जपान मधील फुकुशिमा येथील अपघाताचे चित्र पूर्ण स्पष्ट झाल्यावर तेथील घटनेचा अभ्यास करुन त्या आधारे भारतीय अणुप्रकल्पांच्या सुरक्षा यंत्रणांची तपासणी करण्यात येईल व गरज पडल्यास त्यात योग्य त्या सुधारणा करण्यात येतील असे सांगितले. मला सभागृहाला हेच सांगायचे आहे की, देशातील सर्वोच्च व्यक्ती माननीय पंतप्रधान श्री. मनमोहन सिंग यांनी या प्रकरणी लक्ष घातलेले आहे. अणुऊर्जा आयोगाचे अध्यक्ष डॉ. बॅनर्जी यांनी लक्ष घातलेले आहे. त्याच प्रमाणे राज्य सरकारचा जो काही अधिकार आहे त्याचाही विचार करुन या प्रकल्पाकडे आम्ही लक्ष देत आहोत. तोपर्यन्त हा प्रकल्प थांबविणार का असा प्रश्न सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी उपस्थित केला. मी सांगू इच्छितो या वरिष्ठ लोकांनी सांगितले की या प्रकल्पाबाबत पुढे जाण्यात काही अर्थ नाही तर मग आज देशामध्ये राजस्थान, गुजराथ, केरळ, महाराष्ट्र अशा अनेक ठिकाणी अणुभट्टयांची जी कामे सुरु आहेत ती सर्व कामे थांबतील.

...नंतर श्री. भोगले....

अग्रिम प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ KGS/ MMP/ KTG/ 14:00

श्री.अजित पवार......... ता.प्र.क्र.12891.....

त्यामुळे एखादी घटना घडल्यानंतर तशी घटना आपल्या भागामध्ये घडू नये आणि घडली तर स्थानिक लोकांवर कोणत्याही परिस्थितीत तिचे संकट येता कामा नये याची खबरदारी आपण घेतली पाहिजे. या सगळ्या गोष्टींची खबरदारी केंद्र सरकार देखील घेत आहे. राज्य सरकारने देखील त्यामध्ये खूप बारकाईने लक्ष घातले आहे, हे मी सभागृहाच्या लक्षात आणून देऊ इच्छितो.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, माडबन आणि जैतापूर परिसरातील ज्या जमिनी आहेत त्या जमिनी कुळाकडून वर्षानुवर्षे कसल्या जात आहेत. आता जमिनीचा मोबदला मिळणार हे कळल्यानंतर जमीन मालक मुंबईहून त्या परिसरात गेले आहेत. माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, कसेल त्याची जमीन या नियमानुसार जी बेदखल कुळे आहेत त्यांना मोबदला दिला जाईल काय? ज्याप्रमाणे आदिवासींना स्वत:ची भूमी नाही त्याप्रमाणेच मच्छीमारांना स्वत:ची भूमी नाही. त्या भागातील मासेमारी व्यवसायामुळे राज्याला दरवर्षी 100 कोटी रुपयांचे परकीय चलन मिळते. या मच्छीमारांना कोणती मदत दिली जाणार आहे याचे देखील स्पष्टीकरण व्हावे.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.हुसेन दलवाई यांनी मच्छीमारांचा प्रश्न उपस्थित केला होता त्याचवेळी मी उत्तर दिले आहे. तरी देखील माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी प्रश्न उपस्थित केल्यामुळे पुन्हा सभागृहाला सांगू इच्छितो की, मच्छिमार असोत, भूमिहीन असोत, त्या भागातील एकाही प्रकल्पग्रस्त घराचे पुनर्वसन करावे लागत नाही. त्या गावाला दरवर्षी वेगवेगळ्या कामासाठी 25 लाख रुपयांची मदत मिळते. एकत्रितपणे 2 कोटी रुपयांची मदत देत आहोत. तरी देखील माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी मुद्दा उपस्थित केला आहे की, तेथे मूळ जमीन मालक वेगळे असून जमीन कसणारे वेगळे आहेत. संपूर्ण राज्यात प्रकल्पग्रस्तांबाबत तेथील जमीन संपादित करीत असताना जो निर्णय घेतला जातो त्याच पध्दतीचा निर्णय याही भागात घेतला जाईल. त्यामध्ये काही सहानुभूती दाखविण्याची वेळ आली तर त्यामध्ये बदल करण्याची भूमिका राज्य सरकारची राहील. कोणत्याही परिस्थितीत मूळ मालक किंवा कसणारे शेतकरी असोत त्यांना असे वाटता कामा नये की, माझा विचार राज्य सरकारने केलेला नाही. अशी भावना त्यांच्या मनामध्ये न येऊ देण्याची खबरदारी आम्ही घेऊ. त्याचबरोबर मच्छिमारांबाबत काही वेगळे पॅकेज देण्याची वेळ येत असेल आणि तशा प्रकारचा निर्णय घ्यावाच लागत असेल तर तोही निर्णय घेण्याकरिता राज्य सरकार मागेपुढे बघणार नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12891.....

श्री.संजय केळकर : या विषयावर चर्चा खूप झालेली आहे. हा देशातील सर्वात मोठा प्रकल्प आहे. 10 हजार मे.वॅट वीज निर्मिती या प्रकल्पातून होणार आहे. संपूर्ण कोकणात 200 कि.मी.परिसरात 14 वीज प्रकल्प प्रस्तावित आहेत. त्यामध्ये काही प्रकल्प कोळशावर आधारित आहेत. हे कोळशावर आधारित असलेले ऊर्जा प्रकल्प आपण रद्द करणार आहात का? जैतापूरमध्ये इतका मोठा प्रकल्प होत आहे. शासनाने आधी पुनर्वसन आणि मग प्रकल्प अशी भूमिका घेतलेली आहे. ही भूमिका जैतापूर प्रकल्पाबाबत राबविण्यात येईल काय, हे धोरण राबवित असताना त्या परिसरात दंडुकेशाही चालविणे योग्य आहे का? लोकांना नोटिसा दिल्या जात आहेत. धाकदपटशा दाखविला जात आहे. आधी पुनर्वसन आणि नंतर प्रकल्प हे धोरण अवलंबिण्यात येईल काय?

श्री.अजित पवार : राज्य सरकार देखील या मताशी सहमत आहे. राज्य सरकार देखील त्याच गोष्टीचा विचार करीत आहे. अलीकडे हायड्रो, थर्मल किंवा अणु ऊर्जा प्रकल्प येत असला तरी चर्चा अधिक केली जाते. विदर्भातील सन्माननीय सदस्य सांगतात की, विदर्भामध्ये इतक्या हजार कोटीचे प्रकल्प आले आहेत. कोकणातील विषय आला की, सांगितले जाते की, आमच्याकडे इतक्या हजार कोटीचे प्रकल्प येत आहेत. प्रत्यक्षात चर्चा खूप झाली तरी आपल्या राज्यात विजेची कमतरता आहे. कोणत्याही भागात प्रकल्प येत असताना राज्य सरकार गुंतवणूकदारांना आग्रह करीत नाही की, अमुक ठिकाणीच प्रकल्प राबवावा. जैतापूरबाबत कन्याकुमारीपासून काश्मीरपर्यंत सर्व्हे झाला.

नंतर श्री.भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.12891...

श्री.अजित पवार...

सर्व्हे झाल्यानंतर एनटीपीसीने ती जागा सिलेक्ट केली. त्यानंतर पुढील गोष्टी झाल्या. फक्त आपल्याकडेच नाही तर तामीळनाडू, गुजरात, आंध्रप्रदेश, हरियाणा, मध्यप्रदेश राज्यांच्या भागामध्ये देखील एनपीसीआयएलकडून येणारे नवीन प्रकल्प येत आहेत. तामीळनाडू, गुजरात, राजस्थान, हरियाणा या चार राज्यात बांधकामाधिन प्रकल्प आहेत. आम्ही फक्त एवढेच बघू की, गुंतवणूकदार गुंतवणूक करणार आहेत, अशावेळी स्थानिकांना वाऱ्यावर सोडले जाणार नाही. स्थानिकांना योग्य प्रकारचा मोबदला दिला जाईल. प्रकल्प खूप येतात म्हणून ते थांबविले गेले पाहिजेत अशी भूमिका राज्य सरकारची नाही. विदर्भामध्ये विशेषत: अमरावती जिल्हयात अशा प्रकारची भूमिका राज्य शासनाने स्वीकारलेली आहे. त्याचे कारण असे की, त्या जिल्हयात पाण्याची अडचण आहे. ज्यावेळी कोकणामध्ये प्रकल्प येतात त्यावेळी समुद्राचे पाणी त्या प्रकल्पांसाठी वापरले जाते. कोकणातील प्रकल्पांसाठी शेतीचे पाणी वापरले जात नाही. राज्याच्या लॉंगटर्मचा विचार करुन प्रकल्प राबविण्याचा निर्णय शासनातर्फे घेतला जातो. डॉ.अनिल काकोडकर साहेबांनी परवाच्या भाषणात प्रेझेंटेशनद्वारे दाखविले की, दरवर्षी देशपातळीवर विजेची मागणी किती वाढत जाणार आहे? संपूर्ण जगात अमेरिका प्रत्येक माणसामागे किती वीज वापरते, भारतात प्रत्येक माणसामागे किती वीज वापरली जाते याबाबतचे सगळे आकडे आपण सर्वांनी बघितले. ती आकडेवारी पाहिली असता महाराष्ट्र राज्य याबाबतीत खूप मागे आहे. विजेच्या बाबतीत राज्य स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीने आपल्या मनात ज्या शंका कुशंका असतील त्यांचे निरसन झाले पाहिजे. कुठे तरी टोकाची भूमिका घेऊन आता आमच्याकडे प्रकल्प बाद झाले असे न म्हणता जेथे शक्य असेल, जेथे इन्फ्रास्ट्रक्चर देण्यासारखी परिस्थिती असेल अशा ठिकाणी प्रकल्प आणण्यासाठी सगळयांनी प्रयत्न केले पाहिजेत. त्याशिवाय आपल्याकडे उद्योगधंदे वाढणार नाहीत. आपल्याला तरुणांच्या हाताला काम देता येणार नाही ही बाब देखील सभागृहाने लक्षात घेतली पाहिजे.

श्री. परशुराम उपरकर : महोदय, जपान येथे भूकंपाची घटना घडल्यानंतर केंद्रीय पर्यावरण मंत्री श्री.जयराम रमेश यांनी सदर जागा ही भूकंप प्रवण क्षेत्र 3 मध्ये असल्यामुळे जैतापूर प्रकल्पाबाबत फेरसर्वेक्षण करावे लागेल अशा प्रकारचे त्यांनी वक्तव्य केले हे खरे आहे काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2..

ता.प्र.क्र.12891... श्री.परशुराम उपरकर...

केंद्रीय पर्यावरण विभागाने माधवराव गाडगीळ समिती नेमली होती. त्या समितीने आपला अहवाल केंद्रास सादर केलेला आहे, त्या अहवालाचा विचार केला जाणार आहे काय ?

श्री. अजित पवार : महोदय, केंद्रीय पर्यावरण मंत्री श्री. जयराम रमेश यांचे वक्तव्य सर्व सन्माननीय सदस्यांनी वाचले आहे. भारतात भूकंप प्रवण क्षेत्राचे 1,2,3,4,5,6,7 व 8 असे प्रकार असतात. भूकंप प्रवण क्षेत्र 1 ते 5 मध्ये मोडते. जैतापूर प्रकल्पातील क्षेत्र हे 3 मध्ये मोडते. जपानमध्ये 8.09 रिस्टर स्केलचा भूकंप झाला होता. जपान मधील भूकंप प्रवण क्षेत्र हे 1 ते 9 मध्ये मोडते. केंद्रीय पर्यावरण मंत्री श्री.जयराम रमेश साहेबांनी जे काही सांगितले आहे त्याबाबतीत सर्व गोष्टी पाहिल्या जाणार आहेत. या बाबतीत माननीय पंतप्रधान स्वत: लक्ष घालीत आहेत. सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांना सांगू इच्छितो की, तुमच्या सर्वोच्च नेत्यांनी यामध्ये लक्ष घातलेले आहे. त्यामुळे आपण देखील लक्ष घातले असले तरी त्यास जास्त महत्व नाही. माननीय श्री.उध्दवजी हे उध्दवजीच आहेत. याबाबतीत डॉ.मनमोहन सिंह यांनी लक्ष घातलेले आहे, त्यामुळे त्यात माननीय केंद्रीय पर्यावरण मंत्री श्री.जयराम रमेश यांनी लक्ष घातले काय आणि मी लक्ष घातले काय, यास काही महत्व नाही.

श्री.दिवाकर रावते : साधारणत: प्रश्नोत्तराच्या तासाचा अवधी एक तासाचा असतो. परंतु प्रश्नोत्तराचा तास सुरु होऊन जवळपास दीड तास झाला आहे. प्रश्नोत्तराचा तास किती वेळ चालवावयाचा हा अधिकार सर्वस्वी आपला आहे. प्रश्नोत्तराचा तास दोन तास चालला तरी त्यास माझी काही हरकत नाही.

**सभापती** : माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांची जो मुद्दा उपस्थित केला तो अगदी रास्त आहे. प्रत्येक वेळेला प्रश्नोत्तराच्या तासाची वेळ संपल्यानंतर "प्रश्नोत्तराचा तास संपला" असे मी जाहीर करतो. परंतु हा अतिशय महत्वाचा प्रश्न चर्चेला आलेला असल्यामुळे मी त्यास अधिक वेळ देत आहे.

श्री.दिवाकर रावते : हा महत्वाचा प्रश्न असल्यामुळे या विषयासंदर्भात वेगळी चर्चा घेता येईल.

**सभापती** : ठीक आहे.

यानंतर श्री. खर्चे.....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, प्रश्नोत्तराच्या तासाची वेळ आज जास्त वाढविलेली आहे. मला वाटते या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी एखादी स्वतंत्र चर्चा ठेवावी.

श्री. भाई जगताप : महोदय, अतिशय महत्वाच्या व संवेदनशील विषयावर आपण सभागृहात प्रश्नोत्तराच्या तासाची वेळ वाढविली त्याबद्दल प्रथम आपले आभार मानतो. हा प्रश्न फक्त एखाद्या गोष्टी पुरताच मर्यादित नाही तर संपूर्ण देश तसेच राज्याशी संबंधित आहे. या जैतापूर अणु ऊर्जा प्रकल्पाच्या संदर्भात लोकांमध्ये जो संभ्रम आहे त्यात समज असण्यापेक्षा गैरसमजच जास्त आहे. यामध्ये केवळ मोबदला देण्याचाच प्रश्न नाही तर जनतेच्या सुरक्षिततेचाही प्रश्न आहे. ही सुरक्षितता लक्षात घेऊन या भागातील गावकऱ्यांचे म्हणणे आहे की, या प्रकल्पावर काम करणारे अधिकारी व शास्त्रज्ञ यांच्यासाठी 25 कि.मी. अंतरावर घरे बांधली जाणार आहेत. एवढ्या लांब अंतरावर अधिकाऱ्यांची व शास्त्रज्ञांची घरे बांधण्याचे कारण काय, असा प्रश्न जनतेच्या मनात निर्माण होत आहे. जर यामध्ये वेगळे कारण असेल तर तेथे प्रकल्पाजवळ राहणाऱ्या गावकऱ्यांच्या बाबतीत काय विचार केला आहे, कारण या परिस्थितीत गावकऱ्यांना प्रकल्पापासून धोका नाही असे कसे सांगणार आहात ?

श्री. अजित पवार : प्रकल्पावर काम करणाऱ्या अधिकारी व शास्त्रज्ञांची घरे कोठे व किती अंतरावर बांधावीत ही बाब संपूर्णत: त्या विभागाच्याच अखत्यारीत येते. तरी देखील या निमित्ताने वेगवेगळे प्रश्न व शंका निर्माण होत आहेत असे सांगून त्या अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली जाईल. तसेच तारापूर येथील प्रकल्पाच्या बाबतीत कोणती धोरण घेतले याचीही तपासणी करण्यात येईल. मधल्या काळात माननीय मुख्यमंत्री व मी सुध्दा माननीय पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन झाले तेव्हा तारापूरला गेलो होतो तेव्हा तेथे तयार केलेली ग्रीनरी पाहण्यात आली. याबाबतीत वेगवेगळ्या प्रकारचे संशोधन झालेले आहे त्यामुळे अशी कोणतीही बाब राहिली नाही की या प्रकल्पापासून असुरक्षितता आहे. पण जपानमध्ये नुकतीच घटना घडल्यानंतर प्रत्येकाच्या मनात शंकेची पाल चुकचुकली. म्हणून सन्माननीय सदस्यांनी सुरक्षिततेच्या बाबतीत जो प्रश्न उपस्थित केला त्या अनुषंगाने नक्कीच विचार केला जाईल. कारण बऱ्याच वेळेला असे असते की, एखाद्या प्रकल्पाचा प्लांट एका बाजूला आणि अधिकाऱ्यांचे राहण्याचे ठिकाण खूप अंतरावर असते. आपल्या देशात तामिळनाडू, गुजरात, आंध्र प्रदेश, पश्चिम बंगाल, हरियाणा व मध्य प्रदेश या राज्यांमध्ये

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ........

एमपीसीआय कडून जे प्रकल्प चालू आहेत तेथे काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची निवासस्थाने किती अंतरावर आहेत, तसेच तारापूर येथे काय परिस्थिती आहे ही बाब सुध्दा तपासली जाईल. पण ज्या ज्या वेळी असा प्रश्न निर्माण होतो तेव्हा स्थानिक लोकांमध्ये कुठे तरी अशा प्रकारची चर्चा किंवा भीतीचे वातावरण असते व त्यांच्या वतीनेच सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. त्यासाठी एक खबरदारी म्हणून या सर्व शंकांचे निरसन करण्यात येईल. तसेच या मागील कारणे सध्या माझ्याकडे नाहीत, ती माहिती मिळाल्यानंतर सभागृहात देण्यात येईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

माननीय विरोधी पक्षनेते आणि सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे तो देखील तेवढाच महत्वाचा आहे. काही वेळा या सभागृहात एखादा प्रश्न महत्वाचा असेल तर आपण त्यासाठी पाच-दहा मिनिटांची वेळ वाढवून देतो. आज या प्रश्नाच्या अनुषंगाने देखील तसेच झालेले आहे. या प्रश्नाच्या चर्चेसाठी थोडा अधिक वेळ देण्याचे कारण असे आहे की, मी आज दुपारी 1.45 वाजता येथे येणे आवश्यक होते पण त्याऐवजी मी दुपारी 1.50 वाजल्यानंतर आसनावर आलो, म्हणजेच मलाही थोडा उशीरच झाला होता. सभागृहात हा महत्वाचा विषय चर्चिला जात असल्यामुळे मी असा विचार केला की, या प्रश्नासाठी थोडा अधिक वेळ द्यावा. यामुळे थोडा जास्तच वेळ झालेला आहे. तरी देखील माननीय विरोधी पक्षनेते व सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जी सूचना केली त्या सूचनेची योग्य ती नोंद घेतली जाईल.

---------

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: लेखी उत्तरे

**मु.शी.**: अतारांकित प्रश्नोत्तराची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी, आठवी, नववी व दहावी यादी सभागृहासमोर ठेवणे.

**सह सचिव** : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतांराकित प्रश्नोत्तराची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी, आठवी, नववी व दहावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

**सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तराची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी, आठवी, नववी व दहावी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

( प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

--

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** :आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.45 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 2.16 ते 2.45 मध्यंतर)

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( मध्यंतरा नंतर )

**सभापतीस्थानी माननीय उप सभापती**

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येणार आहेत काय ?

**उप सभापती** : आज औचित्याचे मुद्दे घेण्यात येणार नाहीत हे मुद्दे सोमवारी घेण्यात येतील. सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांचा अत्यंत महत्वाचा औचित्याचा मुद्दा असल्यामुळे तो मांडण्यास अनुमती देण्यात यावी अशी त्यांनी मला भेटून विनंती केली असल्यामुळे व तो विषय तितकाच महत्वाचा असल्यामुळे मी त्यांना परवानगी देत आहे.

**पृ.शी.मु.शी**. औचित्याचा मुद्दा

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रामध्ये आज गंभीर घटना घडली आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या महापौर श्रीमती वैजयंती घोलप, विविध पक्षाचे गट नेते , नगरसेवक व त्यांचे सहकारी असे जवळजवळ 35 जण त्या भागातील पाण्याच्या प्रश्नाच्या संदर्भात एमआयडीसीच्या अधिका-याबरोबर चर्चा करण्याकरिता गेले होते.एमआयडीसीचे अधिकारी श्री. पणिकर यांच्याकडे या लोकप्रतिनिधींनी अशी मागणी केली की, या भागात 48 एमएलडी पाणी मिळावयास पाहिजे परंतु त्या ऐवजी फक्त 38 एमएलडी पाणी दिले जाते त्यामुळे आम्हाला 48 एमएलडी पाणी देण्यात यावे. अन्यथा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या क्षेत्रात पाण्याची अधिक टंचाई निर्माण होईल. या सर्व लोकप्रतिनिधींबरोबर व महापौरांबरोबर श्री पणिकर यांनी अतिशय उध्दट वर्तन केले. त्यानंतर ठिकाणी गदारोळ झाला . त्याठिकाणी पोलीस , पोलीस इन्सपेक्टर एसीपी उपस्थित होते या सर्वांनी लाठीमार सुरु केला. त्या ठिकाणी महिला पोलीस उपस्थित नव्हत्या .महापौरांवर लाठीमार करण्यात आल्यामुळे त्यांना चार टाके पडले आहेत व त्या हॉस्पिटलमध्ये ॲडमिट आहेत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर ...

त्यांच्याबरोबर इतरही अनेक जणांवर लाठीमार करण्यात आला होता. राज्याच्या दृष्टीने ही अतिशय गंभीर घटना आहे.लोकप्रतिनिधीवर पोलिसांकडून हल्ले केले जात आहेत व त्यांना मारहाण केली जात आहे.या ठिकाणी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या प्रथम नागरिक या महिला महापौर असून त्यांच्यावर लाठीमार करण्यात आला आहे व त्यांना चार टाके पडले आहेत.या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो की त्या ठिकाणी महिला पोलीस नसतांना देखील महिलांवर लाठीमार केला होता यास जे कोणी जबाबदार असतील त्याच्याविरुध्द ताबडतोब कारवाई केली पाहिजे आणि आजच्या आज शासनाने निवेदन केले पाहिजे .

डॉ.दीपक सावंत :सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी जो औचित्याचा मुद्दा मांडला उपस्थित केला आहे त्याला समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.सन्माननीय सदस्य श्री. हर्षवर्धन जाधव यांच्यावर पोलिसांनी लाठीमार केला व त्यांना गुरासारखे झोडपून काढले होते त्यानंतर मारहाण करण्याची ही मालिकाच सुरु झालेली आहे. लोकप्रतिनिधींचा कोणताही आदर न करता किंवा त्याच्या विषयी कोठलीही भावना लक्षात न घेता त्यांच्याबरोबर जे उध्दट वर्तन केले जात आहे ते खरोखर निषेधार्ह आहे. त्यामुळे असे वर्तन करणा-या विरुध्द कारवाई करुन किंवा निवेदन करुन हे प्रकरण थांबणार नाही तसेच हा प्रश्नही सुटणार नाही या निमित्ताने माझी अशी इच्छा आहे की या विषयी राज्य शासनाने मग ते माननीय मुख्यमंत्री असो वा उप मुख्यमंत्री असो वा गृह मंत्री असो त्यांनी या विषयाची गंभीर दखल घेऊन संबंधिताविरुध्द कारवाई करावयास पाहिजे त्याचबरोबर नगरसेवक, आमदार वा लोकप्रतिनिधी यांच्या बाबतीत पोलिसांकडून आचारसंहिता नेहमीच अव्हेरली जाते ती आचारसंहिता काटेकोरपणे पाळली गेली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री हर्षवर्धन जाधव यांना मारहाण केली तेव्हा पासूनच मारहाण करण्याची ही परंपरा सुरु झालेली आहे.

नंतर श्री.सरफरे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

तुमचे पोलीस कोणताही मुलाहिजा ठेवायला तयार नाहीत. त्यामुळे या सभागृहामध्ये लोकांचे प्रश्न मांडण्यासाठी येणारे आम्ही लोकप्रतिनिधी जर सुरक्षित नसतील तर लोकांचे प्रश्न मांडणार कसे? कल्याण महानगरपालिकेतील लोकप्रतिनिधी त्या ठिकाणी चांगल्या गोष्टीसाठी गेले होते, पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नासाठी गेले होते. त्यांनी त्याठिकाणी कोणतेही आंदोलन केले नव्हते, दगडफेक केली नव्हती. ज्यामुळे अश्रूधूर सोडावा लागेल असे कोणतेही गैरवर्तन त्यांनी केले नव्हते. फक्त त्याठिकाणी गदारोळ झाल्यानंतर पोलिसांनी त्यांच्यावर लाठीमार केला याचा मी निषेध करतो. म्हणून याबाबत राज्य शासनाने त्वरित कारवाई केली पाहिजे. हे सभागृह संपण्यापूर्वी केलेल्या कारवाईबाबत निवेदन केले पाहिजे अशी मी राज्य शासनाला विनंती करतो.

श्री. हसन मुश्रीफ (कामगार आणि विशेष सहाय्य मंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी कल्याण येथे घडलेल्या घटनेबाबत औचित्याच्या मुद्दयाव्दारे विषय उपस्थित केलेला आहे. त्या बाबत माननीय गृहमंत्र्यांना आज संध्याकाळपर्यंत निवेदन करण्यास सांगितले जाईल.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

**मु.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

(प्रस्ताव पुन: प्रस्तुत झाला)

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा किती वाजेपर्यंत चालणार आहे हे आम्हाला अगोदर समजले पाहिजे व त्याप्रमाणे आम्हा सदस्यांना बोलण्यासाठी वेळ मिळाला पाहिजे.

**उप सभापती** : ही चर्चा संध्याकाळी साडे चार वाजेपर्यंत संपवावयाची आहे. आता माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी चर्चेला सुरुवात करावी.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर किती खंत व्यक्त करावी, ती करीत असतांना कौतुक करणाऱ्यांना काय वाटेल? एवढया चिंताजनक बाबी या अभिभाषणामध्ये असल्यामुळे त्या सर्वच बाबींवर मी बोलणार आहे अशातला भाग नाही. मी फक्त यामधील दोनच बाबींवर बोलणार आहे. माननीय राज्यपालांच्या चिंताजनक असलेल्या या भाषणाची झलक आम्हाला सुरुवातीला ऐकावयास मिळाली. मुळात हे सरकार काम करीत नसतांनाही माननीय राज्यपालांच्या माध्यमातून या राज्यापुढे कसे धोरण मांडले जात आहे हा मला सुरुवातीला प्रश्न पडला आहे. माननीय मुख्यमंत्री ज्यावेळी बीड जिल्ह्यात गेले होते त्यावेळी ते कॉंग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या संपूर्ण समुदायामध्ये होते. त्यांच्याकडे तक्रारी आल्यानंतर त्यांनी केलेले जाहीर वक्तव्य मी याठिकाणी सांगणार आहे. याठिकाणी मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चिंता व्यक्त करीत असतांना तुम्ही कौतुक कां करीत आहात याचे उत्तर माननीय मुख्यमंत्र्यांनी दिले आहे.

माननीय मुख्यमंत्री 16 फेब्रुवारी रोजी बीड येथे गेले होते त्यावेळी ते असे म्हणाले की, राष्ट्रवादी कॉंग्रेसमुळे आमच्या सरकारचा विकास रखडला आहे. ते असे अधिकृतपणे जाहीररित्या बोलले त्यावेळी त्यांच्या शेजारी त्यांच्याच पक्षाचे जिल्हाध्यक्ष होते. केवळ गरज म्हणून कॉंग्रेस पक्षाने या राज्यामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस बरोबर आघाडी केली आहे.परंतु आघाडीचा धर्म पाळतांना राष्ट्रवादी कॉंग्रेस कुचराई करीत आहे. त्यामुळे विकासाचे अनेक प्रश्न रखडले आहेत. अशा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KTG/ KGS/

श्री. दिवाकर रावते...

शब्दामध्ये ते राष्ट्रवादी कॉंग्रेसवर बरसले. त्यानंतर माननीय उप मुख्यमंत्र्यांनी एक निवेदन केले ते मी वाचून दाखवितो. माननीय मुख्यमंत्र्यांना पदावर येऊन अनेक दिवस झाले आता किती दिवस वाट पहावयाची, आमच्या नस्त्या त्यांच्याकडे इतके महिने पडून आहेत, त्यावर सह्या होत नाहीत. अशा प्रकारची तक्रार त्यांनी जाहीररित्या केली आहे. ही खडाजंगी बाबा आणि दादा यांच्यामध्ये सुरु आहे त्यामुळे हे चांगल्या राज्याचे लक्षण आहे असे म्हणण्याचा प्रश्न येत नाही.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . ..

सभापती महोदय, सध्या जे काही चालले आहे, ते पुढे येत असताना या सरकारची स्थिती चिंताजनक आहे असे म्हणावे लागेल. त्यामुळे याठिकाणी जे धोरण मांडलेले आहे, ते केवळ मांडावयाचे म्हणून मांडलेले आहे. यावेळेस माननीय राज्यपालांचे अभिभाषण सुध्दा कमी पानांचे आहे. पण याठिकाणी काल जे कौतुकाचे भाषण झाले, तेव्हा मला नवल वाटले. सध्या एक नवीन पुस्तक गेल्या महिन्यामध्ये प्रसिध्द झाले आहे आणि ते बाजारामध्ये आले आहे. ते मी वाचत आहे. मला ते पुस्तक सर्व सन्माननीय सदस्यांना देखील द्यावेसे वाटत आहे. या पुस्तकाचे नाव "छत्रपतींचे आरमार" असे आहे. त्यामध्ये छत्रपर्तीनी आपले आरमार समर्थपणे कसे उभे केले आणि दृष्टा राजा कसा होता हा एकच विषय त्यामध्ये आहे. जोपर्यंत सागरी किनारा भक्कम होत नाही, तोपर्यंत स्वराज्याचे रक्षण होणार नाही. छत्रपती शिवाजी महाराज यांना आरमाराचे महत्व कळले होते आणि येथे सागरी किनाराही आहे. परंतु काल सदनामध्ये एक सन्माननीय सदस्य श्री.विनायकराव मेटे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या माध्यमातून सरकारचे कौतुक करीत होते. त्यामुळेच ते आग्रह धरतात की, शिवाजी महाराज अरबी समुद्रामध्ये कधी उभे राहून आमचे रक्षण करतात, त्यांचा पुतळा कधी उभा करण्यात येणार आहे आणि ते आमचे रक्षण कधी करणार आहेत या बाबत त्यांना चिंता आहे. सागरी मार्गाने आक्रमण होईल अशी कोणी अपेक्षा केली नव्हती असे त्यांनी भाष्य केले आहे. मग आम्ही सागरी मार्गाबाबत केलेल्या ज्या सूचना आहेत त्या बाबत सरकारचे कौतुक केले. असे हे निर्बुध्द सरकार आहे की, ज्याला आपल्यावर कुठून हल्ला होणार आहे काही कळतच नाही. ही तुमची कौतुकाची वाक्ये आहेत.अशा प्रकारे सरकार आणि अधिकारी निर्बुध्दपणे वागणार असतील तर ते महापौरानांच मारणार,ते आमदारानांच मारणार. कारण त्यांच्याकडे दुसरे काय काम आहे? पण येथे कौतुक करण्यात आले.मला आणखी एका गोष्टीचे कौतुक वाटले की, या बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी जातपडताळणीच्या बाबतीत कसा भ्रष्टाचार होतो हे जाहीररित्या मांडले. तुम्हाला त्यावर अंकुश निर्माण करता येत नाही ? आता त्याचे संगणकीकरण होणार आहे म्हणून त्याबाबत वाहवा केली, म्हणजेच जातपडताळणीच्या बाबतीत जो भ्रष्टाचार होत आहे, त्यावर सरकारला अंकुशही ठेवता आला नाही काय ? निरंकुश म्हणजे ज्यांना अंकुश निर्माण करता येत नाही असे हे निर्बुध्द सरकार आहे, अशा प्रकारे तेथून वक्तव्य झाले, आमच्याकडून झालेले नाही. आम्ही एखादे वाक्य सहज बोलल्यानंतर कोणीतरी उसळून बोलले. मला असे वाटते की, बहुतेक सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप बोलले असावेत. पण मला नक्की

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . ..

नाव आठवत नाही. पण ते असे म्हणाले की, उत्तर प्रदेशातील 6 पतंप्रधान झाले, अमुक झाले, तमुक झाले. त्यावर मी म्हटले की, बघा, ज्या भागातील पंतप्रधान होतो त्या भागाचा विकास होत नाही. त्यामुळे बरे झाले की, महाराष्ट्रातून कोणी झाले नाही. तर त्यावर संबंधितांनी कै.यशवंतराव चव्हाण यांचे नाव घेतले. मला आनंद झाला. पण कै.यशवंतराव चव्हाण यांना किती वर्षे पायरीवर बसविले ? त्यांचा अपमान वगैरे. पण कै.यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिमत्व हे पक्षाच्या पलीकडे गेलेले असल्यामुळे ते महाराष्ट्राला झोंबले होते. केंद्रातील मंत्री महोदयांनी किंवा काँग्रेसजनांनी दादा, हा व्यथेचा विषय आहे. बाकी सोडून द्या. केंद्राच्या योजना येत असतील.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याला मिळालेली रोजगार हमी योजना ही कै.वि.स.पागे यांची स्वयंकृत योजना होती. आपण त्याबाबत कौतुक करतो की, महाराष्ट्र राज्य हे एकमेव असे आहे. मला आमदार झाल्यानंतर नेहमी प्रश्न पडत असे की, राष्ट्रीय रोजगार हमी योजना दोन वर्षापूर्वी अस्तित्वात आली. पण आमची रोजगार हमी योजना समिती इतर राज्यांमध्ये पहाणी करीत असे. पण तेथे ही योजनाच नव्हती, मग ही समिती कसले दौरे करावयाची हे मला समजले नाही. इतर समित्या दौरे करतात तेव्हा तेथे त्या योजना राबविलेल्या असतात. परंतु ज्या राज्यामध्ये कुठेही रोजगार हमी योजना राबविली जात नाही तेथे रोजगार हमी योजना समितीचे पहाणी दौरे का व्हावयाचे ? हे मला कळले नाही आणि त्याचे उत्तरही मिळाले नाही. पण माझा मुद्दा वेगळा आहे. ज्यावेळेला केंद्र शासनाने जी रोजगार हमी योजना आणली, तेव्हा महात्मा गांधी योजना असे नाव दिले. कोणतीही नवीन योजना आल्यावर राजीव गांधी, अमुक गांधी, तमुक गांधी. मग अशा वेळी कै.यशवंतराव चव्हाण किंवा कै.वि.स.पागे यांचे नाव का दिले नाही, त्यादृष्टीने सरकारने आग्रह का धरला नाही, महाराष्ट्राला सन्मानित करता येत नाही काय ? या देशामध्ये गांधी शिवाय दुसरे कोणी श्रेष्ठच नाही. त्यामुळे जे काही नव्याने निर्माण होईल ते गांधीच्याच नावाने निघाले पाहिजे मग ते कोणीही असतील. कै.इंदिरा गांधी असतील किंवा आणखी कोणी असतील. त्यांच्या कर्तृत्वाबद्दल, महात्म्याबद्दल माझी तक्रार नाही. परंतु देशामध्ये त्यांच्याशिवाय इतर कोणी कर्तृत्ववान नाहीच का ?

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ KTG/ प्रथम सौ. रणदिवे.... 15:00

श्री. दिवाकर रावते...

मला या ठिकाणी फक्त एक 'कामराज' योजना आठवते. ही योजना आल्यानंतर सर्वांमध्ये घबराहट निर्माण झाली होती. सर्वांना घाम फुटले होते. या 'कामराज' योजनेमुळे अनेक लोकांना घरी जावे लागले होते. ही केंद्र शासनाची योजना होती. ही योजना आली तेव्हा मी लहान होतो. म्हणून स्वाभिमान सांगत असताना आपल्या लोकांना कसे अवमानीत व्हावे लागते याचाही विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाच्या वेळी मी त्यांना हात जोडून मराठीत बोलावे आणि त्यानंतर आपले अभिभाषण करावे अशी विनंती केली होती. माननीय राज्यपाल मराठीत बोलू शकत नाहीत, हे मला अभिप्रेत आहे. माननीय राज्यपाल श्री.पी. सी. अलेक्झांडर ज्यावेळी अभिभाषणाला सुरुवात करावयाचे त्यावेळी ते पहिले वाक्य मराठीत बोलत असत आणि त्यांनतर पुढचे भाषण इंग्रजी भाषेतून करीत असत, मग भलेही ते पहिले वाक्य मराठी, इंग्रजीतून लिहून आणीत असतील. पण पहिले वाक्य मराठीत बोलत असत. सन्मानीय श्रीमती सोनिया गांधी या आपले भाषण कुठल्या भाषेत लिहून आणत असतील हे त्यांचे त्यांनाच माहीत . त्यांचे भाषण हिंदी भाषेत किंवा इटालियन भाषेत लिहिलेले असेल पण संपूर्ण देशाला संबोधित करीत असताना त्या हिंदी भाषेत भाषण करतात. मी त्यांना अजून कधी इंग्रजी भाषेत बोलताना ऐकलेले नाही. त्यांना कायम हिंदी भाषेतूनच बोलताना ऐकलेले आहे. कॉंग्रेस पक्षाचे सर्वोच्च नेतृत्व ज्यावेळी लोकांच्या भाषेच्या भावना ओळखते त्यावेळी महाराष्ट्राच्या प्रथम नागरिकाने ते लक्षात घेतले पाहिजे. शिवतीर्थावर 26 जानेवारीचा कार्यक्रम झाला त्यावेळी देखील मी याबाबतची माझी प्रतिक्रिया व्यक्त केली होती. त्यावेळी त्यांनी चुकून मुंबईचा उच्चार बॉम्बे असा केला होता. पण ज्यावेळी मी संध्याकाळी त्यांच्याकडे चहापानाला गेलो त्यावेळी त्यांच्या एडीसीने माझ्याकडे येऊन खुलासा केला की, प्रोनाऊन्सेशनमध्ये चुकून असे झाले आहे. मानननीय राज्यपालांनी किमान आपल्या अभिभाषणाच्या सुरुवातीला "सन्मानननीय सदस्यांचे मी स्वागत करतो" हे जे पहिले वाक्य आहे ते मराठीत बोलावे एवढीच आमची अपेक्षा होती. त्यामुळे माननीय राज्यपालांना मराठी भाषेत बोलण्याची विनंती केल्यानंतर मी खाली बसलो. माझ्या राज्य भाषेचा आपण अवमान करीत आहात पण आपण महामहिम राज्यपाल असल्यामुळे मी तुमचा निषेध करु शकत नसल्यामुळे मी खंत व्यक्त करुन खाली बसलो. त्यावेळी सत्ताधारी पक्षातील काही सन्मानननीय सदस्य हसत होते, आमच्याकडे कुत्सिततेने बघत होते.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे ( खाली बसून ) : त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम उभे होते.

श्री. दिवाकर रावते : श्री. रामदास कदम यांच्या पायाचा प्रॉब्लेम होता त्यामुळे ते त्याठिकाणी बसू शकले नाहीत. आजही ते ट्रीटमेंट घेण्या करिताच गेले आहेत. त्यांना बसता येत नव्हते म्हणून ते उभे रहिले पण त्यांनी आमच्या बरोबर निषेध नोंदविलेला आहे.

सभापती महोदय, चार दिवसांपूर्वी मी रुग्णालयातून आलो, औषधे घेतो त्यामुळे त्या औषधांची ग्लानी होती त्यामुळे आम्ही झोपलो आहेत असे टी.व्ही. चॅनेल्सनी दाखविले. आपल्या आदरणीय सभापतींची तब्बेत आपल्याला माहीत आहे, याही परिस्थितीत ते काम करीत आहेत. मुख्यमंत्री दिवसाचे 20 ते 22 तास काम करतात त्यामुळे बसल्यानंतर त्यांना डुलकी लागली असेल. ठीक आहे, टी.व्ही. चॅनेल्सवर काय दाखवावे आणि काय दाखवू नये हा त्यांचा अधिकार आहे, मी त्याबद्दल बोलणार नाही.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी "शासनाने महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षात, वेगवेगळया प्रशासकीय विभागात कार्यरत असलेल्या मराठी भाषेशी" असे वाचल्याबरोबर टाळया वाजविण्यात आल्या, आम्ही खाली बसलो होतो म्हणून आपल्याला इतका आंनद झाला होता काय? त्या टाळया व्यर्थ होत्या की, योग्य होत्या हे आपल्याला माननीय राज्यपालांच्या त्यापुढील वाक्यावरुन लक्षात येईल. माननीय राज्यपालांनी पुढे असे म्हटले की, "निगडीत संस्था एकाच छत्राखाली आणून, मराठी भाषेचे जतन, संवर्धन व विकास यासाठी स्वतंत्र "मराठी भाषा विभाग" स्थापन केला आहे. तसेच विविध योजनांची रुपरेषा ठरविण्याबाबत विभागास तज्ज्ञ सल्ला देण्यासाठी "भाषा सल्लागार समिती" स्थापन करण्यात आली आहे. सभापती महोदय, माननीय राज्यपालांना असत्य बोलावयाला लावून शासनाने काय मिळविले. त्यांच्या मुखातून हे जे वदविण्यात आलेले आहे तसे घडलेले नाही. माननीय राज्यपालांना दिलेली माहिती अर्धवट आहे. ही माहिती मराठी भाषेच्या बाबतीत असत्य आहे. मुळात मराठी भाषेशी निगडीत सर्व यंत्रणा एका प्रशासकीय विभागाखाली अजूनही आणल्या गेल्या नाहीत.

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या नंतर श्री. बरवड....

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या सभागृहाचे ज्येष्ठ नेते सन्माननीय सदस्य श्री. दिवाकरजी रावते हे अत्यंत पोटतिडिकीने माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलण्यासाठी उभे असताना त्यांच्या पक्षाचा एकही सदस्य त्यांच्या पाठीमागे उपस्थित नाही. त्यांच्या सदस्यांचा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बहिष्कार आहे की, त्यांच्या भाषणावर आहे, हे सभागृहाला समजले पाहिजे.

श्री. दिवाकर रावते : आपण या ठिकाणी असताना काय करीत होता याची आठवण केली तर आपल्या लक्षात येईल. सभापती महोदय, मला खेद एवढाच वाटतो की, माननीय राज्यपालांना सरकारने असत्य बोलावयास लावण्याचा चुकीचा पायंडा आपण पाडत आहात. माननीय राज्यपाल भाषण करीत असताना नेहमी 'माय गव्हर्नमेंट, माझे सरकार, माझे सरकार' असे वाक्य बोलत असतात. या वेळी मी अधिकृतरित्या बोलत आहे. त्याबाबत खुलासा करावा. आजही अशा संस्था एकाच छत्राखाली आणलेल्या नाहीत. माननीय राज्यपाल महोदय परिच्छेद क्रमांक 65 मध्ये असे म्हणत आहेत की, हे एका छत्राखाली आणले आहे. अशा निगडित सर्व यंत्रणा एका प्रशासकीय विभागाखाली अजूनही आणलेल्या नाहीत. उदाहरण द्यावयाचे झाले तर ग्रंथालय संचालनालय हे अजूनही उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे आहे. ते अजूनही "मराठी भाषा विभाग या विभागाकडे आलेले नाही. विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ अस्तित्वात आहे की नाही, याचा पत्ता नाही. तो विषय सकाळी झाला होता. ते मंडळ अजूनही वेगळेच आहे. ते या विभागाकडे आलेले नाही. त्यामुळे माननीय राज्यपालांनी अशा प्रकारे निवेदन करावे त्याबद्दल मी खेद व्यक्त करतो. मराठीचा विषय एवढा लावून धरल्यानंतरही अशी परिस्थिती आहे हे माझे दु:ख आहे. या विधान परिषदेमध्ये 21 मार्च,1984, 30 मार्च, 1984, 26 मार्च, 1985, 7 एप्रिल, 1995, 7 डिसेंबर, 2001, 12 डिसेंबर, 2001, 4 एप्रिल, 2007, 24 एप्रिल, 2008, 29 मार्च, 2010 आणि 22 जुलै, 2010 या दिवशी या मराठीच्या विषयावर चर्चा झाली. मराठी राज्यभाषेचा सन्मान ठेवा, मराठी भाषा वापरात आणा, अशा प्रकारची चर्चा अनेक माध्यमातून या सदनामध्ये झाली.

सभापती महोदय, आपल्याला आठवत असेल की, 29 मार्च, 2010 ला मी त्रिभाषा सूत्र अंमलात आणले पाहिजे या संदर्भात जो ठराव आणला होता तो मताला टाकण्याची परिस्थिती

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. दिवाकर रावते ....

निर्माण झाली होती. तो ठराव असंमत झाला तर काय होईल, अशी परिस्थिती होती. आज सकाळी जे झाले तशीच परिस्थिती होती. त्यानंतर सभापती महोदयांनी एक प्रस्ताव मांडला आणि दोन्ही सदनाने एकमताने तो प्रस्ताव मंजूर केला. त्याचेही काय धिंडवडे निघाले आहेत हे मी सांगणार आहे. या सदनाला कोणी जुमानत नाही. एवढ्या वेळा चर्चा झाल्यानंतर सुध्दा राज्यभाषेचा मान या राज्यामध्ये ठेवला जात नाही, असे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरुन वाटते.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यभाषा अधिनियम, 1964 ची अंमलबजावणी होत नाही, हे मला दुर्दैवाने म्हणावे लागते. कोणीही जुमानत नाही. मुंबईवर 26/11 चा हल्ला झाला. त्यानंतर मेणबत्तीवाल्यांनी महाराष्ट्राची राजधानी मुंबई येथे भारताचे प्रवेशव्दार असलेल्या गेट वे ऑफ इंडिया येथे एक स्मारक उभारले. मी मघाशी सांगितले की, मुंबईमध्ये मराठी टक्का कमी होत आहे. 72 टक्क्याच्या वर सगळे खानदानी परप्रांतीय भरलेले आहेत मग मराठी शाळेत मुले कशी येतील ? त्यांना आपल्या भाषेशी काही घेणे-देणे नाही. मराठी टक्का कमी झाल्यावर मराठी शाळेतील मुले कमीच होणार. पण या ठिकाणी जे स्मारक उभारले आहे त्याचा फोटो मी आणलेला आहे. त्या स्मारकावर मराठीमध्ये लिहिलेले नाही. या महाराष्ट्राच्या राजधानीमध्ये या देशाच्या प्रवेशव्दारासमोर हे स्मारक उभारले आहे आणि त्यावर मराठीमध्ये लिहिले गेले नाही. त्याही ठिकाणी मराठी भाषेला या लोकांनी हौतात्म्य पत्करावयास लावले. आपण काय करीत आहोत ?

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी आल्या आल्या मराठीबाबत भूमिका घेतली. सन्माननीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी त्याबाबत मघाशी सांगितले. माननीय मुख्यमंत्र्यांनी आल्या आल्या सांगितले की, मराठीचा वापर सुरु करतो. मी पत्र पाठवून त्यांचे अभिनंदन केले. माझ्याकडे पत्र आहे. मी 24 नोव्हेंबर, 2010 ला त्यांना पत्र पाठविले होते. मी संपूर्ण पत्र वाचून दाखवत नाही. त्या पत्रामध्ये मी एक खास चौकट करुन लिहिले की, "माननीय मुख्यमंत्री या नात्याने आपल्याकडे सर्वच खात्याच्या नस्त्या येतात.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

आपण आपल्या मुख्यमंत्री कार्यालयातील अधिकार कक्षेमध्ये काम करणाऱ्या सर्व प्रशासकीय अधिकाऱ्यांना सूचना द्यावी की, नस्ती मराठीमध्ये असेल तरच मुख्यमंत्र्यांपर्यंत जाईल. अन्यथा ती परत पाठविली जाईल, हा बडगा बसला तर सर्वच खात्यातील नस्त्या मराठीतून लिहिल्या जातील, वाचल्या जातील व आदेशितही होतील." मुळात माननीय मुख्यमंत्र्यांनी याची सुरुवात केली तर होईल ना, एवढे मी लिहून सुध्दा त्याप्रमाणे कार्यवाही झाली नाही. मी त्यांना विचारले होते की, आपण हे कराल का ? मराठीचा सन्मान करीत व ढोल बढवत आलेल्या मुख्यमंत्र्यांनी या सदनातील एका सामान्य सदस्याने मराठीच्या बाबतीत केलेल्या सूचनेकडे दुर्लक्ष केले आहे. त्यांच्या मनात असते तर त्यांनी ते केले असते. बिहारचे मुख्यमंत्री श्री.नितीशकुमार यांनी सरकारी कर्मचाऱ्यांनी मालमत्ता जाहीर करण्याचे आदेश दिले होते. आपल्याकडे श्री.फाटक यांच्यासारखे अधिकारी मालमत्ता घेत आहेत. बिहारच्या मुख्यमंत्र्यांनी कर्मचाऱ्यांना एक महिन्याचा अवधी दिला होता. तो संपल्यानंतर त्यांनी अधिकाऱ्यांना विचारले की, किती जणांची मालमत्ता जाहीर करण्याचे राहिले आहे. 80 हजार कर्मचाऱ्यांनी मालमत्तेची माहिती दिली नव्हती. त्यांनी त्या कर्मचाऱ्यांचे ताबडतोब पगार बंद करण्याचे आदेश दिले. याला प्रशासकीय ताकद म्हणतात. जोपर्यंत माहिती देत नाही तोपर्यंत 80 हजार कर्मचाऱ्यांचे पगार बंद केले आहे. मुख्यमंत्री असे कडवट असले पाहिजेत. म्हणून मी मघाशी सांगितल्याप्रमाणे मुख्यमंत्र्यांनी मराठीतून नस्ती आल्याशिवाय मी बघणारच नाही असे सांगितले तर मराठीतून नस्त्या येतात की नाही ते दिसून येईल.

सभापती महोदय, अधिवेशन सुरु झाल्याच्या दुस-या दिवशी 15 मार्च रोजी वर्षभरामध्ये मराठी भाषा विभाग मृत्यूपंथाला लागला अशा आशयाचा अग्रलेख वर्तमानपत्रातून आला. या भाषा विभागामध्ये विभागाच्या विकासासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची तरतूद केली होती. त्यामध्ये 10 कोटी ग्रंथालयाचे आहेत. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी सांगितले होते की, इंग्रजी भाषेचे 10 लाख शब्द आहेत आणि मराठीचे 1 लाख शब्द आहेत. त्यासाठी 10 कोटी रुपये आहेत ते आता या विभागाचे असल्याचे दाखविले जात आहेत. मराठीसाठी वेगळे पैसे द्यायचे नाहीत. या विभागाकरिता तेच पैसे फिरविण्यात आले.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.दिवाकर रावते.....

श्री.नरेंद्र चपळगांवकर यांच्या अध्यक्षतेखाली असलेल्या समितीला टेबल नव्हते, स्टूल नव्हते, बाकडा नव्हता, शिपाई नव्हता, आता दीड महिन्यापूर्वी हे सर्व दिलेले आहे. त्यामुळे या समितीच्या 1-2 बैठका झाल्या आहेत, यावरुन मराठी भाषेची सरकारला किती पोटतिडीक आहे ते समजते. या समितीवर 23-24 सदस्यांची नेमणूक केली आहे. महिन्यातून एकदा भेटत आहेत. आतापर्यंत 60 वर्षे झाली आहेत, एवढा काळ उपेक्षित राहिल्यामुळे मन लावून काम करु या, झिजून काम करु या आणि मराठीला सन्मान मिळवून देण्यासाठी शासनाला योग्य त्या सूचना करु या. ते जाहीर केल्यापासून समितीच्या 1-2 बैठका झाल्या आहेत. त्या समितीमध्ये कोणीही तज्ज्ञ नाहीत, सर्व साहित्यिक आहेत. त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री.उल्हास दादांना का घेतले नाही ते समजले नाही. मी माननीय मुख्यमंत्र्यांच्या घोषणेचे स्वागत करतो. आम्ही त्यांच्या बरोबर आहोत. आदरणीय उद्धव ठाकरे यांनी मराठीला अभिजात दर्जा मिळावा म्हणून यासाठी मी दिल्लीला येऊन माननीय राष्ट्रपतींना, माननीय पंतप्रधानांना भेटतो असे सांगितले. त्याला योगायोग म्हणता येईल, नेमकी त्याच दिवशी माननीय मुख्यमंत्र्यानी मराठी ही अभिजात भाषा झाली पाहिजे यासाठी मी प्रयत्न करीन अशी घोषणा केली.

पुटप्पा नावाचे एक माकड आहे, ते साहित्यिक असतील. आमच्यासाठी ते माकडच आहे. त्यांनी असे सांगितले की, मराठी भाषा जुनी नाही. मराठी भाषेला दर्जाच नाही. मराठी अभिजात झाली पाहिजे यासाठी मराठीची योग्यता येथे नोंदली गेली पाहिजे यासाठी मी हे वाचतो. 'पुण्यनगरी' या वर्तमानपत्रात असे छापून आलेले आहे. या वर्तमानपत्राचे श्री.विजय सावंत यांच्याशी संपर्क साधून मी त्यांच्याशी बोललो आहे आणि त्यांचे अभिनंदनही केलेले आहे. आपण त्यातील तज्ज्ञ नाही. त्यांनी जे म्हटले आहे ते येथे नोंदले गेले पाहिजे. त्यात त्यांनी असे म्हटले आहे की, "प्राचीन ताम्रपट किंवा ताम्र शिलालेख किंवा ऐतिहासिक स्वरुपाचा उल्लेखही साधारणपणे कोणत्याही भाषेच्या उत्पत्तीचे साधन सांगता येते. मराठी भाषेच्या संदर्भात शके 905 हा मराठीचा जन्म काल म्हणता येऊ शकतो. म्हैसूर जवळ सावनबेलगोळ गावाजवळ दोडबीड इंद्रगिर नावाच्या पर्वतावर गोमतेश्वराच्या पुतळ्याखाली "श्री चामुंडरायाचे करविले" असे एक वाक्य कोरले आहे. मराठी भाषेतील उपलब्ध असलेले हे पहिले वाक्य आहे. मराठीच्या बोलीचा उल्लेख शके 750 च्या सुमारास मिळतो. यावरुन आठव्या शतकाच्या प्रारंभी मराठी भाषेचा जन्म काळ गृहीत धरण्यास हरकत नाही.

यानंतर श्री.शिगम.

अस्वाक्षरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 15:15

श्री. दिवाकर रावते....

मराठीचा आद्यग्रंथ हा "विवेकसिंधू" होय. या काळामध्ये म्हणजे शके 1100मध्ये मराठी भाषेचा वापर चांगल्याच प्रमाणात सुरु झाला होता. मुंकुंदराय, नागपंथीय, महामुनीय महिवट यांनी चक्रधर स्वामींच्या लिळांचा ग्रंथ लीळाचरित्र लिहिला. मराठीतील हा पहिला गद्य ग्रंथ होय. इ.स.1296ला मराठी भाषेत एक चमत्कार घडला. वारकरी पंथाची स्थापना करुन ज्ञानेश्वरांनी "ज्ञानेश्वरी" हा मराठी भाषेतील ग्रंथ लिहून 1200 शतकात मराठी भाषा ही अभिजात असल्याचा झेंडा रोवला. "ज्ञानेश्वरी" या पायावर पुढे नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास या संतसज्जनांनी मराठीचा कळस रचला. परकीय आक्रमणात मराठी भाषा जिवंत ठेवली. मुक्तेश्वर ते मोरोपंत इ.स.1609 ते 1794 या काळातही मराठी भाषा लिखित स्वरुपात, बोली स्वरुपात फुलतच गेली. चरित्र ग्रंथ, पोवाडे, बखरी, शायरी, लावण्या, आनंद फंदी ते होनाजी बाळ,इ.स.1744 ते 1813 या काळात मराठी भाषेला लाघवीपणा आला. ऐतिहासिक कादंब-या, निबंध, लेखमाला, नाट्य या साहित्य क्षेत्रात ब्रिटीश काळातही मराठी भाषा वाढत राहिली. मराठी ही आद्यभाषा असून अभिजात भाषा होण्याची तिची योग्यता आहे. या मराठी भाषेला अभिजात भाषा करण्याकरिता माननीय मुख्यमंत्र्यांनी प्रयत्न करावेत.

सभापती महोदय, हे सर्व या ठिकाणी सांगत असताना या गोष्टीचे दुःख होत आहे की, आम्ही गेल्या अनेक वर्षापासून मराठीला राजभाषेचा दर्जा द्यावा असे सांगत होतो. मराठीचा प्रशासनामध्ये कटाक्षाने वापर व्हावा यासाठी मी वारंवार पाठपुरावा केला. अनेकदा पत्रव्यवहार केला. त्या पत्रव्यवहाराची फाईल माझ्याकडे आहे. भाषा, पर्यटन आणि सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रमुख म्हणून श्री. आनंद कुलकर्णी नावाच्या सद्गृहस्थांची नेमणूक केलेली आहे. त्यांना मी 23 नोव्हेंबरला पत्र लिहिले.त्या पत्राचे मला उत्तर देखील आले. आम्हा सर्व आमदारांना शासनाचे जी.आर. आणि परिपत्रके येत आहेत. श्री. कुलकर्णी यांनी असे पत्र लिहिलेले आहे की, "शासकीय कार्यालयाप्रमाणे शासनाच्या अंगीकृत उपक्रमामधील कार्यालयामध्ये मराठीचा वापर करण्याबाबत शासनाकडून वेळोवेळी शासन परिपत्रके, शासन निर्णय याद्वारे सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्याप्रमाणे शासन निर्णयांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत सर्व प्रशासकीय विभागांना पुन्हा सूचना देण्यात येत आहेत." आम्ही फक्त सूचनाच देतोय, पत्र पाठवतोय. पण त्याबाबतीत कारवाई काय होते हा प्रश्न आहे. मी त्यांना कारवाई करण्यासंबंधी पत्र लिहिले होते.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, प्रत्येक शासनातील अधिकारी आणि कर्मचा-याने आपले नाव मराठीमध्ये लिहिले पाहिजे अशा प्रकारचा 1985चा आदेश मी श्री. कुलकर्णी यांना दाखवला. त्यानंतर मंत्री महोदय श्री.राजेश टोपे यांनी 3 एप्रिल 2007 रोजीच्या पत्राने, याबाबतीत सामान्य प्रशासन विभागाकडून कडकपणे अंमलबजावणी केली जाईल, असे मला कळविले होते. तेही पत्र मी श्री. कुलकर्णी यांना पाठवले. आपणाला शासनाचे जे काही जी.आर.येतात त्यामधील अधिका-यांच्या नावातील अद्याक्षरे मराठीमध्ये नसतात. माझ्याकडे एक जी.आर.आहे. त्यामध्ये वसुली अधिकारी श्री. बी.एन.जबीर असे नाव लिहिलेले आहे. हा अधिकारी मराठीमध्ये बी.एन. असे लिहितो. त्याचे मराठीत जे नाव आहे त्याचे अद्याक्षर लिहायला पाहिजे. अशा प्रकारची नावे असलेले जी.आर.मी कारवाईसाठी पाठविले होते. परंतु काहीही कारवाई झालेली नाही. काय कारवाई केली पाहिजे हे शासनाच्या आदेशामध्ये लिहिलेले आहे. कशाला हे अधिकारी पगार खायला बसले आहेत, त्यांना पगार घेण्याचा काय अधिकार आहे ? मी सदस्य म्हणून पत्र लिहिलेले आहे. सर्व बाड मी पाठविलेले आहे. पण कारवाई शून्य. काल परवा मला शासनाचा एक जी.आर. आला. त्यामध्ये एस.डी.सूर्यवंशी, सहायक निबंधक अशा प्रकारे नाव लिहिलेले आहे. त्याने एस.डी.का लिहिले ? नाव मराठीत लिहिण्यासंबंधी शासनाचे आदेश आहेत. आईवडिलांनी जे काही नाव ठेवले असेल ते त्या अधिका-याने मराठीत लिहिले पाहिजे. आपले नाव मराठीत लिहिण्यास या अधिका-यांना लाज वाटते काय ? "अे.टी.कुंभार" असेही दुस-या अधिका-याने नाव लिहिलेले आहे. मग शासनाने काढलेल्या आदेशाला काय अर्थ आहे ? या ठिकाणी आम्ही सर्व सांगायचे, बोलायचे आणि मराठीसाठी निषेध केल्यानंतर आमच्याकडे बघून मिश्किलपणे हासायचे, राज्यपाल मराठीत बोलले की टाळया वाजवून सांगायचे की बघा आमचे "मराठी" राज्यपाल महोदय बोलून दाखवत आहेत. अशा प्रकारच्या तुमच्या सवयी बद्दल वाईट वाटते.

सभापती महोदय, न्यायालयीन भाषेच्या बाबतीत राज्य सरकारने अधिसूचना काढून जिल्हा न्यायालयामध्ये, सर्व कनिष्ठ न्यायालयाची कामकाजाची भाषा फक्त मराठी असेल असे परिपत्रक काढलेले आहे. न्यायालयाच्या कामकाजाची भाषा मरीठी असावी म्हणून त्यासंबंधीच्या विधेयकावर मी या सभागृहामध्ये सव्वादोन तास बोललो होतो. तत्कालीन विधी व न्याय मंत्री श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी ताबडतोब तसे करु म्हणून उत्तर दिले होते.

...नंतर श्री. गिते....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

परंतु त्या बाबतीत काहीही झालेले नाही. उच्च न्यायालय प्रशासनाने सर्व कनिष्ठ न्यायालयांना किमान 50 टक्के कामकाज मराठीतून करण्याचे निदेश दिले आहेत. वास्तविक भाषा विकासाचे धोरण म्हणून मराठीची सरकार सक्ती करु शकते, ही बाब सर्वोच्च न्यायालयाने मान्य केली आहे. एवढेच नव्हे तर मुंबईतील फौजदारी न्यायालयाच्या कामकाजाची भाषा मराठी असली आणि न्यायालयात पोलिसांनी मराठीत आरोप पत्र सादर केले तरी त्याची इंग्रजी प्रत आरोपी मागू शकतो, अशा पध्दतीचा न्यायालयाने निकाल दिलेला आहे. सन्माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती श्रीमती रंजना देसाई यांनी वकीलांना सुनावले की, तुम्हाला कोणी सांगितले की, आम्हाला मराठी येत नाही ? त्या म्हणाल्या की, आम्हाला मराठी चांगल्या प्रकारे वाचता येते. अशी अवस्था मराठी भाषेसंबंधी झालेली आहे. मराठी भाषेचे कौतुक करीत असताना आणि उच्च न्यायालयाने निदेश देऊन सुध्दा अद्याप न्यायालयांचा कारभार मराठीतून झालेला नाही.

सभापती महोदय, शासनाकडून वरिष्ठ नागरिकांसाठी ओळख पत्र देण्यात येते, त्याचे काही नमुने माझ्याकडे आहेत. या ओळख पत्रांवर सर्व माहिती इंग्रजी भाषेत दिलेली आहे. अशा परिस्थितीत जे अधिकारी राज्य कारभारात मराठीचा वापर करीत नसतील अशा अधिकाऱ्यांना शासन शिक्षा करणार आहे की नाही याचे मला शासनाकडून उत्तर हवे आहे. सभागृहातही अशीच काही परिस्थिती आहे. आम्ही विचारलेल्या प्रश्नांना फिदी फिदी हसत उत्तर द्यावयाचे आणि काखेत बॅग घेतली की सभागृहाबाहेर जावयाचे आणि लाल दिव्याच्या गाडीतून मौज मजा करावयाची. यासाठी तुम्हाला मंत्री केले आहे काय ? मराठी भाषेचा एवढा अपमान करीत आहात, हा प्रकार कोठे तरी थांबला पाहिजे, असे माझे मत आहे.

सभापती महोदय, श्री सिध्दी विनायक ट्रस्ट हे सरकारच्या अखत्यारीत असलेले धर्मादाय स्वरुपाचे विश्वस्थ मंडळ आहे. या विश्वस्थ मंडळाची काही कागदपत्रे माझ्याकडे आहेत. त्यावर देखील "बॉम्बे" असा उल्लेख करण्यात आलेला आहे. वास्तविक शासकीय कामकाजात "बॉम्बे" या शब्दाऐवजी "मुंबई" असा उल्लेख करावा यासाठी या सभागृहात मी ठराव आणला होता. तरी देखील श्री सिध्दी विनायक गणपती टेम्पल ट्रस्ट असा उल्लेख केला जातो. तसेच त्या मंदिराचा पत्ता म्हणून तेथील रोडचा "राव बहादूर सिताराम केशव बोले" मार्ग असा उल्लेख पाहिजे होता.

2...

श्री.दिवाकर रावते...

परंतु त्याऐवजी अतिशय संक्षिप्त शब्दात फक्त "आर.के.बोले" रोड असाच या मंदिराच्या पत्त्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे. या गोष्टींकडे लक्ष देण्याऐवजी या मंदिराचे विश्वस्थ फक्त प्रसाद वाटण्यात एवढे गर्क आहेत की काय अशी शंका येते. त्यांना आपल्या विश्वस्थ मंडळाचे नाव व पत्ता मराठीत टाकण्यास वेळ मिळत नाही. याबाबतीत शासन काय करणार आहे, याचा खुलासा झाला पाहिजे. याबाबतीत आम्ही अनेक वेळा चिडलो, संतापलो, परंतु त्याची दखल न घेता केवळ हसण्यावारी न्यायचे आणि विरोधी पक्षाला कसे खजील केले असेच दाखवावयाचे. आपल्या आईची वस्त्रे फेडली जात असताना सुध्दा आनंद व्यक्त करण्याची प्रवृत्ती कोणाची असेल तर ती प्रवृत्ती त्यांनाच लखलाभ होवो. मराठीच्या वापरासाठी आम्ही तळमळून किती वेळा सांगावयाचे ?

सभापती महोदय, शासनाने महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या वेगवेगळ्या चार कंपन्या निर्माण केल्या. त्यात पहिली म्हणजे महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी. कंपनी हा शब्द इंग्रजी असला तरी तो शब्द मराठीत नमूद केला आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत जे मान्य झाले त्याचे नाव महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी असे आहे. परंतु ती कंपनी रजिस्टर्ड करताना मात्र कंपनीचे नाव महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसिटी बोर्ड असे दिले आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड असे दुसरे नाव आहे आणि ती कंपनी रजिस्टर्ड करताना मात्र इंग्रजीमध्ये महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्टेशन कंपनी लिमिटेड असे नाव दिले आहे. तिसरी कंपनी म्हणजे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड असे असून या कंपनीची नोंदणी करताना इंग्रजी मध्ये महाराष्ट्र स्टेट डिस्ट्रीब्यूशन कंपनी लिमिटेड अशा नावाने केलेली आहे. त्यानंतर महाराष्ट्र विद्युत धारक कंपनी लिमिटेड. या कंपनीची नोंदणी करताना इंग्रजीमध्ये महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीसिटी होल्डिंग कंपनी लिमिटेड अशा नावाने चौथी कंपनी नोंदणीकृत केली आहे. मला कळत नाही, मराठी भाषेचा वापर करण्याच्या बाबतीत अधिकाऱ्यांची मानसिकता बदलत नसेल तर अशा अधिकाऱ्यांच्या कानफटात मारली पाहिजे. मंत्रिमंडळाने ज्या नावाने कंपनी निर्माण केली तशीच कंपनी नोंद करावयास पाहिजे होती. ही बाब दोन, तीन वेळा सांगून झाली तरीही फरक पडत नाही. आता तर या मराठी भाषेचा वापर न करणाऱ्या अधिकाऱ्यांचा अतिरेक झाला आहे म्हणून मला असे बोलावे लागत आहे. एक प्रकारे या शासनाचे अधिकारी मराठी भाषेला पायदळी तुडवित आहेत, मंत्रिमंडळाच्या बैठकीत

3..





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

मंजूर झालेला निर्णय अधिकारी जुमानण्यास तयार नाहीत. या कंपन्या रजिस्टर्ड करणारे आयएएस अधिकारी श्री. संजय भाटिया हे होते आणि त्यावेळी ते ऊर्जा सचिव होते. त्यांनी या चारही कंपन्या नोंदणीकृत केलेल्या आहेत. वास्तविक हे परप्रांतीय अधिकारी असल्याने त्यांना मराठीबद्दल काहीच सोयरसुतक नाही. ते आमच्या बोडक्यावर नाचत आहेत. म्हणूनच या कंपन्यांची नावे सातत्याने इंग्रजीत चर्चेस येतात.

यानंतर श्री. भोगले...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

मला शासनाकडून एक पत्र प्राप्त झाले आहे. त्याच्या लिफाफ्यावर असे नमूद केले आहे की, "Personal Assistant to Home (Urban), Food and Drug Administration, Home (Rural) Prison and Excise, Government of Maharashtra, Mantralaya, MUmbai- 400 032." हे पत्र शासनानेच मला पाठविले आहे. आम्ही सांगून सुध्दा मंत्रालय मराठी भाषेचा अवलंब करण्यास तयार नाही.

सभापती महोदय, राज्य शासनाने टेंडरच्या जाहिराती देण्याबाबत नियम केला आहे. सर्व मराठी वृत्तपत्रात जाहिराती द्यायच्या आणि एक जाहिरात इंग्रजी वृत्तपत्रात द्यायची असा नियम आहे. माझ्याकडे सर्व वृत्तपत्रांचे बाड आहे. सर्व मराठी वृत्तपत्रांमध्ये कालपर्यंत दिलेल्या जाहिराती या इंग्रजी भाषेतील आहेत. मी परवा ठाण्याच्या महापालिका आयुक्तांना फोन केला. त्यांनी फोनवरुन माफी मागितली. कोल्हापूरचे तेच आहे. रोहा नगर परिषदेने एकाच वृत्तपत्रात मराठी आणि इंग्रजी भाषेतून जाहिरात दिली. जाहिरातीबाबत नियम काय सांगतो? सर्व मराठी वृत्तपत्रात जाहिराती द्यायच्या आणि एक जाहिरात इंग्रजी वृत्तपत्रात द्यायची. असे असताना अद्याप जाहिराती इंग्रजी भाषेतून प्रसिध्द होत आहेत. मी पत्र लिहून लिहून थकलो. काहीही फरक पडत नाही. मी मराठी भाषेचा आग्रह धरला. सर्वांनीच तो आग्रह धरलेला आहे. केवळ मीच आग्रह धरला असे नाही. सर्वांच्या मनामध्ये ही भूमिका आहे. केंद्र सरकारने घटनेच्या कलम 344 (1) अन्वये पहिला राजभाषा आयोग नेमला. त्यांनी वेगवेगळ्या राज्यातील प्रादेशिक कार्यालयांना आपल्या तेथील जनतेबरोबरचा व्यवहार कोणत्या भाषेत करावा यासंबंधी काही शिफारशी केल्या होत्या. संसदेने या शिफारशीं आणि घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी घटनेच्या कलम 344 (6) नुसार 27 एप्रिल, 1960 रोजी माननीय राष्ट्रपतींनी एक खास राजभाषा विषयक आदेश काढला. तेच त्रिभाषा सूत्र. या आदेशात भाषा आयोगाने शिफारस केलेल्या, संसदेने मान्य केलेल्या वरील राजभाषा विषयक शिफारशीच्या संदर्भात पोटनियम (अ) प्रमाणे आपल्या राज्याने त्रिभाषा सूत्राप्रमाणे पहिली भाषा मराठी, दुसरी भाषा हिंदी आणि तिसरी भाषा इंग्रजी असा अवलंब करावयाचा आहे.

सभापती महोदय, आपल्याला आठवत असेल, आपण या सभागृहात ठराव पारित केला आणि त्रिभाषा सूत्राची अंमलबजावणी दोन्ही सभागृहात झाल्यामुळे पुढील अंमलबजावणी करण्याची



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

जबाबदारी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांवर आहे. माझ्याकडे शासनाच्या चेक्सच्या झेरॉक्स प्रती आहेत. त्या चेक्सवर देखील मुंबई ऐवजी "बॉम्बे" असे छापण्यात आले आहे. मी रिझर्व्ह बँकेत जाऊन यासंबंधी विचारणा केली. तेथील अधिकाऱ्यांनी मला सांगितले की, चेक्स आमच्याकडून छापले जात नाहीत. म्हणून मी संबंधित खात्याच्या अधिकाऱ्यांकडे जाऊन विचारणा केली. त्यांनी सांगितले की, आम्ही एवढ्या एवढ्या लोकांना कळविले आहे. यापुढे 29 जून, 2010 ते 12 फेब्रुवारी, 2024 पर्यंत जे चेक्स छापले जातील त्यावर बॉम्बे ऐवजी मुंबई छापावे असे सागिंतले आहे. त्यांच्या पत्रात असे नमुद केले आहे की, "by Stamping Mumbai instead of Bombay" अशी सुधारणा करावयास सागिंतली आहे. हे अधिकारी जुमानत नाहीत. आपण याठिकाणी एवढी चर्चा करतो, बोलतो त्याला काही किंमत आहे का? एवढ्या लोकांना त्यांनी नोटीस दिली. तरी जुमानत नाहीत. त्रिभाषा सूत्र मान्य केल्यानंतर कॅनरा बँक, कॉर्पोरेशन बँक, ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स, आयडीबीआय बँक, देना बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, इंडियन बँक, पंजाब नॅशनल बँक यांच्याकडून या राज्यात त्रिभाषा सूत्राची अंमलबजावणी केली जात नाही. महाराष्ट्र बँकेने मला एक फॉर्म सही करण्यासाठी पाठविला आहे. जो या क्षणाला माझ्या हातात आहे. मी त्यांना स्पष्ट सांगितले की, मी या फॉर्मवर सही करणार नाही. हा फॉर्म हिंदी व इंग्रजी भाषेत छापला आहे. मराठी भाषेत छापायला तयार नाही. मी त्यांना हेही सांगितले की, जोपर्यंत हा फॉर्म मराठी भाषेतून दिला जात नाही तोपर्यंत मी सही करणार नाही. मी या सगळ्या बँकांचे फॉर्म आणले आहेत. या बँका मराठी भाषेचा अवलंब करायला अजिबात तयार नाहीत. मग आम्ही सभागृहामध्ये ठराव कशासाठी पारित केला? का अंमलबजावणी करणार नाही? मी अधिकाऱ्यांबद्दल एवढे बोलल्यानंतर काही सदस्यांच्या अंगाचा तिळपापड झाला. शेवटी परिसीमेच्या पलिकडे गेल्यानंतर सतत सांगूनही कोणी ऐकत नाही त्यावेळी दुसरे खेटर मारता येत नाही म्हणून शब्दाने मारायचा आपल्याला अधिकार आहे.

सभापती महोदय, पोलीस खाते माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांचे ऐकत नाही. मराठी करा, मराठी करा म्हणून आम्ही सतत मागणी करीत आहोत. मी एक तासापूर्वी फोटो काढून आणला आहे. चौपाटीच्या दिशेने जात असताना रस्त्यामध्ये जो फलक लावला आहे तो इंग्रजी भाषेतून लिहिला गेला आहे. त्यावर इंग्रजी भाषेत लिहिले गेले आहे,MUMBAI POLICE.

..3..



श्री.दिवाकर रावते.......

26 जानेवारीच्या दिवशी मी शिवाजी पार्क येथील पोलीस परेडसाठी उपस्थित राहिलो होतो. माझ्यासमवेत माननीय श्री.मनोहर जोशी होते. मी त्यांना सांगितले, बघा, पोलिसांच्या वाहनावर 'मुंबई पोलीस' ही अक्षरे इंग्रजी भाषेत लिहिली गेली आहेत. ते म्हणाले, तुमचे फार बारीक लक्ष असते. पोलिसांच्या वाहनांवर इंग्रजी भाषेत मोठया अक्षरात 'मुंबई पोलीस' असे का लिहिले जाते? फॉरेनरना गोळ्या घालायच्या होत्या? मुंबई पोलीस आहेत हे कळले पाहिजे म्हणून?

नंतर 3आय.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ........

बाकीचे सर्व परप्रांतीय असल्यामुळे ते असे वागतात. कारण हे परप्रांतीय फक्त मजा करायला, मावा खायला आणि मेवा खायला मुंबईत आलेले आहेत. पण मुंबईसाठी संघटना, चळवळी आणि मोर्चे मात्र आम्ही काढतो.

श्रीमती विद्या चव्हाण : महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असून त्याद्वारे मी आपल्या असे निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, परप्रांतीय केवळ मजा करायला आणि मावा खायला आले असे उद्‌गार सन्माननीय सदस्यांनी काढले ते चुकीचे आहे. कारण मुंबई हे जगातील एकमेव असे शहर आहे की, सबंध देशात मुंबईवर प्रेम करणारे लोक आहेत. त्यामुळे जसे आपण लहान मुलाला बबड्या, बाबड्या अशा नावाने संबोधतो आणि पुढे तेच नाव रुढ होते त्याप्रमाणे मुंबईला सुध्दा प्रेमाने बॉम्बे, बंबई असे म्हणतात आणि त्यात मराठी किंवा इंग्रजीचा काही संबंध नाही. म्हणून परप्रांतीय केवळ मावा खायलाच येतात हे म्हणणे चुकीचे आहे. या शहराच्या विकासामध्ये बाहेरुन येणारा जो श्रमजीवी वर्ग आहे त्याचाही तेवढाच हक्क आहे. त्यांच्या बाबतीत असे बोलणे म्हणजे सभागृहाची दिशाभूल करण्यासारखे आहे. मुंबई शहर हे जगातील व देशातील एक महत्वाचे शहर आहे ज्याला आपण प्रेमाने बॉम्बे, बंबई म्हणतो त्यामुळे त्यात वावगे काहीच नाही.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांना कदाचित माहिती नसावे याच सभागृहाने मुंबई शहराचे नामकरण करण्याचा कायदा केला आहे. त्यानुसार या शहराला बॉम्बे असे न संबोधता फक्त मुंबईच बोलावयाचे आणि हीच मराठी संस्कृती आहे. त्याबाबत सन्माननीय सदस्या यांचे ज्ञान मला कळले. त्यांना जर या शहराला मुंबई म्हणायची लाज वाटत असेल तर ती त्यांनी आपल्याच घरी ठेवावी.

महोदय, माझ्याकडे इस्लाम जिमखान्याचे छायाचित्र आहे. या जिमखान्याला शासनानेच जागा दिलेली असून त्यावर तो जिमखाना चालविला जात आहे, त्याबद्दल माझी कोणतीच तक्रार नाही. पण जिमखान्याचे नाव मात्र इंग्रजीतूनच लिहिलेले आहे. मराठीतून न लिहिण्याचे जसे यांनी ठरवूनच टाकले आहे. त्याचप्रमाणे पोलिसांच्या गाडीवर "मुंबई पोलीस" असे छापलेले आहे व त्याचे छायाचित्र सुध्दा माझ्याकडे आहे.

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी : महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण यांनी उपस्थित केलेल्या मुद्यावर बोलताना "लाज" असा शब्दप्रयोग केलेला आहे. तो शब्द कामकाजात ठेवणे उचित नसल्याने कामकाजातून काढून टाकावा, अशी माझी विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : महोदय, हा शब्द अजिबात काढता कामा नये. सभागृहात याच मुद्यावर तीन तास चर्चा झाली. सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई हे या सदनाचे ज्येष्ठ सदस्य आहेत. त्यांचा मी आदर करतो.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया आपापसात बोलू नये.

श्री. दिवाकर रावते : महोदय, मुंबई शहराचे बॉम्बे असे नाव आहे काय, यासंबंधी आपणच निर्देश द्यावे अशी मी विनंती करतो. कदाचित बॉम्बे ऐवजी मुंबई न म्हणणे हे आपल्या पक्षाचे धोरण आहे काय काय हे देखील स्पष्ट व्हावे. तसेच मुंबई शहराचे नाव बदलण्यासंबंधीचा कायदा पास इ ाालेला असताना बॉम्बे असाच शब्दप्रयोग करणे सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांना तरी मंजूर आहे काय ? हे देखील समजले पाहिजे.

श्री. अरुण गुजराथी : मुंबई शहराला सर्वच लोक मुंबई म्हणतील पण फक्त "लाज" हा शब्द कामकाजातून वगळावा अशी मी विनंती करतो.

**उप सभापती** : ठीक आहे, सन्माननीय सदस्यांनी वापरलेला "लाज" हा शब्द कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : महोदय, कायदा करुनही त्याचे पालन होत नसेल याची लाज वाटून घेण्याचा अधिकार मला तरी आहे की नाही ? कारण मुंबई हे नाव कायद्याने झाल्यानंतर देखील बबड्या, बाबड्या असे प्रेमाने म्हणतो तसेच प्रेमाने मुंबई म्हणण्यात काय अडचण आहे ?

यानंतर हिंदी भाषण.....श्री. देवदत्त



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जमा : सभापति महोदय, इस बारे में सदन में बहुत बार चर्चा हुई है. माननीय सदस्य श्री रावते साहब तथा अन्य माननीय सदस्यों ने भी मराठी भाषा के बारे में तथा मुंबई शब्द से संबंधित अनेक बार यहां पर प्रश्न उपस्थित किए हैं. यहां पर अभी माननीय सदस्य श्री अरुण गुजराथी साहब ने भी बताया कि माननीय सदस्या को भी मालूम है कि मुंबई का नाम अब सिर्फ मुंबई ही है.दूसरा कोई नाम मुंबई का नहीं है. इस बारे में शासन ने कानून बनाया है, यह बात माननीय सदस्या को भी मालूम है. लेकिन माननीय सदस्या का कहना है कि जिस प्रकार घर के अंदर माता पिता अपने बच्चे को कई बार प्यार में उस नाम से पुकारते हैं जो कि उसका असली नाम नहीं है. इसका मतलब यह नहीं कि उस बच्चे् का नाम ही बदल जाता है. यही बात यहां पर मुंबई केबारे में है. मुंबई को भी अनेक लोग प्यार से बम्बई या बॉम्बे के नाम से से पुकारते हैं. इसका मतलब यह नहीं कि मुंबई का नाम बदल गया. इसलिए उनका कहना है कि इसमें नाराज होने जैसी कोई बात नहीं है. इसलिए मुंबई शब्द से सिर्फ आपको ही प्यार है और उस शब्द का अभिमान सिर्फ आपको ही है ऐसी बात नहीं है बल्कि सभी माननीय सदस्यों को मराठी भाषा और मुंबई शब्द से प्यार है. इसीलिए आपने जो अपमानकारक शब्द यूज किए हैं वे शब्द सदन के रिकार्ड से निकाल देने चाहिए, यही हमारा निवेदन है.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांनी यासंदर्भात विचार व्यक्त केल्यानंतर मी तो शब्द कामकाजातून काढून टाकण्यास सांगितले आहे. त्यामुळे सदस्यांनी आपापसात न बोलता आपल्या भाषणास सरळ सुरुवात करावी.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मला एक गोष्ट कळत नाही की, "लाज" हा शब्द असा तसा नाही तर तो "सांस्कृतिक" शब्द आहे. शेवटी परप्रांतीय आले की, असेच होणार. मला एखाद्या गोष्टीची लाज वाटते त्यामध्ये तुम्हाला कशाला वाईट वाटावयास पाहिजे ?

सभापती महोदय, पोलीस खात्याने अनेक सुवर्ण पदके मिळवली आहेत असे आम्ही वर्तमान पत्रात वाचतो. मध्यंतरी एक बातमी आली होती की, इतर राज्यामध्ये पोलिसांनी सुवर्ण पदक मिळवले तर त्यांना मोठे बक्षीस दिले जाते परंतु आपल्या पोलिसांनी सुवर्ण पदके मिळवली तर त्यांना साधी पदोन्नती सुध्दा दिली जात नाही अशी आपली स्थिती आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात असे नमूद करण्यात आले आहे की, "अलीकडेच पार पडलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा आणि आशियाई क्रीडा स्पर्धा यांमध्ये महाराष्ट्राच्या खेळाडूंनी अनेक पदके जिंकल्याचा आम्हा सर्वांना अभिमान आहे. सुवर्ण, रौप्य व कांस्य पदक विजेत्यांना प्रोत्साहन म्हणून शासनाने प्रत्येकी अनुक्रमे 10 लाख, 7.50 लाख आणि 5 लाख रुपयांची पारितोषिके देऊन त्यांचा यथोचित गौरव केला आहे. शासनाने गुणवान खेळाडूंची योग्य त्या शासकीय सेवेमध्ये थेट भरती करण्याचा देखील निर्णय घेतला आहे." परंतु या शासनाने पोलिसांचा अशा पध्दतीने गौरव केलेला नाही एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. त्यामुळे माननीय गृहमंत्र्यांनी पोलिसांच्या खेळाचा गौरव करावा एवढी विनंती करतो.

सभापती महोदय, शेवटी मला एवढेच सांगावयाचे आहे की, या शहराचे नाव मुंबई आहे त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी मुंबईचा उल्लेख "मुंबई" असाच करावा. कारण आपल्या आईचे नाव प्रेमानेच घ्यावयाचे असते. माझी सन्माननीय सदस्या श्रीमती वंदना चव्हाण यांना विनंती आहे की, आपल्या आईचे नाव आईच्या प्रेमानेच घ्यावे. मराठी माणसे एकमेकांशी भांडतात परंतु त्याचा फायदा दुसरेच घेतात त्यामुळे या गोष्टीचाही विचार करावा एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र....

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

18-03-2011 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3J-1
SGJ/ प्रथम श्री. खर्चे..... 15:35

**उप सभापती** : मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, सदस्यांचे भाषण सुरु असेल तर मी मध्येच कोणाला थांबवत नाही. सभागृहाची आजची कामकाजाची वेळ 4.30 वाजे पर्यंत आहे. सन्माननीय सदस्यांची इच्छा असेल तर मी सभागृहाची वेळ 7.00 वाजेपर्यंत सुध्दा वाढविण्यास तयार आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी आपले विचार थोडक्यात मांडावेत.

...3..

अशुध्दारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर आभार व्यक्त करण्यासाठी उभा आहे. राज्यपाल महोदयांचे भाषण मी अत्यंत काळजीपूर्वक वाचलेले आहे. अभिभाषण वाचल्यानंतर असा निष्कर्ष काढला की, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर प्रत्येकाने आभार मानावेत इतके ते उत्तम आणि सुरेख अभिभाषण आहे. काही मंडळींना माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात आभार मानण्यासारखे काहीच दिसत नाही, कारण तो शेवटी त्यांच्या दृष्टीचा दोष आहे असे गृहीत धरुन त्याकडे दुर्लक्ष करावयाचे व पुढे जावयाचे असे मी मानतो.

सभापती महोदय, माणुसकीचा अंश, माणसाविषयीची कणव जर पहावयाची असेल तर ती माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात आपल्याला जागोजागी आढळून येते. महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये विधिमंडळाचा सिंहाचा वाटा राहिलेला आहे हे सर्वांना मान्य आहे. अमृताचे वातावरण निर्माण व्हावे म्हणून राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणामध्ये अनेक योजनांचा ऊहापोह केलेला आहे.

माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल जेवढे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. परंतु मराठवाडा आणि विदर्भाची भावना अशी आहे की,

"आम्हा कोणाचीही तुम्हा पुढे तक्रारही करता आली नाही,
कारण तुमच्या महालाचे खोजे तुमच्याहूनही बेगुमान होते."

सभापती महोदय, मराठवाडयाच्या जनतेची भावना लक्षात घेऊन राज्यपाल महोदयांनी अनुशेषाच्या संदर्भात एका तज्ज्ञ समितीचे गठण केलेले आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले ...

कदाचित आमच्याकडील अनुशेष दूर करण्याचा प्रयत्न ही तज्ज्ञ समिती करील आणि हा अनुशेष कालांतराने दूर होईल म्हणूनच माननीय राज्यपालांनी तज्ज्ञ समिती स्थापन केली असेल. सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी ही तज्ज्ञ समिती स्थापन केल्यामुळे मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो फक्त या समितीमध्ये कोण तज्ज्ञ आहेत याबाबतीत माननीय मंत्र्यांनी सांगावे अशी मी त्यांना आग्रहाची विनंती करतो.

सभापती महोदय, जिल्हयाचा विकास करावयाचा असेल तर जिल्हा नियोजन मंडळ हे अतिशय महत्वाचे असून मागच्या वर्षाच्या तुलनेने या वर्षी जिल्हा नियोजन मंडळाच्या निधीमध्ये 53 टक्के वाढ करण्यात आली असून जिल्हयातील सदस्यांना नावीन्यपूर्ण योजना तयार करण्यासाठी साडेचार टक्के निधी देण्यात आला आहे. त्यामुळे त्या जिल्हयातील सदस्यांनी नावीन्यपूर्ण आविष्कार करावा अशी अपेक्षा आहे. त्यामुळे जे कल्पक असतील ज्यांना दूरदृष्टी असेल तेच नावीन्यपूर्ण योजना जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीत देऊ शकतात . ज्यांच्याकडे कल्पनाशक्ती आहे अशाच व्यक्ती जिल्हयाचा विकास करु शकतात ही माननीय राज्यपालांची अभिनव संकल्पना मला दाद देऊन गेलेली आहे. माननीय राज्यपालांनी मला या सभागृहात पाठविलेले असल्यामुळे त्यांचे आभार मानण्या पलीकडे माझ्याकडे दुसरा पर्याय नाही हे सुध्दा मी या ठिकाणी सांगू इच्छितो.

सभापती महोदय, "निश्चयाचा महामेरु,बहूत जणासी आधारु, अखंड स्थितीचा निर्धारु, श्रीमंत योगी " अशा प्रकारे स्वामी समर्थानी छत्रपती शिवाजी महाराजांचे वर्णन केलेले आहे. काही जण कधी तरी हसले तर सन्माननीय सदस्य श्री दिवाकर रावते असे म्हणतात की, आपण कुत्सितपणे हसत आहात आणि आता ते स्वत:च कुत्सितपणे हसत आहेत म्हणजेच दुस-यांना काहीही येत नाही आणि जेवढी काही बुध्दीमत्ता आहे ती आपल्यातच सामावलेली आहे, ही जी त्यांची भावना आहे ती मूळातच चुकीची आहे.

श्री.दिवाकर रावते : मी आपल्याला हसलेलो नाही.

प्रा.सुरेश नवले : या सभागृहात अभ्यास करणारे बाकीचेही काही सन्माननीय सदस्य आहेत तेव्हा इतरांना तुच्छ लेखण्याची जर आपली भावना असेल तर त्याबाबतीत अंर्तमुख होऊन

2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले ...

आपणही विचार करण्याची आवश्यकता आहे. या सभागृहात अभ्यास करणारे इतरही काही सन्माननीय सदस्य आहेत.चांगले पाहण्याची जर दृष्टीच आपल्याकडे नसेल तर त्याही बाबतीत गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. तुम्हाला जर हसावयाचे असेल तर तुम्ही जरुर हसा तुमच्या हसण्याकडे लक्ष देण्याची आम्हाला काहीही गरज नाही.महाराष्ट्राचा विकास आमच्या डोळया समोर आहे. माननीय राज्यपालांना सगळा महाराष्ट्र डोळयासमोर दिसत आहे. या महाराष्ट्राचे सर्वागीण प्रगतीचे चित्र या देशामध्ये उभे करण्याचा संकल्प सोडला असल्यामुळे या राज्याप्रती आमचे जे काही उत्तरदायित्व आहे ते आम्ही पूर्ण करणार आहोत. उत्तरदायित्वाचे अनुयायी जर कोण असतील तर माझ्या डाव्या बाजूला बसलेले आणि आपल्या उजव्या बाजूला बसलेले सर्व सन्माननीय सदस्य आहेत यावर माझा विश्वास आहे म्हणूनच मी माननीय राज्यपालांचे आभार मानतो.

सभापती महोदय, 57 गस्ती नौका आणण्याचा संकल्प सोडण्यात आला असून त्यापैकी 28 गस्ती नौका येऊन पोहोचल्या आहेत .छत्रपती शिवाजी महाराजांना हे माहीत होते की,समुद्र मार्गाने शत्रू येंऊ शकेल आणि भेद करु शकेल तेव्हा भेद करणा-या शत्रूचा मध्येच फडशा पाडला पाहिजे म्हणूनच महाराजांनी आरमार सज्ज केले होते.अशा प्रकारे आरमार सज्ज करण्याची छत्रपती शिवाजी महाराजांची संकल्पना होती त्या बाबतीत या राज्यकर्त्यानी तोच आदर्श घेतला असल्यामुळे 57 गस्ती नौका विकत घेण्याचे ठरविले असून त्यातील 28 गस्ती नौका येऊन पोहोचल्या आहेत. या 28 गस्ती नौका सुध्दा कमी पडणार असल्यामुळे कालांतराने आणखी गस्ती नौका आणाव्या लागतील आणि समुद्राच्या लाटेवरुन तरंगत येणारे आणि आतून शिरकाव करु पाहणारे` दुष्ट प्रवृत्तीचे जे आहेत त्या दुष्ट प्रवृत्तीला ठेचण्याचे काम देखील गस्ती नौका करतील.

सभापती महोदय, पोलिसांसाठी अकादमी स्थापन करण्यात येणार आहे. माननीय राज्यपालांची संकल्पना अतिशय चांगली आहे. असे मी सन्माननीय सदस्य श्री धंनजय मुंडे यांना सांगू इच्छितो.राज्यातील पोलीस प्रशिक्षित झाले पाहिजे आणि महाराजांच्या मावळयांनी ज्याप्रमाणे शत्रुशी सामना केला होता, अटकेपार झेंडे फडकावले आणि शत्रूचा फडशा पाडला होता, प्रसंगी हुरडा खाल्ला , घोडयावर बसले आणि खांद्यावर निशाण घेतले होते परंतु शत्रू जमिनीवर

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले ...

येता कामा नये हा संकल्प त्यांनी सोडला होता त्याप्रमाणे आमचा पोलीस शस्त्र सज्ज झाला पाहिजे आणि प्रशिक्षित झाला पाहिजे ही भावना माननीय राज्यपालांची असल्यामुळे अकादमी स्थापन करण्यात आली आहे या माध्यमातून महाराष्ट्राचे संरक्षण करण्याची जबाबदारी पोलीस पार पाडणार आहेत.

. सभापती महोदय, महाराष्ट्राची सर्वसाधारण सिंचन क्षमता साडे सतरा टक्के एवढी आहे.हे गृहित धरुन या वर्षी 7 हजार 919 कोटी रुपयाचा निधी सिंचनासाठी ठेवण्यात आला असून आतापर्यंत सर्वात जास्त निधी देण्यात आला आहे.

नंतर श्री.सरफरे`

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले....

याठिकाणी 1 लाख 75 हजार हेक्टर अतिरिक्त सिंचन क्षमता निर्माण केली जाणार आहे. ही सर्व सुपीक जमीन असल्यामुळे तिला पाण्याचा स्पर्श झाल्याशिवाय आपल्या दारामध्ये धान्याच्या राशी येऊन पडणार नाहीत. त्यामुळे महाराष्ट्रामध्ये मोठया प्रमाणावर सिंचन झाले पाहिजे ही आपली सर्वांची भावना आहे. त्यादृष्टीने सिंचनाचे क्षेत्र वाढविण्यासाठी हे शासन प्रयत्न करीत आहे आणि त्याकरिता राज्य सरकारने केंद्र सरकारकडून 8 हजार 39 कोटी रुपयांचा निधी मिळविला आहे. सभापती महोदय, पाठपुरावा केल्याशिवाय कोणतीही गोष्ट मिळत नाही ही वस्तुस्थिती आहे. हा निधी मिळविण्यासाठी आपल्याला खूप पाठलाग करावा लागला आणि हे पाठलाग करण्याचे काम आपल्या अधिकाऱ्यांनी योग्य प्रकारे केल्यामुळे हा निधी मिळाला असावा.

सभापती महोदय, आपल्याला माहीत आहे की, केंद्रामध्ये आणि राज्यामध्ये दोन्ही ठिकाणी आघाडीचे राज्य असल्यामुळे आघाडीचा धर्म पाळण्यामध्ये केंद्र सरकार आघाडीवर आहे. त्यामुळे राज्यातील आघाडी सरकारने या योजनेचा पाठपुरावा करण्याची आघाडी उघडली तर केंद्र सरकारची तिजोरी या राज्यासाठी सताड उघडेल आणि हा निधी आपल्या महाराष्ट्रामध्ये येऊ शकेल. त्यामुळे या राज्यातील शैक्षणिक वातावरण अनुरुप होण्यास मदत होईल. हे काम आपण उत्तमप्रकारे करणार आहोत यावर माझा विश्वास आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी या अभिभाषणाच्या निमित्ताने एक अभूतपूर्व कल्पना मांडली आहे. तूर, हरभरा, सोयाबीन इत्यादी पिकांवर कीड पडते ती पडू नये म्हणून उपाय योजना केली पाहिजे, त्या उपाय योजनेचा शोध घेतला पाहिजे. त्यांनी मांडलेली ही कल्पना अतिशय महत्वाची आहे. त्यानिमित्ताने मला अशी सूचना करावयाची आहे की, समाजा-समाजामध्ये तेढ निर्माण करणारी कीड महाराष्ट्रामध्ये निर्माण झाली आहे ती आटोक्यात आणण्यासाठी काही उपाय योजना करता येऊ शकतील त्या राज्य सरकारने केल्यास मी मनापासून राज्य सरकारला धन्यवाद देईन. शेतक-यांचे मळे फुलावेत म्हणून शेतकऱ्यांविषयी महाराष्ट्र सरकारला असलेला लळा, प्रेम व्यक्त करण्यासाठी राज्य शासनाने पीक कर्जासाठी 11 हजार 358 कोटी रुपये दिले आहेत आणि पुढील तीन वर्षात 20 हजार कोटी रुपये शेतकऱ्यांना पीक कर्जासाठी दिले जाणार आहेत. म्हणून मी यानिमित्ताने राज्य शासनाची या शेतकऱ्यांविषयी असलेली सहानुभूती, आपुलकी आणि प्रेमाची भावना मी याठिकाणी व्यक्त करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

प्रा. सुरेश नवले....

सभापती महोदय, माझ्या बीड जिल्हयामध्ये मोठया प्रमाणात कापूस पिकतो. यावर्षी कापसाच्या पिकामधून 10 हजार कोटीपेक्षा जास्त उलाढाल झाली. गुजरातमधील व्यापाऱ्यांनी माझ्या बीड जिल्हयामध्ये येऊन कापसाची खरेदी केली व तो घेऊन ते आपल्या राज्यामध्ये गेले. त्यामुळे शेतकऱ्याच्या हातामध्ये थोडे पैसे आले. परंतु माझी राज्य सरकारला विनंती आहे की, बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यामध्ये आपण एक सूत गिरणी उभी केली पाहिजे.आज त्याठिकाणी खाजगी लोक सूत गिरणी उभी करण्यास तयार आहेत. याकरिता पुढील दहा वर्षामध्ये सूत गिरणी उभी केल्यास त्यांना व्याजामध्ये सवलत दिली पाहिजे, पुढील दहा वर्षे त्यांच्याकडून व्याज घेतले जाणार नाही असे सांगितले पाहिजे. मी आपणास खात्री देतो की, बीड जिल्ह्यामध्ये मराठवाडयातील प्रत्येक तालुक्यामध्ये एक सूत गिरणी उभी राहिल्यास लोकांना रोजगार मिळेल आणि ग्रामीण भागातील 2 एकर जमीन असलेल्या शेतकऱ्याच्या हातामध्ये दीड लाखापर्यंत पैसे पडू शकतील. त्यामधून बीड जिल्ह्यातील व मराठवाडयातील लोकांची आर्थिक क्षमता वाढल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय,माननीय उद्योग मंत्र्यांनी मराठवाडयामध्ये 169 नवीन उद्योगधंदे सुरु केल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. या निमित्ताने त्यांनी विशाल प्रकल्पाची संकल्पना मांडली आहे. त्यापैकी मराठवाडा आणि विदर्भामध्ये 70 विशाल प्रकल्प उभे राहणार आहेत. मराठवाडा,विदर्भ, नागपूर, औरंगाबाद या भागामध्ये ही संकल्पना उभी राहणे आवश्यक आहे. बीड, जालना, हिंगोली, परभणी या जिल्ह्यांमध्ये विशाल प्रकल्पांपैकी काही प्रकल्प होणे आवश्यक आहेत. तरच मराठवाडयाचा सर्वांगीण विकास होईल हे आपल्या लक्षात असावे अशी मी आग्रहाची विनंती करतो.

(यांनतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

APR/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 15:50

प्रा.सुरेश नवले . . . .

गडकोटांचे संरक्षण करण्याची जबाबदारी राज्य शासनाने घेतलेली आहे. माननीय राज्यपाल महोदयांनीही त्याबाबतीत उल्लेख केलेला आहे, त्याबद्दल मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो आणि त्यांचे आभार मानतो. शेवटी या ऐतिहासिक वास्तू आहेत, ऐतिहासिक स्थळे आहेत आणि त्यामुळे त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी राज्य शासनाने स्वीकारली पाहिजे आणि माझे शासन ती जबाबदारी स्वीकारील अशी माननीय राज्यपालांची जी भूमिका आहे, ती सुध्दा अभिनंदनास पात्र आहे, आभारास पात्र आहे.

सभापती महोदय,"मराठीयेच्या नगरी ब्रम्हविद्येचा सुकाळ करी" म्हणूनच शेवटी या मराठी भाषेसाठी स्वतंत्र विभाग निर्माण करण्यात आला आहे. मराठी भाषा जी ऐश्वर्यवती आहे जेणेकरुन इतर भाषिकांनी सुध्दा या ऐश्वर्यवतीकडे पहावे, डोळेभरुन पहावे. शेवटी या ऐश्वर्यवतीचे जे चालणे आहे, जे वागणे आहे, जे बोलणे आहे ते लोकांच्याही कानात, मनात आणि तनामध्ये भरावे ही जी माननीय राज्यपालांची भावना आहे, ती सुध्दा खरोखर अभिनंदनास पात्र आहे.

सभापती महोदय, सीमा प्रश्न हा महाराष्ट्राच्या अस्मितेचा प्रश्न आहे आणि महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाच्या मनामध्ये हा प्रश्न सतत तेवत असल्यामुळे माननीय राज्यपालांनी देखील या प्रश्नाचा आपल्या अभिभाषणामध्ये उल्लेख केला. त्यामुळे मी माननीय राज्यपालांचे मनापासून आभार मानतो आणि माननीय सभापती यानी मला भाषण करण्यासाठी एक-दीड मिनिटांचा अधिक कालावधी दिला, त्याबद्दल मी आपले मनापासून आभार मानून तसेच आपल्याला धन्यवाद देऊन रजा घेतो.

-----

. . . .3 एम-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, खरे म्हणजे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल त्यांचे आभार मानणारा प्रस्ताव मांडणे ही या सदनाची पूर्वीपासून चालत आलेली मोठी परंपरा आहे. माननीय राज्यपाल हे आपल्या अभिभाषणामध्ये नेहमीच सत्तेमध्ये असलेल्या सरकारबद्दल माहिती देत असतात.कारण त्यांना घटनेने अधिकार दिलेला आहे. त्यानुसार हे माझे सरकार आहे आणि हे सरकार येत्या आर्थिक वर्षामध्ये कोणते विविध उपक्रम राबवू इच्छिते आणि पुढील काळामध्ये राज्याची प्रगती कशा प्रकारे होणार आहे याविषयी दिशादर्शन करतात. सहाजिकच जनतेने निवडून दिलेले आणि स्थापन झालेले सरकार हेच या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी कार्यरत झालेले असते. त्यामुळे संपूर्ण वर्षाचा दिशादर्शक असा आराखडा मांडत असताना या राज्यातील सर्वसामान्य जनतेला ज्या-ज्या प्रश्नांच्या संबंधी राज्य शासनाकडून उकल होण्याची अपेक्षा आहे, त्या सर्व प्रश्नांचा परामर्श अभिभाषणामध्ये घेतल्याचे आपल्याला दिसून येईल. महत्वाचे विषय जे काळाप्रमाणे बदलत जातात, त्या विषयांकडे हे सरकार कशा दृष्टीने पहात आहे आणि त्यादृष्टीकोनातून काही ठोस उपाययोजना करण्याचे सरकारने ठरविलेले आहे की नाही याचेही दिशादर्शन या अभिभाषणाच्या माध्यमातून जनतेपर्यंत पोहोचविलेले असते. यामध्ये अनेक गोष्टी अंतर्भूत केल्या जातात. आपल्याला सर्वांना कल्पना आहे की, राज्याच्या विविध भागाचा विकास करीत असताना त्यामध्ये समतोलपणा राखणे ही एक प्राथमिक जबाबदारी असते आणि ती जबाबदारी योग्य प्रकारे पाळली जात आहे की नाही हे पहाण्यासाठी त्याबाबत आढावा घेण्याची आवश्यकता असते. त्यामुळे हा आढावा घेऊन, त्यानुसार त्यात दुरुस्त्या सुचविण्यासाठी एखाद्या समितीची नियुक्ती करणे ही अत्यावश्यक गोष्ट होती आणि आता ते या निमित्ताने साकार होणार आहे. आपल्या राज्यात सागरी किनाऱ्याच्या सुरक्षिततेबाबत अनेक वेळा चर्चा झाली आहे.

यानंतर कु.थोरात . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ प्रथम सौ. रणदिवे.... 15:55

श्री. हेमंत टकले.....

पूर्वीच्या काळात त्यामध्ये काही त्रुटी जरुर राहून गेल्या असतील पण सक्षमता वाढावी यादृष्टीने पोलिसांना एका विशेष प्रशिक्षणाची आवश्यकता होती, त्यावर भर देण्याचे या अभिभाषणात सूचित करण्यात आलेले आहे. नक्षलग्रस्त जिल्हे हा केवळ आपल्या राज्याचा प्रश्न नाही तर संपूर्ण देशातील अनेक भागामध्ये फोफावणारा एक ज्वलंत प्रश्न आहे. आपल्या राज्यामध्ये गडचिरोली आणि गोंदिया हे दोन जिल्हे विशेष संवेदनाक्षम जिल्हे आहेत. त्याठिकाणी नक्षवाद्यांशी सामना करण्यासाठी "अल्फा हॉक अकादमी स्थापन" करण्यात आलेली आहे. मला वाटते हा एक ऐतिहासिक निर्णय आहे.

सभापती महोदय, पर्यावरणाचे संतुलन दिवसेंदिवस योग्य पध्दतीने राखणे अत्यावश्यक बनलेले आहे. शहरे वाढत आहेत, वाहतूक वाढत आहे, वाहने वाढत आहेत, त्यामुळे वायु प्रदूषण नियंत्रित करण्याची फार मोठी आवश्यकता निर्माण झालेली आहे. आपण जेव्हा श्वास घेतो तेव्हा ऑक्सिजनच्या रुपाने हवा आत घेत असतो. या हवेची गुणवत्ता तपासणी करणे हा ही प्रामुख्याने विचार करण्यासारखा एक मुद्दा आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात याबाबतीतही दिशादर्शन करण्यात आलेले आहे.

सभापती महोदय, या अभिभाषणात शेती संबंधीच्या, कृषी संबंधीच्या आणि इतर काही नाविन्यपूर्ण योजनांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. कुठलीही दुर्घटना घडल्यानंतर त्यासंबंधीची उपाययोजना करावी लागते त्यामुळे राज्याच्या तिजोरीवर अधिकाधिक भार पडत जातो असे घडू नये म्हणून याला प्रतिबंध करण्यासाठी योजना तयार करणे आणि कल्पकतेने त्या योजनांची अंमलबजावणी करणे याबाबतीतील दिशा या अभिभाषणात दिसून येते.

सभापती महोदय, शिक्षणाचा हक्क प्राप्त झाल्यानंतर कुठल्याही राज्यामध्ये बाल कामगार असू नयेत. पण आजही आपल्या राज्यामध्ये अनेक ठिकाणी बाल कामगार कामावर जातात ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. परंतु याबाबतीत सुधारणा केल्या पाहिजेत यासाठी या बाल कामगार प्रथेच्या विरोधात एक व्यापक जागरुकता मोहिम घेण्याचे या निमित्ताने ठरविण्यात आलेले आहे. कुठल्याही राज्याचा विकास होत असताना कृषी व औद्योगिक विकास व्हावयास पाहिजे. शेतीमधून उत्पन्न होणाऱ्या मालावर प्रक्रिया करणारे उद्योग निर्माण झाले पाहिजेत. या सगळया

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले.....

उद्योगासाठी, या सगळया विकासाठी ऊर्जा ही अत्यावश्यक गरज आहे. त्याबाबतीत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात उहापोह झालेला आहे.

सभापती महोदय, मला या ठिकाणी एका गोष्टीचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे. आपल्याकडे इतर अनेक राज्यांचे उदाहरण देऊन सांगितले जाते की, अमुक राज्यांत अमुक योजना राबविण्यांत आल्या आहेत त्या आपल्या राज्यात का राबविल्या जात नाहीत. आपल्या राज्यातील "संत गाडगे महाराज" ही योजना असेल, "महात्मा गांधी तंटामुक्त गाव" ही योजना असेल, या अतिशय चांगल्या आणि महत्वाच्या योजना आहेत. या योजनांचीही चांगली अंमलबजावणी होत आहे. स्वच्छता मोहिमेच्या बाबतीत सुध्दा आपले राज्य आघाडीवर आहे, ही गोष्ट आपण विसरुन चालणार नाही. सर्वसामान्य नागरिकांना ज्या गोष्टी लागतात त्यामध्ये शिक्षण आणि आरोग्याचेही महत्व आहे. आज आपल्या राज्यामध्ये तातडीने वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी इतर राज्यांप्रमाणे आपल्या राज्यामध्येसुध्दा एक महत्वाची यंत्रणा कार्यरत झाली पाहिजे या दृष्टिकोनातून माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात 690 रुग्णवाहिका उपलब्ध करुन देण्याचा एक ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला आहेत. सभापती महोदय, जसजसे तंत्रज्ञान वाढत जाते तसतसा या माध्यमांचा उपयोग करुन आपण त्यातील कागदोपत्री होणारी दिरंगाई कमी करण्यासाठी 'ई' सेवा केंद्र स्थापन करणे हाही एक महत्वाकांक्षी कार्यक्रम या अभिभाषणाच्या माध्यमातून लोकांपर्यंत नेण्यात येत आहे.

सभापती महोदय, मुंबईतील गिरणी कामगारांचा प्रश्न तेवढाच महत्वाचा आहे. या गिरण्या मुंबईतून दुसरीकडे गेल्या. उद्योग दुसरीकडे गेल्यामुळे त्या जागा रिकाम्या झाल्या. कामगार बेकार झाले. त्यांची घरे गेली. कामगारांच्या घरांची योजना करणे अत्यंत आवश्यक आहे, त्या दृष्टिकोनातून योग्य पाऊले टाकली जातील असाही उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात करण्यात आलेला आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले ....

सभापती महोदय, सन 2011-2012 हे वर्ष राज्याने 'पर्यटन वर्ष' म्हणून साजरे करण्याचे ठरविले आहे. त्यामध्ये एखादा उत्सव किंवा सण साजरा करणे एवढाच भाग नसून पर्यटनाच्या माध्यमातून आपली चांगली प्रगती कशी होईल या दृष्टीनेही अतिशय महत्वाच्या योजना राज्य शासनाकडून या वर्षात निश्चितपणे राज्यामध्ये घेतल्या जातील याचा आम्हाला विश्वास वाटतो.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये एक महत्वाचा विषय आपल्याला आढळून येईल. तो विषय मराठी भाषा विभागाचा आहे. मराठी भाषा आणि मराठी संस्कृती या दोन गोष्टी एकजीव आणि एकमेकांशी निगडित आहेत. मराठी भाषेचे जतन, संवर्धन आणि विकास या तीनही गोष्टी त्या दृष्टीने अतिशय महत्वाच्या आहेत. पूर्वीच्या पिढीतील विचारवंतांनी असे म्हटले होते की, भाषा संवर्धनासाठी सगळ्यात पहिली पायरी जर कोणती असेल तर ती शिक्षणाची असते आणि त्यामध्येही प्राथमिक शिक्षणाची असते. ते शिक्षण जर मातृभाषेतून दिले गेले तर त्या मातृभाषेचा विस्तार, ती ज्ञानभाषा होण्यासाठी होणारी प्रगती या गोष्टी यामधून निश्चितपणे होऊ शकतील. म्हणून आपल्या राज्यात निर्माण झालेला मराठी भाषा विभाग हा त्या दृष्टीने मला अतिशय महत्वाचा वाटतो. तो विभाग पुढच्या काळामध्ये अतिशय मोठ्या प्रमाणात सक्षम करण्याची गरज आहे. या ठिकाणी अनेक वेळा इतर राज्यांची उदाहरणे आपल्या समोर ठेवली जातात. शेजारच्या कर्नाटक राज्यात त्यांचा जो सांस्कृतिक विभाग आहे त्याला त्या ठिकाणी केवळ सांस्कृतिक विभाग न म्हणता कानडी भाषा आणि सांस्कृतिक विभाग असा एकत्रित विभाग त्या ठिकाणी निर्माण केला आहे. कारण भाषा ही संस्कृतीशी अतिशय जवळून निगडित आहे. या बाबतीत शासनाने सुवर्ण महोत्सवी वर्षात निश्चितपणे चांगले काम करणे अपेक्षित आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात एक खंत व्यक्त करण्यात आलेली आहे. ती खंत महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नाबद्दलची आहे. या सीमा भागामध्ये राहणारे लाखो मराठी भाषिक लोक आज एका अन्यायाच्या वरवंट्याखाली चिरडले जात आहेत. त्यासाठी आपण सर्वोच्च न्यायालयामध्ये दिवाणी दावा दाखल केला असून त्याबद्दलची प्रक्रिया न्यायालयामध्ये सुरु

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हमंत टकले....

आहे. पण त्याही पलीकडे जाऊन न्यायालयाचे निर्णय जेव्हा यावयाचे तेव्हा येवोत पण त्या भागातील आपल्या मराठी बांधवांना, सीमावासीयांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकार या वर्षामध्ये निश्चितपणे चांगले उपक्रम हाती घेईल, असा मला या निमित्ताने विश्वास वाटतो. एकूणच या लोकशाही आधाडी सरकारचे जे पुढचे वर्ष आहे ते वर्ष विकासाच्या दिशेने टाकलेले एक भरभक्कम पाऊल असेल अशा पध्दतीचे दिशानिर्देश माननीय राज्यपालांच्या या अभिभाषणतून मिळत असल्यामुळे मी माननीय राज्यपालांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ( विधानभेने निवडलेले ) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांचे अभिभाषण पाहिले, वाचले आणि मी त्या दिवशी अभिभाषणाच्या वेळी प्रत्यक्ष उपस्थितही होते. पण ते भाषण ज्यावेळी ऐकले त्यावेळी माझ्या मनाला अतिशय वेदना झाल्या. मघाशी या ठिकाणी कौतुक केले गेले. पण या अभिभाषणाबद्दल मी चार ओळी सांगणार आहे.

"भाषणातील आकडे आपल्याला भावले
मला मात्र अंतरातील शब्द हृदयाला भिडले
शब्दाच्या जंजाळात साखळदंड आले
म्हणूनच गळ्याला आमच्या दोरखंड आले"

सभापती महोदय, खऱ्या अर्थाने या संपूर्ण अभिभाषणामध्ये महिलांवरील अत्याचाराबाबत काहीही उल्लेख नाही. महिलांसाठी 50 टक्के आरक्षण घोषित झाल्याचे आम्ही वर्तमानपत्रामध्ये वाचले पण त्याचाही उल्लेख या अभिभाषणामध्ये आलेला नाही. महिलांवर होणारे बलात्कार, मुलींवर होणारे बलात्कार, त्यांचे मृत्यू याचाही कोठे उल्लेख नाही. भ्रूणहत्या हा अत्यंत महत्वाचा विषय आहे पण त्याचाही अभिभाषणात कोठेही उल्लेख नाही. म्हणून माझ्या मनाला असे वाटले की, या महाराष्ट्र राज्याला महिला आपल्याला 50 टक्के मतदार म्हणून मान्य आहेत पण या ठिकाणी अधिकारात आणि राजकारणात आम्ही कोठे असावे असे या शासनाला वाटत नाही का याबद्दलही मला दु:ख वाटले.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

2000 साली जेव्हा सर्व्हे झाला त्यावेळी राज्यात एक हजार पुरुषांमागे 917 महिलांची संख्या होती. ऑक्टोबर, 2010 मध्ये सर्व्हे झाला त्यावेळी एक हजार पुरुषांमागे 780 महिलांची संख्या असल्याची माहिती समोर आली आहे. याचा विचार कोठे होणार की नाही ? सभापती महोदय, आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीमध्ये दोन प्रश्न राज्यातील मुलींच्या जन्मदराबाबत होते. हे दोन प्रश्न आल्यामुळे मला आनंद झाला. या प्रश्नांना शासनाकडून काही तरी उत्तर मिळेल असे वाटले होते. परंतु चौथ्या क्रमांकावर असलेल्या प्रश्नाबाबत अहवाल प्राप्त झाला नसल्याचे उत्तर देण्यात आले आहे. जुलै महिन्यामध्ये याच सभागृहामध्ये माननीय आरोग्य मंत्र्यांनी आम्हाला शब्द दिला होता की, शासन कोल्हापूर पॅटर्नच्या धर्तीवर लेक वाचवा अभियान राबवून स्त्री भ्रूण हत्या थांबविण्याचा सहा महिन्यात प्रयत्न केला जाईल. आता तर तज्ज्ञ समितीचा अहवालच सादर झाला नसल्यामुळे प्रश्नच उद्‌भवत नाही. महिलांच्या आयुष्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. स्त्री भ्रूण हत्येचा प्रश्न उपस्थित होत नाही. त्यामुळे या अभिभाषणाचे कौतुक कसे करावे असा माझ्यासमोर प्रश्न आहे.

सभापती महोदय, विदर्भातील सिंचनाचा अनुशेष प्रचंड वाढत आहे. "माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्नशील आहे" असे नमूद केले आहे. या शब्दांमागे असलेला जंजीर, असलेला खंजीर कोणाला दिसत नाही. अभिभाषणात असे नमूद करण्यात आले आहे की, "अनुशेष व विकास खर्चाच्या समान वितरणाच्या समस्येचा नव्या दृष्टीने विचार करण्यासाठी व साधनसंपत्तीचे समान वाटप होण्यासाठी निश्चित असे पर्यायी मार्ग शोधण्याकरिता तज्ज्ञांची एक समिती स्थापन करण्यात येत आहे." समन्यायी वाटपासाठी ही तज्ज्ञ समिती कित्येक वर्षापासून नेमण्याचे शासनाचे प्रयत्न सुरु आहेत. आम्ही अनेक वेळा या समितीला रोखले आहे. प्रत्येक वेळी आम्हाला राज्यपालांनी साथ दिली आहे. विदर्भाचा, मराठवाड्याचा विकास झाला पाहिजे असे सांगून सिंचनाच्या अनुशेषाचा प्रश्न तसाच ठेवला जात आहे. आणखी एक तज्ज्ञ समिती नेमण्याचे षडयंत्र विदर्भ व मराठवाड्याच्या पाठीत खंजीर खुपसण्यासाठी रचलेले आहे. आमच्या भागाच्या पैशावर डोळा ठेवून ही नवीन दुरुस्ती सुचविली आहे. त्यामुळेच या अभिभाषणातील शब्दांचे जंजाळ आम्हाला कळले नाही.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्रीमती शोभा फडणवीस....

विदर्भातील लोक साधेसुधे असतात.

माननीय राज्यपालांनी दिनांक 6.3.2008 रोजी सिंचन क्षेत्रासंबंधी निर्देश दिले होते. त्यातील परिच्छद क्र.7.8 अनुसार गोदावरी खोऱ्यात महाराष्ट्र राज्यासाठी उपलब्ध असलेल्या एकूण पाण्यापैकी 203 टीएमसी पाणी उचलण्याचे अद्यापही विदर्भात नियोजन झालेले नाही. प्रत्येक वेळी सांगितले जाते की, शासनाने गोदावरी प्रकल्पासाठी एवढ्या पैशाची तरतूद केली आहे. हे जबरदस्त षडयंत्र सुरु आहे. बजेटच्या पुस्तकात मोठमोठे आकडे येतात. प्रत्यक्षात 31 मार्चपर्यंत पैसा येत नाहीत, अशाप्रकारच्या षडयंत्राला आम्हाला आयुष्यभर सामोरे जावे लागत आहे. ते पैसे सुध्दा आम्हाला मिळू नयेत यासाठी तज्ज्ञ समितीचे षडयंत्र रचले जाते आहे. त्यामुळे या तज्ज्ञ समितीला माझा तीव्र विरोध आहे. या अभिभाषणात असेही नमूद केले आहे की, सन 2010-11 या वर्षाकरिता अतिरिक्त सिंचन क्षमता निर्माण करण्यासाठी 7919 कोटी रुपयांची तरतूद केली आहे आणि ती राज्यातील सिंचन प्रकल्पांकरिता करण्यात आलेली आतापर्यंतची सर्वाधिक तरतूद आहे. याबरोबरच 1.75 लाख हेक्टर अतिरिक्त सिंचन क्षमता निर्माण करण्याचे देखील योजिले आहे" या तरतुदीचे यापूर्वीच्या वक्त्यांनी कौतुक केले होते. परंतु प्रत्यक्षात आमच्या भागात या पैशाचे वाटप झालेले नाही. अजूनही आवश्यक असलेला पैसा गोदावरी खोऱ्यासाठी आलेला नाही. हा शब्दांचा व आकड्यांचा खेळ आहे असे मी म्हणते. पैसे कोठे जातात, कोणाचा विकास होतो ते सगळ्यांना माहीत आहे. आमचा आदिवासी माणूस कपड्यावरुन लंगोटीपर्यंत आलेला आहे, त्याकडे कोणाचेही लक्ष नाही याचे आम्हाला दुःख होते. राज्यातील अनेक गावे बारमाही रस्त्याने जोडले गेले आहेत. माननीय मुख्यमंत्री धारणीला गेले होते. मेळघाटातील आदिवासींचे दुःख बघण्यासाठी गेले होते. परंतु केवळ अधिकाऱ्यांच्या व एनजीओंच्या गराड्यामध्ये अडकून राहिले. मुख्यमंत्री महोदयांनी खऱ्या आदिवासींचे दुःख बघितले आहे काय, मेळघाटात असलेले दलाल पाहिले का ? हे लोक शासनाची दिशाभूल करीत आहेत. मेळघाटातील आदिवासी भागात रस्ते नाहीत. आमचा पैसा कोठे गेला. पुनर्वसनाच्या नावाखाली त्या लोकांना ट्रकमध्ये भरुन बंदुकीच्या जोरावर नेऊन

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

सोडून देतात. त्यांना रस्ते नाहीत, पाणी नाही, त्यांना घर नाही, घर दिले तर घरावर कौले नाहीत. पैसे सुध्दा नाहीत. जनावरापेक्षा त्यांची वाईट अवस्था आहे. त्यांच्याकडे कोण बघणार, बारमाही रस्ते कोठून येणार ? ना मेळघाटमध्ये रस्ते आले ना गडचिरोलीला आले. या जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील 50 टक्के गावे आजही रस्त्यांनी जोडलेली नाहीत.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती ॲड.उषा दराडे)**

यानंतर श्री.शिगम.....

अस्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 16:10

श्रीमती शोभा फडणवीस....

पिण्याचे पाणी नाही. सद्य:परिस्थितीमध्ये आम्हाला नाल्याचे पाणी प्यावे लागत आहे. ही 63 वर्षाच्या स्वातंत्र्याची शोकांतिका आहे. याठिकाणी मात्र राज्यपालांच्या अभिभाषणाचे आपण कौतुक करीत आहात. आम्हाला असा प्रश्न पडत आहे की, आम्ही खरेच या स्वतंत्र भारतात राहात आहोत काय, या भारताचे आम्ही नागरिक आहोत काय ? मी मेळघाटमध्ये गेले होते. त्यावेळी तेथील आदिवासी मला म्हणाले की, ताई आम्हाला जहर आणून द्या, आमची जिवंत राहाण्याची इच्छा नाही. हा काय प्रकार आहे, यांच्याकडे कोण पहाणार आहे, रस्ते कुठे कुठे जोडलेले आहेत, कुणाच्या डोक्यातील हा विचार आहे, बारमाही रस्त्याने गावे जोडली, हे येथे कसे काय सांगण्यात आले ? आजही राज्यातील 40 टक्के रस्ते बारमाही रस्त्याना जोडलेले नाहीत. अनुशेषाच्या रिपोर्टमध्ये ही सर्व आकडेवारी आहे. परंतु तो रिपोर्ट वाचण्याची आपणाला इच्छा होत नाही. अनुशेष भागातील रस्ते बारमाही रस्त्यांना जोडले गेले नाहीत.

सभापती महोदय, बेरोजगारांना नोक-या देण्याच्या बाबतीत देखील आपण फार मोठ्या प्रमाणावर मागे आहोत. मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करतो की, त्यांनी एकदा तरी आमच्या बरोबर येऊन परिस्थितीची पहाणी करावी. त्यांना सत्य परिस्थिती काय आहे हे आम्ही दाखवू. नक्षलवादी कारवाया सक्षमतेने हाताळण्यासाठी पोलिसांना विशेष प्रशिक्षण देण्यात येईल असा उल्लेख अभिभाषणामध्ये करण्यात आलेला आहे. आमच्या भागामध्ये नक्षलवादी पोलिसांना गोळया घालून मारतात आणि पोलीस आदिवासींना झोडपून काढून नक्षलवादी म्हणून महिनोन महिने जेलमध्ये टाकतात. या आदिवासींना कोण वाली आहे, या आदिवासींचे शब्द कोण ऐकणार आहे? केवळ "आम आदमीसाठी आम्ही आहोत" असे म्हणून काही होत नाही. तर या आम आदमीच्या पाठीवर जोपर्यन्त तुमचा हात येणार नाही, जोपर्यन्त त्याला तुमचा प्रेमाचा शब्द मिळणार नाही तोपर्यन्त या देशाला स्वातंत्र्य मिळालेले आहे असे कुणीही म्हणू शकणार नाही. आज आदिवासींची मोठया प्रमाणावर छळवणूक होत आहे. कोणता विशेष कार्यक्रम सरकार राबवित आहे. गेली 25 वर्षे मी विधानसभेमध्ये होते. त्या ठिकाणी "विशेष कार्यक्रम" हे शब्द ऐकून मी थकून गेले. अजूनही आमच्या भागामध्ये रस्ते होत नाही. मेळघाटातील कुपोषण अजूनही संपत नाही. मेळघाटमध्ये आजही शाळा नाहीत. मुलांच्या शिक्षणाची सोय नाही. शाळेत जाण्याकरिता 50 कि.मी.दूर जावे लागते.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

सभापती महोदय, पाटबंधारे विभागाने पुनर्वसन योग्य पध्दतीने न केल्यामुळे तेथील लोकांना जंगली अवस्थेत राहावे लागत आहे. तेथे कोठेही रस्ते झालेले नाहीत. मग आमचा विकास झाला असे कोण म्हणते ? वन परिक्षेत्रामध्ये 2011-12 हे वर्ष पर्यटन वर्ष म्हणून साजरे होणार आहे. घरात मोठा माणूस येणार म्हणून घरातील कचरा बाहेर काढला जातो आणि म्हाता-या माणसाला मागच्या खोलीमध्ये ठेवले जाते. कारण येणा-या माणसाला घर चांगले दिसले पाहिजे. अशी स्थिती आमच्या आदिवासींची झालेली आहे. त्याठिकाणी जेव्हा जेव्हा मुख्यमंत्री भेटीसाठी येतात त्या त्या वेळी आमच्या आदिवासींची तोंडे गप्प केली जातात. त्यावेळी मुख्यमंत्र्यांच्या समोर हाजी हाजी करणारे लोक फार असतात. आदिवासींना मात्र गावाच्या बाहेर कुठे तरी ठेवले जाते. त्यांना बोलायची संधीच दिली जात नाही. एवढी दडपशाही, हुकूमशाही, हिटलरशाही या राज्यामध्ये आज चालू आहे. ही हिटलरशाही केव्हा कमी होईल, आम्हाला केव्हा न्याय मिळेल ? आमचा आदिवासी बांधव हा अज्ञानी आहे, अडाणी आहे आणि सर्वात महत्वाचे म्हणजे तो भित्रा आहे. त्यामुळे त्याच्यावर दडपण आणणे सोपे जाते. त्यांच्यासाठी कोणती पुनर्वसनाची योजना केली, कोणते पुनर्वसन केले ?

पर्यटनाच्या नावाखाली व्याघ्र प्रकल्प जाहीर केला गेला. या व्याघ्र प्रकल्पक्षेत्राच्या आतील लोकांचे अजून पुनर्वसन झाले नाही. त्या क्षेत्राची वाढ करुन बफर झोन घोषित केला. अजून बफर झोन मधील कोणाचेही पुनर्वसन झालेले नाही. पुनर्वसनासाठी, व्याघ्र प्रकल्पासाठी केन्द्र शासनाकडून निधी येणार आहे.मी मेळघाटमध्ये फिरले. तेथील सर्व आदिवासींना मी विचारले की, कोणी वाघ बघितले का ? त्यांनी सांगितले की, 6 वर्षात आम्ही वाघ बघितले नाहीत. मी ताडोबाची असल्यामुळे मी वाघ बघितलेले आहेत. सभापती महोदय, जेथे वाघ नाहीत तेथे व्याघ्र प्रकल्पाच्या नावाखाली बफर झोन केला जातोय. आमच्या ताडोबामधे असलेल्या 42 वाघांची संख्या गेल्या 10 वर्षामध्ये 43 सुध्दा झालेली नाही. तेथे एकही वाघ जन्माला आला नाही. कारण ताडोबामध्ये पाहिजे त्या प्रमाणात पाणी नाही, खाद्य नाही, रेंजर नाही, गाड्या नाहीत. तुम्ही तुमचे लेकरु सांभाळू शकत नाही काय ? आता बाहेरच्या क्षेत्रात असलेले वाघ ताडोबा क्षेत्रामध्ये आहेत असे सांगून केन्द्राकडून पुन्हा पैसे मागितले जातील. या व्याघ्र प्रकल्पाच्या नावाखाली आम्हा लोकांना जीवन

..3..



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 16:10

श्रीमती शोभा फडणवीस....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जगणे कठीण झालेले आहे. पर्यटन क्षेत्र म्हणून बाहेरचे लोक आमच्याकडे येतील आणि फिरुन जातील. पण आम्ही कुठे जाणार ? एकदा बिट्टू सेहगल माझ्याकडे आले आणि म्हणाले की, "ताई 10 साल के बाद हम बम्बई वाले यहाँ आयेंगे तो हमको शेर बहुत अच्छी संख्या में दिखाई देंगे" मी म्हटले, साहेब तुमचे बरोबर आहे आमच्याकडे तुम्हाला वाघ दिसतील आणि आम्ही मात्र झ ााडावर लंगोट्या घालून दिसू. कारण वाघ खाली आले तर आम्ही कुठे जाणार, आदिवासी कुठे जाणार ?

....नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

ते आम्हाला जंगलात फिरु देणार नाही. जंगलात कामे करु देणार नाहीत. जंगलात आम्हाला सुख देणार नाही. माणूस म्हणून आम्हाला जगू देणार नाही. आम्ही पुन्हा पूर्वीप्रमाणे आदिवासी सारखे लंगोटया लावून झाडावर राहणार. खाली मात्र तुम्ही मजा करुन कोंबडया खावून निघून जाणार. माननीय राज्यपाल महोदयांचे भाषण वाचल्यानंतर मला अतिशय वाईट वाटले. तत्कालीन मुख्यमंत्री श्री. अशोकराव चव्हाण हे मेळघाट येथे आले होते. त्यांनी वन जमिनीच्या 400 पट्टयांचे वाटप केले. त्या पट्टयांवर उप वन संरक्षकाची सही आहे. उपायुक्त, आदिवासी विकास यांची सही आहे. त्यावर जिल्हाधिकारी यांची सही आहे. अधिकृतपणे पट्टयांचे वाटप झाले आहे. आदिवासींना अधिकृत पट्टे मिळालेले आहेत. परंतु माननीय श्री. अशोकराव चव्हाण हे मुख्यमंत्री पदावरुन गेल्यानंतर अधिकारी मेळघाट येथे गेले आणि आदिवासींना सांगू लागले की, आमचे पट्टे परत द्यावेत. हा कुठला न्याय आहे ? त्यांनी ॲज ए चेअर म्हणून वाटप केले की, श्री. अशोक चव्हाण म्हणून वाटप केले ? शासकीय अधिकाऱ्यांवर सरकारचा कंट्रोल आहे की नाही हाच खरा महत्वाचा प्रश्न आहे. तुमचे सचिव तुम्हाला ऐकत नाही. तुम्ही या ठिकाणी सांगता की, अवकाळी पावसाचा जी.आर.जिल्हाधिकाऱ्यांना पाठविला. याबाबतीत जिल्हाधिकारी यांच्याकडे गेल्यानंतर ते आम्हाला सांगतात की, आमच्याकडे त्यासंबंधीचा जी.आर.अजून प्राप्त झालेला नाही. शेतकऱ्यांना 50 हजार रुपयांचे कर्ज बिनव्याजी म्हणून देण्यासंबंधी जी.आर.संबंधितांकडे पाठविला आहे असे सांगितले जाते. यासंदर्भात मी बँकेला नोटीस दिली, बँकेने मला सांगितले की, बिनव्याजी कर्ज देण्याचा शासनाचा जी.आर.आमच्याकडे अजून आलेला नाही.

यासंदर्भात विधानसभेत प्रश्न उपस्थित केला गेला त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, आम्ही 2010-11 संबंधी बोललो होतो. परंतु ते कर्ज आम्ही 2011-12 या वर्षात देऊ. लबाडाचे आमंत्रण जेवल्यानंतर खरे समजावयाचे नसते. 2011-12 मध्ये तरी मिळेल की नाही याबाबतीत शंका आहे. केवळ शब्दाच्या जंजाळामध्ये आम्हाला टाकावयाचे. या सभागृहात मधाची बोटे चाटवावयाचे आणि तिकडे गेल्यानंतर आदिवासी लोकांना, दलित लोकांना फसविण्याचे काम सरकार करीत असेल तर अशा सरकारला पदावर राहण्याचा अधिकार नाही. जो घोडयावर बसतो, त्याने घोडयाचा चाबूक स्वत:च्या हातात ठेवला पाहिजे. घोडा उधळून तुम्हाला पाडून टाकत असेल तर याला राज्य चालविणे असे म्हणता येणार नाही एवढे बोलून मी माझे भाषण
संपविते.धन्यवाद.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ( मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदया, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर सत्ताधारी पक्षाचे व विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य बोलले. या अभिभाषणामध्ये अनेक गोष्टी दिलेल्या आहेत. दरवर्षाप्रमाणे माननीय राज्यपालांचे अभिभाषण मध्यवर्ती सभागृहात होते. त्या अभिभाषणावर सभागृहात चर्चा होते. त्यानंतर राज्याचा अर्थसंकल्प सभागृहात सादर होतो. अभिभाषणात असलेल्या काही गोष्टींचा अंतर्भाव अर्थसंकल्पात होत असतो. परंतु त्या गोष्टींचा पैसा मात्र संबंधित घटकाला मिळत नाही. संबंधित विभागास मिळत नाही. एक गोष्ट सत्य आहे व ती माननीय मंत्री देखील कबूल करतील. ज्या योजना जाहीर केल्या जातात, त्या किती टक्के अमलात आणल्या जातात. 40 टक्के अमलात येतात, 50 टक्के अमलात येतात अथवा 60 टक्के योजना अमलात येतात. या योजनांच्या पैशांना दरवर्षी शासनाकडून कट लावला जातो. दुर्दैवाने असे म्हणावे लागते आहे की, माननीय राज्यपालांनी राज्यातील जनतेला कोणताही मॅसेज दिलेला नाही. कोणत्याही प्रकारचा संदेश दिलेला नाही. महाराष्ट्र राज्यात सुवर्ण महोत्सवी वर्ष सुरु आहे. म्हणून माननीय राज्यपालांनी थोडे तरी मराठीतून भाषण करावे अशी अपेक्षा होती. परंतु ती अपेक्षा पूर्ण झाली नाही.

सभापती महोदया, माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणातून राज्यातील शेतकऱ्यांना 1088.88 कोटी रुपयांचे आर्थिक मदतीचे पॅकेज दिले. आपण आर्थिक पॅकेज विषयी नेहमी चर्चा करीत असतो. मी लोकलेखा समितीचा सदस्य आहे. लोकलेखा समितीमध्ये देखील या पॅकेजवर अनेक वेळा चर्चा झाली आहे. या पॅकेजच्या संदर्भात लोकलेखा समितीने एक सब कमिटी देखील नेमली होती. लोकलेखा समितीच्या अहवालात या पॅकेजच्या संदर्भात अनेक गोष्टींचा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यामुळे मी पॅकेजच्या संदर्भात बोलू शकतो. समितीत घडलेल्या गोष्टी सभागृहात बोलत नसतो. लोकलेखा समितीचा अहवाल सभागृहासमोर आलेला आहे. परंतु आर्थिक पॅकेजची मदत शेवटच्या शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेली नाही. यात दोष राज्यकर्त्यांचा आहे की अधिकाऱ्यांचा आहे, हा संशोधनाचा विषय आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती फडणवीस यांनी मघाशी सांगितले की, घोडयावर बसताना घोडयाची लगाम आपल्या हातात असला पाहिजे. परंतु घोडयाचा लगाम आपल्या हातामध्ये ठेवण्यात शासन अयशस्वी झालेले आहे ही गोष्ट मात्र खरी आहे.

3...



ABG/ KTG/ KGS/ प्रथम श्री.शिगम 16:15

डॉ.दीपक सावंत...

सभापती महोदया, या अभिभाषणामधील 18 व्या क्रमांकावर मत्स्यगंधा महोत्सवाचा उल्लेख करण्यात आलेला आहे. या मत्स्यगंधा महोत्सवानंतर दुसऱ्या दिवशी काही बातम्या वृत्तपत्रात छापून आल्या होत्या, त्याकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो....

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.......

आपल्यापैकी किती जण या मत्स्यगंधा महोत्सवाला उपस्थित होते? आपण हृदयावर हात ठेवून सांगा, या मत्स्यगंधा महोत्सवाला किती लोक आले होते. या महोत्सवाची जाहिरात कशी झाली होती? या विषयावर प्रचंड वादळ उठले होते. मत्स्यगंधा महोत्सवाचा संपूर्ण तंबू ओसाड पडल्याचे दृश्य दूरदर्शनवर दाखविले गेले. या मत्स्यगंधा महोत्सवाच्या माध्यमातून कोळी बांधवांना पुढे आणण्याचा प्रयत्न केला गेला. माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर निश्चित सांगू शकतील. अजूनही मच्छीमारांना डिझेलवरील सबसिडीची रक्कम दिली गेली नाही. फयान वादळामुळे मच्छीमारांचे जे नुकसान झाले त्याबद्दल आर्थिक मदत जाहीर केली गेली, परंतु अद्याप त्यांच्यापर्यंत ही आर्थिक मदत पोहोचली नाही ही सत्य परिस्थिती आहे. ही आर्थिक मदत केव्हापर्यंत त्यांना दिली जाणार आहे? फयान वादळामुळे मच्छीमारांचे नुकसान झाले. त्याचबरोबर 26/11 च्या घटनेनंतर कायदेशीर निर्बंध लादले गेल्यामुळे मच्छिमार बांधव संकटात सापडले आहेत. परदेशी ट्रॉलर्सच्या आक्रमणामुळे ते त्रस्त झालेले आहेत. त्यामुळे मत्स्यगंधा महोत्सव साजरा करुन कोळी बांधवांबद्दल जे प्रेम दाखविले गेले आहे ते बेगडी आहे असे आमचे मत आहे.

सभापती महोदय, बाल कामगार हा या राज्याचा, विशेषकरुन मुंबईचा महत्वाचा विषय आहे. बाल कामगारांची मुक्तता करुन त्यांना औपचारिक शिक्षणाद्वारे मुख्य प्रवाहात आणण्याचा शासनाचा मानस आहे. मध्यंतरी गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी हा विषय संवेदनशीलतेने हाताळला होता. दुर्दैवाने काही दिवसानंतर या विषयाकडे का दुर्लक्ष झाले मला माहित नाही. बाल कामगारांना रिमांड होममध्ये आणून नोकरी किंवा शिक्षणाच्या प्रवाहामध्ये समाविष्ट करुन घेण्याबाबत सुतोवाच केले होते. त्याचे पुढे काय झाले? आजपर्यंत किती बाल कामगारांना मुख्य प्रवाहात आणले गेले, किती बाल कामगारांना सुशिक्षित केले, किती जणांना नोकऱ्या उपलब्ध करुन दिल्या हा विषय संशोधनाचा आहे. केवळ लिहिण्यासाठी या गोष्टी अभिभाषणात नमूद केल्या आहेत.

सभापती महोदय, जैतापूर प्रकल्पाबाबत फार मोठी चर्चा झाली. माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी अत्यंत ज्वलंत विषयाला हात घातला. त्यांच्या वैयक्तिक मताबद्दल मी भाष्य करणार नाही. परंतु माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी माझ्या एका प्रश्नाला उत्तर देताना जे सांगितले, त्यामुळे पुन्हा एकदा अंतर्मुख होऊन शासनाने या प्रकल्पाबाबत विचार करणे आवश्यक

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.......

आहे. 2065 प्रकल्पग्रस्तांपैकी केवळ 131 प्रकल्पग्रस्त शासनाकडे विचारविनिमयासाठी आले. लोकांच्या मानसिकतेचे हे प्रतिबिंब आहे असे म्हणावे लागेल. जपानमध्ये जी दुर्दैवी घटना घडली अशी घटना कोणत्याही राष्ट्रात होऊ नये. परंतु जपानमधील घटनेनंतर जे भयानक व विदारक चित्र समोर येत आहे त्यामुळे लोकांच्या मनामध्ये शंकेचे ढग निर्माण झाले आहेत. लोकांच्या मानसिकतेचा विचार करुन पुन्हा एकदा जैतापूर प्रकल्प जरी महत्वाकांक्षी असला आणि राज्य शासनाने तो डोक्यावर घेतला असला तरी या प्रकल्पाबाबत पुनर्विचार करणे अत्यंत आवश्यक आहे.

नंतर 3टी.1....

अशुध्दीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ........

महोदय, राज्यात 9266 अंगणवाड्या सुरु करण्याचा उल्लेख या अभिभाषणात केलेला आहे. पण आज या अंगणवाडी सेविकांची काय स्थिती आहे याचा शासनाने विचार केला आहे काय ? तसेच या अंगणवाडी सेविकांचे पगार आता नुकतेच शासनाने वाढविले. त्यांना प्रत्येक अधिवेशनात भाऊबीजेची भेट मिळावी म्हणून दरवेळी मागणी करावी लागते, धरणे धरावे लागते. तरीही त्यांना त्या त्या वर्षी ती भेट मिळत नाही, कधी तरी दुसऱ्या वर्षी मिळते. त्याचप्रमाणे आपल्या राज्यातील किती अंगणवाड्या आज शासनाच्या जागेत आहेत व किती भाड्याच्या जागेत आहेत व त्यातील सेविकांना आपण काय न्याय देणार ? यांचा मात्र कुठेही उल्लेख दिसत नाही.

तिसरी महत्वाची गोष्ट म्हणजे क्र. 37 वर शासनाने इंदिरा गांधी मातृत्व सहाय्य योजना नावाची एक नवीन योजना महिलांसाठी सुरु करण्याचा विचार केला आहे. ही योजना प्रामुख्याने भंडारा व अमरावती या दोन जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. त्याचबरोबर मी असेही निदर्शनास आणून देणार आहे की, सध्या आपल्याकडे जननी सुरक्षा योजना आणि माहेर योजना अशा दोन योजना सुध्दा महिलांसाठीच राबविल्या जात आहेत, त्यांचे काय झाले याचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. या दोन योजना सुरु असताना आणखी एक नवीन व तशाच स्वरुपाची योजना आणण्याचे कारण काय आहे ? केंद्रशासनाच्या इंदिरा गांधी सहाय्य योजना आणि माहेर योजना अशा दोन्ही योजनांमध्ये बाई बाळंतीण झाल्यानंतर तिला एक साडी, रोख पैसे आणि औषधे दिली जातात. अशा प्रकारे एक माहेरवाशीण म्हणून ट्रिट केले जाते पण दुर्दैवाने या योजनेमार्फत साडी, रोख पैसे व औषधे सुध्दा मिळत नाहीत. मी सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांच्या बरोबर अनेक वेळा मेळघाटमध्ये गेलो. आपणही भेट देत असल्याची माहिती मला मिळाली आहे. तेव्हा आपण देखील विचार करावा की, नव्याने सुरु केलेल्या या योजनेचा काय फायदा होणार आहे ?

सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी आपल्या भाषणातून माननीय राज्यपालांचे व सरकारचे अभिनंदन केले. या अभिभाषणातील क्र. 40 वर आपद्ग्रस्तांना वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी 690 रुग्णवाहिका पुरविण्याचे शासनाने ठरविले आहे. मला आठवते की, माननीय श्री. दिग्विजय खानविलकर हे आरोग्य मंत्री असतानाच्या काळात राजर्षि शाहू महाराज

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .......

योजनेमार्फत अशा प्रकारच्या ॲम्बुलन्स गाड्या घेतल्या होत्या पण त्यातही प्रचंड गैरव्यवहार झाला होता. शेवटी त्या ॲम्बुलन्स कोणालाच मिळाल्या नाहीत, फक्त धूळ खात पडून आहेत, अशी परिस्थिती आहे. आपण आता तातडीची वैद्यकीय सेवा पुरविणार म्हटले तर त्यासाठी डॉक्टर्स, नर्सेस व आवश्यक इन्स्ट्रुमेंट्सची गरज लागणार आहे. पण आजची परिस्थिती पाहिली तर प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय तसेच सिव्हील हॉस्पिटलमध्ये डॉक्टर्स नाहीत, फिरती पथके नेमली पण ती देखील बंद आहेत. अशा प्रकारे केवळ घोषणेपुरतेच हे सांगितले की काय अशी मला शंका येत आहे, त्याचा खुलासा व्हावा.

क्र. 41 वर म्हटल्याप्रमाणे अन्न सुरक्षा कायदा, 2006 मध्ये केला असून त्याची अंमलबजावणी करण्याची तयारी शासनाने केली असल्याचे म्हटले आहे. पण शासनाकडे या कामासाठी पुरेसा स्टाफच नसल्याने अंमलबजावणी कशी करणार याचा खुलासा झाला पाहिजे.

यानंतर क्र. 46 वर केंद्र शासनाच्या आधार प्रकल्पाची सुरुवात म्हणून नंदुरबार जिल्ह्यातील टेंबली गावात उद्‌घाटन करुन झाली. त्यावेळेस कॉंग्रेस पक्षाच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांच्या हस्ते त्या योजनेचे उद्‌घाटन झाले होते. तसेच हा प्रकल्प सन 2012 पर्यंत 10 कोटीपेक्षा अधिक रहिवाशांना सामावून घेण्यासाठी राज्यभरात राबविण्यात येणार असल्याचे म्हटले आहे. पण राज्यातील कोणकोणत्या भागात अशी ओळख पत्रे वाटप करण्यात आली ? माझ्या माहितीप्रमाणे कोणत्याही भागात ही ओळख पत्रे अद्याप वाटलेली नाहीत, अशी परिस्थिती आहे. या कामासाठी संगणकीकरणाचे जे कंत्राट दिले त्यात प्रचंड भ्रष्टाचार झाला आहे, याचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे.

महोदय, सन 2009 मध्ये आपण फी नियमन करण्याबाबत सांगितले होते. तसेच मोफत व सक्तीचे शिक्षण मिळण्याचा अधिकार देशातील नागरिकांना मिळाला. मग अगोदर सुरु असलेल्या आपल्या सर्व शिक्षा अभियान योजनेचे काय झाले याचाही खुलासा झाला पाहिजे. केंद्र शासनाने नवीन कायदा केल्यानंतर देखील सर्व शिक्षा अभियान योजनेला पाच वर्षांची मुदतवाढ दिली त्याचे कारण काय आहे ? याबाबतची माहिती सभागृहात मिळणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

या दोन्ही योजनांचे उद्दिष्ट एकच आहे.

**तालिका सभापती** (ॲड.उषा दराडे ) : सभागृहाची वेळ अर्ध्या तासाने म्हणजे 5.00 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

डॉ. दीपक सावंत : शासनाने क्रीडा धोरण, युवा धोरण जाहीर केलेले आहे परंतु ज्येष्ठ नागरिकांसाठी एकही धोरण जाहीर केलेले नाही. राज्याच्या दृष्टीने ज्येष्ठ नागरिक ही सर्वात मोठी समस्या बनलेली आहे. त्यामुळे राज्याने ज्येष्ठ नागरिकांसाठी धोरण आखण्याची गरज आहे.

सभापती महोदय, आदिवासी भागात केवळ 75 कनिष्ठ महाविद्यालये आहेत. इतक्या कमी प्रमाणात कनिष्ठ महाविद्यालये असतील तर आदिवासी भागातील विद्यार्थी शिक्षण कसे काय घेऊ शकतील ? आठवी ते दहावीमध्ये गळतीचे प्रमाण सर्वात मोठे असते. यामध्ये मुलींच्या गळतीचे प्रमाण सर्वात जास्त आहे. परंतु यासंदर्भातील उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कोठेही दिसून येत नाही. आदिवासींच्या शिक्षणासाठी शासनाने कोणतेही धोरण आखलेले नाही.

सभापती महोदय, महाराष्ट्रात एडस्च्या रुग्णांची संख्या मोठया प्रमाणात वाढत आहे. परंतु या एवढया गंभीर गोष्टीचा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कोठेही उल्लेख नसल्यामुळे मी माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर खेद व्यक्त करुन माझे भाषण पूर्ण करतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र...

-----

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक ) सभापती महोदय, माननीय राज्यपालाच्या अभिभाषणाचे मी बारकाईने वाचन केले असून हे अभिभाषण अत्यंत चांगल्या पध्दतीचे व राज्याला एक नवी दिशा दर्शवणारे आहे.

माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये 70 मुद्यांचा ऊहापोह करण्यात आलेला आहे. चांगल्याला चांगले म्हणणे ही आपली संस्कृती आहे. महाराष्ट्र राज्य हे प्रगतीकडे वाटचाल करणारे राज्य आहे. या राज्याने सन 2010-11 मध्ये विकास कार्यक्रमासाठी 3828 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. गेल्या वर्षीच्या वाढीपेक्षा यामध्ये 53 टक्क्याने वाढ झालेली आहे. गोंदिया, गडचिरोली या ठिकाणी जो नक्षलवाद फोफावतो आहे त्याचा बिमोड करण्यासाठी शासन कोटयावधी रुपये खर्च करीत असून नक्षलवादाचा बिमोड करण्यासाठी माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी गडचिरोली जिल्हयाचे पालकत्व स्वीकारलेले आहे. नक्षलवादाचा मुकाबला करण्यासाठी नागपूर येथे अल्फा हॉक अकादमी सुरु करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, ग्रामीण भागातील जे काही तंटे असतात ते ग्रामीण भागातच मिटले पाहिजे ते पोलीस स्टेशन पर्यंत येता कामा नये यासाठी माननीय गृहमंत्र्यांनी महात्मा गांधी तंटामुक्त गाव योजना सुरु केली असून या योजनेमुळे 4247 गावे तंट्यातून मुक्त झालेली आहेत. या तंटामुक्ती गावांना बक्षीसे सुध्दा देण्यात आलेली आहेत.

सभापती महोदय, मुंबईमध्ये वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे मुंबईमध्ये प्रदूषणाची समस्या मोठया प्रमाणात उभी राहिलेली आहे. ज्या जुन्या टॅक्सीज आहेत त्या टॅक्सीजमुळे मोठया प्रमाणात प्रदूषण होत असल्यामुळे त्या काढून टाकल्या पाहिजेत. भविष्यामध्ये हायब्रीड कार, सौर ऊर्जेवर चालणारी वाहने या राज्यात आली पाहिजेत व ही वाहने अधिक प्रमाणात येण्यासाठी त्यांना शासनाने मोठया प्रमाणात कर सवलत देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, भारत देश हा कृषी प्रधान देश आहे. सिंचन क्षमता वाढविण्यासाठी राज्य शासनाने अनेक महत्वाची पाऊले उचलली आहेत. जवळपास 7119 कोटी रुपयांची तरतूद सिंचनासाठी महाराष्ट्र शासनाने केलेली आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.विक्रम काळे ...

त्यामुळे, माननीय उप मुख्यमंत्री आणि या खात्याचे मंत्री श्री. अजित दादा पवार यांचे अभिनंदन केले पाहिजे. बॅरेजेस तयार करण्याची संकल्पना माननीय उप मुख्य मंत्री श्री. अजित दादा पवार यांच्याच मुळे राज्यामध्ये राबविण्यात आली होती. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांना मी सांगू इच्छितो की, चांगल्या गोष्टीला चांगले म्हणण्याचे आपण शिकले पाहिजे. मराठवाडयातील गोदावरी आणि मांजरा या नद्यांवर बॅरेजेस बांधण्यात आल्यामुळे, सगळया नद्या भरल्यासारख्या दिसतात. उन्हाळयामध्ये सुध्दा विहिरीला दहा फुटावर पाणी असते. त्या भागात बॅरेजेस निर्माण केल्यामुळे ही सुधारणा झाली असून ती आपल्याला मान्य करावीच लागेल. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, जी काही वस्तुस्थिती आहे तीच मी या ठिकाणी मांडत आहे.

**( सभापती स्थानी माननीय उपसभापती )**

सभापती महोदय, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी खेडयाकडे चला अशी हाक दिली होती परंतु आज असे दिसून येते की, खेडयातून शहराकडे लोक मोठया प्रमाणावर स्थलांतर करीत आहेत. त्यामुळे ही बाब चिंता निर्माण करणारी आहे. कधी पाऊस कमी पडला वा पाऊस जास्त झाला, कधी पिकावर कीड पडली वा रोगराई आली की, शेतक-यांना सातत्याने मदत देण्याची भूमिका राज्य सरकारने घेतलेली आहे. देश स्वतंत्र झाल्यानंतर या वर्षी प्रथमच शेतक-यांसाठी मोठया प्रमाणात कर्ज माफी करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. आज राज्यामध्ये विजेची जी काही समस्या आहे, ती नाकारुन चालणार नाही. राज्यातील शेतक-यांना अखंडित विजेचा पुरवठा झ ाला पाहिजे या दृष्टीने शेतक-याकडून सातत्याने मागणी केली जात आहे. 2012 सालापर्यंत लोड शेडींग मुक्त करण्याचे शासनाने धोरण ठरविले असून ते नक्कीच पूर्ण केले जाईल, अशी आम्हाला आशा आहे.

सभापती महोदय,देशातील एक अग्रेसर राज्य म्हणून महाराष्ट्राकडे पाहिले जाते. या दृष्टीकोनातून उद्योगांना संरक्षण दिले गेले पाहिजे तसेच उद्योगांना सवलती दिल्या गेल्या पाहिजेत. यासाठी राज्य सरकार चांगले धोरण आखत आहे, याचा सुध्दा आम्हाला आनंद वाटत आहे.

सभापती महोदय, ऊर्जा ही आज जीवनाचा एक अविभाज्य घटक बनली आहे. ऊर्जेशिवाय आपण जीवन जगू शकत नाही. जैतापूर येथे देशातील सर्वात मोठा अणुऊर्जा प्रकल्प येत आहे,

2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे ...

याचा सर्वाना आनंद असला पाहिजे. त्यामुळे हा प्रकल्प तातडीने पूर्ण व्हावा, हीच तुमची आमची सर्वाची इच्छा असली पाहिजे.

सभापती महोदय, राज्यातील रस्ते सुधारले पाहिजेत, सर्व रस्ते चार पदरी झाले पाहिजेत या दृष्टीकोनातून उपाययोजना सरकारने केलेल्या आहेत. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये जात पडताळणी सबंधीचा एक अत्यंत महत्वाचा मुद्दा मांडला आहे. त्यामध्ये आमुलाग्र बदल करण्याची कल्पना मांडण्यात आली आहे. विद्यार्थ्यापासून ते अधिका-या पर्यत सर्वांना जात वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असते. ज्या कोणाला नोकरी लागली असेल त्या व्यक्तीला सुध्दा जात वैधता प्रमाणपत्र सादर करावे लागते. हे प्रमाणपत्र देणा-या कार्यालयामध्ये जो काही भ्रष्टाचार होऊ घातलेला आहे वा होत आहे तो कमी करण्याची व जात वैधता प्रमाणपत्र देतांना पारदर्शकता आणण्याची गरज आहे. विद्यार्थ्यानासुध्दा शाळा महाविद्यालयामध्ये हे प्रमाणपत्र कसे देता येतील यासबंधीचा एक बृहत आराखडा राज्य शासनाने तयार केला पाहिजे, असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, शिक्षणाच्या संदर्भात माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात दोन परिच्छेद आहेत. म्हणून बृहत आराखडा तयार करुनच शाळा मंजूर केल्या पाहिजेत, असे मला सांगावयाचे आहे. त्याचबरोबर या शाळा मंजूर करीत असतांना अनुदानावरच दिल्या गेल्या पाहिजेत या दृष्टीने शासनाने धोरण आखावे, अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी जे अभिभाषण केले आहे, त्याला मी पाठिंबा देतो आणि माननीय राज्यपालांचे अभिनंदन करतो. तसेच मला बोलण्याकरता आपण थोडा वेळ वाढवून दिला, त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो. जयहिंद, जय महाराष्ट्र.

-------

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंत जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचे स्वागत करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे. या राज्य सरकारने सर्वसामान्य माणूस केंद्रबिंदू ठरवून काही आदर्श कामे केली आहेत व यापुढेही करावयाची आहेत. त्या केलेल्या कामांचा अतिशय चांगल्या पध्दतीने माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणामध्ये ऊहापोह केला आहे. त्यानिमित्त मला प्रामुख्याने सांगितले पाहिजे की, सद्याच्या न्याय व्यवस्थेवर प्रचंड ताण पडत असल्यामुळे अनेक दावे न्यायालयामध्ये प्रलंबित असल्यामुळे सायंकालीन आणि सकाळ अशा दोन्ही सत्रामध्ये 200 न्यायालये मंजूर करण्याचा चांगला निर्णय शासनाने घेतला आहे. अशाप्रकारे न्याय व्यवस्थेवर असलेला ताण कमी करण्याचा राज्य सरकारने चांगला प्रयत्न केला आहे. आमच्यासारखे नवीन सभासद या सभागृहामध्ये आल्यानंतर पहात आहोत की,काही चुकीचे असेल तर त्याला चूक म्हटले जात आहे. या चर्चेमध्ये भाग घेत असतांना आमच्या काही काही सहकारी माननीय सदस्यांकडून शासनाच्या असलेल्या त्रुटींबाबत ऊहापोह केलेला पहावयास मिळत आहे. परंतु काही माननीय सदस्यांना या सभागृहामध्ये शासनाचे काही चुकले असेल व ते दिसत नसेल आणि जे काही चांगले असेल व ते दिसत नसेलतर तो त्यांचा दृष्टीदोष असावा. या राज्य सरकारने आपले धोरण ठरवितांना शेतकऱ्यांना खतांचा वेळेवर साठा कसा उपलब्ध होईल आणि त्यांना कर्जाचे वाटप कसे करता येईल यादृष्टीने या अभिभाषणामध्ये सखोल विचार केलेला दिसत आहे. त्याचबरोबर निराधार विधवांना अर्थसहाय्य करणे किंवा इतर सोयी सवलती देणे या संदर्भात राज्य शासनाने या अभिभाषणामध्ये ऊहापोह केलेला आहे.

सभापती महोदय, राज्य शासनाने हे वर्ष "पर्यटन वर्ष" म्हणून जाहीर केले आहे. त्याचप्रमाणे ऐतिहासिक गड किल्ल्यांचा जीर्णोध्दार व त्यांचे संरक्षण करण्याचे चांगले कार्य हाती घेतले आहे. परंतु माननीय सदस्य श्री. उपरकर यांना सांगू इच्छितो की, या गड किल्ल्यांचे संरक्षण करीत असतांना जर काही कुणाची राजकीय बुरुजे ढासळत असतील तर त्यामध्ये लक्ष घालण्याचे या शासनाचे काम नाही. तेव्हा पर्यटनाच्या निमित्ताने राज्य शासनाने हा अतिशय चांगला उपक्रम हाती घेतला आहे त्यांचे मी स्वागत करीत आहे. माझ्या नाशिक जिल्ह्याच्या दुर्गम भागामधील गरीब आदिवासी कुटुंबातील कु. कविता राऊत नावाच्या मुलीला सुवर्ण कन्या म्हणून संपूर्ण भारतामध्ये ओळखले जात आहे. या सुवर्ण कन्येने आदिवासी दुर्गम भागामध्ये राहून सुध्दा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. जयवंत जाधव....

क्रीडा क्षेत्रामध्ये अतिशय चांगले यश संपादन केले आहे. अशा खेळाडूंना क्रीडा क्षेत्रामध्ये चांगले प्रोत्साहन मिळण्याकरिता राज्य शासनाने दहा लाख, साडे सात लाख आणि पाच लाख रुपये पारितोषिक देऊन त्यांचा गौरव केला आहे. याचाच पुढील भाग म्हणून राज्य शासनाने स्वतंत्र "क्रीडा धोरण" तसेच "युवा धोरण" तयार करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. मला याठिकाणी सांगण्यास अतिशय आनंद वाटतो की, यामध्ये काही त्रुटी असतील तर त्या कमी कशा करता येतील यासाठी प्रयत्न करावयाचे असतात. याचे कारण जो काम करतो तो चुकत असतो आणि जो चुकतो त्याने आपली चूक सुधारुन काम करावयाचे असते. म्हणून शासनाने निविदा पध्दत आत्मसात करण्याचा निर्णय घेतला आहे. अशाप्रकारे आदर्श पारदर्शक पध्दत स्वीकारुन एक पाऊल पुढे टाकण्याचा चांगला निर्णय घेतला आहे. त्याचप्रमाणे आज हे जग संगणकाच्या युगामध्ये अतिशय प्रगल्भ होत असतांना देशाच्या पातळीवर लोकसंख्याशास्त्रीय व बायोमेट्रिक माहिती संकलित करुन लोकांना विशिष्ट प्रकारचे ओळखपत्र देण्याच्या कामाला सुरुवात करण्याचा बहुमान आपल्या नंदूरबार जिल्ह्याला मिळाला आहे ही देखील अभिनंदनीय अशी बाब आहे. त्याचप्रमाणे अनुसूचित जमाती आणि इतर पारंपरिक वन निवासींचा वन हक्क मान्य करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्या अनुषंगाने आदिवासींना आणि परंपरागत वन निवासींना 84 हजार 760 जमीन पट्टे देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे ही देखील अभिमानास्पद अशी बाब आहे.

सभापती महोदय, जात पडताळणी सारख्या क्लिष्ट विषयामध्ये पारदर्शकता आणून त्यामध्ये सुसूत्रीकरण करण्यासाठी या योजनेचे संगणकीकरण करण्याचा राज्य सरकारने निर्णय घेतला आहे त्याचे आपण स्वागत केले पाहिजे. आज याठिकाणी अंगणवाडीच्या संदर्भात चर्चा होत असताना एकीकडे उघडयावर अंगणवाडया भरविल्या जातात असे सांगितले जाते. अशा परिस्थितीत नवीन अंगणवाडया बांधण्यासाठी राज्य शासन निर्णय घेत असेल तर त्याचे आपण स्वागत केले पाहिजे. या अभिभाषणावर बोलण्या सारख्या पुष्कळ गोष्टी आहेत, परंतु वेळे अभावी मी एवढेच बोलून माझे भाषण संपवितो. धन्यवाद. जय हिंद, जय महाराष्ट्र.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KTG/ KGS/ 16:45

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, याठिकाणी मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर खेद व्यक्त करण्यासाठी उभा आहे. खरे म्हणज केवळ पाच मिनिटांमध्ये 70 मुद्यांच्या बाबतीत भाषण करणे अवघड आहे. परंतु मी एकेक मुद्याच्या बाबतीत माझे विचार थोडक्यात मांडणार आहे.

सभापती महोदय, सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये असे सांगितले जात आहे की, आम्ही सामान्य माणसाला केंद्रबिंदू मानून राज्य चालवित आहोत. खरे म्हणजे हे राज्य कोणाचे आहे हा मुख्य प्रश्न आहे. कारण हे राज्य माफियांचे आहे की घोटाळेग्रस्तांचे आहे की भेसळ करणाऱ्यांचे आहे की दिवाळखोरीमध्ये निघालेल्या लोकांचे आहे असा प्रश्न आहे. आपल्याला या राज्यामध्ये सामान्य माणसाला कोणत्याही प्रकारचा न्याय मिळाल्याचे दिसत नाही. आपण आज कोणत्याही क्षेत्रामध्ये जाऊन पाहिले तर हे राज्य शासन येथील सामान्य माणसासाठी नाही, त्याच्या अधिकारासाठी नाही, त्याला जोपासण्यासाठी नाही, त्याला न्याय देण्यासाठी नाही. आता या राज्यातील लोकप्रतिनिधींना देखील असे वाटू लागले आहे. मध्यंतरीच्या काळामध्ये विधानसभेच्या सन्माननीय सदस्यांवर हल्ला झ ाला. आज सुध्दा महापौरांवर हल्ला झाला. नगरसेवकांवर हल्ले होत आहेत आणि येथील राज्यकर्त्यांची प्रशासनावर अजिबात कोणत्याही प्रकारची पकड नाही. त्यामुळे त्या-त्या विभागातील पोलीस स्टेशनमधील अधिकाऱ्यांना असे वाटते की, हे सगळे माझेच आहे आणि मीच या पोलीस स्टेशनच्या हद्दीतील राजा आहे. अशा प्रकारच्या भूमिकेतून महसूल विभागातील, पोलीस विभागातील लोक वागत आहेत. त्यामुळे लोक प्रतिनिधी देखील यातून सुटत नाहीत. सामान्य माणसाला केंद्र बिंदू मानून त्याच्याकरता काम करण्याची भूमिका या राज्य शासनामध्ये नसल्याने हे सरकार पंक्चर झालेले आहे. राज्य शासनाची गाडी पूर्णपणे बंद पडलेली आहे. राज्य शासनाचा कोणत्याही विभागावर, कोणत्याही क्षेत्रावर अंकुश राहिलेला नाही.त्यामुळे माफियागिरीच्या माध्यमातून हे राज्य उद्ध्वस्त होत आहे. याठिकाणी प्रशासन आणि राज्यकर्त्यां मधील काही लोक ज्याला आपण "धुमाकूळ घालणे"असे म्हणतो, तसे करीत आहेत. देशामध्ये केवळ एक किंवा दोन लाख रुपयांचा नाही तर करोडो रुपयांचा धुमाकूळ घालता जात आहे. तसेच हा धुमाकूळ मुंबईपर्यंत आणि येथील गल्ली पासून अगदी मंत्रालयापर्यंत निरनिराळी लोक घालत आहेत. माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणामध्ये एकूण 70 मुद्यांबाबत उल्लेख केलेला असून त्या सर्व मुद्यांची चिरफाड करता येईल अशी स्थिती आहे.

**उप सभापती** : आम्हाला सन्माननीय सदस्यांच्या भावना समजल्या आहेत.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, तरी देखील यातील जे ठळक मुद्दे आहेत, त्याबाबत मी माझे विचार मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. त्यानुसार पहिल्या मुद्यामध्ये प्रादेशिक असमतोला बाबत उल्लेख केलेला आहे. ज्याप्रमाणे विदर्भ अन्यायग्रस्त आहे आणि तेथील लोक आवाज उठवत असतात. त्याच प्रमाणे कोकणावर सिंचनापासून ते शिक्षणापर्यंत सातत्याने अन्याय झालेला आहे. कोकणामध्ये केवळ सिंचनाच्या बाबतीत किंवा विविध पॅकेजच्या बाबतीत बॅकलॉग नाही तर सगळया विषयांच्या बाबतीत आहे. आता शिक्षणाच्या बाबतीत सांगावयाचे तर त्याठिकाणी शालांत परीक्षा मंडळाची स्थापना करण्यात आली आहे आणि त्याबाबत स्वत:चीच पाठ थोपटून घेत आहेत. सन्माननीय माजी मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी रत्नागिरीमध्ये चार वर्षापूर्वी घोषणा केली होती.पण सन्माननीय माजी मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांची कारकीर्द संपली,त्यानंतर सन्माननीय माजी मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांची कारकीर्द संपली, परंतु त्याबाबत काही झाले नाही. परंतु आता रत्नागिरी येथे आम्ही शालांत परीक्षा मंडळाच्या बाबतीत रेटा लावल्यानंतर शासनाने रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग बाबत जी.आर.काढला आहे. तुमचे राज्य कशा प्रकारे चालले आहे? कोकणावर शिक्षणाच्या बाबतीत, सिंचनाच्या बाबतीत अन्याय होत आहे.

सभापती महोदय, याठिकाणी अभिभाषणामध्ये म्हटलेले आहे की, याबाबत तज्ज्ञांची समिती नेमण्यात येईल. परंतु सध्या प्रत्येक खात्याच्या माध्यमातून तज्ज्ञांची समिती नेमली जाते. मग ती बाब कोणत्याही विभागाच्या संबंधातील असो. कोणत्याही विषयाच्या बाबतीत माननीय मंत्री महोदय उत्तर देताना सांगतात की, "अमुक विषयाच्या बाबतीत समिती नेमण्यात येईल." पण अगोदर ज्या समित्या नेमण्यात आल्या होत्या, त्यांच्या अहवालाचे काय झाले ? त्याबाबत काहीही सांगितले जात नाही. मला सांगावयाचे आहे की, कोकणाने अनेक गोष्टी देशाकरता, राज्याकरता दिलेल्या आहेत. पण कोकणासाठी येथील राज्यकर्त्यांनी काही दिलेले नाही. याठिकाणी शिक्षणाच्या बाबतीत खेळखंडोबा चालला आहे. मग विद्यार्थी असतील, पालक असतील, नागरिक असतील. मागील काही कालावधीमध्ये चार माननीय शिक्षण मंत्री येऊन गेले. आता माननीय श्री.राजेंद्र दर्डा साहेब शिक्षण मंत्री आहेत, यापूर्वी ते उद्योग मंत्री होते. अगोदर माननीय श्री.वसंत पुरके साहेब शिक्षण मंत्री होते, त्यानंतर माननीय श्री.राधाकृष्ण विखे पाटील शिक्षण मंत्री होते, त्यानंतर माननीय श्री.बाळासाहेब थोरात शिक्षण मंत्री होते. पण त्यांचा एक पाय शेतीमध्ये आणि एक पाय शिक्षणामध्ये अशी स्थिती होती. ते दोन विभागांचा कारभार पहात होते. त्यामुळे त्यांनी या राज्याची प्रयोगशाळा केली. मी नेहमी सांगितले आहे की, आपण एखादा प्रयोग करीत असताना तज्ज्ञ लोकांना देखील





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बरोबर घ्यावे. जर येथील सरकारला आम्ही तज्ज्ञ असल्याचे वाटत नसेल तर या राज्यामध्ये जे अनेक तज्ज्ञ आहेत, त्यांना बरोबर घेऊन प्रयोग करावेत. पण याठिकाणी शिक्षणाची वाट लावली. कधी परसेंटाईल, कधी 70:30 आणि कधी बेस्ट ऑफ फाईव्ह अशा नवीन पध्दती घेऊन कोर्टामध्ये जात होते. या राज्यातील राज्यकर्ते कोणताही निर्णय घेण्यासाठी असमर्थ ठरलेले आहेत आणि ते कोणत्याही प्रकारची भूमिका घेत नाहीत आणि त्यामुळे कोर्टाचे काम वाढलेले आहे.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर......

रस्त्यावरचे खड्डे बुजविण्याकरिता देखील कोर्टात पिटिशन करावे लागत आहेत अशा प्रकारची स्थिती या राज्यात निर्माण झालेली आहे. हे काम राज्यकर्त्यांचे असातना सुध्दा कोर्टाला निणर्य द्यावे लागत आहेत. झोपडपट्टयांच्या बाबतीत देखील कोर्टाला निणय द्यावे लागत आहेत. याचे कारण असे की, राज्यकर्ते ठोस भूमिका घेऊन, जनतेला बरोबर घेऊन कुठल्याही प्रकारचे निर्णय घेत नाहीत. व्होट बँक पॉलिटिक्समुळे कुठल्याही प्रकारचे निर्णय करण्यात येत नाहीत त्यामुळे हे शासन पंक्चर अवस्थेत आहे. ही सरकारची गाडी पंक्चर आहे, या गाडीला गियर नाही, कुठल्याही प्रकारे ही गाडी चालावयास तयार नाही. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील अनेक विषय असे आहेत की, त्यावर या ठिकाणी चर्चा करता येईल. परंतु फक्त दोन ते तीन विषय मी या ठिकाणी मांडणार आहे.

सभापती महोदय, शासनाने अतिरिक्त सिंचन क्षमता निर्माण करण्यासाठी 7119 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. महाराष्ट्रामधील अनेक प्रकल्पांच्या बाबतीत विधिमंडळात व विधिमंडळाच्या बाहेर होणाऱ्या सभांच्या निमित्ताने चर्चा करण्यात येते. कोकणात आणि ठाणे जिल्ह्यात पंधरा प्रकल्प आहेत. त्या ठिकाणी पाण्यासाठी लढाया होणार आहेत. आज सुध्दा कल्याण-डोंबिवली महापालिकेचे महापौर आणि सर्व पक्षीय नगरसेवकांनी पाण्याकरिता आंदोलन केले होते. ठाणे जिल्ह्यातील पंधरा प्रकल्पांना वन खात्याची परवनगी न मिळाल्यामुळे हे प्रकल्प सुरु करता येत नाहीत असे माझ्याकडे लेखी पत्र आहे. जो प्रकल्प 250 कोटी रुपयांचा होता तो आता 750 कोटी रुपयावर गेला आहे. वन खात्याच्या परवानगी विना प्रकल्प रखडलेले आहेत. असे असताना सुध्दा आम्ही हे प्रकल्प राबविणार आहोत, आम्ही अमुक करणार आहोत, तमुक करणार आहोत असे सांगण्यात येते पण यामध्ये सरकार अपयशी ठरलेले आहे.

सभापती महोदय, मी या ठिकाणी उद्योग आणि कामगारांच्या बाबतीत बोलणार आहे. मला काही दिवसांपूर्वी वागळे इस्टेटमधील एक उद्योजक भेटले होते. आता ते बाजूच्या राज्यामध्ये गेले आहेत. त्यानी मला असे सांगितले की, "महाराष्ट्र राज्यात ऑक्ट्रॉय व बाकीच्या सगळया गोष्टींमुळे मला खूप त्रास झाला त्यामुळे मी गुजरात राज्यामध्ये गेलो आहे." त्यांना त्या ठिकाणी 48 तासात जागा मिळाली, वीज मिळाली, इन्फ्रास्ट्रक्चर मिळाले. उद्योगासाठी लागणाऱ्या सर्व परवानग्या मिळाल्या पण त्या घेण्यासाठी ते तेथे पोहचू शकले नाहीत म्हणून गुजरात राज्यातील या

श्री. संजय केळकर......

खात्यातील माणसाने त्यांच्याशी याबाबत संपर्क साधला. त्यानंतर ते ज्यावेळी त्या ठिकाणी गेले त्यावेळी सगळया प्रकारच्या परवानग्या त्याच्या हातामध्ये देण्यात आल्या. प्रश्न गुजरात राज्याचा नाही परंतु उद्योजकांना प्रोत्साहन दिले नाही, योग्य पध्दतीने एक खिडकी योजनेच्या माध्यमातून उद्योगासाठी लागणाऱ्या सर्व परवानग्या दिल्या नाही, इन्फ्रास्ट्रक्चर दिले नाही तर या राज्यामध्ये उद्योग रहाणार नाही. उद्योगाच्या बाबतीत ठाणे जिल्ह्यामध्ये बेलापूर पट्टी हा सोन्याचा धूर होता. त्या ठिकाणी आता कॉंक्रीटचे जंगल तयार होत आहे. हे सरकार नाकर्ते आहे, राज्यकर्ते नाकर्ते आहेत, ते उद्योगधंद्याला प्रोत्साहन देण्यास तयार नाहीत. याबाबतीत सगळा छळ चाललेला आहे. उद्योजकाकडे आणि व्यापाऱ्याकडे चोर आहेत की काय अशा भूमिकेतून बघितले जात आहे अणि सगळी लुटालूट चाललेली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील उद्योजगक समाधानी नाही. कंत्राटी कामगारांचे पेव फुटलेले आहे. कंत्राटी कामगारांनी मंत्री महोदयांना मनोरुग्णालयात भूमिपूजन करावयास जाऊ दिले नाही. तेथील 200 कंत्राटी कामगारांचे सहा महिन्यापासून पगार झालेले नाहीत. त्या कामगारांची उपासमार चाललेली असताना त्या ठिकाणी भूमिपूजन कसले करता. भूमिपूजन केले पाहिजे, आमचा त्याला विरोध नाही. पण त्या ठिकाणी काम करणाऱ्या कामगारांना न्याय दिला नाही तर हे राज्य कसे चालेल, येथील उद्योग कसा चालेल. मला या ठिकाणी सांगण्यास खेद वाटतो की, उद्योजकांना आणि कामगारांना या राज्यामध्ये कुठल्याही प्रकारचे स्थान नाही. सामान्य माणूस केंद्र बिंदू आहे अशातला भाग नाही. या राज्यामध्ये फक्त धनदांडग्यांना आणि फक्त माफियांनाच स्थान आहे की काय अशा प्रकारची स्थिती निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, मी फक्त क्रीडा आणि सांस्कृतिक विभागाच्या बाबतीत बोलणार आहे. क्रीडा या विषयाच्या बाबतीत राज्य शासनाने खूप मोठया प्रमाणात पाठ थोपटून घेतलेली आहे. राष्ट्रकुल स्पर्धेमध्ये ज्या खेळाडूंनी बक्षिसे मिळविली त्या खेळाडूंना पाच ते दहा लाख रुपये दिलेले आहेत, ही गोष्ट चांगली आहे. अशा प्रकारचे प्रोत्साहन दिले पाहिजे. परंतु आज राज्य पातळीवर आणि राष्ट्रीय पातळीवर जे खेळाडू खेळतात त्यांचे काय हाल आहेत हे आपण त्यांना विचारले तर समजू शकेल. त्यांची अतिशय वाईट परिस्थिती आहे. त्यांना कुठल्याही प्रकारचा भत्ता मिळत नाही. त्यांना कुठेही जावयाचे असले तरी कुठल्याही प्रकारचे रिझर्वेशन मिळत नाही. रात्रभर एका ठिकाणी बसून, 24 तास प्रवास करुन ते त्या ठिकाणी महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी

..3..

श्री. संजय केळकर......

जातात. मुंबई विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी जातात. त्या ठिकाणी गेल्यानंतर त्यांना कुठल्याही सोयी-सुविधा मिळत नाहीत. एवढेच नाही तर त्यांना स्नान करायला देखील मिळत नाही. याला क्रीडा धोरण म्हणतात काय, हे खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचे काम आहे काय? सभापती महोदय, 250 विद्यार्थ्यांच्या मागे एक शारीरिक शिक्षक असला पाहिजे असा 1987 मध्ये नियम करण्यात आलेला आहे. सन 2005 मध्ये या नियमाची अंमलबजावणी करुन त्याची पूर्तता करण्यात यावी, असे सांगितले होते. पण या नियमाची अंमलबजावणी झालेली नाही.

सभापती महोदय, शिव छत्रपती पुरस्कार गेल्या दोन वर्षापासून जाहीर करण्यात आलेले नाहीत.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ....

शासनाने शिवछत्रपती पुरस्कार जाहीर करावयास पाहिजे. आपण खेळाडूंना कोणत्या प्रकारचे प्रोत्साहन देत आहात ? आट्यापाट्या हा या मातीतील खेळ आहे. आपण एका बाजूला आयपीएल आणि इतर मोठे मोठे खेळ खेळविता आणि दुसऱ्या बाजूला आट्यापाट्या खेळाला शालेय क्रीडा स्पर्धेमध्ये सुध्दा स्थान दिलेले नाही. आट्यापाट्या हा आपला फार जुना खेळ आहे. सभापती महोदय, ज्या खेळाडूंना शिवछत्रपती पुरस्कार मिळालेला आहे त्यांना शासकीय नोकरी मिळाली पाहिजे, त्यांना पदोन्नतीचा लाभ दिला पाहिजे, त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. आपले आयुष्य देऊन हे खेळाडू त्या ठिकाणी काम करीत असतात. परंतु या खेळाडूंकडे कोणी ढुंकूनही पहावयास तयार नसतात, अशा प्रकारची परिस्थिती आहे. त्यामुळे खेळाडूंना प्रोत्साहन मिळाले पाहिजे. जिल्हा पातळीवर क्रीडांगणे झाली पाहिजेत.

सभापती महोदय, सांस्कृतिक खात्याच्या संदर्भात मी शेवटचा मुद्दा मांडणार आहे. आपण सिनेकलावंतांना तसेच रंगभूमीवरच्या कलावंतांना निरनिराळ्या प्रकारचे पुरस्कार देतो. नाटकांना प्रोत्साहन देण्यासाठी सुध्दा आपले अनुदान असते पण ते अनुदान त्यांना मिळते का ? साधे अनुदान सुध्दा आपण वेळेवर देऊ शकत नाही. एखाद्या नाटकाचे 25 प्रयोग झाल्यानंतर वेळेवर त्यांना अनुदान मिळत नाही. हा कागद नाही, तो कागद नाही, असे सांगितले जाते. ही पध्दत आहे काय ? सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले साहेब या ठिकाणी उपस्थित आहेत. ज्या वेळेला राज्य नाट्य स्पर्धा घेतल्या जात होत्या त्यामध्ये आम्ही भाग घेत होतो. त्या वेळी वर्तमानपत्रामध्ये त्या स्पर्धेच्या जाहिराती येत होत्या आणि नाटके बघायला तुडूंब गर्दी होत असे. लोक तिकीट काढून राज्य नाट्य स्पर्धा बघावयास यावयाचे. ते खरे व्यासपीठ होते. या राज्यातील जे कलाकार आहेत ते या राज्य नाट्य स्पर्धेच्या माध्यमातून पुढे येत होते. या शासनाने कोणत्या प्रकारचे सांस्कृतिक धोरण तयार केले आहे, कोणत्या प्रकारे आपण कलाकारांना प्रोत्साहन देत आहात ? 'शिवबा' सारखे नाटक कोकण कला अकादमीने घेतले आहे. मी त्याचा अध्यक्ष आहे. 'शिवबा' सारख्या नाटकाचे 25 प्रयोग गोवा सरकार स्वत: घेते. पण या महाराष्ट्रातील कोणत्याही मंत्र्याला आणि कोणालाही ते नाटक बघायला येण्यास फुरसत नाही, अशा प्रकारची स्थिती या ठिकाणी आहे.

..2...

श्री. संजय केळकर .....

आपण राष्ट्रपुरुषांवरील नाटकाला कोणत्या प्रकारचे प्रोत्साहन देता ? आपण साधे अनुदान देखील देत नाही. वेळेवर अनुदान देत नाही.

सभापती महोदय, बोलण्यासारखे अनेक विषय आहेत परंतु या राज्यातील प्रत्येक क्षेत्रातील माणूस अत्यंत दु:खी आहे. मग तो गरीब असेल, आदिवासी असेल, मजूर असेल, कष्टकरी असेल, कलाकार असेल, विद्यार्थी असेल, महिला असतील, हे सर्व दु:खी आहेत. मग हे राज्य कोणाकरिता आहे ? अशा प्रकारची सर्व परिस्थिती निर्माण झालेली असल्यामुळे मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महिलांची संपत्ती, प्रतिष्ठा, अस्मिता, स्वातंत्र्य, बोलण्याचे स्वातंत्र्य, फोनवर बोलण्याचे स्वातंत्र्य हे सगळेच सरकार काढून घेत आहे म्हटल्यावर या सभागृहात बोलण्यासारखे आमच्या हातात काही राहिले आहे काय ? 50 टक्के आरक्षण दिले असे आपण सांगत आहात. पण त्या वाटाण्याच्या अक्षता कधी मिळणार ? ते आरक्षण कधी मिळणार याची तारीख कळली तर बरे होईल. आतापर्यंत त्या आरक्षणाची वाट बघता बघता बऱ्याच महिलांची आयुष्यातील बरीच वर्षे वाया गेलेली आहेत. आम्ही 1998 पासून विधानसभा आणि लोकसभेच्या बाबतीत हे ऐकतो. 12 सप्टेंबर 1996 ला पहिल्यांदा लोकसभेत बिल पुर:स्थापित झाले. योगायोगाने 12 सप्टेंबरला माझा वाढदिवस आहे. मी शिवसेनेत नसते तर विधान परिषदेपर्यंत पोहोचले नसते, हे मला या ठिकाणी मुद्दाम नमूद करावयास पाहिजे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल गेल्या वर्षी जी आश्वासने दिली होती त्यातील दोन आश्वासनांच्या संदर्भात अभिभाषणातील मुद्यांकडे सर्वात प्रथम मला लक्ष वेधावयास पाहिजे. गेल्या वर्षी शासनाने बेस्ट ऑफ फाईव्हच्या संदर्भात घोषणा केली होती. जी मुले कोठे तरी मागे पडत आहेत त्यांना योग्य ती संधी मिळण्याच्या दृष्टीने बेस्ट ऑफ फाईव्हचा गाजावाजा झाला. त्यानंतर कोर्टामध्ये तो निर्णय टिकला नाही. या वर्षी परत बेस्ट ऑफ फाईव्हचे काय झाले, याबद्दल माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ MMP/ D/ KGS/ श्री.बरवड 17:00

डॉ.नीलम गोऱ्हे....

सभापती महोदय, शेगांव, तुळजापूर या तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी गेल्या वर्षीच्या अभिभाषणातील अनुक्रमांक 27 वरील मुद्यामध्ये 682 कोटी इतका खर्च केला जाणार आहे, असा उल्लेख होता. परंतु सातत्याने ज्या घटना घडत आहेत त्या पाहिल्या तर अनेक ठिकाणी 2005 मध्ये सातारा जिल्ह्यातील मांढरदेवीच्या काळेश्वरीच्या जत्रेमध्ये 267 भाविकांचा मृत्यू झाला. तेथून ते आतापर्यंत पंढरपूर असेल, मांढरदेवी असेल, कोल्हापूरचे महालक्ष्मी मंदिर आहे. या सर्व तीर्थक्षेत्रांसंबंधी एका बाजूला शासनाने पर्यटन धोरण जाहीर केले. या पर्यटन धोरणात या तीर्थक्षेत्राच्या विकासासाठी शासन काय पावले उचलणार आहे यासंबंधी काहीही उल्लेख केलेला नाही.

पुणे शहर व संपूर्ण महाराष्ट्रासाठी सरकारने 4 वर्षापूर्वी जाहीर केले होते की, नागरी विकास धोरण आखणार आहे. पण नागरी विकास धोरण या सगळया मोठया शहरांसाठी कितपत अंमलात आणले जात आहे, याबाबत बोलावयाचे झाले तर मला अतिशय खेद होत आहे. पुणे व पिंपरी-चिंचवड या दोन्ही महानगरपालिकांनी पाण्यावर प्रक्रिया न करताच सांडपाणी ड्रेनेजच्या पाईप लाईनमध्ये सोडल्यामुळे या दोन्ही महानगरपालिका का बरखास्त करण्यात येऊ नयेत अशा प्रकारच्या नोटिसेस आलेल्या आहेत. ही महानगरपालिकांची परिस्थिती आहे. उल्लेखच करावयाचा झाला तर महाराष्ट्रातील सर्व मोठया शहरांमध्ये स्वच्छतागृहांची परिस्थिती वाईट आहे. परराज्यातून स्थलांतरित होत आहेत त्यांची स्थिती बिकट आहे. आपत्ती व्यवस्थापनाची परिस्थिती ठीक नाही. आपण जपानच्या भूकंपाबाबत वारंवार चर्चा करीत आहोत. दुर्दैवाने असा प्रसंग ओढवला तर त्याबाबत महाराष्ट्र शासनाची किती तयारी आहे याचा विचार केला तर विधान भवनाची इमारत सुध्दा भूकंप प्रतिरोधक नाही. मंत्रालय असो, आमदार निवास असो, आपली परिस्थिती पाहिली तर आपत्ती व्यवस्थापनाच्या संदर्भामध्ये ऑडिटर जनरलचे कित्येक ताशेरे शासनावर मारण्यात आले आहेत. प्रत्यक्षात मात्र त्याची अंमलबजावणी झाल्याचे दिसत नाही.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी असा उल्लेख केला की, विधान भवनाची इमारत भूकंप प्रतिरोधक नाही. सभागृहाच्या माहितीसाठी मी सांगू इच्छितो की, आरसीसीचे बांधकाम असेल ज्यामध्ये लोखंडी सळ्या व सिमेंटचा वापर केला जाते. या वस्तूंचा दर्जा जर चांगला असेल आणि त्याचे साधारण डिझाईन असले तरी भूकंपाला तोंड देता येते.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, विषाची परीक्षा घ्या असे तर मी म्हणू शकत नाही. हे आव्हान स्वीकारावयाचे असेल तर सगळयांचाच प्रश्न येईल. मी असे आवाहन करीन की, आपत्ती व्यवस्थापनासंबंधी एक ट्रायल घेतली जाते. तसा दुर्दैवाने प्रसंग घडला तर कोणत्या जिन्याने कसे बाहेर पडायचे हे किती आमदारांना माहीत आहे हे आपण मला सांगावे. अशा गंभीर प्रसंगी लिफ्ट वापरावयाच्या नाहीत, जिने वापरावयाचे नाहीत अशा सूचना असतील तर येथे आपण ही चर्चा करुन उपयोग आहे का ? माझे असे म्हणणे आहे की, ...

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ही इमारत भूकंप सस्टेन करु शकणार नाही असे म्हटलेले आहे. आता आपण जे म्हणत आहात तो प्रश्न वेगळा आहे.

**उप सभापती** : मी दोन्ही सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपल्याला भूकंप नको आणि वादही नको.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, प्रत्येक वेळी चुकीच्या गोष्टींचे समर्थन केल्यामुळे ते हास्यास्पद होते. कारण ज्या जगजाहीर गोष्टी आहेत त्याबाबत गांभीर्याने विचार झाला पाहिजे तो होत असल्याचे दिसत नाही.

सभापती महोदय, राज्याच्या सांस्कृतिक धोरणाचा राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख करण्यात आलेला आहे. गेल्या वर्षी सांस्कृतिक धोरणासाठी अनेक बैठका झाल्या आहेत. दिनांक 7 जून, 2010 रोजी सरकारने राज्याचे सांस्कृतिक धोरण जाहीर केल्याचे म्हटले आहे. ज्या ज्या सदस्यांना हे सांस्कृतिक धोरणाची माहिती पाहिजे त्यांना सहभागी करुन घ्यावे अशी विनंती केली होती. परंतु आम्हाला यामध्ये सहभागी करुन घेतलेले नाही. त्याबाबत चर्चाही झालेली नाही. पण शासनाचे एक सांस्कृतिक धोरण दिसून आले आहे. विशेषत: पुणे शहराच्या संदर्भात जे काही सुरु आहे त्याबाबत मला खेद होत आहे. पुणे शहरामध्ये मध्यरात्री लाल महालामधून दाजोजी कोंडदेव यांच्या पुतळ्याचे कटरने पाय कापून टाकण्यात आले, त्यावर हिरवे कापड घालून तो पुतळा दुसऱ्या उद्यानात हलविण्यात आला. मला येथे प्रश्न उपस्थित करावयाचा आहे. ठाणे जिल्ह्यातील दादोजी कोंडदेव यांचे नाव स्टेडियमला आम्ही देऊ देणार नाही असे काही लोकांनी

3....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

आव्हान दिले होते.  त्याला तेथील महानगरपालिकेने हे सांगितले की, असे चालणार नाही. दादोजी कोंडदेव यांचे नाव राहील. सोलापूरला देखील त्या नावाला विरोध झाला. दादोजी कोंडदेव यांचा पुतळा कोठे असावा की असू नये. याबाबत चर्चा होऊ शकते.

यानंतर श्री.शिगम....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे....

परंतु शिवाजी महाराजांचे जे गुरु आहेत, जे सरदार आहेत, त्यांचे जे सहकारी आणि सहाय्यक आहेत त्यांना त्यांच्या आसपास कुठेही स्थान असणार नाही अशा प्रकारचे जे सांस्कृतिक धोरण पुणे महानगरपालिकेने जाहीर केले आहे त्याबाबतीत राज्य सरकारने मौन पाळलेले आहे. आज देखील राज्य सरकारची त्याबाबतीत काय भूमिका आहे हे स्पष्ट झालेले नाही. ठाण्यात वेगळी भूमिका, पुण्यामध्ये वेगळी भूमिका आणि सोलापूरमध्येही वेगळी भूमिका शासनाने घेतलेली आहे. प्रश्न पुतळयाचा नाही. पण इतिहासाचा वेगवेगळया पध्दतीने अर्थ लावत असताना जे संघर्ष होतात त्याची उत्तरे कशा प्रकारे शोधणार हा खरा महत्वाचा प्रश्न आहे. या ठिकाणी आमदार श्री. हर्षवर्धन जाधव यांच्या मारहाणीचा उल्लेख करत असताना एक वेगळया पध्दतीची हुकूमशाहीच या राज्यामध्ये दिसून येत आहे. आमचे म्हणणे असे आहे की, एखादी गोष्ट आपणास मान्य नसेल तर त्यावर चर्चा व्हावयास पाहिजे, तज्ज्ञांचे मत घेतले पाहिजे. पण हे अशा प्रकारचे कोणते सांस्कृतिक धोरण सरकार आणू इच्छिते याबद्दल प्रश्न निर्माण होतो.

सभापती महोदय, बाल कामगारांच्या बाबतीत बोलायचे झाले तर बाल हक्क आयोग आज अस्तित्वात नाही. महिलांच्या संदर्भात बोलायचे झाले तर कौटुंबिक हिंसाचाराच्या संदर्भात संरक्षक अधिकारी नेमले गेले नाहीत. राज्य महिला आयोगावर नेमण्यासाठी गेल्या चार-पाच वर्षापासून शासनाला सदस्य सापडत नाहीत. राज्य महिला आयोगाचे बजेट बंद केले जात आहे. पनवेल येथे गतिमंद मुलींवर अत्याचार करण्यात आलेले आहेत. तेथील 7 मुली दगावल्या आहेत, तीन मुली हरवल्या आहेत. तसेच 19 मुलींची तपासणी केली असता 5 मुलींचे लैंगिक शोषण झाल्याचे दिसून आले. बालकांच्या प्रश्नाबाबत, महिलांच्या प्रश्नाबाबत आज महाराष्ट्रामध्ये ही परिस्थिती आहे. दलितांच्यासाठी तर बजेटच वापरले गेले नाही. वेगवेगळया महापालिकांच्या अंतर्गत बचत गटांसाठी बाजार उभे करणार, उत्पादन केंद्रे उभी करणार अशा प्रकारची आश्वासने राज्य सरकारने वारंवार देऊन सुध्दा त्याची पूर्तता एक ठाणे महानगरपालिका सोडली तर कुठेही झालेली नाही. मुंबई महानगरपालिकेने आधार केन्द्रे सुरु केलेली आहेत. प्रश्न जसा आरक्षणाचा आहे तसा तो संरक्षणाचा देखील आहे. महिलांना सन्मानाने कोणती प्रतिष्ठा मिळते ? केन्द्र सरकारने 2003मध्ये जेंडर रिस्पॉन्सिव्ह बजेट सुरु केले. पण आपले राज्य सरकार आजही त्याचा विचार करीत नाही.

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे....

या अर्थसंकल्पामध्ये कशा पध्दतीने तरतुदी केल्या जाणार आहेत ते आम्हाला दिसेलच.

राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये आधीच्या वर्षी जी आश्वासने दिली जातात त्यांची किती पूर्तता होते याचा लेखाजोखा सरकार कधी घेत नाही. या सरकारचे सांस्कृतिक धोरण असेल, नागरी धोरण असेल, महिला धोरण असेल या धोरणांच्या बाबतीत काय अंमलबजावणी झाली, कोणते कायदे केले गेले याची माहिती घेतली जात नाही. महिला धोरणाच्या बाबतीत सांगायचे तर 1994साली श्री. शरद पवार यांनी जे धोरण आणले होते त्या धोरणाच्या अनुषंगाने 1998मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी यांनी कृती कार्यक्रम जाहीर केला होता. त्यांनतर 2002मध्ये तत्कालीन मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुख यांनी धोरण जाहीर केले होते. या सर्व धोरणांची अंमलबजावणी काय झाली याचा आढावा न घेता परत 2011मध्ये आपण महिला धोरणाबाबत चर्चा करणार असलो तर काही लोकांना, काही सत्ताधा-यांना असे वाटते की महिलांना सहजासहजी फसवता येते. कै. प्रभाकर पणशीकर यांची "तो मी नव्हेच" या नाटकामध्ये जशी भूमिका होती तशा भूमिकेमध्ये हे शासन जर का जात असेल तर मला असे वाटते की जनतेच्या न्यायालयामध्येच त्यासंबंधीची कैफियत मांडणे योग्य होईल एवढे बोलून आणि राज्यपालांच्या अभिभाषणा बद्दल खेद व्यक्त करुन मी माझे भाषण संपविते.

---

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ D/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 17:05

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, महामहिम राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभी आहे. महाराष्ट्र राज्याचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये जो काही रोडमॅप दिलेला आहे त्यासंदर्भात मी माझे विचार मांडणार आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील परिच्छेद क्रमांक 4 संबंधी बोलत असताना मी सांगू इच्छिते की, विकास कार्यक्रमासाठी 2010-2011 या वर्षाकरिता 3828 कोटी रुपये उपलब्ध करुन दिलेले आहेत. हा निधी खेड्यातील रस्त्यांच्या दुरुस्तीकरिता, पाण्याचे दुर्भिक्ष्य दूर करण्याकरिता आणि शिक्षणाच्या सोई उपलब्ध करुन देण्यासाठी खर्च व्हावेत अशी माझी प्रामाणिक मागणी आहे.

राज्यपालांच्या अभिभाषणाच्या परिच्छेद क्रमांक 5मध्ये गडचिरोली व गोंदिया या दोन जिल्ह्यामध्ये नक्षलवादी कारवाया सक्षमतेने हाताळण्यासाठी पोलिसांना विशेष प्रशिक्षण देण्याकरिता नागपूर येथे अल्फा हॉक अकादमी सुरु करण्यात येणार आहे.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई...

मला या संदर्भामध्ये नम्रतापूर्वक विचार मांडावयाचे आहेत. आदिवासी विभागामध्ये आदिवासींच्या मुलांना शिक्षण घेण्यासाठी नवीन शाळा उघडण्याचे काही प्रयोजन शासनामार्फत करण्यात येणार आहे की नाही, त्याचप्रमाणे या आदिवासी समाजातील लोकांना रोजगार मिळावा म्हणून काही उद्योग सुरु करण्यात येणार आहेत की नाही, आदिवासींच्या हाताला काम देण्यात येणार आहे की नाही या गोष्टींकडे शासनाने गांभीर्याने पाहिले पाहिजे. आदिवासी विभागात अशा प्रकारचे प्रयोजन केले गेले तर त्यांच्यावर होणारे हल्ले कमी होतील आणि नक्षलवाद कोठे तरी दूर होण्यास मदत होईल, पर्यायाने पोलिसांना नक्षलवादाचे उच्चाटन करण्यास यश प्राप्त होऊ शकेल. मी स्वत: त्या विभागाचे परीक्षण करुन आली असल्यामुळे या गोष्टी जबाबदारीने या ठिकाणी सांगत आहे.

महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील मुद्दा क्रमांक 6 मध्ये शासनाने सागरी किनारा सुरक्षा अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने 57 गस्ती नौका मागितलेल्या आहेत. त्यापैकी 28 नौका प्राप्त झालेल्या आहेत. उर्वरित नौका सुध्दा शासनास वेळेवर आणाव्या लागतील. सागरी किनाऱ्यामुळे काही घटना घडल्या व पुढे देखील घडतील यासंदर्भात मी काही बोलणार नाही. परंतु मुंबई शहर हे कॉस्मोपॉलिटन सिटी आहे. अशा कॉस्मोपॉलिटन सिटीमध्ये सर्व ठिकाणी पोलिसांना नजर ठेवणे शक्य नाही. कोण कोठून आला आणि कोण कोठे गेला यावर मी चर्चा करणार नाही परंतु मुंबई शहरातील माणसे मग ती कोणत्याही जातीची, धर्माची असोत ती सुरक्षित राहिली पाहिजेत. सुरक्षितता समुद्रापासून ढासळत असेल तर शासनाने त्याबाबतीत बंदोबस्त ठेवला पाहिजे.

सभापती महोदय, राज्यपालांच्या अभिभाषणातील अनुक्रमांक 10 मध्ये शासनाने बंदर क्षेत्रात खाजगी गुंतवणूक करण्याचे ठरविले आहे. रत्नागिरी जिल्हयातील मिरा बंदर आहे, त्या बंदराचा विकास करण्याचे काम शासन अग्रक्रमाने घेणार आहे. आज रत्नागिरी येथील मिरा बंदर पाहिले तर तेथे स्थानिक मच्छिमार लोकांच्या नौका लावण्यास जागा मिळत नाही. ते बंदर अतिशय गाळाने भरलेले आहे. या सभागृहातील किती सदस्य या बंदरावर जाऊन आले आहेत याची मला माहिती नाही. मिरा बंदराच्या कामाला अग्रक्रम द्यावा अशी माझी या निमित्ताने विनंती आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील अनुक्रमांक 20 मध्ये कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये आपण काही बदल करु इच्छिता. जागतिक बँक अर्थसहाय्यित महाराष्ट्र

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई....

स्पर्धाक्षम कृषी विकास प्रकल्पांअंतर्गत 100 कृषी उत्पन्न बाजार समित्या, 24 पशुधन बाजारपेठा तयार करण्यात येणार आहेत. आता ज्या कृषी उत्पन्न बाजार समित्या अस्तित्वात आहेत. त्या बाजार समित्यांचे निरीक्षण करुन तेथे प्रत्यक्षात काय चालले आहे त्याची पाहणी शासनाने केली पाहिजे. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून लोकांपर्यंत जाऊन त्या समित्या लोकांच्या उपयोगाची कामे करतात की दलालांच्या उपयोगाची कामे करतात या गोष्टीची माहिती घेणे गरजेचे आहे. या बाजार समित्यांमध्ये दलालांचा फार मोठया प्रमाणात सुळसुळाट झालेला आहे त्यावर काही तरी नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे असे मला सुचवावयाचे आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य हे देशातील एक नंबरचे औद्योगिक राज्य म्हणून अग्रेसर होते. 1980 पासून या राज्याला काही लोक विघातक शक्तीचे दलाल झाले. मी तर असे म्हणेन की, मुंबईतील गिरणी मालकांचे दलाल झाले. त्या दलालांनी या महाराष्ट्रातले गिरण्या बंद करण्याचे ठेके घेतले. त्या दलालांना गिरणी मालकांकडून मोठया प्रमाणात पैसे मिळाले, परंतु त्या गिरण्यांमधील कामगार उद्ध्वस्त झाले. गिरण्या विकल्या गेल्या. गिरण्या बंद झाल्यानंतर राज्यातील नेतृत्वात अनेक वेळा बदल झाला परंतु गिरणी कामगारांचे प्रश्न सुटले नाहीत. गिरणी कामगार रस्त्यावर आला आहे. औद्योगिक धोरण जाहीर करीत असताना 111 प्रकल्पांना मान्यता दिलेली आहे असा या अभिभाषणात उल्लेख केलेला आहे. हे प्रकल्प आज सुरु होतील, उद्या सुरु होतील का, याची मला माहिती नाही. मी लालबाग सारख्या वस्तीमध्ये मोठी झालेली आहे. माझे संपूर्ण शिक्षण लालबाग विभागात झालेले आहे. कामगारांच्या वस्तीमध्ये गेल्यानंतर मला गिरणीच्या भोग्यांची आठवण येते. गिरणी कामगार आठवतात. आज लालबाग सारख्या वस्तीत मल्टी स्टोअरेज बिल्डींग उभ्या राहिल्या असून आमच्या राज्यकर्त्यांनी अप्पर वरली म्हणून नामकरण केलेले आहे. या विभागात कामगारांसाठी पुन्हा उद्योग सुरु होणार काय हा खरा प्रश्न आहे. गिरणी मालक आणि काही स्वत:ला शहाणी म्हणविणारी मंडळी, स्वत:ला हुशार समजणारी मंडळी या कामगारांसाठी काही नवीन धोरण राबविणार काय ? नवीन धोरण राबविताना कामगारांसाठीच उद्योग सुरु झाले पाहिजेत.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई..........

कामगारांच्या मुलांच्या हाताला काम मिळाले पाहिजे असे मला सांगावयाचे आहे. जैतापूर प्रकल्पाबाबत खूप मोठी चर्चा झालेली असल्यामुळे मी त्याविषयी अधिक बोलणार नाही. परंतु वीज निर्मिती झाली पाहिजे. महाराष्ट्र राज्याची आणि देशाची त्यामुळे प्रगती होणार आहे. म्हणूनच आपण जैतापूरचा अणुऊर्जा प्रकल्प पुढे घेऊन चाललो आहोत.

सभापती महोदय, महाराष्ट्र सरकारने या राज्यामध्ये औद्योगिक धोरणाबरोबरच पर्यटन धोरण राबविण्याचे सुतोवाच केले आहे. पर्यटन क्षेत्रात काम करीत असताना काही गोष्टींचा जलद गतीने विकास करणे गरजेचे आहे. देशातील एकमेव सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित करण्यात आला. सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये पर्यटनाच्या दृष्टीने वेगळ्या पध्दतीने काम उभे करावे लागेल. तरच गोवा आणि केरळप्रमाणे पर्यटक त्याठिकाणी आकर्षित होतील असे मला वाटते. सिंधुदुर्ग जिल्हयात समुद्रात आणि डोंगरावर अनेक किल्ले आहेत. त्या किल्ल्यांचा पर्यटन क्षेत्र म्हणून विकास झाला पाहिजे. त्यादृष्टीने शासनाने प्रयत्न करावेत अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, मुंबई शहरातील बंद पडलेल्या कापड गिरण्यांच्या पुनर्विकासातून उपलब्ध होणाऱ्या जागेवर 60 हजार कामगारांना घरे दिली जाणार आहेत त्याबद्दल मी माननीय राज्यपाल महोदयांचे आभार मानते. कामगारांना घरे मिळणे अत्यंत गरजेचे आहे. ज्यांच्या घामाने गिरण्या उभ्या राहिल्या त्या कापड गिरण्या आज उद्ध्वस्त होत असताना त्या भागात निदान घराच्या माध्यमातून कामगारांचे अस्तित्व टिकून राहील. मी आरक्षणाच्या माध्यमातून सभागृहात सदस्य म्हणून आले नसले तरी शासनाने महिलांना 50 टक्के आरक्षण देण्याची भूमिका जाहीर केली आहे त्याबद्दल मी शासनाचे आभार मानते आणि माझे भाषण संपविते. जय हिंद, जय महाराष्ट्र!

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभी आहे.

माननीय राज्यपालांचे अभिभाषण हे शासनाने केलेल्या भरीव कार्याचे द्योतक आहे. महाराष्ट्र शासनाने केलेल्या कामगिरीतून शासनाचे पुरोगामीत्व, लोकाभिमुख राज्य कारभार आणि गरीब, दुर्बल घटकांविषयी शासनाची असलेली बांधिलकी स्पष्ट झालेली आहे. महाराष्ट्रातील जनतेच्या विविध मागण्या आहेत. त्या मागण्यांकडे शासनाने नेहमीच गांभीर्याने पाहिले आहे. राज्य शासन यासाठी प्रत्येक जिल्हयाच्या मानव विकास निर्देशांकाप्रमाणे त्या त्या जिल्हयाचा गुणानुक्रम आणि विकास पातळी निश्चित करुन त्यादृष्टीने विकास योजना आखून जनतेच्या न्याय मागण्यांच्या पूर्ततेसाठी विशेष योजना आखणार आहे ही गोष्ट अभिनंदनीय आहे.

सभापती महोदय, शाळा आणि शिक्षणाविषयी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये ऊहापोह झालेला आहे. त्याबद्दल विस्ताराने बोलावेसे वाटते. स्वातंत्र्य मिळून सहा दशके उलटूनही बाल कामगार प्रथा आपण बंद करु शकलो नाही. आपण नेहमीच सांगतो की, बालमजुरी व्हायला नको. परंतु बालमजुरी झाली नाही तर त्यांनी कुठे जायचे हा फार मोठा प्रश्न निर्माण होईल. त्या प्रश्नाकडे शासनाने गांभीर्याने बघणे आवश्यक आहे असे मला वाटते. बालमजुरी ही कोणत्याही संवेदनशील मनाला अधिक दु:खदायक आहे. बाल कामगार निर्माण होण्यामध्ये काही महत्वाची कारणे आहेत. त्यामध्ये बालकांची शाळेतून होणारी गळती हे एक महत्वाचे कारण आहे. महाराष्ट्र राज्यात नववीपर्यंत सुमारे 50 टक्के विद्यार्थी शाळेबाहेर फेकले जातात. त्यामागे आर्थिक कारणाशिवाय अन्य कारणे देखील आहेत. या संदर्भात जो अहवाल आला आहे त्यामध्ये असे म्हटले आहे.

नंतर 4इ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ MMP/ D/ पूर्वी श्री. भोगले....... 17:20

श्रीमती विद्या चव्हाण .........

शासनाने या आणि अशा समग्र अहवालाचा विचार करुन राज्यात बाल कामगार बनणारच नाही अशी पावले उचलावीत, कारण ते समाजाच्या दृष्टीने एक प्रकारे लांच्छनास्पद अशी गोष्ट आहे. पण त्या बाल मजुरांना आपल्या पोटासाठी मजुरी करावी लागते म्हणून मला अशी सूचना करावयाची आहे ज्या मुलांना मजुरीशिवाय पर्याय नसतो अशा मुलांसाठी, ज्याप्रमाणे शासनाच्या वतीने मागासवर्गीयांसाठी ज्याप्रमाणे वसतिगृहे चालविली जातात त्याच धर्तीवर जिल्हा व तालुक्याच्या ठिकाणी वसतिगृहे बांधावीत. त्यात या मुलांची सर्व काळजी घ्यावी आणि त्यांना औपचारिक शिक्षणही द्यावे, अशी माझी विनंती आहे.

महोदय, शासनाने बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्यासंबंधीचा अधिकार प्रदान करणारा कायदा सन 2009 मध्ये केला व त्याची अंमलबजावणी आपल्या राज्यात सुरु केली आहे. पण या कायद्यानुसार 6 ते 14 वयोगटातील मुलांपुरतीच ही मर्यादा ठेवलेली आहे, ती तशी न ठेवता बालवाडीपासून बारावीपर्यंतच्या मुलांचाही त्यात समावेश करावा अशी माझी विनंती आहे. तसेच सध्या पूर्व प्राथमिक शिक्षण अतिशय महाग करुन ठेवलेले आहे हे आपण सर्वच जाणतो, ते घेणे पुढे अशक्य आहे. त्यामुळे गरिबांची मुले अशा शिक्षणापासून वंचितच राहणार आहे हे देखील मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छिते. त्याचबरोबर 14 व्या वर्षी हे मूल साधारणत: आठवी किंवा नववीमध्ये शिकत असणार अशा वेळी त्यांना पुढील शिक्षणाचा अधिकार रद्द झ ाल्यानंतर मात्र शिक्षण घेण्यापासून वंचित रहावे लागणार आहे. अशा वेळेस ही मुले शाळा सोडून जाण्याची शक्यता अधिक असते. आपल्या राज्याला शाहू-फुले-आंबेडकरांसारखी महान शैक्षणिक परंपरा आहे हे लक्षात घेऊन शासनाने शिक्षणाचा हक्क मिळणारा कायदा जो 6 ते 14 वयोगटापर्यंत मर्यादित केलेला आहे, त्याचा विचार करावा. ही मर्यादा तेवढीच न ठेवता बारावीपर्यंतच्या सर्व बालकांना असे मोफत व सक्तीचे शिक्षण मिळावे अशी कळकळीची विनंती मी शासनाला करीत आहे.

महोदय, यासाठी आर्थिक तरतूद करीत असताना "द गॉल" यांचे एक वाक्य लक्षात ठेवावे. ते म्हणतात की जे शासन शिक्षणावर कमी खर्च करते त्या शासनाचा तुरुंग आणि पोलिसांवरील खर्च वाढतो. कारण जर बालकांना शिक्षण दिले आणि त्यांचे भविष्य घडविले तर मला वाटते इतर खर्च सुध्दा कमी होती याचाही विचार करण्याची गरज आहे. शिक्षणाच्या माध्यमातून एक नवा व

....2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण .........

सुसंस्कृत समाज घडवावयाचा, त्या समाजाची उन्नती करावयाची व त्यासाठी शिक्षण हाच एकमेव मार्ग आहे. तसेच गरिबांच्या उन्नतीचाही तोच एकमात्र मार्ग आहे, असे मला सांगावेसे वाटते.

दुसरा एक महत्वाचा मुद्दा शिक्षणाप्रमाणेच एका गोष्टीकडे लक्ष वेधण्याची गरज आहे ती म्हणजे राज्यातील मागासवर्गीयांना फी माफी देतो त्याचबरोबर आर्थिकदृष्ट्या दुर्बल व मागासवर्गीय ठरवित असताना त्यांच्या संपूर्ण कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न 15 हजार रुपये पाहिजे, अशी शासनाने मर्यादा ठरवून दिलेली आहे. ही मर्यादा सन 1993 मध्ये ठरविलेली आहे. पण मधल्या काळात प्रचंड महागाई वाढली व खर्च सुध्दा वाढला म्हणून ही मर्यादा वाढवून किमान 1 लाख पर्यंत करावी अशी माझी विनंती आहे.

"बहुजन हिताय, बहुजन सुखाय" ब्रीद असलेले हे शासन या उत्पन्नाची मर्यादा वाढविण्यासाठी त्वरेने पावले उचलेल अशी मला खात्री आहे.

महोदय, मुलांना शैक्षणिक संधी उपलब्ध करुन देऊन राज्यातील प्रत्येक गरीब माणसाची उन्नती करावयाची आहे. शासनाने शालेय विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबाबत जागृती निर्माण करुन शासनाने पर्यावरण सेवा योजना सुरु केली, ही बाब महत्वाची आहे. त्याचबरोबर आज समाजात वाढत चाललेली हिंसा आणि फैलावत चाललेला विद्वेष रोखून अहिंसा आणि रचनात्मक काम करण्यावर श्रध्दा असणारी पिढी निर्माण करण्यासाठी काही महत्वाचे प्रयत्न करणे आवश्यक आहे. शालेय अभ्यासक्रमाची आखणी अहिंसा, शांती आणि सद्भावनेवर विश्वास ठेवणारी पिढी निर्माण करण्याच्या दृष्टीने खास प्रयत्नांची गरज आहे आणि हे महत्वाचे पाऊल शासन उचलेल, असा विश्वास वाटतो.

दुसरा महत्वाचा मुद्दा घरांच्या बाबतीत आहे. कारण सरकारने गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या माध्यमातून घरांची योजना राबविली. त्यात शासनाने 4 हजार घरे बांधण्याचे ठरविले. पण सबंध राज्याची लोकसंख्या विचारात घेतली तर ही 4 हजार घरे अत्यंत अपुरी आहे. कारण घरांच्या किंमती खूप वाढलेल्या आहेत, म्हणून या गोष्टीकडे शासनाने लख दिले पाहिजे. कुठलीही वस्तू बाजारात येते त्या वस्तूला तिच्या निर्मितीवर होणाऱ्या खर्चावर आधारित त्या वस्तूची किंमत असावी, हे सक्तीचे पाहिजे. मग त्यात औषधाची बाटली, किंवा टी.व्ही. सेट असेल अथवा कोणतीही वस्तू विकत घेतो तेव्हा ती वस्तू उत्पादन खर्च व फायदा घेऊन विकली जाते.

( नंतर श्री. जुन्नरे ......

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण ...

आज मुंबईमध्ये 5 हजार, 50 हजार, 1 लाख रुपये चौरस फूट या प्रमाणे घरांचे दर आहेत. सर्वसामान्य आणि मध्यमवर्गीय माणूस एवढया महागडया दरामध्ये घर घेऊ शकत नसल्यामुळे झोपडपट्टयांची संख्या वाढते आहे. ज्या मध्यमवर्गीयाला 50 हजार रुपये पगार आहे तो सुध्दा एवढया महागडया किमतीत घर घेऊ शकत नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे शासनाने गृह धोरणाच्या बाबतीत विचार करण्याची आवश्यकता आहे. शासनाने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडून 4000 परवडण्याजोगी घरे बांधण्यासाठी उपाययोजना केल्या आहेत. परंतु मला असे वाटते की सध्याची लोकसंख्या बघता ही घरे फार अपुरी आहेत त्यामुळे शासनाने या योजनेतून अधिक घरांची बांधणी करण्याची आवश्यकता आहे. मुंबईतील जे गिरणी कामगार आहेत त्यांच्यासाठी 7 हजार घरे बांधून दिली जाणार आहेत. परंतु गिरण्यांच्या जमिनीच्या तुलनेने हा आकडा अतिशय कमी आहे. त्यामुळे घरांच्या संदर्भात शासनाने गंभीरपणे विचार करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील 66 व्या मुद्यामध्ये असे म्हटले आहे की, नागरिकांना जलद गतीने न्याय मिळवून देण्यास शासन कटिबध्द आहे. यासाठी राज्यातील विविध ठिकाणी सुमारे 200 सायंकालीन न्यायालये, 200 सकाळची न्यायालये तसेच 25 ग्राम न्यायालये स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे." खरे म्हणजे आज अशी परिस्थिती आहे की, सर्वसामान्य माणसालाही आता न्यायालयात जावे लागते व न्यायालयात गेल्यानंतर निकाल लवकर लागत नाही. यामुळे जनतेचा वेळ आणि पैसा मोठया प्रमाणात वाया जातो. न्यायालयाचा निर्णय लागण्यासाठी किती कालावधी लागतो आहे याची आपल्या सर्वांना कल्पना आहे. त्यामुळे न्यायालयांचे निकाल वेळेत लागावे, लवकर लागावेत यासाठी शासनाने न्यायालयांना काही तरी बंधने घालून देण्याची आवश्यकता आहे.

माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात जे मुद्दे मांडलेले आहेत ते मुद्दे सर्वसमावेशक आहेत. मी ज्या काही बाबींवर प्रकाश टाकलेला आहे त्याचा विचार व्हावा अशी अपेक्षा करते व माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाचे अभिनंदन व समर्थन करते. आपण मला विचार मांडण्याची संधी दिल्याबद्दल आपलेही आभार मानते व माझे दोन शब्द पूर्ण करते.

धन्यवाद.

----

4 जी-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जमा ( महाराष्ट्र विधानसभा द्वारा निर्वाचित ): सभापति महोदय, महामहिम राज्यपाल महोदय के अभिभाषण के धन्यवाद प्रस्ताव पर अपने विचार रखने के लिए मैं यहां पर खड़ा हुआ हूं.

सभापति महोदय, महाराष्ट्र सरकार ने पिछले वर्षों में जो कुछ काम किया और जो कुछ काम वह आने वाले वर्ष में करने वाली है, उसकी जानकारी इस अभिभाषण में दी गयी है. लेकिन मैं कहूंगा कि आने वाली 23 तारीख को, जिस दिन अगला बजट पेश किया जाएगा, उस दिन हमें यह पता लगेगा कि किस काम को कितनी प्रायर्टी दी गयी है और उस काम को पूरा करने के लिए कितना पैसा दिया गया है.

महाराष्ट्र सरकार ने बहुत से अच्छे निर्णय लिए हैं. उदाहरण के तौर पर ह्युमेन डेवलपमेंट इंडेक्स के बारे में बताया गया कि डिस्ट्रीक्ट लेवल को न्युक्लियस माना जाएगा तथा हमारे यहां पर जो इम्बेलेंस है तथा बॅकलाग है, उस बारे में एक कमेटी बनायी जाएगी. ग्रामीण क्षेत्र में डिस्ट्रीक्ट का एलोकेशन 53 प्रतिशत बढ़ाया गया है. मुझे उम्मीद है कि यह प्रोवीजन आने वाले वर्ष में और भी बढ़ेगा.

हमारे गोंदिया और गडचिरोली जिले के लिए केंद्र सरकार का जो इन्टेग्रेटेड एक्शन प्लान है, उसको इन दो जिलों में लागू करने का काम चालू है. मुझे लगता है कि इससे विकास की गति और बढ़ेगी. हमारी खेत नीति, युवा नीति तथा अन्य नीतियों का जिक्र माननीय राज्यपाल महोदय ने अपने अभिभाषण में किया है.

सभापति महोदय, मैं कहना चाहूंगा कि जो कुछ काम हमारे माननीय राज्यपाल महोदय या हमारी सरकार करना चाहती है, उसको कार्यान्वित करने का काम हमारी ब्युरोक्रेसी करती है. मुझे कहना है कि हमारी योजनाओं को कार्यान्वित करने की जो सिस्टम है, अफसरशाहों का काम करने का जो तरीका है,उसमें सुधार करने की बहुत आवश्यकता है. मेरा सुझाव है कि महाराष्ट्र के अंदर एक एडमिनिस्ट्रेटिव रिफार्म्स कमेटी बनायी जानी चाहिए. हमें देखना चाहिए कि हमारी योजनाओं का क्रियान्वयन किस तरह से तेज हो सकता है तथा हमारी एडमिनिस्ट्रेटिव कॉस्ट किस तरह से कम हो सकती है. हालांकि यह बात सही है कि उस दिशा में हमारी सरकार ने

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद जमा....

कुछ कदम जरुर उठाए हैं. उदाहरण के तौर पर उन्होंने अभी एक डॉक्युमेंट मॅनेजमेंट सिस्टम बनाया है. अभी हम बीडीएस की बात सुन रहे हैं. हम कई साल से बजट डिस्ट्रीब्युशन सिस्टम की बात सुन रहे हैं. लेकिन मैं कहना चाहता हूं कि जब से यह बजट डिस्ट्रीब्युशन सिस्टम आया है तब से लोगों को पगार ही समय पर नहीं मिल रहा है. सरकार का मिनिमम वेजेज एक्ट है, उसके अनुसार लोगों का पगार समय पर होना होना चाहिए. लेकिन इसका सबसे ज्यादा उल्लंघन हमारे सरकारी कार्यालयों में ही होता है. हमारी सरकार तो चाहती है कि लोगों को पगार समय पर मिले. लेकिन हमारी सिस्टम या व्यवस्था में कुछ गलतियां होने की वजह से लोगों का पगार समय पर नहीं हो पाता है.

हमारे माननीय मुख्यमंत्री और माननीय उप मुख्यमंत्री की एक बहुत ही अच्छी जोड़ी इस वक्त केबिनेट में है. सरकार में आने के बाद उन्होंने बहुत अच्छे काम शुरु किए हैं.नयी मुंबई में एयरपोर्ट लाने का प्रश्न हो, जैतापुर में वीज केंद्र लाने का प्रश्न हो या महिलाओं को लोकल बॉडीज में 50 प्रतिशत आरक्षण देने का प्रश्न हो, इन सभी बातों में उन्होंने बहुत ही तेजी से निर्णय लिया है. इसी प्रकार उन्होंने कहा कि मुंबई में अधिकारी और बिल्डरों का जो नेक्सस है, उसे तोड़ा जाना चाहिए. ये सब अच्छे निर्णय उन्होंने लिए हैं. हम भी चाहते हैं कि इन सब बातों पर अमल किया जाना चाहिए. लेकिन इन सब कामों को पूरा करने के संबंध में हमारी जो मशीनरी है, उस मशीनरी में सुधार लाने की जरुरत है. हम चाहते हैं कि लोगों में हमारी सरकार के प्रति विश्वास बढ़े.

हम ई-गवर्नेंस की बात कर रहे हैं. बहुत जगहों पर हमने ई-महासेवा केंद्र खोलने की बात भी की है. लेकिन ये सभी काम अच्छी तरह से न होने की वजह से, सरकार की छवि जनता में बहुत अच्छी नहीं बन रही है. इसलिए सरकार को इस बारे में विचार करने की आवश्यकता है.

महाराष्ट्र को हम कितना भी प्रगतिशील कहें, हम कितनी भी बात यहां पर शिवशाही की करें और कितनी भी बड़ी-बड़ी बातें करें. लेकिन आज भी हमारे विदर्भ क्षेत्र में किसानों की आत्महत्या हो रही हैं, या वहां पर हमारे बच्चे कुपोषण के शिकार हो रहे हैं. यह बात हम सब

...3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद अहमद...

के लिए बहुत ही शर्म और चिंता की है.  हमारा खुद का बजट कई हजार करोड़ रुपए का है. इसके अलावा प्रधानमंत्री जी से भी हमको बहुत पैसा मिला है. हमारी सरकार ने भी हजार करोड रुपए की घोषणा की, नागपुर अधिवेशन में हजार करोड़ रुपए का पॅकेज घोषित किया गया. केंद्र सरकार की ओर से 4 सौ करोड़ रुपए दिए गए, 200 करोड़ रुपए केंद्रीय कृषि मंत्री जी ने दिए. फिर भी लोगों में चर्चा हो रही है कि कोई खास फर्क नहीं पड़ा है. किसान अभी भी आत्महत्या कर रहे हैं और बच्चों में कुपोषण की समस्या अभी भी पहले जैसी ही है. यह कुपोषण केवल मेळघाट तक ही सीमित नहीं है.  कुपोषण की समस्या पहले चंद्रपुर, भंडारा, गोंदिया और वरोरा जैसी जगहों  में नहीं थी. लेकिन वहां पर भी यह समस्या अब पनपने लगी है. वहां पर भी कुपोषण की समस्या अब दिखायी देने लगी है.

इसके बाद मैं यहां पर महंगाई और वस्तुओं में मिलावट जैसी बुराईयों के बारे में कहना चाहूंगा. हालंकि इस बात का जिक्र माननीय राज्यपाल महोदय के अभिभाषण में नहीं है. लेकिन मेरा कहना है कि मिलावट और महंगाई जैसी बुराईयों के बारे में भी सरकार को कड़ा कदम उठाना बहुत आवश्यक है. जो लोग सामान को जमा कर लेते हैं, उनके खिलाफ सरकार को कड़े कदम उठाने पड़ेंगे.

कल यहां पर हमारे माननीय विरोधी पक्ष नेता जी ने तेल माफिया के संबंध में कुछ बातें कहीं. व्यापारी लोग सामान की होर्डिंग करते हैं और सामान के भाव बढ़ाते हैं तथा सामान की ब्लैक मार्केटिंग करते हैं. राशन में मिलने वाला सामान गरीब लोगों को न मिलकर वह माल किस तरह से ब्लैक मार्केट में जाता है, यह बात किसी से छिपी नहीं है. क्राइम करने वाले लोगों में आज डर नहीं है. इसीलिए एक समयबद्ध नीति बनाकर उनके मन में यह डर बैठाना पड़ेगा कि यदि उन्होंने काई गलत काम किया तो उनको सजा मिलेगी. यहां पर माननीय गृह मंत्रीजी बैठे हुए हैं. मैं कहूंगा कि क्राइम कम करने के लिए वह बहुत ही ईमानदारी से कोशिश कर रहे हैं. हम भी पुलिस के समर्थक हैं क्योंकि  हमारी पुलिस बहुत ही कठिनाई और विपरित परिस्थितियों में काम करती है. यह बात सही है कि पुलिस के कुछ कर्मचारी अपनी जिम्मेदारी सही ढंग से नहीं निभाते, लेकिन यह बात हमको माननी पड़ेगी कि हमारा पुलिस विभाग या पुलिस ऑरगेनाईजेशन बहुत अच्छा है.

....4

श्री सय्यद जमा...

यहां पर जैतापुर में वीज निर्मिती केंद्र की बात हुई. वहां पर एक लाख करोड़ रुपए का इन्वेस्टमें होने वाला है. मैं कहना चाहूंगा कि हमारे प्रोजेक्ट समय पर पूरे होने चाहिए. गोसीखुर्द जैसा बड़ा प्रोजेक्ट हमारे यहां पर पिछले 25-30 साल से चल रहा है. शुरु में यह प्रोजेक्ट एक हजार करोड़ रुपए का भी नहीं था. लेकिन उसके पूरा होने में बहुत समय लग जाने की वजह से वह प्रोजेक्ट 15-20 हजार करोड़ रुपए का हो गया है. इसी लिए मैं कहना चाहता हूं कि जैतापुर में जो प्रोजेक्ट आ रहा है, वह 1 लाख करोड़ रुपए का है. उस काम में डिले होने की वजह से या हमारे मिस मॅनेजमेंट की वजह से उसकी कॉस्ट यदि 5 प्रतिशत भी बढ़ी तो भी उसकी लागत कई हजार करोड़ रुपए बढ़ जाएगी. हमारे यहां पर कानून ही बना देना चाहिए कि कोई भी प्रोजेक्ट समय पर ही पूरा होना चाहिए. अधिकारियों की जवाबदारी होनी चाहिए कि संबंधित प्रोजेक्ट समय पर पूरा हो. सरकार बदल सकती हैं, लेकिन सरकार बदलने से अधिकारी नहीं बदलते हैं. इसलिए हमारा कोई प्रोजेक्ट 10 साल या 20 साल तक डिले नहीं होना चाहिए. ऐसा मेरा सुझाव है.

( इसके बाद श्री शर्मा...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री. सय्यद जमा जारी, पूर्वी देवदत्त.

सभापति महोदय, हमारे राज्य में प्रकल्पग्रस्त लोगों को पुनर्वसित करने की नीति स्पष्ट नहीं है, इसलिए प्रोजक्ट डिले हो रहे हैं. यह बात सही है कि जैतापुर में केंद्र शासन का प्रोजक्ट है और उस संबंध में उन्होंने अच्छा पॅकेज देने की बात कही है. लेकिन हमारे यहां कार्गो हब का मामला अटका हुआ है और वहां के इनवेस्टर बाहर जा रहे हैं. हम वहां के प्रकल्पग्रस्तों के बारे में वर्ष 2006 से अब तक यह निर्णय नहीं कर पाए हैं कि उनको क्या मुआवजा तथा अन्य क्या सुविधाएं दी जाएंगी. वहां के प्रकल्पग्रस्तों का पुनर्वसन अभी तक पूरी तरह से नहीं हुआ है. गोसीखुर्द केन्द्रीय प्रकल्प है और भारत सरकार इसके लिए पैसा खर्च कर रही है. यहां के प्रकल्पग्रस्तों के प्रश्न अभी तक हल नहीं हुए हैं. मेरी यह मांग है कि चाहे भारत सरकार के प्रकल्प हों, चाहे महाराष्ट्र सरकार के प्रकल्प हों, हमें प्रकल्पग्रस्तों के पुनर्वसन के बारे में एक स्पष्ट नीति यथाशीघ्र बनानी चाहिए.

सभापति महोदय, महाराष्ट्र शासन की ओर से खेल नीति, सांस्कृतिक नीति हमारे सामने आ रही है. महाराष्ट्र शासन ने छत्रपति शिवाजी महाराज का स्मारक समुद्र के अन्दर बनाने का निर्णय लिया है, लेकिन राज्यपाल महोदय के अभिभाषण में इस बात का कोई जिक्र नहीं है. इस बात का जिक्र अभिभाषण में होना चाहिए था. यह स्वर्ण जयंती वर्ष है, इसलिए मेरी मांग है कि 1 मई के पहले इस कार्य को शुरु किया जाए. इससे मुंबई और महाराष्ट्र की शान बढ़ेगी.

सभापति महोदय, अल्पसंख्यक विकास विभाग के लिए बजट में सिर्फ 220 करोड़ रुपए का प्रावधान किया गया है. महाराष्ट्र शासन का आदेश है कि हर विभाग में, हर क्षेत्र में अल्पसंख्यकों के लिए 15 प्रतिशत राशि का आवंटन होना चाहिए. मेरा नियोजन और वित्त विभाग से अनुरोध है कि 23 तारीख को पेश होने वाले बजट में अल्पसंख्यको के लिए 15 प्रतिशत प्रावधान हमें दिखाई देना चाहिए.

सभापति महोदय, महाराष्ट्र सरकार के श्रम विभाग और उद्योग विभाग बहुत निगलेक्टेड हैं. श्रम विभाग के बारे में बात की जाए तो हमारे विदर्भ में सैकड़ों की संख्या में स्मॉल स्केल इन्डस्ट्रीज बंद हैं, बीड़ी उद्योग बंद है, मीडियम और लार्ज स्केल इन्डस्ट्रीज भी बंद हैं. नागपुर का एम्प्रेस मिल बंद है, टेक्सटाइल मिल बंद है. इसके अलावा कई और मिलें भी बंद हैं. कपास हमारे विदर्भ में पैदा होता है, लेकिन कपास की प्रोसेसिंग दूसरी जगह पर की जाती है, जिनिंग

. . . 4H 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्री. सय्यद जमा

फैक्ट्री कोल्हापुर में है. श्रम विभाग में स्टाफ की कमी है, अधिकारी नहीं है. नागपुर में वर्ष 2004 से एडीशनल लेबर कमिश्नर के पद पर कोई नियुक्ति नहीं हुई है. सरकार ने माथाडी कामागारों के लिए बोर्ड बनाया है, निजी सुरक्षा गार्डों के लिए सुरक्षा बोर्ड बनाया है, लेकिन बिल्डिंग कन्सट्रक्शन में काम करने वाले लोगों के लिए बोर्ड नहीं बनाया है. मैं उम्मीद करता हूँ कि शासन इस बारे में ध्यान देगा. राज्यपाल महोदय ने जो अभिभाषण किया, उसके लिए मैं उनको धन्यवाद देता हूँ. जय हिंद, जय महाराष्ट्र.

. . . भाषण पूर्ण, . . . 4H 3

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विधीमंडळाच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये महाराष्ट्राच्या माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या भाषणाच्या मुद्दा क्र. 5 मध्ये गडचिरोली आणि गोंदिया जिल्ह्याचा उल्लेख करण्यात आला आहे. या जिल्ह्यामध्ये आदिवासींच्या आणि नक्षलींच्या योजना सम्मिलित आहेत. माननीय मुख्यमंत्री दिनांक 27 फेब्रुवारी 2011 रोजी गोंदिया जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. त्याठिकाणी नक्षलग्रस्त क्षेत्रामध्ये मूलभूत गरजा पुरविण्यासाठी 25 कोटींचा निधी दिला आहे, त्यामध्ये करण्यात आलेल्या अंबोरा ते ठाणा या रस्त्याच्या कामाचे उदघाटन माननीय मुख्यमंत्र्यांनी केले. परंतु या रस्त्यावर हा निधी खर्च न करता तो नक्षलग्रस्त भागामध्ये खर्च होणे आवश्यक होते. देवरी, सालेकसा, दरेकसा, तकोडी, चिचगड, तकोडीमधील भामरागड या भागांमध्ये हा निधी खर्च न करता एका विशिष्ट क्षेत्रामध्ये, विशिष्ट उद्देशाने खर्च केला जात आहे हे मला खेदाने म्हणावेसे वाटते.

सभापती महोदय, पोलिसांना प्रशिक्षण देणारी योजना करण्यात आली आहे. सभागृहामध्ये माननीय गृहमंत्री उपस्थित असल्यामुळे मला याठिकाणी सांगितले पाहिजे की, गडचिरोली किंवा गोंदिया जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी प्रशिक्षण केंद्र सुरु केले असते तर अत्यंत चांगले झाले असते.

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. परशुराम उपरकर)**

त्यामुळे आमच्या पोलीस मित्रांना या प्रशिक्षण वगार्मध्ये आनंदाने सहभाग घेण्यास उत्तेजन मिळाले असते व त्यांना त्याचा लाभ घेता आला असता. म्हणून मला आपल्याला सुचवावयाचे आहे की, गोंदिया पोलीस मुख्यालयाच्या ठिकाणी "अल्फा हॉक अकादमी" कार्यान्वित करण्याचा कार्यक्रम घेण्यात यावा.

सभापती महोदय, मुद्दा क्रमांक 13 च्या बाबतीत सांगू इच्छितो की, पूर्वी महाराष्ट्रामध्ये रोजगार हमी योजना चांगल्या प्रकारे सुरु होती. त्यामधून खूप लोकांना रोजगार मिळत होता. परंतु महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राज्यामध्ये आल्यानंतर प्रशासकीय खर्चामध्ये तीन टक्क्यांनी वाढ करुन तो 6 टक्क्यावरुन 9 टक्क्के करण्यात आला. याबाबत

. . . 4H 4



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्री. मानकर

महागाई खूप वाढली असल्याचे कारण देण्यात आले.परंतु वाढत्या महागाईला आळा घालण्याबाबत या चर्चेमध्ये कुणीही आपले मत व्यक्त केले नाही. या राज्यामध्ये 14 फेब्रुवारी 2000 पासून रोजगार हमी योजना सुरु आहे, या योजनेतील मजुरीचा किमान दर 127 रुपये करण्यात आला होता . सभापती महोदय, मी या रोजगार हमी योजना समितीवर सदस्य आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर . . . .

सभापती महोदय, पुणे हे औद्योगिक क्षेत्र आहे आणि त्याच्या बाजूला असलेल्या योजनांसाठी काम करण्याकरता एकही मजूर मिळत नाही हे खेदाने सांगावेसे वाटते. कारण या मजुरांना 250 ते 300 रुपये मजुरी मिळते.मग यांच्यासाठी शासन विशेष पॅकेज जाहीर करणार आहे काय? हा माझा सवाल आहे. खरे म्हणजे आपण पुणे शहराच्या बाहेरच्या भागामध्ये जाऊन पहावे.मग आपल्याला तेथील रस्त्यांची परिस्थिती काय आहे ते समजू शकेल आणि या रस्त्यांची परिस्थिती पाहिल्यानंतर अत्यंत वाईट वाटते. एवढ्या चांगल्या प्रकारे शहरांचा विकास होत आहे आणि ग्रामीण भागातील विकास अधोगतीला जात आहे. म्हणून या ग्रामीण रोजगार योजनेमध्ये, बी.पी.एल.मध्ये असलेल्या लोकांची संख्या फार मोठ्या प्रमाणात आहे. परंतु ते रोजगार मिळविण्यासाठी का येत नाहीत ? काम का करीत नाहीत ? त्यांना बी.पी.एल.च्या अंतर्गत मिळणारे अन्नधान्य पाहिजे, त्यातील योजनांचा लाभ पाहिजे पण राष्ट्रीय कार्यक्रमामध्ये हे कोणीही सहभागी होत नाहीत हे खेदाने सांगावेसे वाटते. म्हणून शासनाने याचा देखील विचार केला पाहिजे.जर मजुराला मजुरीची गरज नसेल तर त्याचा समावेश बी.पी.एल.मध्ये कसा केला जातो? जर राष्ट्रीय योजनेमध्ये त्यांचा सहभाग नसेल तर महाराष्ट्रातील बी.पी.एल.च्या याद्यांचे पुनर्निरीक्षण करण्याची आवश्यकता आहे.मी प्रत्येक जिल्ह्यामध्ये गेल्यानंतर तेथील कलेक्टरनां हा प्रश्न विचारतो की,"तुमच्या जिल्ह्यामध्ये किती बी.पी.एल.धारक आहेत, जर असतील तर मग ते कामासाठी का येत नाहीत? या बाबतीत अधिकारी एकच उत्तर देतात की, ग्रामीण रोजगार योजना चालववायाची असेल तर येथे मजदूर मिळत नाहीत. का मिळत नाहीत? तर याबाबत त्याच्यामध्ये उदासीनता आलेली आहे.कारण याबाबत त्याला कर्मचारी आणि अधिकारी सहयोग करीत नाहीत आणि त्यामुळे या योजनेला खऱ्या अर्थाने न्याय मिळत नाही असे मला खेदाने सांगावेसे वाटते. मी शेतकऱ्याचा मुलगा असल्याने, शेतकरी आहे. म्हणून शेतकऱ्यांच्या संबंधात भाष्य करणे हा मी माझा नैतिक अधिकार समजतो.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील पुस्तकामधील अनु.क्र.14,15, 16,17,18, 19 मध्ये शेतकऱ्यांच्या संबंधातील विविध योजनांबाबत उल्लेख केलेला आहे. मी याठिकाणी शेतकऱ्यांच्या संबंधातील वेदना व्यक्त करीत आहे. "लबाडा घरचे जेवण जेवल्याशिवाय काही खरे नाही" अशी म्हण आहे. खरे म्हणजे मागच्या वर्षीही योजना जाहीर झाल्या होत्या,परंतु एकाही शेतकऱ्याला त्याचा लाभ मिळाला नाही.माझे 2012 हे शेवटचे वर्ष आहे.मी माननीय



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल त्याच वेळी आभार मानेन की, ज्यावेळेस मुद्दा क्र.19 मधील योजना खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांच्या हितासाठी राबविण्यात येतील. मला असे सांगावयाचे आहे की, शेतकऱ्यांना बँकामार्फत रुपये 3 लाखापर्यंत कर्जावर 2 टक्के व्याज आकारण्याची योजना चांगली आहे. ती योजना वाईट आहे असे माझे म्हणणे नाही. पण त्याचा संबंधितांना लाभ मिळावयास पाहिजे.या बाबतीत मला माननीय कृषी मंत्री महोदयांना आणि माननीय अर्थ मंत्र्यांना सुचवावयाचे आहे की,शेतकऱ्यांनी खऱ्या अर्थाने आधुनिक प्रकारची शेती करावी असे वाटत असेल तर त्यासाठी कृषी साहित्याची आवश्यकता आहे, ट्रॅक्टरची आवश्यकता आहे, विविध यंत्रांची आवश्यकता आहे म्हणून अशा वेळी जर तुम्ही 5 लाख रुपयांपर्यंतचे कर्ज 2 टक्के व्याजाने देत असाल तर ते 3 किंवा 4 टक्क्यांनी द्यावे पण त्या संबंधातील मुदत वाढवून द्यावी अशी मी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, आमच्या विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणात कापूस पिकतो आणि कापसाच्या संबंधातील सर्व उद्योग हे पश्चिम महाराष्ट्रामध्ये आहेत. म्हणून मला असे सांगावयाचे आहे की, पश्चिम महाराष्ट्रातील, पश्चिम विदर्भातील जे आत्महत्याग्रस्त जिल्हे आहेत ते ऊस ऊत्पादक जिल्हे आहेत. त्याचप्रमाणे दहा लाख व्यक्तींसाठी रोजगाराची संधी निर्माण होणार आहे. नवीन वस्त्रोद्योग धोरण जाहीर झालेले आहे. त्यामुळे तेथे सर्व इंडस्ट्री व्हाव्यात, मिल व्हाव्यात आणि तेथील मजुरांना काम मिळावे, शेतकऱ्यांच्या कापसाला चांगला भाव मिळावा अशी सूचना मी करीत आहे. तसेच याठिकाणी उल्लेख केल्याप्रमाणे जर वर्षभरामध्ये एक-दोन मिल सुरु झाल्या तर पुढच्या वर्षी मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचे निश्चितच अभिनंदन करीन.

**तालिका सभापती (श्री.परशुराम उपरकर)** : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण लवकर संपवावे.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, मी फक्त दोन मिनिटे बोलणार आहे, जास्त बोलणार नाही. केवळ शेवटच्या मुद्याबाबत बोलून माझे भाषण संपविणार आहे. जिल्ह्याच्या ठिकाणी जात पडताळणी करण्याबाबत घोषणा करण्यात आली होती. पण याबाबत खेदाने असे सांगावेसे वाटते की, त्यादृष्टीने काहीही कार्यवाही झालेली नाही. जात पडताळणीच्या बाबतीत आजही अनेक अडचणी आहेत. त्यासाठी पुरेसे अधिकारी नेमले जात नाहीत. त्यामुळे जात पडताळणीच्या बाबतीत एक धोरण जाहीर केले पाहिजे. आम्हाला प्रत्येक जिल्ह्याच्या बाबतीत अभिवचन देण्यात आले होते की, त्याठिकाणी एक समिती असेल आणि यासंबंधातील कामे तातडीने केली जातील. परंतु ग्राम





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

पंचायतीच्या निवडणुकीच्या संदर्भात जात पडताळणीची मुदत वाढवूनही ग्राम पंचायतीच्या सदस्याना, सरपंचांना अजूनही जातीचे प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही असे खेदाने सांगावेसे वाटते आणि असे असूनही अजून त्यांचे सदस्यत्व नष्ट झालेले नाही हे अहोभाग्य आहे. परंतु अशी अनेक प्रकरणे आहेत. शासनाने या बाबत कार्यवाही करावी अशी माझी आग्रहाची विनंती आहे. याठिकाणी अनेक योजनांच्या संबंधात बोलावयाचे आहे.

यानंतर कु.थोरात . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर....

पण वेळेअभावी मी जास्त बोलू शकत नाही. महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये या अभिभाषणामध्ये सुवर्णासारखे काहीच नाही तर फक्त लोखंडासारखे आहे, असे वक्तव्य मी या ठिकाणी व्यक्त करतो आणि या अभिभाषणाबद्दल मी माझा खेद व्यक्त करुन माझे भाषण पूर्ण करतो.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीपराव सोनवणे ( नाशिक विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावाचे स्वागत करण्यासाठी आणि अभिनंदन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात मांडलेले विचार हा या राज्याचा लेखाजोखाच होय. अनेक विकासाचे मुद्दे या अभिभाषणात आले आहेत. सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक क्षेत्रामध्ये लोकाभिमुख आणि कल्याणकारी निर्णय या अभिभाषणात घेण्यात आलेले आहेत. तसेच प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी......

**तालिका सभापती ( श्री. परशुराम उपकर )** : सभागृहाची वेळ सर्व सन्माननीय सदस्यांची भाषणे संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री. दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात "अनुशेष व विकास खर्चाच्या समान वितरणाच्या समस्येचा नव्या दृष्टीने पुनर्विचार करण्यासाठी व साधनसंपत्तीचे समान वाटप होण्यासाठी निश्चित असे पर्यायी मार्ग शोधण्याकरिता तज्ज्ञांची एक समिती स्थापन करण्यात येत आहे." असे म्हटले आहे, हा अतिशय महत्वाचा निर्णय आहे. म्हणून मी माननीय राज्यपालांचे आणि राज्य शासनाचे आभार मानतो. यामुळे निश्चितपणे विदर्भ, मराठवाडा, खानदेश, नक्षलग्रस्त विभाग व दुर्गम भागाचा विचार होईल.

सभापती महोदय, "मानव विकास निर्देशांकाच्या आधारावर जिल्ह्यांचा गुणक्रम ठरविणे आणि त्याचे नियोजन करणे" हा अतिशय महत्वाचा असा मुद्दा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात आलेला आहे. त्यामुळे आतापर्यंत जे जिल्हे मागे राहिले असतील त्यांचा देखील निश्चितपणे विकास होईल. डी.पी.डी.सी.च्या माध्यमातून जिल्हा योजना राबवत असतांना मागील वर्षापेक्षा 53 टक्क्यांनी निधीमध्ये वाढ केलेली आहे, त्याचा फायदा निश्चितपणे प्रत्येक जिल्ह्याला आणि प्रत्येक भागाला होणार आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात नावीन्यपूर्ण योजनेसाठी नावीन्यपूर्ण असा एक निर्णय घेण्यात आलेला आहे. जिल्हा नियोजनाच्या अंतर्गत एकूण नियतव्ययापैकी 4.5 टक्के इतका निधी राखील ठेवण्यात आलेला आहे. या माध्यमातून जिल्हाधिकारी, पालकमंत्री यांना स्थानिक पातळीवर, स्थानिक गरजांची दखल घेऊन स्थानिक विकासासाठी योजना राबविता येतील.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीपराव सोनवणे...

अतिशय महत्वाची अशी ही घोषणा असल्यामुळे याबाबतीत मी माननीय राज्यपालांचे, उप मुख्यमंत्र्यांचे आणि वित्त मंत्र्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, आदिवासी विद्यार्थ्यांचा शैक्षणिक व आर्थिक दर्जा उंचावण्यासाठी या अभिभाषणत एक स्तुत्य असा उपक्रम हाती घेण्यात आलेला आहे. नामांकित निवासी शाळांमध्ये या विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन त्यासाठी त्यांना शिष्यवृत्ती देण्याचा आणि प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. शालेय विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी "पर्यावरण सेवा योजने"चा अतिशय महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आलेला आहे. परंतु शिक्षणावर जास्त प्रमाणात खर्च करण्यात व्हावा, अशी अपेक्षा मी या निमित्ताने व्यक्त करतो.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातून "क्रीडा धोरण" आणि "युवक धोरण" पुढे येत आहे. त्याबद्दल मी क्रीडा व युवक कल्याण विभागाच्या मंत्र्यांचे अभिनंदन करतो. वित्त विभागात विविध शासकीय विभागांमधील खरेदी प्रक्रियेमध्ये कार्यक्षमता आणि पारदर्शकता आणण्यासाठी 50 लाख रुपयांवरील कोणत्याही खरेदीच्या व्यवहारासाठी ई-निविदा पध्दत अनिवार्य करण्यात आली आहे. हा अतिशय महत्वाचा निर्णय आहे. महाराष्ट्रातील प्राचीन ऐतिहासिक किल्ल्यांचा जीर्णोध्दार केला तर ते किल्ले आणि पर्यटन स्थळे ऐतिहासिक आणि शैक्षणिक माहिती देणारे महत्वाचे केंद्र बनतील आणि त्या ठिकाणी विद्यार्थ्यांना चांगली माहिती मिळेल. निसर्ग पर्यटनासाठी 4 व्याघ्र प्रकल्प, 6 राष्ट्रीय उद्याने आणि 36 अभयारण्ये घोषित करण्यात आलेली आहेत, ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे.

सभापती महोदय, आम्ही देखील भूमिपुत्र आहोत. आम्ही देखील शेतकऱ्यांची मुले आहोत. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात अतिरिक्त सिंचन क्षमता निर्माण करण्यासाठी मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. यासाठी 7919 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. ज्यामुळे 1.75 लाख हेक्टर अतिरिक्त सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. राज्याला, गतिमान सिंचन लाभ कार्यक्रमातंर्गत आतापर्यंत केंद्र शासनाकडून 8039 कोटी रुपये इतके भरीव अर्थसहाय्य प्राप्त झाले आहे. याबाबतीत मी माननीय वित्त मंत्र्यांचे आणि सिंचन मंत्र्यांचे मनापासून आभार मानतो. अतिवृष्टी, अनियमितपणे लांबलेला पावसाळा व अनियमित उष्ण हवामान यांमुळे

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीपराव सोनवणे....

शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. हे नुकसान कसे भरुन काढावे हा मोठाच प्रश्न होता म्हणून आर्थिक नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना 1088.88 कोटी रुपये इतक्या आर्थिक मदतीचे पॅकेज मागील अधिवेशनात जाहीर केले व त्याचे वाटप प्रगतिपथावर आहे. हा अतिशय स्तुत्य असा कार्यक्रम आहे, या संदर्भात मी माननीय राज्यपालांचे मनापासून आभार मानतो.

सभापती महोदय, राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत "गाव सुपीकता निर्देशांक " ही अतिशय चांगली अशी योजना, शेतातील मातीचा दर्जा सुधारण्यासाठी करण्यात आलेली आहे. तसेच शेतकऱ्यांचे सोयाबीन, कापूस, तूर व हरभरा या पिकांच्या संदर्भात "कीडरोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प" निर्माण करण्यात आलेला आहे.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीपराव सोनावणे .....

सभापती महोदय, खताच्या संदर्भामध्ये 15 मे पूर्वी खताचा राखीव साठा प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी येणार आहे, हे फार महत्वाचे आहे. शेतकऱ्यांच्या दृष्टीकोनातून पीक कर्जाची अतिशय चांगली योजना शासनाच्या माध्यमातून झालेली आहे. 50 हजार रुपयांपर्यंतचे कर्ज बिनव्याजी आणि 50 हजार रुपये ते 3 लाख रुपयांपर्यंतचे कर्ज फक्त 2 टक्के व्याजाने तसेच फेब्रुवारी, 2011 पर्यंत शेतकऱ्यांना अल्प व्याज दराने 11 हजार 358 कोटी रुपयांचे कर्ज वाटप तसेच 2014-2015 पर्यंत 20 हजार कोटी रुपयांपर्यंत कर्ज वाटप होणार आहे, हा देखील महत्वाचा भाग आहे. नवीन वस्त्रोद्योग धोरणामध्ये कापसावर राज्यातच प्रक्रिया केली पाहिजे आणि ती प्रक्रिया राज्यात केली तर निश्चितपणे पुढे 10 लाख व्यक्तींना रोजगाराची संधी मिळणार आहे. हा एक अतिशय चांगला निर्णय आहे.

सभापती महोदय, ऊर्जेच्या संदर्भात सांगावयाचे म्हणजे या ठिकाणी कृषी पंप धारकांना इंधन व समायोजन आकारावरील व्याजाची जवळजवळ 2410.44 कोटी रुपयांची सूट समायोजित करण्याचा निर्णय घेऊन अनुदान रुपाने शेतकऱ्यांना मदत केलेली आहे. राज्याच्या विकासासाठी, शेतकऱ्यांसाठी आणि उद्योगांसाठी 12.12.2012 पर्यंत भारनियमन मुक्तीचा अतिशय चांगला निर्णय या ठिकाणी होत आहे. त्या संदर्भात महाजेनको असेल, पारस, परळी, भुसावळ, खापरखेडा, चंद्रपूर, कोराडी या ठिकाणी वीज निर्मिती प्रकल्प उभारले जात आहेत. माननीय उप मुख्यमंत्री व ऊर्जा मंत्री श्री. अजितदादा पवार यांचे, शासनाचे व माननीय राज्यपालांचे मी या निमित्ताने अभिनंदन करतो.

सभापती महोदय, पोलीस प्रशिक्षण आणि पोलिसांची भरती या संदर्भामध्ये माननीय गृहमंत्र्यांनी अतिशय चांगले निर्णय घेतले. त्यांचे देखील या निमित्ताने अभिनंदन करतो. गावांचा सर्वंकष विकास व्हावा आणि पर्यावरण संतुलित समृध्द गाव विकास अभियान राबविले जावे म्हणून माननीय ग्रामविकास मंत्री श्री. जयंत पाटील यांनी अतिशय चांगली योजना केलेली आहे. संपूर्ण भारतात राबवली जाईल अशा प्रकारची योजना त्यांनी केलेली आहे. त्या ठिकाणी पायाभूत सुविधा, त्यासाठी लागणारा निधी, वृक्षारोपणाच्या संदर्भात एक व्यक्ती एक झाड, पर्यावरण विकास आणि

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ D/

श्री. दिलीपराव सोनावणे .....

त्याच्या अंमलबजावणीसाठी विशेष कार्यक्रम या ठिकाणी घेतला आहे. त्याबद्दल मी शासनाचे निश्चितपणे अभिनंदन करतो. राज्यात राजीव गांधी किशोरवयीन मुलींचे सक्षमीकरण असेल, त्यासाठी लागणारा पैसा असेल तो देखील उपलब्ध करुन देण्याची घोषणा या ठिकाणी करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, जात पडताळणी समित्यांच्या संदर्भातील संपूर्ण कामकाजाचे संगणकीकरण करण्याचा मनोदय शासनाने व्यक्त केलेला आहे. त्यामध्ये निश्चितपणे पारदर्शकता आहे. माननीय राज्यपाल महोदयांनी अतिशय चांगली घोषणा या निमित्ताने केलेली आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. युवकांना रोजगार आणि स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देणे, अल्प मुदतीचे अभ्यासक्रम तयार करणे, कौशल्य विकासाचा उपक्रम करणे, असे चांगले निर्णय युवकांच्या रोजगार आणि स्वयंरोजगारासाठी केलेले आहेत. मुंबईच्या संदर्भात सुध्दा सार्वजनिक परिवहन सेवेमध्ये वाढ, मेट्रो रेल, मोनो रेल असे प्रकल्प या ठिकाणी घ्यावयाचे आहेत. हवाई वाहतुकीच्या संदर्भात देखील निर्णय घेतलेला आहे. या ठिकाणी सर्वसामान्यांच्या न्याय व्यवस्थेचा जो प्रश्न आहे त्यासाठी 200 सायंकालीन न्यायालये, 200 सकाळची न्यायालये आणि 25 ग्राम न्यायालये सुरु करण्याची चांगली घोषणा या ठिकाणी करण्यात आलेली आहे. मी या निमित्ताने राज्यपाल महोदयांचे आणि शासनाचे आभार मानतो तसेच आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ D/

ॲड. उषा दराडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, महाराष्ट्राचे राज्यपाल माननीय श्री. के. शंकरनारायणन यांनी केलेल्या अभिभाषणाचे जर आपण अवलोकन केले तर निश्चितच शासनाचे अभिनंदन करण्यासारखे आणि माननीय राज्यपालांचे आभार मानण्यास योग्य असे हे अभिभाषण आहे. सर्वसाधारणपणे राज्य चालवित असताना राज्याचा सर्वांगीण विकास, त्यामध्ये युवक असतील, विद्यार्थी असतील, महिला असतील, शेतकरी असतील, शेतमजूर असतील, कामगार असतील, उद्योगधंदे असतील, सिंचनाचा प्रश्न असेल, या सगळ्या सर्वंकष प्रश्नांना घेऊन जाणारे अभिभाषण आहे की, नाही हे बघणे गरजेचे असते. माझ्या दृष्टीने सर्व सामाजिक प्रश्न सोडविण्याची जबरदस्त इच्छाशक्ती असलेले हे अभिभाषण आहे आणि त्या दृष्टीने या ठिकाणी आभार मानणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, काही विशेष बाबींचा या ठिकाणी उल्लेख करणे मला खूप गरजेचे वाटते. डीपीडीसीला आपण जो निधी देतो त्यामध्ये विकास कार्यक्रमाच्या विकेंद्रित अंमलबजावणीच्या उत्साहवर्धक अनुभवातून म्हणजे सत्तेचे जे विकेंद्रीकरण झालेले आहे आणि त्यामधून जी अंमलबजावणी झाली ती विकासाच्या दृष्टीने फार उत्साहवर्धक दिसून आली म्हणून 2010-2011 साठी 3828 कोटी रुपये इतका निधी शासनाने दिलेला आहे. खूप मोठ्या प्रमाणावर हा निधी दिलेला आहे. पोलिसांच्या संदर्भात बोलत असताना मला नेहमी महाराष्ट्राच्या जनतेचे अभिनंदन आणि कौतुक करावेसे वाटते. बॉम्बस्फोट झाल्यानंतर महाराष्ट्र लवकरच पुन्हा सुरळीत कामकाजाला सुरुवात करतो. 26/11 चा हल्ला झाल्यानंतर पुन्हा महाराष्ट्र स्वत:च्या पायावर उभा राहिला. पुण्यामध्ये बॉम्बस्फोट झाल्यानंतर त्याही ठिकाणी पूर्ववत कामकाज सुरु झाले.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे.....

महाराष्ट्राच्या जनतेमध्ये जगण्याची व विकासाची जबरदस्त इच्छाशक्ती व सामुदायिक श्रम करण्याची ताकद आहे. त्यांच्या जीवावर आपण हे सर्व करीत आहोत. त्यामध्ये पोलीस यंत्रणेचा फार मोठा वाटा आहे. पोलीस यंत्रणेसाठी विशेषत: गडचिरोली व गोंदिया या दोन जिल्ह्यांमध्ये 'एकात्मिक कृती योजना' राबविण्यात येणार आहे. ही योजना अत्यंत कौतुकास्पद आहे. या ठिकाणी पोलिसांना विशेष प्रशिक्षण देण्याकरिता नागपूर येथे 'अल्फा हॉक अकादमी' सुरु होणार आहे त्याचा वारंवार उल्लेख झालेला आहे. ही गोष्ट अत्यंत चांगली असल्यामुळे त्याचे सर्वांनी स्वागत केले पाहिजे.

सभापती महोदय, सागरी किनारा सुरक्षा अधिक बळकट करण्यासाठी शासनाने काही पावले उचलली आहेत. सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी छत्रपती शिवरायांचा उल्लेख केला होता. सागरी हल्ल्याचा धोका शिवरायांनी कसा ओळखला होता ते त्यांनी सांगितले आहे. त्याच पध्दतीने शासनाने 12 सागरी पोलीस ठाणी व 32 तपासणी चौक्या कार्यान्वित केल्या आहेत. त्याचप्रमाणे आणखी 7 सागरी पोलीस ठाणी सुरु होणार आहेत. शासनाने सुरक्षिततेच्या दृष्टीने 75,558 मच्छिमारांना स्मार्ट कार्डे दिलेली आहेत.

सभापती महोदय, आपला महाराष्ट्र नेहमी पुरोगामी पावले उचलणारा आहे. आपण रोजगार हमी योजनेचा 1977 साली कायदा केला. पण रोजगाराची हमी 1972 सालापासून सुरु केली आहे. हा कायदा संपूर्ण देशात पोहोचला असून त्याचे संपूर्ण देशभर व जगभर स्वागत झालेले आहे. त्याच धर्तीवर ग्राम स्वच्छता अभियान सुध्दा महाराष्ट्रभर सुरु झाले, ती योजना सुध्दा निर्मल ग्राम योजना म्हणून देशपातळीवर पोहोचली. याच पध्दतीने महाराष्ट्र राज्याने माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांच्या नेतृत्वाखाली 'महात्मा गांधी तंटामुक्त गाव योजना' सुरु केलेली आहे. या योजनेच्या पहिल्या वर्षी 2325 गावे, दुसऱ्या वर्षी 2891 गावे, तिसऱ्या वर्षी 4247 गावे तंटामुक्त गावे म्हणून घोषित झाली आणि 360 गावांना विशेष शांतता पुरस्कार देऊ शकलो.

राज्यातील सिंचनाची क्षमता वाढविण्यासाठी शासनाने 7919 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. 1.75 लाख हेक्टर अतिरिक्त सिंचन क्षमता निर्माण करण्यासाठी तरतूद केली आहे.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे.....

विदर्भातील व मराठवाड्यातील सिंचनाचा अनुशेष भरुन काढण्यासाठी माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित दादा पवार हे जलसंपदा मंत्री होते त्यावेळी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यामुळे त्यांचेही आभार मानणे गरजेचे आहे. तरी सुध्दा त्या भागातील सिंचनाचा बहुतांश अनुशेष दूर झालेला नाही, तो दूर करण्यासाठी शासन प्रयत्न करीत आहे याचा मला आनंद होत आहे.

सभापती महोदय, शेती हा विषय शासनाने गांभीर्याने घेतलेला आहे. शासन यापुढे गाव सुपीकता निर्देशांक तयार करणार आहे. या अंतर्गत या वर्षात 43,711 गावांपैकी 6,312 गावांची निवड करण्यात आली आहे. या गावातील माती कशी आहे, तिचे गुणधर्म कोणते आहेत, त्या जमिनीत कोणत्या पध्दतीची लागवड करता येईल, पाणी शोषून घेण्याची क्षमता आहे की, पाण्याचा निचरा करण्याची क्षमता आहे. त्या जमिनीचा कस कसा आहे, तिची प्रतवारी कशी आहे, याचा निर्देशांक ठरविणारी अत्यंत पुरोगामी व अत्यंत प्रगतीशील विचाराची योजना राज्य शासन राबवित आहे. मला या योजनेचे कौतुक करावेसे वाटते.

सभापती महोदय, या वर्षात 'कीडरोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प' राबविला जाणार आहे. याबाबत सगळयांनी उल्लेख केला. हा प्रकल्प चांगला आहे. सरकारने 6 लाख मेट्रिक टन इतका खतांचा साठा केलेला आहे. महाराष्ट्राला नेहमी मग आदरणीय श्री.शरदराव पवार असोत की, यशवंतराव चव्हाण असोत की, वसंतराव नाईक असोत या सर्वांनी महाराष्ट्राला पुरोगामी दिशा देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी शेतकऱ्यांचे हित जपलेले आहे. त्यांनी हरित क्रांती, फळबाग योजना ते महिलांचे सक्षमीकरण करण्याचे स्वप्न पाहिले व त्यानुसार राज्यात योजना आणल्या आहेत.

मला शासनाचे एका गोष्टीचे कौतुक करावयाचे आहे. शासन नियमित कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना 50 हजार रुपयांपर्यंत बिनव्याजी व 3 लाखापर्यंत 2 टक्के दराने कर्ज देणार आहे. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांना त्यापासून परावृत्त करावयाचे आहे. या राज्यात वेगवेगळया प्रकारच्या कृषी विभागामार्फत योजना राबविल्या जात आहेत. त्यासाठी शासनाचे अभिनंदन करणे गरजेचे आहे.

3....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे.....

मला एका गोष्टीचा उल्लेख करावाच लागेल. राज्यात विजेची टंचाई आहे हे आपल्या सर्वांना माहीत आहे. त्यावेळी एन्रॉनचा प्रकल्प कसा अडचणीत आणला गेला त्यावर मी पुन्हा भाष्य करणार नाही. राज्यामध्ये त्याबाबत खूप चर्चा झालेली आहे. परंतु महाराष्ट्राला व देशाला विजेची गरज आहे हे निश्चित आहे. त्यासाठी जैतापूरचा अणुऊर्जा प्रकल्प शासनाने हाती घेतला आहे. त्या प्रकल्पाबाबत काही लोक नकारात्मक भूमिका घेत आहेत. हा प्रकल्प सकारात्मक भूमिकेतून स्वीकारला पाहिजे. कारण हा प्रकल्प महाराष्ट्राचे भवितव्य घडविणारा आहे. म्हणून हा प्रकल्प पूर्ण झाला पाहिजे, या दृष्टीने शासनाने सूतोवाच केलेले आहे त्याची आपल्याला गांभीर्याने दखल घ्यावी लागेल. त्याचे कौतुक करावे लागेल.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ D/ MMP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 18:00

ॲड. उषा दराडे....

2012मध्ये आपला महाराष्ट्र भारनियमन मुक्त तर होईलच पण जसा आपला महाराष्ट्र 1993मध्ये बाजूच्या राज्यांना वीज विकत होता तशी स्थिती आपल्या राज्याची निर्माण झाली पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, या सदनामध्ये महिलांच्या संदर्भात ब-याच चर्चा झाल्या. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये महिलांसाठीच्या 50 टक्के आरक्षणाचा उल्लेख झालेला नाही. परंतु 73 आणि 74व्या घटना दुरुस्तीच्या पार्श्वभूमीवर महिलांना पंचायती राज व्यवस्थेमध्ये जे 33 टक्के आरक्षण मिळाले त्या पार्श्वभूमीवर महिलांना 50 टक्के आरक्षण देता येईल का याबाबत महाराष्ट्राच्या मत्रिमंडळामध्ये चर्चा झाली ही अत्यंत सकारात्मक बाब आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांचे स्वप्न साकार करणारी ही गोष्ट आहे. पंचायती राज्य व्यवस्थेच्या संदर्भात राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नवी मुंबई येथे जे शिबिर झाले त्यामध्ये आदरणीय श्री. शरद पवार साहेबांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या सर्व मंत्र्यांना अशी सूचना दिली होती की हा विषय तुम्ही मंत्रिमंडळामध्ये मांडला पाहिजे. माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण आणि माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी या गोष्टीला सकारात्मक घेतलेले आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करते. भविष्यात पंचायती राज व्यवस्थेमध्ये महिलांसाठी 50 टक्के आरक्षण येईल असा मला विश्वास आहे. आज देशात 10 लाख महिला राजकारणामध्ये, समाजकारणामध्ये आणि विकासाच्या प्रक्रियेमध्ये सामुदायिकरीत्या उभ्या रहात आहेत. त्यांच्या संख्येमध्ये वाढ होईल. आज महिलांची समाजातील संख्या कमी होत आहे. त्यामुळे गर्भजल परीक्षेच्या संदर्भात सरकारने गांभीर्याने भूमिका घेतलेली आहे. त्याबाबतीत कमिटी स्थापन केलेली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर हे सरकार महाराष्ट्रातील महिलांना सक्षम करणारे, अडीअडचणीमध्ये त्यांना मदत करणारे आणि त्यांना बरोबरीचे स्थान देणारे सरकार आहे आणि त्याविषयी माझ्या मनात कोणताही किंतु वाटत नाही. पुन्हा एकदा मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल त्यांचे आभार मानते आणि सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपलेही आभार मानून रजा घेते.

----

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल त्यांचे आभार मानण्यासाठी आणि त्यांचे अभिनंदन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांचे अभिभाषण हा राज्याचे धोरण ठरविणारा एक दस्तऐवज असून समाजातील सर्वसामान्य लोक, गरीब, दुर्बल घटक, विशेषतः अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, मागासवर्गीय यांच्या हक्कांचे व हिताचे संरक्षण व जपणूक करणा-या धोरणांचा उहापोह माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये करण्यात आलेला आहे. सन 2008-2009 आणि सन 2009-2010 या वर्षामध्ये महाराष्ट्राला सर्वाधिक केन्द्रीय अर्थसहाय्य मिळालेले आहे. कुठल्याच राज्याला मिळाले नाही एवढे अर्थसहाय्य आपल्या महाराष्ट्राला मिळालेले आहे. याचे कारण महाराष्ट्रावर देशातील सर्व नेत्यांचे प्रेम आहे. राज्याचे माजी मुख्यमंत्री केन्द्रातील सत्तेमध्ये आहेत. कै. यशवंतराव चव्हाण यांच्या नंतर श्री. शरद पवार, श्री. सुशीलकुमार शिंदे, श्री. विलासराव देशमुख यांनी या देशाला आणि राज्याला एक नियोजनबद्ध कार्यक्रम दिलेला आहे. आपल्या देशाचे माननीय पंतप्रधान श्री. मनमोहन सिंग हे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर होते त्यावेळी त्यांचे मुंबईमध्ये वास्तव्य होते. आमच्या पक्षाच्या सर्वेसर्वा श्रीमती सोनिया गांधी यांचेही महाराष्ट्रावर अतिशय प्रेम आहे. त्यामुळे एवढा भरीव निधी आपल्या राज्याला मिळालेला आहे. हा निधी महाराष्ट्राला मिळण्याचे दुसरे एक कारण म्हणजे केन्द्रामध्ये महाराष्ट्राची ताकद आहे. राज्याचे तीन माजी मुख्यमंत्री आज केन्द्राच्या मंत्रिमंडळामध्ये आहेत. केन्द्राकडून राज्याला निधी मिळण्यासाठी राज्याची तेवढी पत असावी लागते आणि ती असल्यामुळेच राज्याला एवढा निधी मिळालेला आहे. सन 2003-2004मध्ये राज्यात भीषण दुष्काळ पडला होता. त्यावेळी श्री. सुशीलकुमार शिंदे हे राज्याचे मुख्यमंत्री होते. जनावरांना चारा मिळत नव्हता, जनावरांच्या छावण्या उभाराव्या लागत होत्या. त्यावेळी ते राज्याचे एक शिष्टमंडळ घेऊन तत्कालीन पंतप्रधान श्री. अटल बिहारी वाजपेयी यांच्याकडे गेले होते. त्यावेळी त्यांना रिकाम्या हाताने परत यावे लागले होते. तशी आज आपल्या राज्याची स्थिती नाही. आपल्या राज्याला भरीव असे अर्थसहाय्य मिळत आहे.

सभापती महोदय, दुसरी महत्वाची गोष्ट अशी की, या अभिभाषणामध्ये शेतकरी हा केन्द्रबिंदू आहे. या राज्याने शेतक-याला 11358 कोटी रुपयाचे कर्ज वाटप केलेले आहे. तसेच सन 2014-2015 या वर्षापर्यन्त पीक कर्जाचे वाटप 20,000 कोटी रुपयांपर्यंत वाढविण्याचे

..3..



MSS/ KTG/ D/ MMP/ KGS/ पूर्वी श्री. खंदारे 18:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण....

ठरविलेले आहे. श्री. पृथ्वीराज चव्हाण हे राज्याचे नवे मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी संपूर्ण जगाला दृष्ट लागेल असे दोन प्रकल्प आपल्या राज्यात आणले. प्रतिवर्षी 60 दशलक्ष प्रवाशांच्या प्रस्तावित क्षमतेसह, प्रवाशांच्या हवाई वाहतुकीच्या मागण्यांची पूर्तता करण्यासाठी नवी मुंबई येथे आतंरराष्ट्रीय विमानतळ  प्रकल्पाला मान्यता मिळाली असून तो 2014 पर्यंत प्रवाशांच्या सेवेत दाखल होईल. माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण हे स्वत: विज्ञान शाखेचे पदवीधर आहेत.

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

....नंतर श्री. गिते...

अशुध्दीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ KTG/ KGS/ प्रथम श्री.शिगम 18:05

श्री.सुभाष चव्हाण...

ते अणुऊर्जा खात्याचे मंत्री होते. जैतापूर प्रकल्पाच्या अनुषंगाने त्यांनी बैठका घेतल्या. स्वत: जैतापूर येथे जाऊन शासनाची भूमिका लोकांना समजावून सांगितली. एवढा मोठा प्रकल्प आपल्या देशामध्ये किंबहुना अशिया खंडात येत आहे. याचा आपणा सर्वांना सार्थ अभिमान असला पाहिजे असे माझे मत आहे.

महोदय, माननीय राज्यपालांनी आपले अभिभाषण मराठीत करावे म्हणून शिवसेना पक्षाचे काही सदस्य सभागृहाच्या वेलमध्ये बसले. राज्याचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. मराठी भाषेचे जतन, मराठी भाषेचा सर्वांगीण विकास यासाठी शासनाने स्वतंत्र असा मराठी भाषा विभाग स्थापन केलेला आहे. मराठी भाषेची काळजी माननीय राज्यपालांना आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या वेळी सभागृहातील बाकडयाखाली लपणे, माननीय राज्यपालांच्या बाबतीत नाराजी व्यक्त करणे हे बरोबर नाही असे मला वाटते. राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात असे औचित्य साधून छायाचित्रे, माहितीपत्रे, आपले जे वैभवशाली दस्तऐवज आहेत. छत्रपती शिवाजी महाराजापासून जो जो इतिहास घडला आहे तो दाखविण्यासाठी एक सांस्कृतिक धोरण शासनाने जाहीर केलेले आहे. हे वर्ष पर्यटन वर्ष म्हणून साजरे होणार आहे. पर्यटन हा माझा आवडीचा विषय आहे. या महाराष्ट्राला 720 कि.मी.सागरी किनारपट्टी लाभलेली आहे. त्यामुळे संपूर्ण कोकणपट्टी सुंदर होणार आहे. ऐतिहासिक किल्ल्यांच्या जीर्णोध्दार, पर्यटन स्थळे, राष्ट्रीय उद्याने, अभयारण्य, वाघ्र प्रकल्प, या सगळया बाबी पर्यटनमय होणार आहेत. पर्यटनामध्ये वाढ झाल्यामुळे शासनाच्या महसुलात वाढ होणार आहे.

सभापती महोदय, कोकणातील अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, अवेळी होणारा पाऊस, नियमित उष्ण हवामान यासंदर्भात नुकसान भरपाईला भरीव असे पॅकेज माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणाच्या माध्यमातून राज्यातील जनतेला दिलेले आहे. 1088.88 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर करुन त्या पॅकेजच्या निधीचे देखील वाटप पूर्णपणे झालेले आहे. त्यामुळे या आघाडी सरकारने म्हणजे कॉग्रेस आणि राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाने आपल्या जाहीरनाम्याप्रमाणे वचनांची पूर्तता केलेली आहे. शासनाने जी आश्वासने दिली होती त्याची परिपूर्तता म्हणजे माननीय राज्यपालांचे अभिभाषण आहे. मला आपण बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. धन्यवाद.

-----

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज साधारणत: किती वेळ चालेल याची सदस्यांना माहिती दिली तर बरे होईल असे मला वाटते.

**उप सभापती** : माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर आणखी चार,पाच सदस्यांना बोलावयाचे आहे. त्यांची भाषणे संपल्यानंतर सभागृहाचे कामकाज थांबवू. साधारणत: 06.30 वाजेपर्यंत सभागृहाचे कामकाज आपण चालवू. त्यानंतरही काही सदस्य बोलावयाचे राहिले तर त्यांना सोमवारी बोलण्याची संधी देऊ.

श्री. हेमंत टकले : ठीक आहे.

---

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ KTG/ KGS/ प्रथम श्री.शिगम 18:05

श्री. चंद्रकांत पाटील ( पुणे विभागय पदवीधर ) : सभापती महोदय, आपल्या संसदीय कामकाजामध्ये काही पध्दती का पडल्या आहेत मला कळत नाही. माननीय राज्यपालांचे अभिभाषण आणि त्यावर फक्त दोन दिवसांची चर्चा होते. खरे तर या चर्चेस जास्त वेळ दिला पाहिजे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात सुध्दा केवळ ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्याच मांडल्या पाहिजेत असे काही अधोरेखित आहे की काय हे मला कळत नाही. किती तरी गोष्टी न झालेल्या आहेत, त्याबाबतीत अतिशय नम्रपणे मान्य करुन, त्या गोष्टींची आम्ही पूर्तता करु असे शासनास म्हणता आले असते.

सभापती महोदय, शिक्षणाच्या संदर्भात गेल्या दहा वर्षात आश्वासन देऊन पूर्ण झाल्या नाहीत त्याची मोठी यादी मी वाचून दाखवू शकतो. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती 2003 पासून बंद आहे. अनेक शाळांमध्ये अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, 2003 पासून शिक्षकेतर कर्मचारी न भरल्यामुळे मुख्याध्यापकांना शाळेची घंटी वाजवावी लागणार आहे. वेतनेतर अनुदान 2005 पासून वेगवेगळया संस्थांना मिळालेले नाही. काही संस्थांची अनुदानाची रक्कम कोटीच्या वर गेलेली आहे. विजेची बिले शाळा भरु शकत नाही अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. जवळ जवळ 37 हजार शिक्षकांना कायम विना अनुदानित शाळांमधून गेल्या दहा वर्षापासून पगार मिळालेले नाहीत. जुलै,2008 मध्ये या सभागृहामध्ये असा शब्द दिला गेला की, "कायम" हा आम्ही काढू आणि 37 हजार शिक्षकांना पगार देऊ. परंतु याबाबतीत कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही...

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील............

शिक्षण क्षेत्रातील असंख्य गोष्टी ज्या गेल्या दहा वर्षात झालेल्या नाहीत, त्याबद्दल कुठेही अभिभाषणात उल्लेख झाला नाही याबद्दल मी खेद व्यक्त करीत आहे.

सभापती महोदय, 200 सायंकालीन आणि सकाळची न्यायालये सुरु होणार असा ऊहापोह केलेला आहे. गेली 20 वर्षे कोल्हापूरला उच्च न्यायालयाचे खंडपीठ व्हावे यासाठी जन आंदोलन सुरु आहे. तेथे खंडपीठ स्थापन झाल्यास कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयातील लोकांना उच्च न्यायालयीन कामकाजासाठी मुंबईला यावे लागणार नाही. गेली 20 वर्षे प्रभावी आंदोलन सुरु असताना उच्च न्यायालयाचे खंडपीठ कोल्हापूर येथे सुरु करणार की नाही याचा उल्लेख अभिभाषणामध्ये नाही याबद्दल मी खेद व्यक्त करीत आहे.

सभापती महोदय, नवी मुंबईमध्ये जागतिक दर्जाचे विमानतळ उभारण्याचे सूतोवाच केले आहे. कोल्हापूर येथे विमानतळ आहे. परंतु मागील सहा महिने तेथे विमानोड्डाण होऊ शकत नाही अशी धावपट्टीची स्थिती झालेली आहे. विस्तारीकरणाचा प्रस्ताव मांडला, त्याची अंमलबजावणी होत नाही. कोल्हापूरमध्ये चित्रनगरी व्हावी, संपूर्ण महाराष्ट्रातील मराठी चित्रपटसृष्टीला चांगला स्टूडिओ मिळावा म्हणून दोन वर्षापूर्वी मी लक्षवेधी सूचना मांडली असताना 350 कोटी रुपये खर्चाची चित्रपटसृष्टी निर्माण करण्याचे शासनाने मान्य केले. परंतु अद्याप त्या कामाचे टेंडर निघालेले नाही.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील जवळजवळ 5 जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांवर प्रशासक नेमले आहेत. कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेवर प्रशासक नेमून दोन वर्षे झाली. संचालकांवर तोट्याची जबाबदारी निश्चित झालेली असताना अद्याप एफआयआर दाखल झालेला नाही. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला 2100 कोटी रुपये थकहमी देण्याबाबत मंत्रिमंडळात वाद सुरु आहे. एका बाजूला चांगल्या गोष्टींचे स्वागत करीत असताना ज्या गोष्टी आम्ही आजपर्यंत करु शकलो नाही त्या गोष्टी पुढील काळात करणार आहोत असा उल्लेख अभिभाषणामध्ये असावयास पाहिजे होता. परंतु तो उल्लेख न केल्याबद्दल मी खेद व्यक्त करुन माझे भाषण संपवितो.

-----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी दिनांक 14 मार्च, 2011 रोजी केलेल्या अभिभाषणाबद्दल त्यांचे आभार व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांचे अभिभाषण म्हणजे सरकारने वर्षभर केलेल्या कामांचा आढावा असतोच, शिवाय भविष्यकाळातील दिशा धोरणांचे प्रतिबिंब त्यामध्ये दिसून येते. महाराष्ट्र राज्य आपले सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत असताना सुवर्ण महोत्सवी वर्षात राज्यातील जनतेला उत्साह, प्रेरणा आणि दिलासा देणारे अभिभाषण झालेले आहे असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. ग्लास अर्धा भरलेला आहे की अर्धा रिकामा आहे हे ज्याच्या त्याच्या बघण्यावर अवलंबून आहे. विरोधी पक्षात बसत असताना ग्लासकडे कोणत्या दृष्टीने पाहिले जाते हे महत्वाचे आहे. कोकणाचा विचार करीत असताना तो विकासापासून वंचित राहणार नाही याची विरोधकांनी काळजी घ्यावी.

सभापती महोदय, मध्यंतरीच्या काळात स्वतंत्र विदर्भाची मागणी करण्यात काही लोक आघाडीवर असल्याचे वृत्तपत्र व दूरदर्शनच्या माध्यमातून पहावयास मिळाले. मी शासनाचे यासाठी मन:पूर्वक आभार मानतो की, 1 मे, 1960 रोजी हे राज्य स्थापन झाले, विदर्भ आणि मराठवाड्याचा समावेश होऊन हे राज्य स्थापन झाल्यानंतर विदर्भ आणि मराठवाड्याचा विकास झाला नाही असे तेथील जनतेला वारंवार वाटत आले होते. त्यातून स्वतंत्र विदर्भाची मागणी पुढे आली. विदर्भाचा विकास होत नाही त्यामुळे तेथे अनुशेष वाढत आहे. यादृष्टीने स्वतंत्र विदर्भ द्या, कोकणाचा विकास होत नाही म्हणून स्वतंत्र कोकण द्या अशा पध्दतीच्या बातम्या वृत्तपत्रातून प्रसिध्द झाल्या होत्या. परंतु महाराष्ट्रातील सर्व भागांना समान न्याय मिळावा, सामाजिक समतोल राखला जावा यादृष्टीकोनातून अनुशेष, विकास आणि खर्च याचा अभ्यास करण्यासाठी तज्ज्ञांची समिती स्थापन करण्याचे माननीय राज्यपालांनी घोषित केले आहे. मागील 60 वर्षाच्या काळात पहिल्यांदा अशी समिती स्थापन करण्याची घोषणा झाली. याचे कारण म्हणजे वारंवार स्वतंत्र विदर्भाची मागणी होत होती. यासाठी माननीय राज्यपालांनी केलेले अभिभाषण महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाला समर्पक आणि साजेसे आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

सभापती महोदय, गडचिरोली आणि गोंदिया हा नक्षलग्रस्त भाग म्हणून ओळखला जातो.

नंतर 4पी.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर .........

लोकप्रतिनिधी म्हणून काम करीत असताना वारंवार शासकीय यंत्रणेला बोलतो की गडचिरोली आणि गोंदिया जिल्ह्यात बदली करण्यात येईल. अशा प्रकारे गडचिरोली आणि गोंदिया जिल्ह्यात बदली म्हणजे एक प्रकारे काळ्या पाण्याची शिक्षाच समजली जाते. पण माननीय गृह मंत्र्यांचे मी अभिनंदन करणार आहे कारण त्यांनी गडचिरोली जिल्ह्याचे पालक मंत्री म्हणून स्वत:च मागून घेतले. त्यानंतर ते गडचिरोली जिल्ह्यात फिरताना पोलिसांच्या संरक्षणात, पोलिसांच्या ताफ्यात न फिरता कधी कधी मोटर सायकलवरुन देखील फिरतात. त्यामागे त्यांची भावना अशीच आहे की, नक्षलवादी जिल्ह्यातील सर्वसामान्य जनता सुरक्षित राहिली पाहिजे आणि ज्यावेळेस नक्षलग्रस्त भागातील जनता सुरक्षित तेव्हाच राज्यही सुरक्षित असे म्हणता येईल. या गोष्टीवरुन मला एका गोष्टीची आठवण करुन द्यावीशी वाटते की, कै. सुनिल दत्त हे पंजाबमध्ये मोठ्या प्रमाणात दहशतवाद सुरु असताना सुवर्ण मंदिरात शांततेचा प्रस्ताव घेऊन एकटेच गेले होते. यासंबंधीच्या बातम्या आपण अनेक वृत्त वाहिन्या तसेच वर्तमानपत्रातून वाचल्या असतीलच. त्याचप्रमाणे गडचिरोली सारख्या वन परिक्षेत्र परिसरातील नक्षलवादी कारवाया सक्षमपणे हाताळता याव्यात म्हणून विशेष प्रशिक्षण देण्यासाठी नागपूरला अल्फा हॉक ॲकेडमी कार्यान्वित करण्याचा निर्णय या शासनाने घेतला त्याबद्दल मी जरुर माननीय राज्यपालांचे अभिनंदन करीन.

यानंतर माननीय राज्यपालांनी राज्यातील विजेच्या परिस्थितीचाही आढावा आपल्या भाषणात घेतला आहे. ऊर्जा ही जलद विकासाची मूलभूत गरज आहे. सन 2012 पर्यंत संपूर्ण राज्य भार नियमन मुक्त होणार असे माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितलेले आहे. याचा आढावा घेताना मी असे सांगू इच्छितो की, कधी तरी कॉंग्रेस सरकारने कोकणात एन्रॉन प्रकल्प सुरु करण्याचा प्रयत्न केला होता पण त्याला मोठ्या प्रमाणात विरोध झाला. त्यानंतर काय झाले हे सर्वांनाच ज्ञात आहे. अशा प्रकारे विरोध करीत असताना गावागावात जाऊन फक्त भाषणे करायची पण ऊर्जेची गरज आहे हे मात्र जनतेला देखील समजते. आज आपण पाहतो की, भार नियमनामुळे आपला शेतकरी दिवसा वीज नसते म्हणून रात्रीच्या वेळेला शेतात जातो, त्याला साप व विंचूचा त्रास होतो पण याला कारणीभूत कोण आहे याचा विचार करण्याची वेळ आलेली आहे. जर शेतकऱ्याचा विकास व्हावा असे वाटत असेल तर ऊर्जेची सुध्दा तितकीच गरज आहे हे विसरुन चालणार नाही. पण



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ..........

ऊर्जा प्रकल्पांना वेगवेगळ्या प्रकारे नेहमीच विरोध करुन प्रकल्प कसे थांबतील असाच प्रयत्न होताना दिसतो. ऊर्जा प्रकल्पाबाबत विचार केला तर सुरक्षिततेचा प्रश्न असू शकतो पण त्यावरही तोडगा असतो. त्याचा अभ्यास करुन, तज्ज्ञांची मते घेऊन त्यातून मार्ग निघतो. पण अशा प्रकारे प्रयत्न न करता केवळ विरोधच करणे हे कितपत योग्य आहे, याचा विचार विरोधकांनी करावा. येथे एन्रॉन प्रकल्प कसा बुडविला आणि पुन्हा कसा बाहेर काढला याबाबतीतील चर्चा मी करणार नाही, कारण सर्व सन्माननीय सदस्यांना त्याची चांगलीच माहिती आहे.

महोदय, या आघाडी शासनाचे मी क्रीडा विषयक धोरण, कामगार विषयक धोरण याबाबत सुध्दा अभिनंदन करणार आहे. तसेच सन 2011-12 हे वर्ष पर्यटन वर्ष म्हणून जाहीर केलेले आहे. त्यासंदर्भात मला अशी सूचना करावयाची आहे की, केवळ पर्यटन विकासामध्ये एकाच जिल्ह्याचा विकास न करता संपूर्ण राज्यातील पर्यटनाचे महत्व लक्षात घ्यावे. तसेच ज्या मुंबईतून कर रुपाने करोडो रुपये उत्पन्न मिळते तसेच उत्पन्न पर्यटनाच्या माध्यमातून देखील मिळू शकेल. कारण या मुंबई शहरात गेट-वे ऑफ इंडिया, तारापोरवाला मत्स्यालय अशी अनेक ठिकाणे पाहण्यासारखी आहेत. त्यात परदेशातून समुद्रमार्गे तसेच हवाई मार्गे पर्यटक येत असतात. अशा सर्व गोष्टींचा विचार केला तर मुंबईतील पर्यटनाचा विकास करण्याचा निर्णय शासनाने घ्यावा. एवढे बोलून मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाला पाठिंबा देतो व माझे दोन शब्द संपवितो.

--------

.....3......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलत असताना शासनाने सागरी सुरक्षेसंबंधीचा उल्लेख केलेला आहे. मुंबईत 26.11.2008 रोजी झालेला अतिरेक्यांचा हल्ला झाल्यानंतर करावयाच्या उपाययोजना म्हणून सागरी किनाऱ्यांची सुरक्षा करण्याचा निर्णय घेतला. यामध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी अप्सरा, सावित्री, अस्मिता आणि सागरकन्या अशा नवीन बोटी दिल्या. पण त्यावर प्रशिक्षीत स्टाफ न दिल्यामुळे त्या पूर्णपणे गस्तीला न जाता समुद्रातच पडून आहेत. गेल्या जून महिन्यात मी विशेष उल्लेखाच्या माध्यमातून हा प्रश्न उपस्थित केला असता त्याचे उत्तर माननीय गृह मंत्र्यांनी मला पत्राने कळविले आहे.....

यानंतर श्री. जुन्नरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ KGS/ KTG/ 18:20

श्री. परशुराम उपरकर .....

सागरी सुरक्षा रक्षकांची 70 पदे रिक्त असून ही पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे असे सांगण्यात आले होते परंतु अद्याप पर्यंत ही पदे भरली गेली नसल्यामुळे या सागरी गस्ती नौका समुद्रातच उभ्या आहेत. त्यामुळे उभ्या असलेल्या सागरी गस्ती नौकांबाबत शासनाकडून जे दुर्लक्ष होत आहे त्याबाबत मी खेद व्यक्त करीत आहे.

सभापती महोदय, काही दिवसापूर्वी मंत्रिमंडळाची बैठक घेण्यात आली होती व या बैठकीमध्ये जसे निवडणुकीचे पॅकेज जाहीर केले जाते तशा प्रकारे कोकण पॅकेज जाहीर करण्यात आले व त्यासंदर्भात 30 जून रोजी जी.आर.काढण्यात आला होता. या जी.आर.च्या अनुषंगाने कोकणाला 1500 कोटी रुपये 3 टप्प्यामध्ये देण्याची घोषणा झाली.

सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये 2 मोठे, 8 मध्यम व 16 लहान प्रकल्प आहेत परंतु या प्रकल्पाची कामे ठप्प झालेली आहेत. टाळंबा येथील प्रकल्पातील लोकांचे पुनर्वसन न झाल्यामुळे या ठिकाणचे गावकरी रस्त्यावर उतरले व आधी पुनर्वसन व नंतर धरण असे धोरण राबवा यासाठी रस्त्यावर आले होते.

आज कोकणातील मच्छीमार हवालदिल झालेला असून तो दुष्काळाच्या खाईत पडलेला आहे. गेल्या दोन वर्षापूर्वी कोकणामध्ये जे फयान वादळ आले होते त्यासंदर्भात मच्छीमारांना मदत करण्यासाठी शासनाने मोठी घोषणा केली होती. जिल्हा बँकेने फयान मच्छीमारांना कर्ज रुपात मदत केली होती. परंतु आज त्या कर्जाची वसुली करण्याकरिता शिरोडा येथील मच्छीमारांना जी 101 च्या नोटीसेस पाठवून मच्छीमारांना त्रस्त करण्याचे काम शासनाकडून केले जात असल्यामुळे शासनाच्या धोरणाबद्दल खेद व्यक्त करीत आहे.

कोकणातील सिंधुदुर्ग जिल्हयात काजूचा उद्योग मोठया प्रमाणात चालतो. कोकणातील काजू प्रक्रिया उद्योगास चालना देण्यासाठी शासनाने राज्यामध्ये उत्पादित व प्रक्रिया केलेल्या आणि विक्री झालेल्या काजूवरील भरणा केलेल्या 12.5 टक्के इतक्या मूल्यवर्धित कराच्या रकमेची अनुदान स्वरुपात प्रतिपूर्ती करण्याचा निर्णय घेतलेला आहे. परंतु हा निर्णय शासनाने केवळ एक वर्षासाठी घेतलेला आहे. त्यामुळे हा निर्णय कायमस्वरूपी घ्यावा व छोटया उद्योजकांना काजू बी शासनामार्फत खरेदी करुन त्यांना बाराही महिने प्रोसेसिंगसाठी द्यावा व छोटया उद्योगांना चालना द्यावी अशी विनंती आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर .....

माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात क्रीडा धोरणाच्या बाबतीत नमूद केले गेले आहे. क्रीडा स्पर्धेत जास्त जास्त पदके ही नेमबाजीमध्ये मिळवली गेली होती. नेमबाजीमध्ये पदके मिळवलेल्या कु. तेजस्वीनी सावंतचा आपण सत्कार व सन्मान केलेला आहे. परंतु कु. तेजस्वीनी सावंत ज्या रेंजमध्ये प्रॅक्टीस करते ती रेंज कोल्हापूरमध्ये कशा पध्दतीची आहे, त्या रेंजला कशा पध्दतीने अद्यावत करावे याबाबत शासनाने पूर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे. जी काही पदके मिळवली गेली आहे त्या पदकातून आपले मोठेपण दाखवण्यासाठी शासन अभिमान बाळगत आहे. परंतु अशा प्रकारचा अभिमान बाळगण्याऐवजी कोल्हापूरची रेंज चांगली करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयातील गोवा-मुंबई हायवे क्रमांक 17 वर सन 2009-10 मध्ये एकूण 1500 अपघात झालेले असून या अपघातामध्ये 863 व्यक्तींचा मृत्यू व 4354 व्यक्ती जखमी झालेल्या आहेत. या हायवेवरील अपघाताच्या संदर्भात वेळोवेळी वर्तमानपत्रातून माहिती छापून येत असतात. कोकणातील या हायवेच्या संदर्भात "हा हायवे आहे की, डायवे आहे" अशा प्रकारचा मथळा देऊन माहिती छापण्यात आली होती. परंतु असे असतानाही हा हायवे दुरुस्त केला जात नाही, हायवे वरील वळण कमी केले जात नाही. जर हायवेची डागडुजी व वळण कमी केले तर अपघातांची संख्या निश्चितपणे कमी होऊ शकेल. त्यामुळे हायवेची डागडुजी व वळण कमी करण्याची नितांत गरज आहे एवढे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, प्राचीन, ऐतिहासिक किल्ल्यांचा जीर्णोध्दार व त्यांचे संरक्षण याबाबत माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात उल्लेख केलेला आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील विजय दुर्ग व सिंधुदुर्ग किल्ल्याचे तट पडत आहे. किल्ल्याच्या तटाच्या दुरुस्तीसाठी केंद्राकडून पैसा आलेला आहे परंतु केंद्राच्या पैशाचे नियोजन राज्य सरकार व्यवस्थित करीत नसल्यामुळे किल्ल्यांच्या तटाची फार भयानक परिस्थिती निर्माण झालेली आहे.

यानंतर श्री. गायकवाड.....

अमुद्रित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

VTG/ KGS/ KTG/ प्रथम श्री.जुन्नरे 18.25

श्री.परशुराम उपरकर ..

हे दोन्ही किल्ले ताब्यात घेऊन राष्ट्रीय स्मारक करण्याच्या बाबतीत माननीय मंत्र्यांनी सभागृहात अभिवचन दिले होते परंतु हे अभिवचन अद्याप पाळले गेले नाही. या किल्ल्यामध्ये शिवाजी महाराजांचे मंदीर आहे त्या मंदिराची दुरुस्ती करण्यासाठी निधी देण्यात यावा अशी मागणी वारंवार केल्यानंतर एक कोटी रुपये देण्यात येतील अशा प्रकारची घोषणा करण्यात आली परतु एक कोटी रुपयापैकी फक्त 25 लाख रुपये देण्यात आल्यानंतर आणि दुरुस्तीचे काम सुरु केल्यावर पुरातत्व विभागाने काम थांबवले त्याकडे राज्य शासनाने दुर्लक्ष केल्यामुळे शिवाजी महाराजांच्या एकमेव मंदिराच्या दुरुस्तीचे काम अपूर्णावस्थेत आहे. तेव्हा हे काम लवकरात लवकर करण्याच्या दृष्टीने शासनाने प्रयत्न करावा.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करण्यासाठी मी उभा होतो या अभिभाषणावरील चर्चेत भाग घेण्यासाठी आपण मला संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे ( पुणे विभाग शिक्षक ) :सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी जास्त वेळ न बोलता थोडक्यात माझे विचार मांडणार आहे.राज्याच्या सुवर्ण महोत्सवाच्या वर्षात माननीय राज्यपालांनी अभिभाषण केले आहे.महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी कै. क्रांतीसिंह नाना पाटील, कै.यशवंतराव चव्हाण,कै.प्र.के.अत्रे यांच्या सारख्या थोर नेत्यांनी योगदान दिलेले असल्यामुळे त्यांच्या नावाचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात करण्याची आवश्यकता होती परंतु तो उल्लेख करण्यात आलेला नाही.

सभापती महोदय, या वेळा विकासाला एक वेगळा आयाम देण्याचा शासन प्रयत्न करीत आहे असे दिसून येते.मानव विकास निर्देशांक हा पायाभूत मानून विकास करण्यात येणार असून ही कल्पना अतिशय चांगली व स्वागतार्ह आहे. परंतु यासाठी कालबध्द कार्यक्रम घेण्यात येईल अशा प्रकारचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात केला असता तर अधिक बरे झाले असते . नेमिच येतो मग पावसाळा याप्रमाणे या कार्यक्रमाचे होता कामा नये. वर्षानुवर्षे योजनांचे काम चालूच राहून त्यांची ज्या प्रमाणे वासलात लागते त्याप्रमाणे मानव विकास निर्देशांकाचे होता कामा नये यासाठी कालबध्द कार्यक्रमाचा अंतर्भाव त्यामध्ये करण्याची आवश्यकता होती .

सभापती महोदय, या वर्षी केन्द्र सरकारकडून जलसिंचनासाठी 8 हजार 39 कोटी रुपयांचा निधी मिळविण्यामध्ये आपण यशस्वी झालो आहोत ही स्वागतार्ह बाब आहे परंतु त्यामध्ये राज्य सरकारचा सहभाग किती राहणार आहे, त्याचबरोबर या निधीचा विनियोग कसा केला जाणार आहे याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये करण्यात आलेला नाही तो उल्लेख या अभिभाषणात करण्याची आवश्यकता होती असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, रोजगार हमी योजनेसंबंधी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख करण्यात आला आहे . 1972-73 सालापासून राज्यामध्ये रोजगार हमी योजना सुरु असून त्यामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने तसेच ती सर्व समावेशक करण्याच्या दृष्टीने माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख करण्यात आलेला नाही तो उल्लेख करण्याची आवश्यकता होती असे मला सांगावयाचे आहे.



VTG/ KGS/ KTG/ प्रथम श्री.जुन्नरे 18.25

सभापती महोदय, अवकाळी पावसाच्या निमित्ताने 1 हजार 18 कोटी रुपयांच्या अर्थसहाय्याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात करण्यात आला आहे. परंतु अशा प्रकारची ज्यावेळी नैसर्गिक आपत्ती येते ती येण्या पूर्वी जी काही प्रिव्हेन्टीव्ह मेझर्स घ्यावयाची असते त्या संदर्भात माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख करण्यात आला नाही तो उल्लेख करण्याची आवश्यकता होती असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय,राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत गाव सुपीकता निर्देशांक तयार करण्याच्या संदर्भात माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख करण्यात आला असून 2010-2011 या वर्षात राज्यातील 43,711 गावापैकी 6312 गावांची निवड करण्यात आली असून त्याचा जवळपास 12.94 लाख शेतक-यांना लाभ होणार आहे.महाराष्ट्रामध्ये 43,712 गावे असून या सर्व गावाची निवड गाव सुपीकता निर्देशांक तयार करण्यासाठी केला असता तर अधिक बरे झाले असते.संपूर्ण राज्यातील गावे डोळयासमोर ठेवून हा कार्यक्रम आखावयास पाहिजे होता परंतु तसे करण्यात आले नाही त्यामुळे केवळ प्रायोगिक तत्वावर कार्यक्रम घेण्यात येईल आणि पुन्हा ती याजना सोडून दिली जाईल की काय अशा प्रकारची भीती मला वाटते.

सभापती महोदय,अनुसूचित जमातीच्या मुला मुलीसाठी राज्यात सुरु असलेल्या शाळांचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात करण्यात आला आहे परंतु राज्यातील अनुसूचित जातीसाठी 288 केन्द्रीय आश्रमशाळा सुरु असून त्या शाळेला अनुदान मिळावे म्हणून गेल्या पंधरा दिवसापासून काही मंडळी आझाद मैदानावर उपोषणासाठी बसलेली आहेत परंतु त्यासबंधी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख करण्यात आला नाही.

सभापती महोदय, राज्यातील 82 अनुसूचित जमातीच्या शाळांची मान्यता काढून घेण्यात आल्यामुळे नाशिक येथील आयुक्त कार्यालयासमोर या शाळेतील शिक्षक उपोषणाला बसलेले आहेत त्यातील 14 जणाची प्रकृती गंभीर असून त्यांना दवाखान्यात भरती केलेले आहे त्या बाबतीत सन्माननीय मंत्री श्री बबनराव पाचपुते यांच्या बरोबर चर्चा केली परंतु त्यांनी सुध्दा समाधानकारक पणे प्रश्न सोडविण्याकडे कल दाखविला नाही.

सभापती महोदय,मुंबईतील बंद पडलेल्या कापड गिरण्यातील कामगारांसाठी 7 हजार घरे म्हाडाच्या माध्यमातून बांधून देण्यात येतील असा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करण्यात आला आहे.परंतु या घराचे वितरण केव्हा आणि कसे केले जाणार आहे यासबंधी या अभिभाषणात अंतर्भाव करण्यात आला नाही.

सभापती महोदय, महाराष्ट्र - कर्नाटक सीमा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने शासनाने सिव्हील याचिका दाखल केली असा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात करण्यात आला आहे परंतु बेळगाव ही उपराजधानी करण्याच्या दृष्टीने कर्नाटक सरकारने जो प्रयत्न चालविला आहे त्यासाठी स्टेट स्को मेन्टेन करण्याकरिता आपण पुन्हा एक याचिका दाखल करण्याची गरज आहे व त्याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात करण्यात आलेला नाही.

सभापती महोदय, राज्यातील सहा ते चौदा वर्ष वयापर्यंतच्या मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्या ंस बंधीचा 2009 चा कायदा अतिशय चांगला आहे. त्याची अंमलबजावणी करण्यासाठी शाहू, फुले, आंबेडकर यांच्या पुरोगामी महाराष्ट्रामध्ये एका चांगल्या कार्यक्रमाचा समावेश या अभिभाषणात करावयास पाहिजे होता परंतु दुर्देवाने तो उल्लेख करण्यात आला नाही एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.धन्यवाद.

-------------

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या महापौर, नगरसेवकांना पोलिसांकडून झालेली मारहाण

**मु.शी.**: कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या महापौर, नगरसेवकांना पोलिसांकडून झालेली मारहाण या विषयावर श्री.संजय केळकर यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यास अनुलक्षून माननीय मंत्र्यांचे निवेदन.

श्री. आर. आर. पाटील (गृह मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी " कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या महापौर, नगरसेवकांना पोलिसांकडून झालेली मारहाण" या विषयासंबंधी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यास अनुलक्षून मी पुढील निवेदन करीत आहे.

आज दिनांक 18.3.2011 रोजी सकाळी 11.30 च्या दरम्यान कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या महापौर सौ. वैजयंती शिरीष घोलप गुजर व त्यांच्याबरोबर शिवसेना, भारतीय जनता पार्टी, मनसे, कॉग्रेस व राष्ट्रवादी कॉग्रेस असे सर्वपक्षीय नगरसेवक एम.आय.डी.सी. च्या डोंबिवली कार्यालयातील अधीक्षक अभियंता श्री. विजय पन्नीकर यांना पाणी योग्य दाबाने व पुरेसे येत नाही म्हणून जाब विचारण्यासाठी गेले होते. त्यांच्या दालनामध्ये जाऊन खाली बसून त्यांनी घोषणाही द्यायला सुरुवात केली होती. त्यांच्याबरोबर असलेल्या 20 ते 25 कार्यकर्त्यांनी बाहेरील अभ्यागत कक्षातील सोफे, टीपॉय, कुंडयांची तोडफोड केली त्याचबरोबर स्टँडचा पंखा, नकाशाची काच, त्यांच्या नावाचे बोर्ड, खिडकीची काच, आतील टीपॉय यांचीही मोडतोड केली. दरम्यान निरीक्षक श्री. पांडे व त्यांचा स्टाफ त्याठिकाणी पोहोचला. श्री. पन्नीकर यांना मारहाण होऊ नये म्हणून पोलिसांनी त्यांच्या भोवती काठया धरुन कडेही केले होते. ते कडे दाबत त्यांच्यापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न त्यांच्याबरोबर असलेले कार्यकर्ते करीत होते. या दरम्यान महापौरांच्या करंगळीला थोडे खरचटल्यासारखे झाले, त्यामुळे थोडे रक्तही आले. त्यांनी ते रक्त रुमालाला पुसून तो रुमाल मीडियाला दाखविला. त्यामुळे लाठीचार्ज झाल्याच्या बातम्या सगळीकडे पसरल्या. पण त्याठिकाणी कोणत्याही पध्दतीचा लाठीचार्ज झालेला नाही. मी स्वत: महापौर यांचेबरोबर दूरध्वनीवर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बोललो. त्यांनी पोलिसांबद्दल माझी कोणतीही तक्रार नाही परंतु आम्हाला एम.आय.डी.सी. चे पाणी योग्य दाबाने आणि पुरेसे मिळत नाही असे सांगितले. सभापती महोदय, महापौरांबरोबर दूरध्वनीवर माझे बोलणे झाल्यानंतर एम.आय.डी.सी. कडे किती पाणी उपलब्ध आहे आणि त्यातील किती कोटा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेसाठी मंजूर केलेला आहे याशिवाय अतिरिक्त पाणी कसे देता येईल या संदर्भात एम.आय.डी.सी. आणि महानगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांची एक बैठक आयोजित करण्याच्या सूचना मी पाणी पुरवठा विभागाला दिलेल्या आहेत. महापौरांवर कोणत्याही पध्दतीने लाठीचार्ज झालेला नाही. तसेच, महापौर आणि तेथील नगरसेवकांची पोलिसांबद्दल कोणतीही तक्रार नाही. सभापती महोदय, त्यांच्याबरोबर गेलेल्या कार्यकर्त्यांनी काही मोडतोड केल्याबद्दल 5 लोकांवर गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. तसेच, संबंधित अधिकाऱ्यांनी अवमान केला म्हणून महापौरांनी केलेल्या तक्रारींची दखल पोलिसांनी घेतली आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मी स्वत: सन्माननीय महापौरांशी बोललो आहे. त्यांनी मला फोनवर सांगितलेल्या माहितीप्रमाणे त्यांना मारहाण झाली ही वस्तुस्थिती आहे. त्याठिकाणी काही मोडतोड केल्यामुळे तेथील वातावरण चिघळले अशातला भाग नव्हता. तेथील संबंधित अधिकाऱ्यांनी महापौरांचा अपमान केला, आणि अरेरावीच्या भाषेमध्ये ते अधिकारी महापौरांशी बोलले. हे सर्वपक्षीय शिष्टमंडळ असल्यामुळे महापौरांचा झालेला अवमान सहन न झाल्यामुळे तो मॉब नंतर हिंसक झाला हे खरे आहे. त्यामुळे त्याठिकाणी कार्यकर्त्यांनी मोडतोड केल्यामुळे पोलिसांनी लाठीचार्ज केला असे झाले नाही. महापौरांना मारहाण झाली आहे व त्यांना पाच टाकेही पडले आहेत ही वस्तुस्थिती आहे.त्यामुळे या संदर्भात आपण अधिक माहिती घ्यावी अशी मी माननीय गृहमंत्र्यांना विनंती करतो.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, महापौरांच्या करंगळीला थोडेसे खरचटले आहे म्हणून करंगळीवर लाठीचार्ज होऊ शकत नाही. त्यांनी मान्य केले आहे की, पोलिसांनी कोणत्याही पध्दतीचा लाठीचार्ज केलेला नाही. त्या अधिकाऱ्यांना मारहाण होऊ नये म्हणून पोलिसांनी त्या अधिकाऱ्यांच्या भोवती काठया धरुन कडे केले होते. ते कडे रेटून जाण्याचा प्रयत्न संबंधित लोक करीत होते. त्यावेळी त्याठिकाणी दोन-दोन काठया धरलेल्या असल्यामुळे कुठेतरी काठी लागली असण्याची शक्यता आहे, परंतु ती लाठीचार्जमुळे लागलेली नाही. काठी पाठीमागे दाबत असतांना कुठेतरी खरचटले आहे. यापेक्षा यामध्ये काहीही गंभीर नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा आजच संपवावयाची आहे असे निर्देश आहेत. त्यामुळे दोन्ही सन्माननीय सदस्यांनी पाच-पाच मिनिटामध्ये आपले भाषण पूर्ण करावे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आता माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी घटनेच्या बाबतीत वस्तुस्थिती सांगितलेली आहे. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनीही माहिती सांगितली आहे. त्यामुळे याबाबतीत कोणावर विश्वास ठेवावयाचा हा प्रश्न आहे.

**उप सभापती** : मी या घटनेच्या विषयी स्वत: जातीने चौकशी करुन त्याबाबत सोमवारी माहिती सांगेन.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आमचा दोघांवरही विश्वास आहे. पण प्रश्न असा आहे की, याठिकाणी वस्तुस्थितीमध्ये तफावत असल्याचे दिसत आहे. त्यामुळे काय निर्णय घ्यावयाचा, आम्ही कोणालाही सर्टीफीकेट देऊ शकत नाही.

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांना सांगू इच्छितो की, असे प्रकार बऱ्याच वेळेला घडले होते आणि त्यावेळी मी स्वत: त्याबाबत माहिती घेऊन सभागृहापुढे ठेवली होती. याठिकाणी आदरणीय गृह मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे.त्यांनीही संबंधितांकडे विचारणा केली आहे.मी देखील ठाणे जिल्ह्यातील आहे.त्यामुळे मी या घटनेबाबत माननीय महापौरांशी स्वत: बोलतो आणि मग सोमवारी आपल्याला माहिती देतो.

डॉ.नीलम गोऱ्हे : ठीक आहे. धन्यवाद.

-----

. . . .4 टी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

**मु.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

(चर्चा पुढे सुरु)

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाबाबत माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाबाबत या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी आपले मनोगत व्यक्त केलेले आहे,आपले विचार मांडलेले आहेत. मी या विषयाच्या अनुषंगाने यासंबंधातील काही मुद्दे सांगून पाच मिनिटांमध्ये माझे मनोगत संपविणार आहे. याठिकाणी सन्माननीय राज्यपाल महोदयांनी अभिभाषण केलेले आहे. आपण दररोज वर्तमानपत्रा मध्ये वेगवेगळया प्रकारच्या भ्रष्टाचाराच्या घटना, गुन्हेगारी स्वरुपाच्या घटना, वेगवेगळया क्षेत्रामध्ये जी नफेखोरी होत आहे इ.स्वरुपाच्या वाचत आहोत. त्यामुळे आज जे संपूर्ण वातावरण बिघडलेले आहे. ते रोखण्यासाठी कोणत्या प्रकारची उपाययोजना शासन करणार आहे याचा सन्माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये उल्लेख नाही.

सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यामध्ये सहा ते सात महानगरपालिका आहेत आणि राज्यातील हा सर्वात मोठा जिल्हा आहे. गेल्या अनेक वर्षापासून या जिल्ह्याच्या विभाजनाचा प्रश्न शासन स्तरावर प्रलंबित आहे. आम्हाला अशी अपेक्षा होती की, किमान यावर्षीच्या अभिभाषणामध्ये जिल्हा विभाजनाचा प्रश्न मार्गी लागेल. पण त्याबाबतीत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये कुठेही उल्लेख करण्यात आलेला नाही. बदलापूर, अंबरनाथ आणि इतर ज्या नगरपालिका आहेत, पण या सर्व नगरपालिकांची लोकसंख्या विचारात घेता तेथे महानगरपालिका होणे अपेक्षित आहे. याबाबतीत तेथील लोकांची मागणी आहे. जर नगरपालिकांची महानगरपालिका झाली तर तेथे खऱ्या अर्थाने सुविधा मिळू शकतील. यासंदर्भातील कोणताही उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणा मध्ये नाही. या राज्याचे करोडो रुपये महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये गोरगरिबांना पाणी देण्यासाठी खर्च होतात आणि हा महाराष्ट्र टँकरमुक्त होण्यासाठी वेगवेगळया प्रकारच्या उपाययोजना करण्याबाबतची घोषणा केली जाते. पण खऱ्या अर्थाने पिण्याच्या पाण्यावर होणारा खर्च वाचविण्यासाठी आणि महाराष्ट्र टँकरमुक्त होण्यासाठी वेगळया प्रकारची योजना करण्याची आवश्यकता आहे. त्याबाबत देखील उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये नाही.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, शिक्षण क्षेत्राचा विचार केला तर सर्वांना शिक्षणाचा हक्क मिळालेला आहे आणि या संदर्भात केंद्र शासनाने जो कायदा केलेला आहे, तो आपण आपल्या राज्यामध्ये लागू केलेला आहे. पण या कायद्याच्या अनुषंगाने त्यासंबंधात काही नियमावली तयार होणे आवश्यक आहे, त्याबाबत काही नियोजन व्हावयास हवे आणि आपण कोणत्या पध्दतीने ही योजना राबविणार आहोत तशा प्रकारचा कोणताही उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये नाही. पण आम्हाला अपेक्षा होती की, अधिवेशनाच्या कालावधीमध्ये तरी हा विषय चर्चेसाठी येईल. परंतु मागच्या अधिवेशनामध्ये देखील हा विषय चर्चेसाठी आलेला नाही आणि सध्या जे अधिवेशन सुरु आहे, त्यावेळी तरी हा विषय चर्चेसाठी येईल की नाही अशी शंका आहे. पण त्याचा कुठेतरी उल्लेख होणे आवश्यक होते.

सभापती महोदय, राज्यातील बेरोजगारी दूर करण्याच्या बाबतीत ठोस अशा प्रकारची उपाययोजना माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये नाही. आज राज्यातील जी सर्वात महत्वाची समस्या आहे आणि जर भविष्यकाळाचा विचार केला तर वाहतुकीची समस्या गंभीर होत आहे. रस्त्यांची दुरावस्था होत आहे. दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढत असून पुरेशी पार्कींगची सोय नाही. त्यामुळे हा विषय देखील अडचणीचा आहे. पण नजिकच्या भविष्य काळाचा विचार करता या सर्व गोष्टी आपल्याला फार अडचणीच्या ठरणार आहेत. त्यामुळे या बाबतीत विशिष्ट धोरण ठरविण्याची आवश्यकता आहे. मग ते वाहनांच्या संदर्भात असेल, रस्त्यांच्या संदर्भात असेल किंवा पार्कींगच्या संदर्भात असेल, या बाबतीत देखील अभिभाषणामध्ये विचार होणे अपेक्षित होते. परंतु तसे झालेले नाही.

सभापती महोदय, शाळांच्या बाबतीत सांगावयाचे तर सर्व शाळांचे वेतनेतर अनुदान बंद केलेले आहे. शासनाने ते अनुदान देण्याच्या बाबतीत घोषणा केली परंतु त्याविषयी अभिभाषणामध्ये कोणताही उल्लेख केलेला नाही. वाचन संस्कृतीचा विकास व्हावा म्हणून ग्रंथपालांच्या बाबतीत चर्चा झाली. या सभागृहामध्ये सर्व पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी एकमुखी मागणी केली होती की, शाळांमधील ग्रंथालये ही सर्वसामान्य जनतेसाठी खुली करावीत.

यानंतर कु.थोरात . . ..

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री रामनाथ मोते.....

तसेच त्या ठिकाणी काम करणाऱ्या माणसाला पुरेसे वेतन देण्यात यावे, पुरेसे पेन्शन देण्यात यावे, सेवानिवृत्तीचे लाभ देण्यात यावेत आणि अन्य काही सुविधा देण्यात याव्यात याचा कोणताही विचार शासनाने केलेला नाही. जवळ जवळ एक हजार पेक्षा जास्त ग्रंथपाल या राज्यामध्ये अर्ध-वेळ काम करीत आहेत.

सभापती महोदय, ग्रामीण भागामध्ये महाविद्यालय सुरु करण्याची आवश्यकता आहे. शासनाने ग्रामीण भागामध्ये महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे. पण एकूणच शासनाच्या धोरणानुसार या महाविद्यालयास कायम विनाअनुदान तत्वावर परवानगी दिली जाते. ही ग्रामीण भागातील महाविद्यालये असल्यामुळे या महाविद्यालयांमध्ये अत्यंत कष्टकऱ्यांची मुले, गोरगरिबांची मुले, शेतकऱ्यांची मुले शिक्षण घेत आहेत. या मुलांना खऱ्या अर्थाने लाभ मिळण्यासाठी ग्रामीण भागातील महाविद्यालयांना अनुदान देण्याची आवश्यकता आहे परंतु यासंदर्भात माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख करण्यात आलेला नाही. या राज्यामध्ये दिनांक 1 नोव्हेंबर, 2005 नंतर नोकरीत लागलेल्या, त्यापूर्वी नोकरीत लागलेल्या आणि त्यानंतर नियमित वेतनावर नोकरीत लागलेल्या शिक्षकांच्या आणि अन्य कर्मचाऱ्यांच्या पेन्शन योजनेच्या संदर्भातील निकाल न्यायालयाने दिलेला आहे. एक-दोन नाही तर किमान 80 प्रकरणांमध्ये मुंबई उच्च न्यायालयाने, औरंगाबाद खंडपीठाने, नागपूर खंडपीठाने निर्णय दिलेला असतानांही शासनाने यासंदर्भात कोणत्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या बाबतीत गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आम्ही शाहू, फुले, आंबेडकरांचे नाव घेतो. मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी वेगवेगळया योजना राबविण्यात येतात. मागासवर्गीय विद्यार्थ्यांना लाभ देण्यासाठी करोडो रुपये खर्च करण्यात येतात ही वस्तुस्थिती आहे. परंतु आज मागासवर्गीय विद्यार्थी विना अनुदानित शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत, या विद्यार्थ्यांचे शिक्षणशुल्क आतापर्यंत शासनाकडून भरले जात होते परंतु आता या शिक्षण शुल्काची प्रतिपूर्ती करण्याचे शासनाने बंद केलेले आहे. यासंदर्भात एक समिती गठित करण्यात आली होती परंतु अद्यापही याबाबतीतील निर्णय घेण्यात आलेला नाही. त्यामुळे संस्था चालक या विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्क वसूल करीत

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते....

आहे. काही ठिकाणी तर पालकांकडून जबरदस्तीने हे शुल्क वसूल करण्याच्या घटना घडत आहेत. म्हणून या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना न्याय देण्याच्या भूमिकेतून शासनाने या मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क माफ करण्याच्या संदर्भात काही तरी ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये अनेक व्यक्तींनी हौतात्म्य पत्करलेले आहे. या महाराष्ट्र निर्मितीच्या इतिहासाची माहिती सर्वसामान्य विद्यार्थ्यांना, पालकांना आणि भावी पिढीला व्हावी यादृष्टिकोनातून हा इतिहास विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमामध्ये समाविष्ट करण्यात यावा, यासंदर्भात सर्वसामान्य माणसांकडून मागणी करण्यात येत आहे. परंतु या संदर्भात कोणताही निर्णय झालेला नाही.

सभापती महोदय, माननीय राज्यपालाच्या अभिभाषणात जात पडताळणी संबंधातील उल्लेख करण्यात आलेला आहे. यासंदर्भात संगणकीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. हा एक चांगला निर्णय आहे. त्याबद्दल खरोखरच शासनाला धन्यवाद द्यावे लागतील पण जात पडताळणी विभागातील प्रकरणे वेळेवर निकाली काढली जात नाहीत. ही प्रकरणे वेळेवर निकाली काढून मागासवर्गीयांना दिलासा देण्याच्या दृष्टिकोनातून यामध्ये काही सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, काही दिवसापूर्वी कोकण भवन येथे पैसे घेत असताना अधिकाऱ्यांला पकडण्यात आले होते. असे प्रकार वारंवार होत आहेत. असे प्रकार केवळ एकाच विभागात होत आहेत असे नाही तर सर्व जिल्ह्यांमध्ये सातत्याने होत आहेत. त्यामुळे असे प्रकार रोखण्यासाठी आणि संबंधितांना जात पडताळणी प्रमाणपत्र वेळेवर मिळण्यासाठी यामध्ये योग्य त्या सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, बंद पडलेल्या गिरणी कामगारांना घरे देण्याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात आहे. गिरणी कामगारांच्या प्रश्नावर या सभागृहात अनेक वेळा चर्चा झालेली आहे. या गिरणी कामगारांच्या मुलांना प्रशिक्षण देण्याच्या संदर्भात आणि नोकरी देण्याच्या संदर्भात शासनाने सकारात्मक भूमिका घेऊन उपाययोजना करण्याचे आश्वासन देण्यात आलेले आहे परंतु त्यासंदर्भात कार्यवाही झालेली नाही. गिरणी कामगारांना घरे दिलीच पाहिजेत त्याचबरोबर गिरणी कामगारांच्या मुलांना नोकरी देण्याच्या संदर्भात आणि प्रशिक्षण देण्याच्या

..3..



SMT/ KTG/ KGS/ 18:40

श्री रामनाथ मोते.....

संदर्भात शासनाने उपाययोजना कराव्यात अशा प्रकारची विनंती करतो. सभापती महोदय,शेवटचा मुद्दा मांडून मी माझे भाषण पूर्ण करणार आहे.

सभापती महोदय, आदरणीय श्री. आबा यांना हा विषय चांगल्या प्रकारे माहीत आहे. या विषयाच्या संदर्भात आम्ही सभागृहात बोलतो तसेच सभागृहाच्या बाहेरही बोलतो. या राज्यामध्ये "शिक्षण सेवक योजनेच्या" संदर्भात शासनाने फेर विचार करण्याची आवश्यकता आहे. त्यांचे मानधन वाढविण्याची आवश्यकता आहे. ही योजना अन्य राज्यामध्ये सुरु असली तरी महाराष्ट्र राज्याचा विचार केला तर अत्यंत तुटपुंज्या पगारावर हे शिक्षक काम करीत आहेत. एका बाजूला एक शिक्षक तीस हजार रुपये पगार घेतो तर दुसऱ्या बाजूला तेवढेच काम करणारा, तेवढीच पात्रता असणारा दुसरा शिक्षक तीन ते चार हजार रुपयावर काम करतो, हे चित्र किंवा ही परिस्थिती महाराष्ट्रासाठी भूषणावह नाही. म्हणून या शिक्षण सेवक योजनेचा फेर विचार करण्याची आवश्यकता आहे, एवढेच मुद्दे मी या निमित्ताने मांडून माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

----

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल....

कोणी मार खाल्ला नाही, कोणी जेलमध्ये गेले नाही. परंतु निर्यात बंद होऊन आयात सुरु झाली. त्यामुळे कांद्याचे भाव कोसळून दीड रुपये किलो, दोन रुपये किलो पर्यंत आले. त्याबाबत कोणीच बोलण्यास तयार नसल्यामुळे मला त्या शेतकऱ्यांची कीव आली. मी पिंपळगांव-बसमत येथे गेल्यावर 25-30 कि.मी.पर्यंत रस्ता बंद आंदोलन केले. याशिवाय आम्ही काय करणार, आमच्या हातामध्ये दुसरे कोणतेही शस्त्र नाही. कांद्याचे भाव कोसळले असताना कोणत्याही राजकीय पक्षाचे पुढारी बोलण्यास तयार नव्हते. नाशिक जिल्ह्यात मोठमोठे पुढारी आहेत, पुणे जिल्ह्यात मोठमोठे पुढारी आहेत त्यांच्यापैकी कोणीही पुढाकार घेण्यास तयार नव्हते. लोकांचे असे म्हणणे होते की, राज्याचे अधिवेशन सुरु असताना या प्रश्नावर कोणी तरी आवाज उठविला पाहिजे होता. त्या गावातील लोकांना असे वाटत होते की, अधिवेशन सुरु आहे, आम्ही सुशिक्षित सदस्यांना निवडून पाठविले आहे, त्यापैकी कोणी तरी या विषयावर बोलले पाहिजे. पण येथे या विषयावर कोणीच बोलण्यास तयार नसतील तर त्यांना काय वाटत असेल ? म्हणून निवडणुकीच्या वेळी ज्या भानगडी होतात त्या टाळावयाच्या असतील तर एका गोष्टीचा विचार होणे आवश्यक आहे. कांद्याचे भाव वाढल्यानंतर खाणारे मेले नाहीत, पण भाव पडल्यानंतर त्याचा खर्च भरुन निघाला नाही म्हणून शेतकरी मेले. खरे तर सरकारने मरणाऱ्याची बाजू घ्यावयास पाहिजे होती. पण न मरणाऱ्याची बाजू घेऊन मुंबईत बसून निर्णय घेऊ लागलो तर हे बरोबर नाही.

सभापती महोदय, कापसाच्या संदर्भामध्ये अभिभाषणामध्ये असे नमूद केले आहे की, "राज्यात उत्पादित होणाऱ्या संपूर्ण कापसावर सर्व प्रक्रिया राज्यातच केल्यास जवळपास 10 लाख व्यक्तींसाठी रोजगाराच्या संधी निर्माण होतील." हे नवीन आहे का ? 1972 साली स्व.यशवंतराव मोहिते साहेबांनी कापूस एकाधिकार खरेदी योजना सुरु केली. कापसापासून कापडापर्यंत अशी या योजनेची संकल्पना होती, परंतु आज कापसापासून जिनिंगपर्यंतच आपण अडकून बसलो आहोत. कापूस आमच्या भागात पिकतो, पण सूत गिरण्या मात्र दुसऱ्या भागात सुरु झाल्या. पुन्हा शिळ्या कढीला ऊत आणणार असाल तर आम्हाला ते खरे वाटणार आहे का ? सरकारने एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे. यावर्षी चीनमध्ये दुष्काळ आहे. पाकिस्तानमध्ये दुष्काळ आहे. चीनमध्ये





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल....

6,500 रुपये प्रति क्विंटल या भावाने कापूस खरेदी करीत आहे. चीन हा देश संपूर्ण जगाला स्वस्तात कापड देणार आहे. हे सर्व जग बघत आहे. आम्ही केंद्र सरकारकडे कापसाच्या निर्यातीची मागणी केल्यावरही कापसाची निर्यात होऊ शकली नाही. त्यामुळे 3500 ते 3700 प्रति क्विंटल या भावाने शेतकऱ्यांनी कापूस विकला आहे. या भावाने सर्व शेतकऱ्यांनी आपल्या घरातील कापसाची विक्री केल्यावर केंद्र शासनाने कापसाच्या निर्यातीची घोषणा केली. परंतु त्यासाठी 55 लाख गाठींची मर्यादा घालून 15 डिसेंबरपर्यंत निर्यात सुरु राहील सांगितले आहे. त्यानंतर केवळ 22 लाख गाठींची निर्यात होऊ शकली. आता पुन्हा कापसाची निर्यात थांबली आहे. कारण 26 फेब्रुवारीपर्यंत निर्यातीची मुदत होती. आता पुन्हा कापसाचे भाव पडले आहेत. म्हणजे माझ्या घरातील कापूस 3500 ते 4000 हजार रुपये भावाने विकला आहे. इतक्या कमी भावाने कापसाची खरेदी करुन चीनमध्ये 6500 रुपये भावाने विकत आहे. म्हणजे शेतकऱ्यांनी वर्षभर मेहनत करुन 3500 रुपये दराने कापूस विकावयाचा आणि व्यापारी तोच कापूस 6500-7000 रुपये भावाने विकत असतील तर या देशातील शेतकऱ्यांचे काय होणार आहे, या देशाचे काय होणार आहे ? मग शासन कशासाठी या अभिभाषणामध्ये शेतकऱ्यांसाठी सहानुभूती दाखवीत आहे. तो मरणार आहे. ही वस्तुस्थिती असताना सरकारची मदत आली की ती विदर्भामध्ये द्यावी असे सांगावयाचे. ज्या भागामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत त्याच भागामध्ये कापूस पिकत आहे. त्यांचीशी अशी विल्हेवाट लावली जात असेल तर देवच तुमचे भले करो.

मी शासनाच्या माहितीसाठी सांगतो की, देशामध्ये 325 कोटी कापसाच्या गाठींचे उत्पादन झ ाालेले आहे. 2.25 कोटी गाठींची देशाची गरज आहे. देशाची गरज भागवून एक कोटी गाठी निर्यात करु शकतो. मग 55 लाख गाठींसाठीच निर्यात करण्याची परवानगी का दिली जात आहे ? शासन कोणाच्या दबावाला बळी पडत आहे. आपण सर्वजण शेतकऱ्यांची मुले असताना मिल मालकांच्या बाजूने बोलत असू तर शेतकऱ्यांचे कधीच भले होणार नाही. त्यामुळे शासनाने आमच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम करु नये. कापसावर सर्व प्रक्रिया राज्यातच सुरु होणार असेल, हे धोरण ईमानदारीने राबविले जाणार असेल तर शासनाने याबाबत बोलावे. अन्यथा, मला याबाबत खरे वाटणार नाही.

3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल....

सभापती महोदय, राज्यात 6 लाख मेट्रिक टन खताचा साठा केला जाणार आहे. गेल्या वर्षी शेतकरी खते मागण्यासाठी गेले होते तेव्हा त्यांना मारहाण करण्यात आली होती. यावर्षी काय केले जाणार आहे ते शासनाने सांगावे. यावर्षी शासनाने पुन्हा खतांचे भाव वाढविलेले आहेत. म्हणजे शेतकऱ्यांच्या मालाचे भाव खाली आणि त्यासाठी लागणाऱ्या साहित्याचे भाव मात्र वर गेले आहेत. शासनाने कापसाचे वाटोळे केले आहे तसे ऊसाच्या संदर्भामध्ये सरकारचे प्रतिनिधी, शेतकरी संघटनेतील लोक, मी स्वत: पुणे येथे झालेल्या बैठकीच्या वेळी उपस्थित होतो. त्यातून मार्ग निघाला होता. गेल्या वर्षी 2200 रुपये प्रति टन दर ऊसाला मिळाला होता. पण यावर्षी जर 1400 रुपये दर दिला जात असेल तर शेतकरी जगेल की मरेल ? राज्य सरकारने मध्यस्थी करुन कोल्हापूर व सांगली जिल्ह्यातील ऊसाला 1800 रुपये देण्याचे ठरले. सोलापूर, नगर व पुणे या जिल्ह्यांना सुध्दा 1800 रुपये देण्याचे ठरले व उर्वरित महाराष्ट्रातील ऊसाला 1750 रुपये भाव देण्याचे ठरल्यावर 1400 रुपये भाव दिला असेल व हा दर वाढवून मिळणार नसेल तर काय होणार आहे ? जगामध्ये साखरेला भाव चांगला मिळत आहे, जगामध्ये साखरेला मागणी आहे. फक्त साखरेच्या निर्यातीची मागणी करु शकत नाही. म्हणजे साखरेची निर्यात, कापसाची निर्यात, कांद्याची निर्यात या सगळया गोष्टी स्वीकारुन शेतकऱ्यांना मारण्याचे ठरविले आहे.

यानंतर श्री.शिगम.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 18:55

श्री. पाशा पटेल...

ऊस उत्पादक शेतक-यांनी आता काय करायचे हा महत्वाचा प्रश्न आहे. अल्पसंख्याकांच्या बाबतीत या अभिभाषणामध्ये आणखी एक सहानुभूती दाखविण्यात आलेली आहे ही चांगली गोष्ट आहे. अल्पसंख्याकांच्या मुलांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. पूर्वी शिष्यवृत्ती मिळत नव्हती म्हणून मुले शाळेत जात नव्हती. या वर्षी पॉलिटेक्निक शिक्षणासाठी 14 हजार अर्ज आलेले आहेत आणि शिष्यवृत्ती मात्र 10 हजार मुलांना देण्यात येणार आहे. आणखी 4 हजार मुलांना शिष्यवृत्ती दिली तर शासनावर फार मोठा आर्थिक बोजा पडणार नाही. अल्पसंख्याकांच्या मुलांना शिष्यवृत्ती दिल्यामुळे त्यांच्यात शिक्षणाचे प्रमाण वाढून जर गुन्हेगारी कमी होणार असेल तर आपण आनंद व्यक्त केला पाहिजे. एवढ्या मोठ्या सरकारला या 4 हजार मुलांचे जास्त ओझे होणार नाही. बाकीच्या मागासवर्गीय समाजातील मुलांसाठी जे निकष लावले जातात तेच निकष अल्पसंख्यांकांच्या मुलांच्या बाबतीत लावले पाहिजेत असे माझ्यासारख्या कार्यकर्त्याला वाटते.

सभापती महोदय, माझा शेवटचा मुद्दा मांडून मी माझे भाषण संपविणार आहे. आतापर्यन्त कापूस पिकविणारा, सोयाबीन पिकविणारा शेतकरी आत्महत्या करायचा. पण आता द्राक्ष बागायतदार देखील आत्महत्या करायला लागला आहे. माझ्याकडे सप्टेंबर 2009चे मॅगेझीन आहे. या मॅगझीनच्या मुखपत्रावर "आता नंबर आमचा" असे नमूद केलेले आहे आणि त्यावर्षी द्राक्ष बागायतदाराने आत्महत्या केली. सभापती महोदय, तुमची माफी मागून मी एक गोष्ट येथे सांगू इच्छितो की, आम्ही आपणाकडे एक अर्ज केला होता की नाशिक जिल्ह्यामध्ये द्राक्ष उत्पादक शेतक-यांची द्राक्षे करार करुन घेतली जात नाहीत. त्याबाबतीत चौकशी करावी अशी आम्ही आपणास विनंती केलेली होती. त्या अर्जाच्या बाबतीत थोडी जरी अंमलबजावणी झाली असती तरी नाशिक जिल्ह्यातील द्राक्ष उत्पादक शेतक-यांनी आपणास दुवा दिला असता. मी अजूनही आपणास नम्र विनंती करतो की, कुठे तरी, कुणी तरी शेतक-याची बाजू घ्यावी. आपलेच लोक द्राक्ष उत्पादक आणि आपलेच लोक कारखानदार आहेत म्हणून कारखानदाराची बाजू आपण घेऊ नका. कारण एक मेला तरी हरकत नाही पण लाख मरु नयेत अशी भूमिका घ्यावी लागेल. सभापती महोदय, राज्यपालांच्या अभिभाषणावर काय बोलावे. "माझ्या तोंडी ब-याच गोष्टी घालण्यात आलेल्या आहेत.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल....

प्रत्यक्षात काय काय केले ते दाखवा" असे राज्यपाल म्हणाल्याचे "मुंबई मिरर" या इंग्रजी दैनिकामध्ये छापून आलेले आहे. माननीय राज्यपालांनाच प्रश्न पडलेला असल्यामुळे मी देखील या अभिभाषणाबद्दल काय बोलावे असा प्रश्न मला पडलेला आहे. त्यामुळे हे सगळे खोटे खोटे चालले आहे की काय असे वाटायला लागले आहे. म्हणून या सर्व गोष्टींचा खेद व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

**उप सभापती** : आता माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या चर्चेवरील सर्व सन्माननीय सदस्यांची भाषणे संपलेली आहेत. सोमवार, दिनांक 21 मार्च 2011 रोजी या चर्चेला उत्तर देण्यात येईल.

सभा□ृहापुढील □म□ज संपलेले आहे. सभा□ृहाची बैठ□ आता स्थ□ि□ होऊन सोमवार दिनांक 21 मार्च 2011 रोजी स□ळी 11.00 वाजता पुन: भरेल.

सकाळी 11.00 ते 12.45 या वेळेत अर्धा-तास चर्चेच्या सूचना चर्चेसाठी घेण्यात येतील. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 1.00 वाजता पुन: भरेल.

( सभा□ृहाची बैठ□ सायंकाळी 6 वाजून 58 मिनिटांनी, सोमवार, दिनांक 21 मार्च 2011 रोजीच्या स□ळी 11.00 वाजेपर्यत स्थ□ि□ झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही